म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ८८

# शिक्षक आणि शिक्षण.

म. का. कारखानीस.

किंमत दीड रुपया.

REFBK-0001630

Presented to
The Marathi
Granth Sangra
halaya by
M. K. Karkhanis

Poona city
28 Shanwar
15/6/19

संग्रहालय
रजिस्टर ३९२
392
REFBK-0001630
९३० क्रमांक

# शिक्षक आणि शिक्षण.

लेखकः

महादेव काशिनाथ कारखानीस, बी. ए.
शिक्षक ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें.

१९१९.

किंमत १॥ रु.

हें पुस्तक पुणें येथें रा. **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं 'आर्यभूषण'
छापखान्यांत छापिलें व रा. **महादेव काशिनाथ कारखानीस**
यांनीं पुणें पेठ शनवार घर नं. २ येथें प्रसिद्ध केलें.

# अनुक्रमणिका.

**भाग १ ला–शिक्षणाचा उद्देश.** माळी व शिक्षक यांचें साम्य. शारीरिक व मानसिक शक्ति बीजरूपानें मुलांत असतात. त्यांना योग्य व हितकर व्यायाम देऊन त्यांचा विकास करणें हेंच शिक्षण होय. शिक्षणानें मुलांची शरीरसंपत्ति सुधारली पाहिजे, त्यांच्या बुद्धीचा विकास झाला पाहिजे व त्यांचें शील बनलें पाहिजे. आयुष्यांतील कर्तव्यें करण्याची पात्रता त्यांचे आंगीं आली पाहिजे. गृहशिक्षण आणि शाळेंतील शिक्षण. निरनिराळे विषय शिकविण्याची आवश्यकता. ज्ञान मिळवितांना मुलांच्या बुद्धीला व्यवसाय मिळाला पाहिजे. परीक्षा पास होणें हें शिक्षणाचें ध्येय नव्हे. शिक्षकाचें कर्तव्य. पानें १-९.

**भाग २ रा–बौद्धिक शिक्षण.** मनाचें स्वरूप. ज्ञान, भावना व प्रवृत्ति हे मनाचे तीन व्यापार आहेत. हे तिन्ही व्यापार एकमेकांत गुरफटलेले असतात. शरीर आणि मन यांचा परस्पर संबंध. अवधान. अवधानाचे दोन प्रकार. मुलांच्या मनाचा विकास कसा होतो. ज्ञानेंद्रियें व त्यांचें शिक्षण. शिक्षकाला शाळेंत मुलांच्या ज्ञानेंद्रियांना शिक्षण कसें देतां येईल. पानें १०-१८.

**भाग ३ रा–स्मरणशक्ति.** ग्रहण, धारण व स्मरण या तीन क्रियांवर स्मरणशक्ति अवलंबून असते. साहचर्य. साहचर्याचे दोन प्रकार. साहचर्याचा उपयोग. मुलांच्या स्मरणशक्तीचा विकास कसा करावा. पानें १९-२४.

**भाग ४ था–कल्पनाशक्ति.** ज्ञानार्जनाचे कामीं कल्पनाशक्तीची आवश्यकता. कल्पनाशक्तीचें कार्य. बौद्धिक व भावनोत्पादक कल्पनाशक्ति. लहानपणीं कल्पनाशक्तीचा उदय होतो. मुलांच्या खेळांत दिसून येणारी त्यांची कल्पनाशक्ति. लहान मुलांना गोष्टी सांगण्याचा हेतु. कल्पनाशक्ति व भीति. लहान मुलांचा भित्रा स्वभाव. मुलांच्या कल्पनाशक्तीची वाढ कशी करावी. पानें २५-३१.

**भाग ५ वा–सामान्यबोधशक्ति.** स्मरणशक्ति, कल्पनाशक्ति व सामान्यबोधशक्ति यांतील भेद. विशेष ज्ञान व सामान्य ज्ञान. लहानपणीं सामान्यबोधशक्ति कमी असते. मुलांना व्याख्या कशा शिकवाव्या. शाळेंत मुलांच्या सामान्यबोधशक्तीचा विकास कसा करावा. पानें ३२-३५.

**भाग ६ वा-निर्णय व अनुमान.** पशु, पक्षी आणि मनुष्यें यांच्या मानसिक शक्तींमधील भेद. सामान्यबोध. निर्णय व अनुमान या विचाराच्या तीन पायऱ्या आहेत. निर्णयाचें स्वरूप. मुलांच्या निर्णयशक्तीची वाढ. अनुमान. अनुमानाचे दोन प्रकार, १ उद्गामी २ अवगामी अनुमान. दोन्ही प्रकारांचीं उदाहरणें. मुलांचीं अनुमानें कां चुकतात. कोणत्या विषयांच्या अध्ययनानें मुलांची अनुमानशक्ति वाढते. पानें ३६–४१.

**भाग ७ वा–भावना.** भावनांचें स्वरूप. शिक्षकाला भावनांचें ज्ञान असण्याची आवश्यकता. मुलांच्या बुद्धीच्या विकासाचे कामीं मुलांच्या भावनांचा शिक्षकाला उपयोग. शील हें भावनांवर अवलंबून असतें. भावनांचें शिक्षण. अहंपर, सामाजिक व उच्च असे भावनांचे तीन प्रकार. अहंपर भावनाः--भीति, राग, कृतिप्रेम, स्पर्धा व स्तुतिप्रियता. अहंपर भावनांची लहानपणीं आवश्यकता. पानें ४२–४७.

**भाग ८ वा–सामाजिक भावना.** सामाजिक भावनांचें स्वरूप, सहानुभूति. मुलांच्या सहानुभूतीचा विकास कसा करावा. बौद्धिक विकासाबरोबर सहानुभूतीचें क्षेत्र वाढतें. पानें ४८–५१.

**भाग ९ वा–उच्चभावना.** उच्चभावनांचे तीन प्रकार. बौद्धिक उच्चभावनांपैकीं मुख्य दोन भावना, जिज्ञासा व कुतूहल. त्यांचें महत्त्व. शाळेंतील अभ्यासक्रमानें या भावना, दबून जाण्याची भीति असते. शिक्षकानें मुलांच्या या भावनांचा विकास कसा करावा. सौंदर्यविषयक भावना व त्यांचें स्वरूप. बुद्धीच्या विकासावर या भावना अवलंबून असतात. सौंदर्यविषयक भावनांपासून होणारा आनंद. त्या भावनांचा विकास कसा करावा. पानें ५२-५६.

**भाग १० वा–नैतिक उच्चभावना.** नैतिक भावनांचें स्वरूप. या भावना उत्पन्न होण्याला विचारशक्तीचा विकास व्हावा लागतो. गृहशिक्षण व नैतिक भावना. शाळेंतील शिस्त व नैतिक भावना. या भावनांचा विकास शाळेंत कसा करितां येईल. पानें ५७–६०.

**भाग ११ वा–प्रवृत्ति.** हेतु, क्रियेचें ज्ञान व ऐच्छिक चलन या तिन्ही गोष्टी मनुष्यानें बुद्ध्या केलेल्या प्रत्येक कृतींत असतात. मुलांच्या प्रवर्तक शक्तीचा उदय व विकास कसा होतो. सहेतुक व अहेतुक क्रिया. प्रवर्तकशक्ति व संवय. पानें ६१ ६५.

**भाग १२ वा–प्रवर्तकशक्ति व संवय.** संवयीच्या योगानें होणारे फायदे. वाईट संवयीचे तोटे. शील व संवय यांचा परस्पर संबंध. संवय कशी लावावी. संवय कशी मोडावी. पानें ६६–७१.

**भाग १३ वा–प्रवर्तकशक्तीचें शिक्षण.** प्रवर्तकशक्तीच्या विकासाला चार गोष्टी अवश्य असतात. १ चांगल्या वाईटाचें ज्ञान. २ सदिच्छा अंत:करणांत पाहिजेत. ३ विचार करून योग्य मार्गानें जाण्याची संवय पाहिजे. ४ आत्मसंयमन करितां आलें पाहिजे. मुलांच्या पुढें उत्तम ध्येय ठेवण्याची आवश्यकता. मुलांच्या प्रवर्तकशक्तीवर शाळेंतील अभ्यासक्रमाचा व शिस्तीचा परिणाम. पानें ७२–७९.

**भाग १४ वा–नीतिशिक्षण.** नीतिशिक्षणाची आवश्यकता. नीतिशिक्षणांचें कार्य. नीतिशिक्षणाला गृहशिक्षणाची आवश्यकता. कुटुंब हें नीतिशिक्षणाची उत्तम शाळा आहे. मुलांच्या नीतिशिक्षणाचे कामीं सर्वस्वीं शिक्षकावर अवलंबून राहातां येणार नाहीं. शाळेंतील शिक्षणानें मुलांच्या आंगीं येणारे गुण. ज्यांना गृहशिक्षण नाहीं त्या मुलांना नीतिशिक्षण देण्याची जबाबदारी शाळेवर असते. नीतिशिक्षण कसें देतां येईल. १ शाळेंतील शिस्त. २ शिक्षकांचें वर्तन. ३ लोकापवादाची भीति. ४ खेळ. ५ कसरत व ड्रिल. ६ शाळेंतील अभ्यासक्रम. ७ धर्मशिक्षण. ८ थोर माणसांचीं चरित्रें. शाळेंतील दररोजची प्रार्थना. पानें ८०–८९.

**भाग १५ वा–शारीरिक शिक्षण.** आयुष्य सुखकर होण्यास व स्वतांचीं कर्तव्यें चांगल्या प्रकारें बजावतां येण्यास उत्तम शरीरसंपत्ति पाहिजे. शारीरिक शिक्षणाचे बाबतींत शिक्षकानें करावयाच्या तीन गोष्टी. १ अभ्यासक्रमानें व शाळेंतील व्यवस्थेनें मुलांच्या आरोग्यास अपाय न होईल याजबद्दल काळजी घेणें. २ मुलांची शरीरसंपत्ति सुधारण्यास खेळ, ड्रिल वगैरे उपायांची योजना. ३ मुलांचे हात, डोळे, वगैरे अवयवांना आपलें काम चांगल्या प्रकारें करितां यावें म्हणून हस्तव्यवसायाच्या कामाची योजना. वर्गाची व्यवस्था. मुलींच्या शारीरिक शिक्षणाचे बाबतींत पालकांची व शिक्षकांची अनास्था. खेळ हें मानसिक व शारीरिक शिक्षणाचें उत्कृष्ट साधन आहे. अगदीं लहान मुलांचा अभ्यासक्रम खेळाच्या स्वरूपाचा असावा. मनोरंजनाकरितां व विश्रांतीकरितां खेळावयाचे खेळ. व्यायामाकरितां व नैतिक शिक्षणाकरितां खेळावयाचे खेळ. ड्रिलपासून होणारे फायदे. ड्रिलचे प्रकार कसे शिकवावे. पानें ९०-९८.

**भाग १५ वा–शिक्षकाच्या आंगचे गुण.** १ आत्मसंयमन. २ कामावरील आसक्ति. ३ मुलांची आवड. ४ आनंदी वृत्ति. ५ सद्वर्तन. ६ प्रसंगावधान. ७ वाचनाचा व्यासंग. ८ पोषाकांतील साधेपणा. ९ शिक्षकाचा आवाज. १० शिक्षकाला गोष्टी सांगतां आल्या पाहिजेत. ११ शिक्षकाला समाजांत मिळून मिसळून वागतां आलें पाहिजे. पानें ९९-१०४.

**भाग १६ वा—वर्गांची जागा.** वर्गाची जागा स्वच्छ व सुशोभित ठेवावी. वर्गातील हवा व उजेड. डेस्क बाकें व फळा. वेळापत्रक. मुलांचा पदार्थसंग्रह. वर्गातील सामानाची मुलांनीं काळजी घेतली पाहिजे. मुलांनीं लिहितांना लेखण झटकूं नये. पानें १०५–१११.

**भाग १७ वा—शाळेंतील शिस्त.** शाळेच्या शिस्तीचा मुलांच्या वर्तनावर होणारा परिणाम. शाळेंत शिस्त नसल्यास मुलांना वाईट संवयी लागतात व अभ्यासही चांगला होत नाहीं. उत्तम शिस्तीनें शाळेंत मुलांचा व शिक्षकाचा काळ आनंदांत जातो. शिस्त राखण्यास शिक्षकाचे आंगीं अवश्य लागणारे गुणः- दृढता, दक्षता, व्यवहारचातुर्य व मनुष्यस्वभावाची पारख. शाळेंत नियम करितांना शिक्षकानें काळजी घेतली पाहिजे. या नियमांच्या बाबतींत शिक्षकानें लक्षांत ठेवावयाच्या गोष्टी. शिस्त राखण्याचा उत्तम उपाय म्हटला म्हणजे धडा मनोरंजक करणें हा होय. पानें ११२–११९.

**भाग १८ वा—शिक्षा.** बक्षिसें व शिक्षा हीं शिस्त राखण्याचीं गौण साधनें आहेत. शिक्षेची औषधाशीं तुलना. शिक्षा देण्याचे उद्देश. १ मुलांत सुधारणा व्हावी. २ अपराध केला किंवा नियमांचें उल्लंघन केलें कीं, शिक्षा ही व्हावयाचीच हें मुलांच्या मनावर बिंबवावें. शिक्षेच्या-संबंधानें ध्यानांत ठेवावयाच्या गोष्टी. १ अपराधाबरोबर शिक्षा ही खात्रीनें झालीच पाहिजे. २ अपराधाबद्दल शिक्षा करितेवेळीं शिक्षकाची समदृष्टि पाहिजे. ३ जितक्या सौम्य शिक्षेनें कार्यभाग होईल तितकें बरें. ४ एकच शिक्षा नेहमीं दिल्यानें तिचा इष्ट परिणाम होत नाहीं. ५ वर्गातील सर्व मुलांना एकदम एकादी शिक्षा केल्यानें तिचा विशेष उपयोग होत नाहीं. ६ बुद्धीच्या मंदपणाबद्दल किंवा हाताच्या जडपणाबद्दल शिक्षा कधींहि करूं नये. शिक्षेचे प्रकारः १ रागाची नजर. २ रागें भरणें. ३ उभें करणें. ४ मार्क कमी करणें. ५ नंबर खालीं देणें किंवा वर्गाबाहेर उभें करणें. ६ खेळाचे जागीं अगर पुस्तकालयांत जाऊं न देणें. ७ शाळा सुटल्यावर वर्गांत बसवून लिहून घेणें. ८ घरीं लिहावयास व पाठ करण्यास देणें. ९ शारीरिक शिक्षा. १० दंड. ११ कांहीं दिवस शाळेंतून घालवून देणें. १२ शाळेंतून नांव कमी करणें. प्रत्येक शिक्षेचे गुणावगुण. पानें १२० ते १२९.

**भाग १९ वा—बक्षिसें.** लहान मुलांना बक्षिसांची आवश्यकता. बक्षिसांचे प्रकारः १ पसंती दर्शविणारी नजर. २ शाब्दिक पसंती. ३ मार्क देणें. ४ वर्गांत मानाची जागा देणें. ५ पदकें, बिल्लें वगैरे देणें. ६ पुस्तकें, पैसे वगैरे देणें. बक्षिसांसंबंधानें शिक्षकानें ध्यानांत ठेवावयाच्या गोष्टी. १ बक्षिसें व प्रशंसा यांचा उपयोग जपून करावा. २ बक्षिसें नेहमींच बुद्धीच्या श्रेष्ठपणाबद्दल किंवा हाताच्या सफाईबद्दल देऊं नयेत. उत्तम वर्तनाबद्दलही द्यावीं. ३ बक्षिसें मोठ्या

किंमतीचीं नसावीं. ४ जसजशीं मुलें मोठीं होतील तसतशी बक्षिसांची संख्या कमी करावी. ५ कर्तव्य आहे तें बक्षिसाचे आशेशिवाय केलें पाहिजे, ही भावना मुलांत जागृत करावी. पानें १३० ते १३५.

**भाग २०–शिकविण्याचीं साधनें.** प्रश्न हें फार महत्त्वाचें शिकविण्याचें साधन आहे. प्रश्नांचे पांच उपयोग. प्रश्नांनीं १ मुलांचें पूर्व ज्ञान व पूर्व तयारी कळते. २ विचारशक्तीला व्यवसाय मिळून तिची वाढ होते. ३ मुलांना आपल्या प्रयत्नानें ज्ञान मिळविण्यास मदत करितां येते. ४ आपण शिकविलेला भाग मुलांना कितपत कळला हें शिक्षकाला समजतें. ५ धड्याची उजळणी घेतां येते, व महत्त्वाच्या मुद्द्यांकडे मुलांचें लक्ष वेधून घेतां येते. प्रश्नांचे दोन प्रकारः १ स्मरण-शक्तीला विशेष व्यवसाय देणारे २ विचारशक्तीला विशेष व्यवसाय देणारे. प्रश्न कसे असावेः १ प्रश्नांची भाषा सोपी, सरळ व सहज कळण्याजोगी असावी. प्रश्नाचें उत्तर देण्यास मुलांना कांहीं तरी विचार करावा लागला पाहिजे. ३ प्रश्न मुलांच्या आटोक्याबाहेरचे नसावे. ४ एकाच पद्धतीनें प्रश्न कधींही करूं नये. ५ प्रश्नांत संगति असावी. ६ प्रश्न विचारतांना शिक्षकाची वृत्ति आनंदी असावी. ७ प्रश्नांची वांटणी योग्य प्रकारें व्हावी. मुलांचीं उत्तरेंः उत्तराची भाषा शुद्ध, साधी व सरळ असावी. अर्धवट उत्तरें शिक्षकानें स्वीकारूं नयेत. अदमासानें उत्तर देण्याची मुलांची वाईट खोड शिक्षकानें घालवावी. वर्गांतील सर्व मुलांनीं एकदम उत्तर देण्याची पद्धति. साहित्यः–वस्तु, वस्तूचें चित्र, वस्तूचें शब्दचित्र. व्याख्यानाची शिक्षणपद्धति लहान मुलांना योग्य नाहीं. पानें १३६–१४६.

**भाग २१ वा–पाठ.** पाठाची पूर्वतयारी करणें आवश्यक असतें. पाठाचा उद्देश. पाठाला योग्य अशी वर्गाची रचना. उपोद्घात. वेळेच्या मानानें पाठ पाहिजे. पाठांतील मुद्द्यांचा योग्य अनुक्रम. मुद्दा सोडून भलतीकडे वाहवत जाणें हा दोष आहे. फळ्याचा योग्य उपयोग करणें. धडा शिकवीत असतांना मुलांच्या हालचालीकडे पूर्ण लक्ष पाहिजे. पाठांतील सामान्य दोष. शिक्षणाचे मुख्य १० नियम. पानें १४७–१५६.

**भाग २२ वा–उपसंहार.** धंद्याच्या ज्ञानाची आवश्यकता. ट्रेनिंग कॉलेजें काढण्याचा उद्देश व आवश्यकता.. शिक्षण हें शास्त्र आहे व कलाही आहे. शिक्षकानें शिक्षणशास्त्र व शिक्षणकला या दोहोंचाही अभ्यास केला पाहिजे. पानें १५७ ते १६२.

# कृतज्ञतापूर्वक उल्लेख.

हें पुस्तक लिहिण्याचे कामीं, फिच्, ल्यांडन, लॉइड मॉर्गन, जेम्स, सली, डेम्स्टर आणि गार्लिक, कर्कप्याट्रिक रेन, प्रेयर वेल्टन, वगैरे इंग्लिश ग्रंथकारांच्या व रा. भावे व रा. काथवटे यांच्या पुस्तकांचा मला फार उपयोग झाला आहे. त्याचप्रमाणें पुणें येथील स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजच्या लेडी सुपरिंटेंडंट मिस्. नवलकर यांच्या 'शिक्षण' या विषयावरील टांचणांचाही मीं उपयोग केला आहे. या सर्व इंग्लिश व मराठी ग्रंथकारांचा तसेंच मिस्. नवलकर यांचा त्यांच्या मदतीबद्दल मी ऋणी आहें.

पुणें येथील स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजच्या माजी लेडी सुपरिंटेंडंट व धारवाड येथील स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजच्या सध्यांच्या लेडी सुपरिंटेंडंट मिस्. न्यूलंड यांनीं हें पुस्तक लिहिण्याचे कामीं केलेल्या साहाय्याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

पुणें २ शनवार
तारीख १ जून सन १९१९. } म. का. कारखानीस.

१८३०
312

# शिक्षक आणि शिक्षण

## शिक्षणाचा उद्देश.

बागेंत एकादा लहानसा आंब्याचा रोपा आपण पाहातों. त्याचें खोड फार नाजूक असतें. त्याजवर पांचसात पानें आलेलीं असतात व तीं वाऱ्याच्या मंद झुळुकीनें देखील हलत असतात. या लहानशा रोप्याची माळी कितीतरी जोपासना करीत असतो. त्याला दररोज वेळच्या वेळीं तो पाणी घालतो. त्याच्या बुडाशीं तो चांगली माती व खत घालतो. कांहीं वर्षें गेल्यावर आपण पुन्हा त्या बागेंत गेलों म्हणजे ज्या जागीं आपण पूर्वी लहानसा नाजूक रोपा पाहिलेला असतो त्याच जागीं आंब्याचा मनोहर व विस्तीर्ण असा वृक्ष आपल्या नजरेस पडतो. त्या वृक्षाची ती गर्द छाया व त्याचा तो लांबवर पसरलेला विस्तार पाहून आपणांस आश्चर्य वाटतें. त्या वृक्षावर लटकलेलीं हिरवीं, पिवळीं, शेंदरी अशीं सुंदर फळें पाहून आपणांस आनंद वाटतो. आपण कांहीं वर्षांपूर्वी जो लहानसा रोपा पाहिला होता त्याचाच हा प्रचंड वृक्ष झाला आहे ही कल्पना, जेव्हां आपल्या मनांत येते, तेव्हां तर आपलें आश्चर्य दुणावतें. पूर्वीच्या लहान रोप्याचा हा विस्तीर्ण वृक्ष कसा झाला ? माळ्यानें नेमानें त्या झाडास पाणी घातलें, त्या रोप्याच्या वाढीला प्रतिबंध करणारीं गवत, तण किंवा दुसरीं झाडें त्यानें तोडून टाकिलीं. अशा रीतीनें त्या नाजूक व लहान झाडाच्या वाढीला अनुकूळ अशा सर्व गोष्टी त्यानें केल्या. पण विस्तार पावण्याची शक्ति त्या रोप्याचे आंगीं मूळचीच होती. वाटेल त्या रोप्याचा विस्तीर्ण वृक्ष माळ्याला बनवितां येत नाहीं. गवताला कितीही पाणी घातलें किंवा खत घातलें तरी त्याजपासून मोठा वृक्ष होणार नाहीं. ही वाढण्याची व विस्तार पावण्याची शक्ति परमेश्वरानें त्या लहान रोप्यांतच ठेविलेली होती. माळ्यानें या वाढीला अनुकूळ अशा गोष्टी त्या रोप्याचे जवळ आणिल्या व वाढीला प्रतिकूळ अशा गोष्टी दूर केल्या. शिक्षक आणि माळी या दोघांच्या व्यवसायांत फार मोठें साम्य आहे.

जेव्हां आपण राममूर्तीसारख्या पहिलवानाचे, चालती मोटार थांबविणें, मोठाले साखळदंड तोडणें, छातीवर मोठाले धोंडे ठेवून ते फोडविणें वगैरे अद्भुत शक्तीचे प्रयोग पाहातों तेव्हां आपल्या मनांत हा प्रश्न साहाजिकच उभा राहातो कीं, या मनुष्यानें ही प्रचंड शक्ति कशी साध्य केली ? याची शरीररचना इतर मनुष्यांचे शरीररचनेपेक्षां निराळी आहे काय ? पण आपणां सर्वांस ही गोष्ट माहीत आहे कीं, परमेश्वरानें सर्व मनुष्यांची शरीररचना सारखीच केलेली आहे. ज्या द्रव्यांचे आपले स्नायु बनविलेले असतात त्याच द्रव्यांचे पाहिलवानांचे देखील बनविलेले असतात. लहानपणीं राममूर्ति हा इतर मनुष्यांप्रमाणेंच होता. मग त्यानें ही एवढी अद्भुत शरीरशक्ति कोठून आणली ? परमेश्वरानें सर्व मुलांचे आंगीं शारीरिक शक्ति बीजरूपानें ठेवलेली असते; आणि शिक्षणानें ती जितकी वाढवावी तितकी वाढते.

भास्कराचार्य, न्यूटन वगैरे बुद्धिमान् लोकांचे ग्रंथ आपण जेव्हां वाचतों तेव्हां त्यांच्या विलक्षण बुद्धीची आपणांस कल्पना होते; व आश्चर्यानें आपण थक्क होतों. ही एवढी विलक्षण बुद्धि या लोकांना प्राप्त कशी झाली ? दुसऱ्यानें देऊन कांहीं ही बुद्धि आलेली नाहीं. परमेश्वरानें बीजरूपानें जी मानसिक शक्ति त्यांच्यामध्यें ठेवलेली होती तिचाच शिक्षणानें हा विकास झाला. प्रत्येक मुलाला परमेश्वरानें मानसिक शक्ति दिलेली आहे. ती लहानपणीं बीजरूपानें असते. शिक्षणाचे योगानें तिचा विकास होतो. शारीरिकशक्ति व मानसिकशक्ति याचप्रमाणें सहानुभूति, स्वार्थत्याग, दया, प्रेम वगैरे उच्च मनोवृत्तींचें बीजही लहान मुलांचे अंतःकरणांत असतें. शिक्षणाचे योगानें त्याची वाढ होते. या उच्च मनोवृत्तींचा पूर्ण विकास झाला म्हणजे गौतमबुद्ध, एकनाथ, तुकाराम यांच्यासारखीं सर्व प्राणिमात्रावर प्रेम करणारीं माणसें दृष्टीस पडतात. शारीरिक शक्ति, बुद्धि व मनोवृत्ति या बीजरूपानें प्रत्येक मुलांत ठेविलेल्या असतात. त्यांची समतोल व योग्य प्रमाणांत वाढ होणें याला विकास म्हणतात. मुलांच्या शारीरिक शक्ति, बुद्धि व उच्च मनोवृत्ति यांचा विकास करणें हें शिक्षणाचें काम आहे. मनुष्याची शारीरिक शक्ति वाढव्यास त्याला योग्य तो व्यायाम करावा लागतो. असा व्यायाम त्याला मिळत गेला म्हणजे हळूहळू त्याचें बळ वाढत जातें. मानसिक शक्तींनाही

हाच नियम लागू आहे. त्या शक्तींना हितकर व योग्य तो व्यायाम न मिळाल्यास त्या शक्ति वाढत नाहींत; व त्यांचा विकासही होत नाहीं. ईश्वरानें मुलांत ठेविलेल्या शक्तींना योग्य व हितकर व्यायाम देणें हेंच खरें शिक्षण होय.

आयुष्यांत आपणांस जीं जीं कर्तव्यें करावयाचीं आहेत, तीं तीं करण्याकरितां व या जगांतील शुद्धानंदाचा अनुभव घेण्याकरितां या तीनही शक्तींचा विकास होणें फार अवश्य आहे. प्रथमतः आपण शरीर-संपत्तीचें उदाहरण घेऊं. मनुष्याची बुद्धि कितीही तीव्र असली व त्याचें अंतःकरण कितीही थोर असलें तरी, जोंपर्यंत त्याची शरीरसंपत्ति चांगली नाहीं, तोंपर्यंत या दोन्ही गोष्टींचा त्याला फारसा उपयोग होणार नाहीं. जो मनुष्य नेहमीं आजारी असतो तो या जगांतील अनेक सुखांना आंचवतो. त्याचे हातून दुसऱ्याला कांहीं मदत होत नाहीं व त्याला स्वतांचें आयुष्य कष्टमय होतें. ईश्वरकृपेनें अशा मनुष्याजवळ जरी पुष्कळ संपत्ति असली तरी देखील, जोंपर्यंत शरीरसंपत्ति चांगली नाहीं तोंपर्यंत बाकीच्या संपत्तीचा उपयोग काय ? जगांतलि इतर सर्व संपत्तीपेक्षां शरीरसंपत्ति श्रेष्ठ आहे म्हणून प्रत्येक मनुष्यानें तिची वाढ करणें हें आवश्यक आहे. आपल्या देशांत निरपेक्ष बुद्धीनें देशहिताकरितां झटणारीं पुष्कळ बुद्धिमान् व थोर माणसें अकालीं मरतांना आपण पाहातों. त्यांच्या मृत्यूनें आपल्या समाजाचें व देशाचें फार नुकसान होत आहे. या मनुष्यांची शरीरसंपत्ति चांगली असती तर त्यांचे हातून देशहिताचीं आणखी कितीतरी कामें झालीं असतीं ! शरीरसंपत्तीचें महत्त्व सर्व देशांत नेहमीं फार मानिलें जातें. आपल्या प्राचीन ऋषींनीं व कवींनीं "धर्मार्थकाममोक्षाणां मूलमुक्तं कलेवरम्" " शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् " वगैरे वचनांनीं शरीरसंपत्तीचें महत्त्व वर्णन केलें आहे. तेव्हां मुलांच्या शारीरिक शक्तीचा विकास करणें हें शिक्षकाचें पहिलें कर्तव्य आहे.

मनुष्याचे बुद्धीचा विकास झाला नाहीं तर त्याचा जन्म व्यर्थ होय. मनुष्याला या जगांत जें श्रेष्ठत्व आलें आहे, तें त्याच्या बुद्धिमत्तेनें होय. बुद्धिमान् मनुष्य आपल्या बुद्धिसामर्थ्यानें स्वतःचें कल्याण साधून दुसऱ्याचेंही हित साधतो. आगगाडी, आगबोट, तारायंत्र वगैरे मनुष्य-

प्राण्यास सुख देणाऱ्या गोष्टी ज्या बुद्धिवान् माणसांनीं शोधून काढिल्या त्यांचे जगावर अपरिमित उपकार झाले आहेत. वैद्यशास्त्र, ज्योतिःशास्त्र, रसायनशास्त्र वगैरे अनेक शास्त्रांत ज्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेनें भर घालून मनुष्यप्राण्याचें सुख वाढविलें, ज्यांनीं आपल्या बुद्धीच्या बळानें हें विश्वाचें कोडें सोडविण्याचा प्रयत्न करून मनुष्यजातीस सन्मार्गाची वाट दाखविली, त्या सर्वांचें हें जग फार ऋणी आहे. मनुष्याचें आयुष्य सुखांत जाण्यास, आणि त्याचा व त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या माणसांचा चरितार्थ चालण्यास, त्याला बुद्धीची आवश्यकता आहे. म्हणून प्रत्येक मुलांत बीजरूपानें असणाऱ्या बुद्धीचा विकास करणें हें शिक्षकाचें दुसरें कर्तव्य आहे.

शरीरसंपत्ति व बुद्धि यांपेक्षांही शीलाचें महत्त्व फार आहे. एका मनुष्याची बुद्धि फार तीव्र आहे व त्याच्या आंगीं शरीरबलही पुष्कळ आहे, पण त्याचें शील जर चांगलें नाहीं, तर तो मनुष्य स्वार्थबुद्धीनें कोणतेंही दुष्कृत्य करण्यास मागें पाहाणार नाहीं. तो मनुष्य आपल्या शरीरसंपत्तीचा व बुद्धीचा उपयोग दुसऱ्यास फसविण्याचे कामीं करील. अशा मनुष्याची बुद्धि जितकी तीव्र असेल तितकी समाजाला त्याचेपासून भीति जास्त असते. चोर, भामटे, दरवडेखोर, खोटे दस्तऐवज करणारे वगैरे माणसांची बुद्धि फार तीव्र असते; पण या तीव्र बुद्धीचा उपयोग तीं माणसें समाजाला त्रास देण्यांत करितात, व परिणामीं आपणही आपल्या स्वार्थबुद्धीला बळी पडतात. शीलाचे योगानें मनुष्याला मनुष्यत्व आलेलें आहे. नाहीं तर त्याजसारखा या जगांत दुसरा भयंकर प्राणी नाहीं. शीलवान् मनुष्य आपलें कर्तव्य बजाविण्यास नेहमीं तयार असतो; व आपल्या हातून दुसऱ्याचें नुकसान न व्हावें म्हणून तो फार जपतो. तो सर्वांशीं सहानुभूतीनें व ममतेनें वागतो व आपल्या हातून दुसऱ्याचें कल्याण व्हावें म्हणून झटत असतो. सारांश, आयुष्याचा खरा उपयोग होण्यास मनुष्यास शील असणें अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाचे योगानें मुलांचें शील बनलें पाहिजे. शील बनण्यास मुलाला लहानपणापासून चांगल्या संवयी लाविल्या पाहिजेत व आज्ञापालन, सत्य भाषण, दुसऱ्याविषयीं सहानुभूति वगैरे गुण लहानपणापासूनच त्याचे आंगीं जडले पाहिजेत. आत्मसंयमनाची संवय

त्याला प्रथमपासून लागली पाहिजे. संवयीचा अंमल मनुष्यावर नेहमीं राहतो किंवा मनुष्य संवयीचा दास असतो, असें म्हटलें तरी चालेल. संवयीसारखा जुलमी धनी नाहीं; मनुष्याची इच्छा कांहीं जरी असली तरी ती झुगारून देऊन संवय त्याला आपल्या इच्छेप्रमाणें करण्यास लावते. तेव्हां मुलांचें पुढील आयुष्य सुखांत जावें अशी जर इच्छा असेल तर आईबापांनीं व शिक्षकानें मुलांस चांगल्या संवयी लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मुलाची शरीरसंपत्ति वाढविणें, त्याच्या बुद्धीचा विकास करणें व त्याला चांगल्या संवयी लावून आणि त्याच्या उच्च मनोवृत्तींचा विकास करून त्याचें शील बनविणें, हे तीन शिक्षणाचे हेतु आहेत.

मुलाचे शिक्षणास आरंभ त्याचे अगदीं लहानपणापासूनच होतो. शिक्षणास पाटीपेन्सिलीचीच जरूर आहे असें नाहीं.

लहान मूल आपल्या आईबापांच्या व सभोंवतालच्या माणसांच्या कृतींकडे लक्ष देत असतें. त्याचे आंगीं अनुकरणशक्ति फार असते, यामुळें त्याच्या परिचयाच्या माणसांच्या कृतींचा व बोलण्याचा परिणाम त्या मुलावर होत असतो. येथूनच त्याच्या शिक्षणास प्रारंभ होतो. मूल आपले सोबती मिळवून खेळूं लागलें कीं, त्याच्या खेळगड्यांच्या सहवासाचाही त्याजवर परिणाम होतो. नंतर तें शाळेंत जाऊं लागतें. त्या ठिकाणीं शिक्षकाचे देखरेखीखालीं त्याचे शाळेंतील शिक्षणास प्रारंभ होतो.

यावरून मुलाचा पहिला शिक्षक त्याची आई होय, हें उघड होतें. या शिक्षकाचें वर्णन जितकें करावें तितकें थोडेंच आहे. सुशील आई आपल्या मुलाला कोणत्या प्रकारचें शिक्षण देते व त्या शिक्षणाचा परिणाम काय होतो हें जर पहाण्याचें असेल तर शिवाजी, जॉर्ज वॉशिंग्टन, आब्राहाम लिंकन, जेम्स गार्फिल्ड वगैरे थोर पुरुषांचीं चरित्रें वाचावीं म्हणजे या शिक्षणाचें महत्त्व सहज लक्षांत येईल. लहान मूल आपल्या आईवर सर्वस्वीं अवलंबून असतें, तेव्हां तिचें अनुकरण करण्याची त्याला इच्छा व्हावी हें साहजिक आहे. आईच्या प्रेमानें वश होऊन आई ज्याप्रमाणें सांगेल त्याप्रमाणें वागण्यास मूल नेहमीं तयार असतें. तिनें सांगितलेल्या गोष्टींचा त्याचे मनावर फार लवकर परिणाम होतो. आपल्या मुलांना लहानपणापासून चांगल्या संवयी लावण्याची व

परोपकार, दया, ईश्वरावरील श्रद्धा वगैरे अनेक उच्च मनोवृत्तींचा परिपोष करण्याची तिला चांगली संधी मिळते. आईपेक्षां कांहीं कमी प्रमाणांत बापालाही मुलाला शिक्षण देण्याची चांगली संधी असते. आई आणि बाप यांनीं दिलेल्या शिक्षणास गृहशिक्षण म्हणतात. गृहशिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया होय. गृहशिक्षण मिळण्याचें भाग्य फारच थोड्या मुलांना असतें. यामुळें शिक्षण देण्याची सर्व जबाबदारी शिक्षकावर येऊन पडते.

मुलांच्या तिन्ही प्रकारच्या शक्तींचा विकास करणें हें शाळेचें काम आहे. शाळेंत मुलांची शरीरसंपत्ति चांगली राहून तिची योग्य तऱ्हेनें वाढ होत आहे याजकडे शिक्षकानें लक्ष पुरविलें पाहिजे. शाळेंत मुलांचे बुद्धीची वाढ झाली पाहिजे व त्यांना चांगल्या संवयी लागल्या पाहिजेत. मुलांना किंवा मुलींना जीं जीं कर्तव्यें करावयाचीं आहेत, तीं तीं करण्याचें सामर्थ्य त्यांचे आंगीं आणणें हें आईबाप व शिक्षक यांचें कर्तव्य आहे. मुलांच्या शारीरिक, मानसिक व नैतिक शक्तींची वाढ झाली म्हणजे साहाजिकपणें आपलें कर्तव्य बजाविण्याचें सामर्थ्य त्यांचें आंगीं येतें. ज्या शाळेंत मुलें शाळेचे वसतिगृहांत राहून सर्व वेळ शिक्षकाचे देखरेखीखालीं घालवितात, त्या शाळेंत, मुलांचे शिक्षणाची जबाबदारी शिक्षकावर जास्त रहाते. ज्या शाळेंत मुलें कांहीं नियमित वेळ येतात व बाकीचा वेळ आपल्या घरीं घालवितात, तेथें शिक्षकावर पूर्वीं सांगितलेल्या शिक्षकाइतकी, मुलांचे शिक्षणाची जबाबदारी नसते. ती जबाबदारी आईबाप व शिक्षक यांत वांटली जाते. जेव्हां मुलांचे आईबाप सुशिक्षित असतात व मुलांना गृहशिक्षण देण्याची ते काळजी घेतात, तेव्हां मुलांचे शिक्षणाचे कामीं त्यांची मदत मिळाल्यामुळें शिक्षकाचें काम हलकें होतें. जेव्हां मुलांचे आईबाप अशिक्षित असतात तेव्हां शिक्षकाचें काम जास्त त्रासदायक होतें. कारण शिक्षकाला मुलांना घरीं ज्या कांहीं अव्यवस्थित संवयी लागलेल्या असतात त्या घालवून चांगल्या संवयी त्यांना लावाव्या लागतात.

शाळेमध्यें शिकविले जाणारे विषय व तींत असणारी शिस्त यांच्या योगानें शिक्षक मुलांना शिक्षण देण्याचें काम करीत असतो. भाषा, इतिहास, भूगोल, गणित, ड्राइंग, सृष्टिनिरीक्षण, हस्तकौशल्याचीं कामें इत्यादि विषय शिकविण्यांत, मुलांची विचारशक्ति वाढावी, डोळे, हात वगैरे अव-

यवांचा त्यांना चांगला उपयोग करितां यावा, एकाग्रता, कामाची आवड, स्वावलंबन, नियमितपणा, आत्मसंयमन वगैरे, चांगले गुण मुलांचे अंगीं जडावे, चांगल्या गोष्टींची मुलांचे मनांत आवड उत्पन्न व्हावी व वाईट गोष्टींचा तिटकारा त्यांना वाटावा, हे हेतु असतात. मुलांना उपयुक्त ज्ञान मिळावें हाही हेतु हे विषय शिकविण्यांत असतो. हें ज्ञान मुलांनीं शिक्षकाच्या साहाय्यानें व आपल्या प्रयत्नांनीं मिळवावें व तें मिळवीत असतांना त्यांचे विचारशक्तीचा विकास व्हावा ही गोष्ट शिक्षकानें लक्षांत ठेविली पाहिजे. ज्या मनुष्याला स्वतःची शरीरसंपत्ति वाढावी अशी इच्छा असते त्या मनुष्याला, ज्याप्रमाणें स्वतः जोडी, मलखांब वगैरे व्यायाम करावा लागतो, त्याचप्रमाणें, ज्या मुलाच्या बुद्धीची वाढ करावयाची असेल त्यानें स्वतः विचार केला पाहिजे व त्याचे बुद्धीला व्यायाम मिळाला पाहिजे. शिक्षकानें मुलांना माहिती सांगावी व मुलांनीं ती पाठ करावी आणि मग परीक्षेचे वेळीं ती परीक्षकाचे पुढें म्हणून दाखवावी या योगानें शिक्षणाचा कोणताच कार्यभाग होत नाहीं. अशा पद्धतीनें मूल कितीही विषय शिकलें व कितीही माहिती त्याला मिळाली तरी त्याच्या विचारशक्तीचा विकास न झाल्यामुळें तें मूल त्या ज्ञानाचें केवळ भारवाहक होतें. शाळेंत शिकविले जाणारे पुष्कळ विषय असे असतात कीं, त्यांच्या ज्ञानाचा मुलाचे पुढील आयुष्यांत त्याला फारसा उपयोग होत नाहीं. आपण आपल्या लहानपणीं जो भूगोल किंवा जें गणित शिकतों त्याचेपैकीं फारच थोडा भूगोल व गणित आपणांस आपल्या पुढील आयुष्यांत लागतें. असें जर आहे तर भूगोल शिकविण्याचा हेतु तरी काय असावा ? मुलांना कार्यकारणहेतु समजावा, त्यांना विचार करितां यावा, ईश्वरानें हें जग केवढें विशाल निर्माण केलें आहे व त्याजमध्यें त्यानें आपलें किती चातुर्य खर्च केलें आहे, हें मुलाच्या लक्षांत येऊन त्यांची ईश्वरावरील भक्ति वाढावी वगैरे हेतु मुलांना भूगोल शिकविण्यांत असतात. ह्याच नियम प्रत्येक विषयाला लागू आहे. विषयाचें ज्ञान ही गोष्ट महत्त्वाची नसून तें ज्ञान कोणत्या पद्धतीनें मिळालें आहे ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. मानसिक व नैतिक शक्तींचा विकास करण्याचें काम केल्यावर तें ज्ञान विसरून गेलें तरी कांहीं हरकत नाहीं. ही गोष्ट स्पष्ट करण्याकरितां आपण एक उदाहरण घेऊं. दोन मुलें हिंदुस्तानचा भूगोल शिकलीं. त्यांपैकीं एका मुलानें हा विषय शिकत

असतांना आपल्या विचारशक्तीचा व निरीक्षणशक्तीचा उपयोग करून ह्या विषयाचें ज्ञान संपादन केलें. कोंकण व आसाम या भागांत पाऊस जास्त कां पडतो, सिंधमध्यें तो कमी कां पडतो, अयोध्याप्रांतांत दाट वस्ती कां आहे व मारवाड, बिकानेर इकडे कमी कां आहे; कृष्णा, गोदावरी, वगैरे सह्याद्रींत उगम पावणाऱ्या नद्या जवळ असलेल्या अरबी समुद्राचा अव्हेर करून दूर असणाऱ्या बंगालच्या उपसागराकडे कां धांवतात, मुंबई व अहमदाबाद या शहरांत कापसाच्या गिरण्या कां आहेत वगैरे गोष्टींचा विचार करावयास लावून शिक्षकानें पहिल्या मुलास तो विषय शिकविला. दुसऱ्या मुलानें नद्या, भूशिरें, शहरें, त्यांची लोकसंख्या या सर्व गोष्टी पाठ केल्या. कांहीं कालानें दोन्हीही मुलें शिकलेल्या भागांपैकीं बराच भाग विसरून गेलीं, तरी पहिल्या मुलाला भूगोल शिकविण्याचा सर्व फायदा झाला व दुसऱ्या मुलाचे श्रम मात्र फुकट गेले. भूगोल शिकल्यानें पहिल्या मुलाचे बुद्धीला व्यायाम मिळून त्याचे बुद्धीचा जो विकास झाला तो मिळविलेली माहिती विसरून गेल्यानें नाहींसा झाला नाहीं.

मुलांना शिकविण्याचा उद्देश त्यांनीं परीक्षेंत पास व्हावें हा नव्हे. मुलांना विषय समजो किंवा न समजो,त्यांच्या विचारशक्तीला व्यवसाय मिळो किंवा न मिळो, पण परीक्षेंत पास होण्याकरितां त्यांनीं ओळीच्या ओळी पाठ कराव्या म्हणून कांहीं मुलें शाळेंत येत नाहींत. या घोकंपट्टीच्या पद्धतीनें मुलांच्या स्मरणशक्तीवर ताण बसतो व तिच्याशिवाय इतर कोणत्याच मानसिक शक्तीच विकास होत नाहीं. अशा तऱ्हेच्या शाळांतून मुलांना आनंददायक असें कांहींच नसतें, म्हणून मुलांना तेथें शिकण्यांत कांहींच गंमत वाटत नाहीं व त्यांचा उत्साह दिवसेंदिवस कमी होत जातो. या निरुत्साहानें शिकण्याचा व परीक्षेकरितां चाललेल्या धडपडीचा परिणाम लहान मुलांवर तेव्हांच होतो. त्यांचा सर्व उत्साह हळूहळू नाहींसा होतो. त्यांची जिज्ञासा व चपळता दिवसेंदिवस कमी होतात व त्यांच्या मानसिक शक्तींची वाढ न झाल्यामुळें तीं गतानुगतिक बनतात व त्यांचेमध्यें स्वावलंबनाचा थोडासा देखील भाग रहात नाहीं. अशा शिक्षणक्रमाचा परिणाम त्यांचे शरीरप्रकृतीवर देखील घडतो. अशा शिक्षणापासून मुलांना आपल्या पुढील आयुष्यांत उपयोग काय होणार आहे ? लहानपणीं आपण ज्या शाळेंत कित्येक वर्षे फुकट घालविलीं, जेथील शिक्षणक्रमानें आपल्या

मानसिक व शारीरिक शक्ति दुबळ्या झाल्या, त्या शाळेबद्दल, तेथील शिक्षणक्रमाबद्दल व शिक्षकाबद्दल त्या शाळेंत शिकलेल्या विद्यार्थ्यांना मोठेपणीं काय बरें वाटेल ? परीक्षा पास होण्याचे दृष्टीनेंही पाहिलें असतां जो शिक्षक आपल्या मुलांना, त्यांच्या मानसिक शक्तींचा विकास होईल, त्यांना शिक्षणांत आनंद वाटेल, अशा रीतीनें शिकवितो, त्या शिक्षकाचे विद्यार्थी निवळ घोकंपट्टी केलेल्या विद्यार्थ्यांपेक्षां परीक्षेंत खात्रीनें वर येतील. केवळ परीक्षेकरितां मुलें तयार करण्याचा हेतु दृष्टीपुढें ठेविल्यानें मुलांचे शरीरप्रकृतीकडे किंवा स्वभावाकडे लक्ष देतां येत नाहीं. मुलें सुस्वभावी व्हावीं त्यांची शरीरप्रकृति निकोप असावी व त्यांना आपले हात पाय डोळे वगैरे अवयवांचा योग्य तऱ्हेनें उपयोग करितां यावा ही गोष्ट नुसत्या बुद्धीच्या वाढीपेक्षां अधिक महत्त्वाची आहे. आयुष्यक्रमांत यश येणें ही गोष्ट बुद्धि-सामर्थ्यापेक्षां शरीरप्रकृति व शील यांवर जास्त अवलंबून आहे.

सारांश, चांगला शिक्षक " कांहीं तरी घोकून माझीं मुलें परीक्षेंत पास व्हावीं " अशी इच्छा कधींही करणार नाहीं; आपल्या मुलांची शरीर-संपत्ति चांगली व्हावी, त्यांची विचारशक्ति वाढावी, त्यांना चांगल्या संवयी लागाव्या, तीं सुशील व्हावीं व त्यांच्या पुढील आयुष्यांत त्यांना जीं कर्तव्यें करावयाचीं आहेत तीं करण्याचें त्यांचे आंगीं सामर्थ्य यावें याकरितां तो मनःपूर्वक झटेल. अशा शिक्षकाचे विद्यार्थी त्याचे सदैव ऋणी राहून त्याचेबद्दल मनांत प्रेम व आदर बाळगतील.

---

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग २ रा.

### बौद्धिक शिक्षण.

मागील भागांत सांगितलेंच आहे कीं, शिक्षणाचे योगानें मुलांचे बुद्धीचा विकास झाला पाहिजे, त्यांना चांगल्या संवयी लागून तीं सुस्वभावी झालीं पाहिजेत, त्यांची शरीरसंपत्तिही सुधारली पाहिजे व अशा रीतीनें त्यांना आपल्या पुढील आयुष्यांत जीं जीं कर्तव्यें करावयाचीं आहेत, तीं तीं करण्याची पात्रता त्यांचे अंगीं आली पाहिजे. मनुष्याची बुद्धि व स्वभाव हीं त्याचे मनावर अवलंबून असतात. ज्या मुलाचे मनाचा यथायोग्य व सर्व बाजूंनीं विकास होतो तें मूल बुद्धिमान् व सुशील निपजतें. शरीर आणि मन यांचा यथायोग्य विकास करणें हें शिक्षणाचें काम आहे आणि म्हणूनच शाळेमध्यें शारीरिक, बौद्धिक व नैतिक असें तिन्ही प्रकारचें शिक्षण द्यावें लागतें. हें तिन्ही प्रकारचें शिक्षण जर शाळेंतून दिलें जात नसेल तर तें शिक्षण अपूर्ण व एकांगीं होईल. एकांगी शिक्षणाचे योगानें मनुष्याचा आयुष्यक्रम सुखकर होत नाहीं. हिंदुस्तानांतील बहुतेक शाळांमधून बौद्धिक शिक्षणाकडेच जास्त लक्ष दिलें जातें व मुलांची शरीरसंपत्ती व स्वभाव यांजकडे कमी लक्ष दिलें जातें, ही गोष्ट बरोबर नाहीं. शाळेंतील शिक्षणाचा हेतु मुलांची परीक्षा उतरावी एवढाच आहे, अशी मुलांच्या पालकांची व शिक्षकांची समज झाल्या-मुळें बौद्धिक शिक्षणावर जास्त भर दिला जावा व बाकीच्या दोन्ही प्रकारच्या शिक्षणाची हयगय व्हावी हीं गोष्ट साहाजिकच आहे. हीं स्थिति पालटत जाण्याचीं सुचिन्हें दिसत आहेत. शारीरिक शिक्षणाचें व नैतिक शिक्षणाचें महत्त्व पालकांच्या व शिक्षकांच्या मनांत हळूहळू बिंबत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. वर सांगितलेल्या शिक्षणाच्या तीन प्रकारांपैकीं बौद्धिक शिक्षणाचा आपण प्रथमतः विचार करूं.

मुलांचें ज्ञान वाढून त्यांना स्वतंत्र रीतीनें विचार करितां यावा व त्यांची ग्रहणशक्ति वाढावी, हा बौद्धिक शिक्षणाचा उद्देश आहे. वर सांगितलेंच आहे कीं, मनुष्याची बुद्धि व स्वभाव हीं त्याचे मनाचे विकासावर अवलंबून असतात. जसजसा मनाचा विकास जास्त होतो तशी तशी बुद्धिही वाढत जाते. ज्याअर्थीं शिक्षकाला मुलांचे मनाचा विकास करावयाचा असतो त्याअर्थीं मन, त्याचे व्यापार, मनाचे वाढीला लागणारी अनुकूल परिस्थिति व त्या वाढीला प्रतिबंध करणाऱ्या गोष्टी या सर्वांची माहिती शिक्षकाला असणें अगदीं अवश्य आहे, म्हणून या गोष्टींचा या भागांत अगदीं थोडक्यांत विचार केला आहे.

मन म्हणजे काय हें सांगणें फार कठीण आहे. मनाची व्याख्या बरोबर रीतीनें देणें अशक्य आहे. मन ही ईश्वरानें मनुष्यास दिलेली अद्भुत शक्ति आहे. हिच्यामुळें आपणांस सुखदुःखादि भावना होतात, ज्ञान होतें व आपली कांहीं तरी प्रवृत्ति होते. " नेत्र, श्रवण, स्पर्श, रसना आणि घ्राणेंद्रिय यांच्या साहाय्यानें मनास बाह्य जगाचें ज्ञान होतें. या ज्ञानाचा ठसा आपल्या मनावर राहतो व त्याची आपणांस पाहिजे तेव्हां स्मृति होते. स्मृतीपासूनच कल्पनाशक्ति, विचारशक्ति व निर्णयशक्ति यांची उत्पत्ति होते. " संवेदन, बोध, स्मरण, कल्पना व विचार हे ज्ञानाचेच भाग आहेत. भावनांमध्यें मनाला होत असलेल्या सुखदुःखाचा समावेश होतो. भूक तहान, श्रम, सुवास, गोडी वगैरे भावना अगदीं साध्या होत. उलटपक्षीं प्रेम, पश्चात्ताप, दुःख, द्वेष वगैरे भावना शरीरस्थितीपासून होणाऱ्या भूक, तहान वगैरे भावनांप्रमाणें साध्या नाहींत. प्रवृत्तीमध्यें मनाच्या कृति, प्रयत्न, निश्चय हे येतात. प्रवृत्तीलाच कृति हा दुसरा शब्द लावितात.

मनाचे हे तिन्ही व्यापार अगदीं निरनिराळे कधींही चालत नाहींत. प्रत्येक व्यापार स्वतंत्र चालणें अशक्य आहे. प्रयाग येथें त्रिवेणीसंगम झाल्यावर तीनही नद्यांचें पाणी जसें मिश्र होऊन वाहतें त्याचप्रमाणें मनाचे हे तिन्ही व्यापार मिश्र होऊन चालतात. भावना व प्रवृत्ति यांशिवाय ज्ञान असूं शकत नाहीं. ज्ञान व प्रवृत्ति यांशिवाय भावना होत नाहीं. प्रवृत्ति होण्यास ज्ञान व भावना आवश्यक आहेत. आपण

जर लहान मुलांच्या वर्गापुढें सुंदर रंगीत चित्र धरलें तर तें चित्र पाहण्यास तीं आनंदानें उत्सुक होतात. तें चित्र पाहून त्यांस आनंद (ही भावना आहे) होतो. त्यामुळें तें चित्र पाहण्याची त्यांची प्रवृत्ति होते व हें चित्र आहे असें त्यांना ज्ञान होतें. त्यांत भावना ही जरी मुख्य आहे तरी तिचेच पाठोपाठ प्रवृत्ति व ज्ञान हींही येतात.

आपण जर एकादें कठीण उदाहरण कंटाळवाण्या रीतीनें वर्गास शिकवीत असलों व वर्गांतील मुलें तें समजण्याकरितां जर आपणाकडे लक्ष देत असतील, तर त्यांचे मनांत प्रवृत्तीचा जोर विशेष आहे, तथापि त्यांत त्यांना त्रास ही भावना व उदाहरण समजणें हें ज्ञान हींही आहेत.

जर आपण प्रश्नोत्तररूपानें मुलांना धडा शिकवून त्यांची विचारशक्ति वाढवीत असलों तर मुलें विचार करून त्या प्रश्नांचीं उत्तरें भराभर देत असतात. या व्यापारांत ज्ञान जरी विशेषेंकरून आहे तरी लक्ष देणें ही प्रवृत्ति व उत्तर देत असतां मनाला होणारा आनंद ही भावना या व्यापारांत आहेत.

## शरीर आणि मन यांचा परस्पर संबंध.

शरीर आणि मन यांचा फार निकट संबंध आहे, ही गोष्ट प्रत्येक शिक्षकानें लक्षांत ठेविली पाहिजे. ज्या ज्या गोष्टींचा शरिरावर अपायकारक परिणाम होतो, त्या त्या गोष्टींचा मनावरही अपायकारक परिणाम होतो. वाईट हवा, सत्त्वहीन अन्न, अपुरा प्रकाश व अशक्तपणा या सर्वांचा परिणाम जसा शरिरावर अपायकारक होतो, तसाच मनावरही होतो. या कारणामुळें मनाची ग्रहणशक्ति कमी होते; व स्मरणशक्ति दुर्बळ होते. जर एकाद्या गोष्टीनें मुलाला त्रास होऊं लागला, तर लागलेंच त्याचें चित्त अस्वस्थ होतें, व तें चळवळ करूं लागतें. एकच धडा फार वेळ लांबविला, किंवा मुलें थकलेलीं असतांना त्यांना अभ्यासास बसविलें किंवा खेळण्याचे वेळीं त्यांना अभ्यासास लाविलें, तर त्यांचे मेंदूला त्रास होतो व त्यांचें लक्ष अभ्यासाकडे लागत नाहीं. मनाची शक्ति मेंदूच्या व ज्ञानतंतूंच्या शक्तीवर अवलंबून आहे. मनाचे व्यापार चांगले रीतीनें चालण्यास उत्तम शरीरसंपत्तीची आवश्यकता आहे. शरिरास सुख झालें तर मनास सुख होतें. शरिरास त्रास झाला तर मनास त्रास होतो. शरीर निरोगी

तरच मन निरोगी राहतें. एवढ्याकरितां शाळेंतील प्रकाश अपुरा अगर डोळे दिपविणारा नसावा. शाळागृहांत थंडी अगर ऊन याचा उपद्रव मुलांस होऊं नये. ज्यांचे योगानें पाठीचे कण्यास बांक येईल, दृष्टीस मंद-पणा येईल, पायास कळ लागेल, अशीं बांकें मुलांस बसण्यास देऊं नये. एका स्थितींत मुलांना फार वेळ बसवूं नये व त्यांचे धडे कधींही लांबलचक असूं नयेत. एक विषय संपून दुसरा विषय शिकविण्यापूर्वीं मुलांना थोडा वेळ विश्रांति देणें जरूर आहे. लहान मुलांचे धडेही लांबलचक नसावे. त्यांना कंटाळा येऊं नये म्हणून कवाईत, गाणें, चित्रकला वगैरे विषय मधून मधून त्यांचे अभ्यासक्रमांत घालावे. सारांश, जेणेंकरून मुलांचे मनास व शरिरास अपाय होणार नाहीं अशा मार्गानें मुलांना शिक्षण देणें हें शिक्षकाचें कर्तव्य आहे.

## अवधान.

बौद्धिक शिक्षण देतांनाही मुलांच्या भावना व प्रवृत्ति यांजकडे लक्ष देणें हें शिक्षकास अवश्य आहे. यांच्या साहाय्यावांचून मुलांस कोणतेंही ज्ञान होणें शक्य नाहीं. कोणत्याही गोष्टीची गोडी लागल्या-शिवाय मुलें तिजकडे लक्ष देत नाहींत; लक्ष दिल्याशिवाय एकाद्या गोष्टीचें ज्ञान होणें अशक्य आहे. आतां अभिरुचि किंवा गोडी ही भावना आहे, व लक्ष देणें ही प्रवृत्ति आहे. मुलें जितकीं लहान तितकी त्यांचे आंगीं भावना प्रबळ असते, व प्रवृत्ति व ज्ञान हीं कमी असतात. कोणतीही गोष्ट समजण्यास त्या गोष्टीकडे आपणांस पूर्ण लक्ष द्यावें लागतें. एकाग्रतेनें लक्ष देण्याच्या क्रियेस अवधान म्हणतात. अवधान हा प्रवृत्तीचा किंवा इच्छाशक्तीचा गुण आहे. अवधान दोन तऱ्हेचें असतें. एक ऐच्छिक व दुसरें अनैच्छिक. बुद्ध्या होऊन दिलेल्या अवधानास ऐच्छिक अवधान म्हणतात. एकादें कठीण उदाहरण शिक्षक कंटाळवाण्या रीतीनें समजावून देत अस-तांही, तें समजावून घेण्याकरितां प्रौढ विद्यार्थी आपलें लक्ष तिकडे लावीत असतात, हें ऐच्छिक अवधानाचें उदाहरण होय. एकादें सुंदर रंगीत चित्र मुलांपुढें धरलें, तर ताबडतोब त्यांचें लक्ष त्या चित्राकडे लागतें हें अनै-च्छिक अवधानाचें उदाहरण आहे. लहान मुलांचे आंगीं इच्छाशक्ति (प्रवृत्ति) कमी असल्यामुळें, त्यांना ऐच्छिक अवधान कधींही देतां येत नाहीं. जशीं जशीं तीं मोठीं होतात तशीतशी त्यांची ऐच्छिक अवधानाची

शक्ति वाढत असते. लहान मुलांचे शिक्षकांस त्यांच्या अनैच्छिक अवधानावर अवलंबून रहावें लागतें. मुलांना ज्या गोष्टीची अभिरुचि वाटते तिजकडे त्यांचें अवधान सहजच जातें. मुलांचें लक्ष आपण जें कांहीं शिकवितों तिकडे लावून घेण्यास, खालील गोष्टी शिक्षकानें लक्षांत ठेवाव्याः—

१ मुलांस शिकविण्याचा धडा नेहमीं मनोरंजक रीतीनें शिकवावा. २ तसबिरा, चित्रें वगैरे आकर्षक वस्तूंचा उपयोग धड्यांत नेहमीं करावा. ३ लहान मुलांस एकादी गोष्ट स्वतः करण्यास फार आनंद वाटतो, म्हणून धड्यासंबंधीं शक्य त्या गोष्टी मुलांकडून करवून घ्याव्या. ४ मुलांस माहीत असलेल्या गोष्टींपासून सुरुवात करून त्यांना माहीत नसलेल्या गोष्टी शिकवाव्या. ५ धड्यांत प्रश्नांचा शक्य तितका उपयोग करावा. ६ मार्क देणें, वर नंबर देणें, वगैरे गोष्टींचा देखील त्याला अवधानाचे कामीं उपयोग करून घेतां येईल.

## मुलाचे मनाचा विकास कसा होतो.

" मानसिक सामुग्रीची भरती होऊन त्या सामुग्रीची निरनिराळीं रूपांतरें होणें, याला आपण मनाचा विकास म्हणतों. इंद्रियांचे योगानें बाह्य वस्तूंचें आपणांस संवेदन होतें; व ती वस्तू अमुक आहे असा बोध होतो. संवेदनें व त्यांपासून होणारा मनास बोध, यायोगानें मनाची सामुग्री वाढते. इंद्रियांच्या योगानें ज्या बाह्य वस्तूंचें ज्ञान आपणांस होतें, त्याचा ठसा आपल्या मनावर राहतो व त्याची आपणांस वाटेल तेव्हां स्मृति होते. या स्मृतीमुळें आपली कल्पनाशक्ति जागृत होते, व न पाहिलेल्या गोष्टीचीही आपण कल्पना करूं लागतों. जसें तळ्याची आठवण झाल्यावर आपणांस सरोवराची कल्पना करितां येते. यानंतर विचारशक्ति व अनुमानशक्ति उत्पन्न होतात,व या शक्ति,मनाचा विकास करितात. या शक्ति बाहेरून नवा कोणताही पदार्थ आणीत नाहींत, तर ज्या कांहीं कल्पना मनांत सांचलेल्या असतात, त्यांच्याच एकमेकांशीं कांहीं तरी संबंध जुळवून, त्यांना निरनिराळीं रूपें देतात. इंद्रियें मनाचे विकासास लागणारी सामुग्री पुरवितात. पुरी इतकी सामुग्री नसल्यास, मनाचा विकास होणें शक्य नाहीं. ज्ञानेंद्रियांनीं आपलें काम योग्य रीतीनें बजाविलें, तरच मनाचे विकासास लागणारी सामुग्री भरपूर मिळेल; म्हणून इंद्रियशिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया आहे.

बालोद्यान, वस्तुपाठ वगैरे विषयांना जें अलीकडे विशेष महत्त्व दिलें आहे, त्याचें कारण तरी हेंच आहे.

मनोविकास कसा होतो हें दाखविण्यासाठीं मानसशास्त्रवेत्त्यांनीं त्याचे चार काल कल्पिले आहेत. १ जन्मापासून पहिलीं तीन वर्षे:---या कालांत मूल सर्वस्वीं दुसऱ्यावर अवलंबून असतें, मुलांचीं ज्ञानेंद्रियें (नेत्र, कान आणि स्पर्श) फार तीक्ष्ण असतात. कोणतीही रंगीबेरंगी अपरिचित वस्तू पाहिली कीं ती घेण्याकरितां मूल धडपड करूं लागतें. आपण इतरांहून भिन्न आहों, ही कल्पना त्याला हळूहळू येते. भीति, राग, प्रीति वगैरे भावना थोड्याबहुत प्रमाणांत असतात. प्रवर्तकशक्ति मात्र बहुतेक नसते. २ चवथ्या वर्षापासून सातवे वर्षापर्यंतचा काल:---मुलांस चांगलें बोलतां चालतां येतें. ज्ञानेंद्रियें विशेष तीक्ष्ण असतात. बाह्य जग जाणण्याविषयीं जिज्ञासा विशेष प्रबळ असते. कल्पनाशक्ति जोरदार असते व स्मरण-शक्ति वाढत असते. मुलांना खेळण्याची विशेष हौस असते. कारण परमेश्वरानें त्यांचे शरिराचा विकास करण्याकरितां त्यांचे इंद्रियांत व स्नायूंत विशेष चापल्य ठेविलेलें असतें. प्रवर्तकशक्ति थोडी असते. राग, लोभ मात्र विशेष प्रबल असतात. हा काळ बालोद्यानाशिक्ष-णाचा आहे. ३ आठव्यापासून चवदा वर्षेपर्यंतचा काल:---स्मरणशक्ति फार तीव्र असते. विचार, अनुमान, निर्णय वगैरे उच्च बौद्धिक व्यापार वाढत असतात. राग, भीति वगैरे हलक्या भावना कमी होतात. त्यांचे ऐवजीं आदर, स्नेह, भूतदया, स्वाभिमान वगैरे उच्च भावना येतात. प्रवर्तकशक्तिही हळूहळू वाढत असते. हा प्राथमिक शिक्षणाचा काल होय. ( ४ ) एकवीस वर्षाअखेरचा काल:--सर्व मानसिक व्यापार पूर्ण होतात. मुलांना बरें वाईट समजूं लागतें. जगांत आपलीं कर्तव्यें काय आहेत, परमेश्वराबद्दल आपलें कर्तव्य कोणतें, वगैरे सर्व गोष्टी मुलांस समजूं लागतात. ”

## ज्ञानेंद्रियें व त्यांचें शिक्षण.

मागें सांगितलेंच आहे कीं, बाह्य जगाचें ज्ञान आपणांस ज्ञानेंद्रियांनीं होतें. ज्ञानेंद्रियांस जर शिक्षण नसेल, तर त्यांचे हातून ज्ञान देण्याचें काम चांगल्या रीतीनें होणार नाहीं. असें झालें म्हणजे मनाचा विकासही

पूर्णपणें होणार नाहीं. कोणत्याही मनुष्यास डोळ्यांनीं वस्तु पाहतां येते, कानानें आवाज ऐकतां येतो, स्पर्शेंद्रियानें स्पर्श कळतो, घ्राणेंद्रियानें वास कळतो, तर मग इंद्रियांना शिक्षण देण्याची आवश्यकता कोठें राहिली, असा प्रश्न सहज उद्भवेल. नानातऱ्हेचे रंग व त्यांच्या नाजूक छटा ओळखण्याचे कामीं, चितान्याचे डोळे जितके कुशल असतात, तितके इतरांचे नसतात. नाना तऱ्हेचे व नाना वाद्यांचे निरनिराळे सूर व त्यांचें मिश्रण ओळखण्याचे कामीं, गवयांचे कान जितके तीक्ष्ण असतात, तितके कोणाचेही नसतात. गंध्यांना निरनिराळ्या अत्तरांचा वास, व त्यांचेमधील भेद जसा ओळखतां येतो, तसा इतरांस येत नाहीं. याचें कारण काय? चितान्याचे नेत्रांस, गवयाचे कानांस, गंध्याचे नाकास जें शिक्षण मिळालें असतें तें इतर लोकांस मिळालेलें नसतें. शिक्षणाचे योगानें चितारी, गवई, व गंधी यांना रंग, स्वर व गंध, यांचें पूर्ण निरीक्षण करून निरनिराळ्या रंगांतील किंवा स्वरांतील किंवा गंधांतील साम्य व भेद ओळखितां येतात. इंद्रियांना शिक्षण देऊन दोन गोष्टी साध्य करावयाच्या असतात. इंद्रियांना व्यायाम देऊन त्यांस ( १ ) कोणताही पदार्थ पूर्णपणें पाहण्यास ( २ ) व दोन पदार्थांमधील साम्य व भेद सूक्ष्मपणें निरीक्षण करण्यास शिकवावयाचें असतें. इंद्रियांचा पहिला व अगदीं साधा व्यापार संवेदन हा होय. आपण बसलों असतां एकदम एकादा आवाज होतो, त्या योगानें प्रथमतः हवेंत आंदोलन सुरू होतें. हवेच्या लाटा कानांतील ज्ञानतंतूवर आदळतात. असें झालें ह्मणजे कशाचा तरी आवाज झाला, हें ज्ञान मनास होतें. मग हा आवाज कशाचा झाला, याचा विचार मन करितें, व त्यास अमक्या पदार्थाचा आवाज झाला हें ज्ञान होतें. अशाच रीतीनें प्रकाशाच्या लहरी डोळ्यांतील ज्ञानतंतूंवर आदळून पदार्थ आपणांस दिसतो. पदार्थांतील बारीक परमाणु नाकांतील ज्ञानतंतूंवर आदळून त्यांचा वास येतो; पदार्थांचा रस जिव्हेचे टोंकावरील ज्ञानतंतूंला लागला कीं, त्यांची चव कळते.

प्रकाशाचा, ध्वनीचा, परमाणूंचा, रसाचा किंवा पदार्थांचा आघात ज्ञानतंतूंस झाला कीं, मनास कांहीं तरी आघात झाला, हें जें कळतें त्यास संवेदन म्हणतात व नंतर अमुक पदार्थाचा आघात झाला, हें जें ज्ञान होतें, त्यास बोध म्हणतात. इंद्रियांस शिक्षण दिलें असतां पदार्थांचा त्यांना पूर्ण बोध होतो. शिक्षण नसल्यास त्यांस पूर्ण बोध होत नाहीं. ज्ञान मिळ-

विण्याचे कामीं डोळे, कान व स्पर्शेंद्रिय, यांचा जितका उपयोग होतो, तितका जीभ व नाक यांचा होत नाहीं; म्हणून डोळे, कान व स्पर्शेंद्रिय यांना ज्ञानेंद्रियें म्हणतात, व शिक्षकाला याच इंद्रियांना शिक्षण द्यावयाचें असतें डोळ्यांचे योगानें मनुष्यास अंधार, उजेड, रंग, आकार व अंतर, हीं कळतात. श्रोत्रेंद्रियानें शब्दाचे द्वारें होणारें सर्व ज्ञान मिळतें. स्पर्शानें थंडी, उष्णता, कठीणपणा इत्यादि गोष्टी कळतात.

"इंद्रियशिक्षण या शब्दाचा अर्थ इंद्रियांकडून योग्य व व्यवस्थित रीतीनें काम करवून घेऊन, त्यांचा विकास करणें हा होय. असें करण्याचा उद्देश हाच कीं, इंद्रियद्वारें होणारें ज्ञान, निर्णय, अनुमान वगैरे उच्च मनोव्यापारांच्या उपयोगीं पडावें. हे मनोव्यापार व्यवस्थेशीर करतां येणें हाच बौद्धिक शिक्षणाचा अंतिम हेतु आहे." मुलांच्या ज्ञानेंद्रियांपैकीं जीभ व नाक यांना शिक्षकास विशेष शिक्षण देतां येत नाहीं. डोळे, कान व स्पर्शेंद्रिय यांना योग्य शिक्षण देणें, हें त्याचें कर्तव्य आहे. ज्ञान मिळविण्याचे कामीं हात व पाय या बाह्येंद्रियांचाही फार उपयोग होतो. लहानपणींच जर हातांत चपळता आली, तर मोठेपणीं कोणताही व्यवसाय करण्यास सोपें जातें. इंद्रियशिक्षण देतांना शिक्षकानें खालील गोष्टी लक्षांत ठेवाव्या. १ जेथें जेथें शक्य असेल तेथें तेथें ती वस्तू मुलांचे पुढें ठेवावी व त्यांचेकडून तिचें पूर्ण निरीक्षण करवावें. २ शब्दास प्रतिशब्द दिला कीं, मुलांस त्या गोष्टीचें ज्ञान झालें असें कधीं समजूं नये. "कॉफी" म्हणजे 'एका झाडाचें बीं' असें मुलांकडून पाठ करवून घेतल्यानें मुलांस जें ज्ञान होतें त्याचे शतपट ज्ञान ती प्रत्यक्ष त्यांचेपुढें ठेवून, तिचा रंग पाहाण्यास, वास घेण्यास, तिची चव घेण्यास, सांगितल्यानें होतें. ३ वस्तु मिळत नसल्यास तिची मातीची आकृति अगर कागदावरील चित्र तरी मुलांस दाखवावें. ४ जितक्या जास्त इंद्रियद्वारां मुलांस वस्तूचें ज्ञान होईल तितकें अधिक चांगलें.

"बालोद्यान, वस्तुपाठ, चित्रकला, गायन, वाचन, भूगोल, वगैरे शाळेंत शिकवीत असलेल्या विषयांचे योगानें, मुलांना इंद्रियशिक्षण मिळतें. बालोद्यानानें पदार्थांचे रंग, आकार, रूप, अंतर वगैरेंचें ज्ञान अगदीं सुलभ रीतीनें होतें. नमुना पुढें ठेवून, त्याप्रमाणें लहान खुर्च्या,

टेबलें, टोपल्या वगैरे जिन्नस करीत असतां मुलांना त्यांच्या आकारांचें व रंगांचें सहज ज्ञान होतें. खेळतां खेळतां मुलांना इंद्रियशिक्षण मिळतें. पदार्थ पूर्ण निरीक्षण करितां यावा हाच वस्तुपाठाचा उद्देश आहे. चित्रकला हा विषय मुलांना अगदीं लहानपणापासून शिकवावा. मात्र मुलांना प्रथम कावळा, चिमणी, मांजर, कुत्रा, काठी, टोपी यांसारख्या त्यांच्या नेहमीं पाहाण्यांत येणाऱ्या वस्तु काढण्यास सांगावें. चित्रकला लहान मुलांस शिकविण्याचा उद्देश, त्यांना चित्रकार बनविणें हा नव्हे, तर पाहिलेल्या वस्तूंचें साधारण चित्र त्यांस रेखाटतां यावें हा आहे. त्यांना काटकोन, सरळरेषा, दीर्घ वर्तुळ, यांचें ज्ञान नसलें तरी चालेल. "* लेखन या विषयाचा देखील चित्रकलेप्रमाणेंच इंद्रियशिक्षणाचे कामीं उपयोग होतो. प्रथमतः मुलांना लहान लहान अंतरें फूटपट्टीच्या साहाय्यानें मोजण्यास व नुसत्या नजरेनें पदार्थांमधील साधारण अंतर काढण्यास शिकवावें. चित्रकला, लेखन व वस्तुपाठ, यांनीं जसें नेत्रांस व स्पर्शेंद्रियास शिक्षण मिळतें, तसेंच गायन व वाचन यांनीं श्रवणेंद्रियास शिक्षण मिळतें.

---

* अवतरणांतील मजकूर रा. भावे यांच्या 'शिक्षण व मानसशास्त्र' या पुस्तकांतून घेतलेला आहे. रा. भावे यांचें हें पुस्तक शिक्षकानें अवश्य वाचण्याजोगें आहे.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग ३ रा.

## स्मरणशक्ति.

ज्ञानेंद्रियांनीं मन जें जें ज्ञान मिळवितें त्याचा ठसा मनावर राहातो, यामुळें हें ज्ञान नाहींसें होत नाहीं. तें ज्ञान मनांत सांठलेलें असतें व मनाला वाटेल तेव्हां तें बाहेर काढून त्याचा उपयोग करितां येतो. आपण आज मुंबईस राणीच्या बागेंत सिंह पाहिला अशी कल्पना करूं. नेत्रेंद्रियानें आज आपणांस सिंहाचें जें ज्ञान झालें आहे, त्याचा ठसा आपल्या, मनावर उमटेल व यानंतर, सिंह पुढें नसतांनाही मनाला सिंहाची प्रतिमा त्याच्या-पुढें आणतां येईल. ज्ञान सांठवून ठेवून वाटेल तेव्हां तें पुन्हां काढण्याची मनाची ही शक्ति फार अद्भुत आहे. हिलाच आपण स्मरणशक्ति म्हणतों. या शक्तीशिवाय मनुष्याचा आयुष्यक्रम एक घटकाभर देखील चालणार नाहीं. जें ज्ञान आपण संपादन करितों तें जर आपणांस आठवणार नाहीं तर तें ज्ञान आपणांस नाहींसें होईल व आपणांस बिलकुल विचारच करितां येणार नाहीं. स्मरणशक्ति चांगली राहाण्यास मनाला ज्ञानेंद्रियांनीं वस्तूचें पूर्ण निरीक्षण लवकर करितां आलें पाहिजे म्हणजे त्या पदार्थांचा बोध मनाला चांगला होईल. मनाला झालेलें हें ज्ञान त्याला पुष्कळ वेळ राखतां आलें पाहिजे व जरूर पडेल तेव्हां हें ज्ञान ताबडतोब त्यास बाहेर काढितां आलें पाहिजे. ज्ञानेंद्रियांचे योगानें वस्तूचें ज्ञान होण्याचे क्रियेस ग्रहण म्हणतात. मनाच्या ज्ञान सांठवून ठेवण्याचे क्रियेला धारणा व मनाला वाटेल तेव्हां तें बाहेर काढण्याचे क्रियेला स्मरण असें म्हणतात. ज्ञानेंद्रियांनीं ज्या मनुष्याला लवकर बोध होतो व ज्याच्या मनांतलें ज्ञान पुष्कळ वेळ राहातें व ज्याला वाटेल तेव्हां तें परत काढतां येतें, त्या मनुष्याची स्मरणशक्ति फार चांगली आहे असें आपण म्हणतों. स्मरणशक्ति चांगली राहाण्यास ग्रहण, धारणा व स्मरण या तिन्ही क्रिया व्यवस्थित रीतीनें व्हाव्या लागतात. या तिन्हींपैकीं एकादी क्रिया जर चांगली होत नसेल तर स्मरण-शक्तीचें काम चांगलें होणार नाहीं. शिक्षकाला मुलांच्या स्मरणशक्तीची

वाढ करावयाची असते म्हणून त्यानें मुलांच्या या तिन्हीं क्रियांकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

**ग्रहण**:—जी गोष्ट आपणांला नीट समजत नाहीं किंवा जिचें आपण पूर्ण निरीक्षण करीत नाहीं किंवा जिच्याकडे आपण अवधान देत नाहीं ती गोष्ट आपणांस बरोबर आठवत नाहीं. एकाद्या मनुष्याला गायनाची जर कांहीं माहिती नसेल तर गवयानें त्याचे समोर गायलेल्या पदांतील सूर त्याचे लक्षांत राहाणार नाहींत. शिक्षक वर्गांत इतिहासाचा कांहीं भाग शिकवीत असेल व विद्यार्थी संध्याकाळीं खेळावयाच्या चेंडूफळीचा विचार करीत असेल तर शिक्षकानें वर्गांत सांगितलेल्या गोष्टी त्याला मुळींच आठवणार नाहींत. घाईघाईनें पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टी आपल्या लक्षांत राहात नाहींत. वर सांगितलेल्या तिन्ही उदाहरणांत ग्रहणाची क्रियाच बरोबर न झाल्यामुळें धारणा व स्मरण या क्रिया बरोबर होत नाहींत. शिक्षक जें कांहीं शिकवीत असतो, त्याजकडे विद्यार्थ्यांचें लक्ष लागून तें जर विद्यार्थ्यांना पूर्णपणें कळेल, तरच त्यांना त्या शिकलेल्या गोष्टींचें स्मरण राहील. एवढ्या करितां शिक्षकानें आपला धडा शक्य तितका मनोरंजक करावा. मुलांना माहीत असलेल्या गोष्टींपासून सुरुवात करून त्यांना माहीत नसलेल्या गोष्टी शिकवाव्या. स्वतःच मोठें व्याख्यान न देतां धडा प्रश्नोत्तररूपानें शिकवावा; म्हणजे मुलांना त्यांत गोडी वाटते व त्यांचें लक्ष त्या धड्याकडे लागतें. सारांश, आपल्या धड्याकडे लक्ष लावून घेण्यास जेवढ्या गोष्टी आवश्यक आहेत, तेवढ्या शिक्षकानें कराव्या म्हणजे मुलांचें लक्ष धड्याकडे लागेल व तो त्यांना उत्तम कळेल. अशा रीतीनें धड्याचें ग्रहण चांगल्या रीतीनें झाल्यावर, मुलांना त्याचें स्मरण होण्यास अडचण बिलकूल पडणार नाहीं.

**धारणा**:—आपण शेंकडों गोष्टी ऐकतों, शेंकडों गोष्टी पांहातों व शेंकडों विचार आपल्या मनांत चाललेले असतात. या सर्वांचा ठसा आपल्या मेंदूवर उमटतो व त्यायोगानें तें ज्ञान नाहींसें होत नाहीं ही गोष्ट वर सांगितलीच आहे. मनांत ज्ञान सांठवून ठेवण्याची ही धारणाशक्ति मेंदूचे सुस्थितीवर अवलंबून असते. लहान मुलांची धारणाशक्ति फार आश्चर्यकारक असते. भोंवतीं चाललेले अनेक व्यापार व सभोंवतीं असणारे अनेक पदार्थ त्यांच्या स्मरणांत राहातात,

**स्मरण**:–ज्या ज्या गोष्टी आपण पाहातों किंवा जें कांहीं आपण ऐकतों किंवा ज्यांचा ज्ञानेंद्रियांनीं आपणांस बोध होतो, त्यांची प्रतिमा मनापुढें उभी करण्याच्या मनाच्या क्रियेस स्मरण म्हणतात, हें वर सांगितलेंच आहे. आपण एकादा पदार्थ प्रत्यक्ष पाहातों, तेव्हां आपल्या मनावर त्या पदार्थाची प्रतिमा जितकी स्पष्ट उमटते तितकी स्पष्ट प्रतिमा त्या पदार्थाच्या आठवणीनें होणार नाहीं ही गोष्ट उघडच आहे. आगगाडी डोळ्यासमोर असतांना तिची प्रतिमा आपल्या मेंदूवर जितकी स्पष्ट उमटते तितकी स्पष्ट प्रतिमा आगगाडीच्या नुसत्या स्मरणानें उमटणार नाहीं ही गोष्ट जरी खरी आहे, तथापि या किंचित् अस्पष्ट झालेल्या प्रतिमेचाही आपणांस फार उपयोग होतो. दररोज आपण जे अनेक पदार्थ पाहातों किंवा ज्या अनेक गोष्टी ऐकतों किंवा ज्या अनेक कल्पना आपल्या मनांत येतात त्या सर्वांचीच आपणांस आठवण राहात नाहीं. त्यांपैकीं कांहींचें मात्र स्मरण राहातें. बाकीच्या गोष्टींचा आपल्या मनावर झालेला ठसा नाहींसा होतो. ज्या ज्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी असतात किंवा ज्यांचा आपल्या मनावर अनेक वेळां संस्कार होतो तेवढ्यांचें मात्र स्मरण होतें.

पुष्कळ वेळां असें होतें कीं, एकादी गोष्ट आपणांस पूर्ण माहीत असतांनाही ती आठवत नाहीं. अशा वेळीं त्या गोष्टीशीं संबंध असणाऱ्या गोष्टींचें आपण स्मरण करतों व त्यांच्या साहाय्यानें आपणांस स्मरत नसलेली गोष्ट स्मरते. एका कल्पनेच्या बरोबर तिच्या जोडीला असणाऱ्या कल्पना आठवण्याच्या या गुणाला साहचर्य असें म्हणतात.

ह्या साहचर्याचीं पुढें दोन उदाहरणें घेतलीं आहेत. दुसऱ्या बाजीरावाचा मसलतगार त्रिंबकजी डेंगळे याचें नांव मला आठवत नाहीं अशी कल्पना करूं. मी तें नांव आठवण्याचा प्रयत्न करण्यास लागेन. या दुष्ट व हलकट मनुष्याचे सल्ल्यानें बाजीराव वागल्यामुळें बाजीरावाचें नुकसान झालें, ही गोष्ट माझ्या ध्यानांत येईल. यानंतर याच मनुष्यानें गायकवाडचा वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन यास मारेकऱ्यांकडून मारविलें, ही गोष्ट माझ्या स्मरणांत येईल. गंगाधरशास्त्र्याचें नांव आठवतांच त्याला मारेकरी घालून मारणाऱ्या त्रिंबकजीच नांव मला चटकन् आठवेल. आणखी एक दुसरें उदाहरण एथें घेऊं. रघुनाथपंडिताच्या नलदमयंतीस्वयंवरांतील ज्या

श्लोकांत " संकटकाळीं कोणीही उपयोगीं पडत नाहीं " ही गोष्ट सांगितली आहे तो मला आठवत नाहीं. मला नलदमयंतीस्वयंवरांतील श्लोक पाठ येत आहेत. जेव्हां, मला पाहिजे तो श्लोक मला आठवत नाहीं, असें मी पाहातों, तेव्हां मी त्या श्लोकाचे मागील श्लोक म्हणण्यास लागेन. नळराजानें हळूच मोठ्या युक्तीनें तो हंस धरला ही गोष्ट माझ्या लक्षांत येईल. त्याबरोबर " टाकी उपानह पदें अतिमंद ठेवी । केली विजार वरि डौरहि मौन सेवी " हा श्लोक मी म्हणेन. शेवटचा चरण ' भूपें हळूच धरिला कलहंस पायीं ' म्हणतांच, पुढच्या श्लोकाचा पहिला चरण ' कलकल कलहंसें फार केला उडाया ' याचें मला स्मरण होईल व मला पाहिजे तो सबंध श्लोक मला आठवेल हीं निरनिराळ्या प्रकारच्या दोन साहचर्यांचीं दोन उदाहरणें झालीं. पहिल्या उदाहरणांत गंगाधरशास्त्र्याच्या खुनाची गोष्ट लक्षांत येतांच तो खून घडविणारा त्रिंबकजी डेंगळा याची आठवण झाली. म्हणजे कार्याची आठवण होतांच त्या कार्याचा जो कर्ता त्याचें स्मरण मला ताबडतोब झालें. दुसऱ्या उदारणांत श्लोक म्हणण्याचा एक अनुक्रम असल्यामुळें, मागचा श्लोक मला आठवल्याबरोबर पुढील श्लोकाची मला आठवण झाली.कार्यावरून कर्त्याची किंवा कारणाची आठवण होणें, एकाद्या जागेवरून त्या जागीं असलेल्या माणसांची किंवा पदार्थांची आठवण होणें, वस्तूवरून तिच्या गुणधर्मांचें स्मरण होणें, शब्दावरून तो शब्द जो पदार्थ दाखवितो तो स्मरणें, हीं सर्व पहिल्या उदाहरणांत असलेल्या सादृश्याचीं उदाहरणें आहेत. उजळणी, अमर वगैरे पाठ म्हणतांना एका शब्दावरून त्याचे मागचा किंवा पुढचा भाग पाठ म्हणणें हें दुसऱ्या प्रकारच्या साहचर्याचें उदाहरण आहे. जर कांहीं कल्पना किंवा संस्कार ठरलेल्या अनुक्रमानें एकामागून एक नेहमीं होत गेले तर एका संस्काराची किंवा कल्पनेची आठवण झाल्याबरोबर मागून येणाऱ्या संस्काराची किंवा कल्पनेची ताबडतोब आठवण होते. एक श्लोक म्हटला कीं, ताबडतोब त्याचे पुढचा श्लोक आठवतो. अठ्ठावीस अठ्ठें किती, हें जर मुलाला आठवत नसेल तर पहिल्यापासून तो पाढा मोजण्यास तें मूल सुरुवात करितें व अठ्ठावीस सत्तें शहाण्णवाशें म्हटल्याबरोबर अठ्ठावीस अठ्ठें चोवीसदोन हें त्याच्या लक्षांत येतें. ज्यांना संस्कृतचा गंधही नाहीं तीं मुलें संस्कृताचीं पानेंच्या पानें पाठ ह्मणत असतात तें याच साह-

चर्याचे जोरावर. लहान मुलांचे आंगीं ही पाठ करण्याची शक्ति फार असते. आपल्या धंद्यांत कुशल नसलेले शिक्षक मुलांच्या पाठ करण्याच्या या शक्तीचा फार उपयोग करून घेतात व त्यांचे विचारशक्तीचा विकास करण्याचें काम बिलकूल करीत नाहींत. इतिहास, भूगोल, शब्दार्थ वगैरे गोष्टी, हे शिक्षक मुलांकडून पाठ करवून घेतात व ते विषय मुलांना समजावून देण्याच्या भानगडींतच पडत नाहींत. साहचर्याचा आणखी एक प्रकार आहे. त्याच्या योगानें एकादी गोष्ट आपल्या ध्यानांत आली कीं, तिच्या-सारख्याच किंवा तिच्या उलट असणाऱ्या गोष्टींचें स्मरण आपणांस होतें याला सादृश्य साहचर्य म्हणतात. जसें सूर्याची कल्पना येतांच किंवा प्रकाशाची कल्पना लक्षांत येतांच अंधाराचीही कल्पना तावडतोब आपल्या मनांत उभी राहाते.

शिक्षकानें नेहमीं शिकवितांना, मुलांना शिकविलेल्या गोष्टी चांगल्या लक्षांत राहून त्यांचें वाटेल तेव्हां स्मरण व्हावें याजकरितां दुसऱ्या प्रकारच्या साहचर्याचा म्हणजे पाठ म्हणण्याचा उपयोग त्यानें बेतानें करावा. उत्तम श्लोक, साधूंची अर्थपूर्ण उक्ति, उजळणी, गणिताचे नियम वगैरे ज्या गोष्टी मुलांनीं पाठ केल्या पाहिजेत, त्या गोष्टी देखील आधीं उत्तम रीतीनें त्यांना समजावून देऊन नंतर त्या त्यांचेकडून पाठ करवाव्या. उगाच त्या घोकण्यांत मुलांनीं आपला वेळ घालवूं नये. अर्थ कळल्याशिवाय किंवा समजल्याशिवाय पाठ केल्यानें विचारशक्तीचा विकास बिलकूल होत नाहीं. प्रथम कोणतीही गोष्ट समजावून घेऊन नंतर ती ज्या भाषेंत लिहिली असेल ती ध्यानांत ठेवण्याजोगी असेल किंवा ती गोष्ट नेहमीं स्मरणांत राहाणें जरूर असेल तरच ती पाठ करावी; एरवीं करूं नये.

शिक्षकानें मुलांना शिकविते वेळीं साहचर्याचा उपयोग विशेष करावा म्हणजे मुलांना शिकत असलेल्या गोष्टींचें चांगलें स्मरण राहातें. स्मरण हें ग्रहण आणि साहचर्य यांजवर अवलंबून असतें हें सांगितलेंच आहे. मनावर झालेला संस्कार कायम राहावा अशी इच्छा असेल तर तो संस्कार मधून मधून पुनःपुनः झाला पाहिजे म्हणजे तो नाहींसा होत नाहीं. झालेल्या विषयांची वर्गांत उजळणी न झाली तर मुलें शिकलेला भाग कांहीं दिवसांनीं विसरून जातात. मुलांनीं दररोज उजळणी म्हणण्याची जी चाल असते तिचें कारण हेंच. दररोज तेच संस्कार मुलांच्या मनावर झाल्यानें ते वज्रलेप

होतात व मग सर्व आयुष्यांत तें मूल उजळणी विसरून जाण्याची धास्ती नसते.

लहानपणीं मुलांची स्मरणशक्ति फार विलक्षण असते. तीं तीन वर्षांचीं होतात न होतात तोंच भाषेंतील दोनतीनशें शब्द त्यांच्या स्मृतींत राहूं लागतात. तीं सात वर्षांच्या वयापर्यंत जवळ जवळ अर्धी भाषा शिकतात. मुलांची ही स्मरणशक्ति १४ व्या वर्षापर्यंत वाढत जाते. पुढें जसजसा विचारशक्तीचा विकास होत जातो, तसतशी स्मरणशक्ति कमी होत जाते. मनाचा विकास होण्याला स्मरणशक्ति अगदीं आवश्यक आहे. तिच्या साहाय्यावांचून मनाचा विकास बिलकूल होणार नाहीं. जें जें ज्ञान आपणांला होतें तें तें स्मरणशक्ति सांठवून ठेवते व उपयोगासाठीं वाटेल तेव्हां तें ज्ञान बाहेर काढते. स्मरणशक्तीनें हें ज्ञान मनांत सांठवून पुन्हां मनाला वाटेल तेव्हां पुरविण्याचें काम केलें नाहीं तर मनाला ज्ञानाचा सांठाच मिळणार नाहीं आणि ज्ञानाची सामुग्री नसल्यास मनाचा विकास तो काय होणार ?

मुलांचे स्मरणशक्तींत कांहीं दोष असल्यास ते लक्षांत आणून घालविण्याचा शिक्षकानें प्रयत्न करावा. कांहीं मुलांना लवकर समजतें पण समजलेली गोष्ट देखील तीं थोड्याच वेळांत विसरून जातात. कांहीं मुलांना समजण्यास वेळ लागतो पण एकदां का एकादी गोष्ट समजली कीं, मग ती तीं मुलें कधींही विसरत नाहींत. कांहीं मुलांची ग्रहणशक्ति चांगली असते पण धारणाशक्ति दुर्बळ असते; यामुळें झालेलें ज्ञान त्यांच्या मनांत फार वेळ राहातच नाहीं. कांहीं मुलांना नुकत्याच शिकविलेल्या गोष्टी चांगल्या स्मरतात, पण जसजसा काळ जातो तसतसा त्यांचे मनावरील तो संस्कार पुसट होत जातो व कांहीं दिवसांनीं तो पूर्ण नाहींसा होतो. कांहीं कांहीं मुलांच्या लक्षांत विशेष चमत्कारिक गोष्टी तेवढ्या राहातात पण साधारण गोष्टींची स्मृति त्यांना होत नाहीं. कांहीं मुलांचे लक्षांत, अनेक गोष्टींतील साम्य चांगलें राहातें पण भेद मात्र त्यांना आठवत नाहीं. या सर्व गोष्टी शिक्षकानें लक्षांत ठेवाव्या व मुलांचे स्मरणशक्तींतील दोष काढून टाकण्याचा यत्न करावा. आजारीपणामुळें, अशक्ततेमुळें, मेंदूच्या दुबळेपणामुळें किंवा पुरेसें व कसदार अन्न न मिळाल्यानें मुलांची स्मरणशक्ति कमी होते.

# शिक्षक आणि शिक्षण.

## बौद्धिक शिक्षण.

### भाग ४ था.

### कल्पनाशक्ति.

" ज्ञानेंद्रियांनीं बाह्य वस्तूंचें ज्ञान होतें व त्या ज्ञानाचा ठसा किंवा प्रतिमा आपले मेंदूवर राहाते. स्मरणशक्तीच्या योगानें वाटेल तेव्हां ही प्रतिमा आपल्या मनाच्या समोर आणितां येते व अशा रीतीनें आपणांस झालेलें ज्ञान नाहींसें होत नाहीं.", हें मागील भागांत सांगितलें आहे. स्मरण-शक्ति नवीन ज्ञान मिळवून देत नाहीं. ज्ञानेंद्रियांनीं जें ज्ञान मिळविलेलें असतें तेंच ती राखून ठेविते. ज्ञानेंद्रियांनीं मिळणाऱ्या ज्ञानाशिवाय जर दुसरें ज्ञान मनुष्याला मिळालें नाहीं तर त्याच्या ज्ञानाचा सांठा फार संकु-चित होईल. ज्ञानाचा सांठाच जर कमी झाला तर त्याची विचारशक्तिही कमी होईल व अर्थातच त्याच्या बुद्धीचा पूर्ण विकास होणार नाहीं. ही गोष्ट खालील दोन उदाहरणांनीं अधिक स्पष्ट होईल.

प्राथमिक शाळेंत पांचवे इयत्तेंत शिकणाऱ्या एका मुलाचें आपण उदाहरण घेऊं. या मुलाला हिंदुस्तानच्या भूगोलाचें बरेंच ज्ञान असतें. कलकत्ता, मद्रास, मुंबई व कराची हीं मोठालीं बंदरें आहेत; या बंदरांत कोट्यवधि रुपयांचा माल परदेशांतून येतो, व तसाच एथून कोट्यवधि रुपयांचा माल परदेशांत रवाना होतो, इत्यादि गोष्टींची त्या मुलाला बरी-चशी कल्पना असते. सह्य, विंध्य, अरवली, हिमालय वगैरे पर्वतांच्या लांबीरुंदीची, त्यांच्यावरील सुंदर व विस्तृत पसरलेल्या वनांची आणि हिंदु-स्तानास होत असलेल्या त्यांच्या उपयोगाची कांहीं थोडी तरी कल्पना या मुलाला असते. कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा, साबरमती, गंगा, यमुना, सिंधु व ब्रह्मपुत्रा वगैरे नद व नद्या या, वरील पर्वतांवरील जलौघ

आणून आपल्या कांठचा प्रदेश सुपीक करितात व लक्षावधि लोकांना अन्न व पाणी पुरवितात, यांच्या कांठीं इतिहासांत प्रसिद्ध असलेलीं अनेक शहरें व पवित्र क्षेत्रें आहेत, इत्यादि अनेक गोष्टींचें साधारण ज्ञान त्या मुलाला असतें. वर सांगितलेल्या शहरांपैकीं, पर्वतांपैकीं किंवा नद्यांपैकीं किती शहरें पर्वत किंवा नद्या त्या विद्यार्थ्यानें पाहिलेल्या असतात ? केवळ ज्ञानेंद्रियांनीं मिळणाऱ्या ज्ञानाशिवाय इतर ज्ञान जर त्या विद्यार्थ्याला मिळालें नाहीं तर त्यानें स्वतः पाहिलेले पांच सात गांव, त्यांतून वाहणारे ओढे किंवा नद्या, गांवाचे शेजारीं असलेल्या टेकड्या यांचे पलीकडे त्याचें ज्ञान कधींही जाणार नाहीं.

हें भूगोलाविषयीं झालें. आतां आपण त्या मुलाला असलेल्या इतिहासाच्या ज्ञानाविषयीं पाहूं. मराठी पांचवे इयत्तेंतील मुलाला महाराष्ट्र देशाच्या इतिहासाची बरीच माहिती असते. १९ व्या शतकाचे प्रारंभीं महाराष्ट्राची किती दैन्यावस्था झाली होती, पेंढाऱ्यांचे लुटालुटीमुळें व शिंदे, होळकर व पेशवे यांच्या आपसांतील यादवीमुळें, देश कसा वैराण झाला होता, त्यांत वारंवार दुष्काळ कसे पडत होते, मनुष्याच्या प्राणाची व वित्ताची शाश्वती कशी नव्हती व प्रजा अगदीं त्रस्त कशी झाली होती इत्यादि गोष्टींचें त्याला ज्ञान झालेलें असतें. त्रिंबकजी डेंगळ्यासारख्या नीच व आपमतलबी मनुष्याचें, बाजीरावासारख्या चैनी, स्वार्थी व सद्गुणापासून परावृत्त असलेल्या माणसाचें किंवा बापू गोखल्यासारख्या शूर, दमदार, सद्गुणी व स्वकर्तव्यनिष्ठ माणसाचेंही चित्र त्याच्या डोळ्यासमोर उभें राहातें. मागील शतकांतील माणसें, त्या वेळची समाजस्थिति किंवा राजकीय स्थिति हा त्या मुलानें पाहिलेलीं नसतात. मागील गोष्टींविषयीं मिळालेलें हें ज्ञान त्याला ज्ञानेंद्रियांनीं मिळालेलें नाहीं.

इंद्रियांनीं झालेल्या ज्ञानावरच जर मनुष्यास अवलंबून राहावें लागलें तर त्याच्या कुटुंबांतील माणसें, त्याच्या नात्यागोत्यांतील कांहीं माणसें, तो ज्या समाजांत वागतो त्यांतील कांहीं व्यक्ति यांशिवाय इतर कोणत्याही माणसाचें त्याला ज्ञान झालें नसतें. तो राहातो त्या देशांतील निरनिराळ्या प्रांतांची, समाजांची, उद्योगधंद्यांची कल्पना त्याला आली नसती. समकालीन लोकांची व त्यांचे उद्योगधंद्याची व समाजस्थितीची कल्पना करितां येणें अशक्य झालें तर मग मागील शतकांतील किंवा

हजारों वर्षांपूर्वीं होऊन गेलेल्या आपल्या पूर्वजांबद्दल यथार्थ ज्ञान होण्याचें अगदींच अशक्य होईल.

मनुष्याचें ज्ञान वाढण्याकरितां परमेश्वरानें, ज्ञानेंद्रियें व स्मरणशक्ति यांशिवाय, आणखी एक शक्ति मनुष्यास दिलेली आहे. तिचें नांव कल्पनाशक्ति. इंद्रियांचेयोगानें मनुष्याला जें ज्ञान मिळतें त्याच्या प्रतिमा मेंदूवर उमटतात व स्मरणशक्ति वाटेल तेव्हां या प्रतिमा मनाचे पुढें पुन्हां उभ्या करिते. कल्पनाशक्ति या प्रतिमांपैकीं वाटेल त्या घेऊन त्यांच्या साहाय्यानें एक नवीनच प्रतिमा मनापुढें उभी करते. स्वयंपाकघरांत रवा, साखर, तूप वगैरे अनेक पदार्थ ठेविलेले असतात. स्वयंपाक करणारा मनुष्य ह्यांपैकीं अवश्य ते पदार्थ योग्य प्रमाणांत मिसळून शिरा, लाडू वगैरे पक्वान्नें बनवितो. त्याचप्रमाणें कल्पनाशक्ति, ज्ञानेंद्रियांनीं मिळविलेल्या व स्मरणशक्तीनें आणून दिलेल्या अनेक प्रतिमा मिळवून त्यांची एक नवीनच प्रतिमा तयार करिते.

आपणांपैकीं पुष्कळांनीं शरावतीचा गिरसाप्पा एथील धबधबा पाहिला नाहीं. परंतु पाणी, खडक, पाण्याचे तुषार, इंद्रधनुष्य, पक्षी, दूध वगैरे वस्तूंचें ज्ञान आपल्या ज्ञानेंद्रियांनीं मिळवून आपल्या मनांत सांठवून ठेविलेलें असतें. जेव्हां आपण त्या धबधब्याचें वर्णन वाचतों तेव्हां आपली कल्पनाशक्ति यां सर्व प्रतिमांचें मिश्रण करून धबधब्याचें एक चित्र आपल्या समोर उभें करिते. आतां कल्पनाशक्तीनें आपल्या मनापुढें उभी केलेली प्रतिमा, धबधबा प्रत्यक्ष पाहून झालेल्या प्रतिमेइतकी स्पष्ट किंवा हुबेहूब नसते. तथापि कल्पनाशक्तीनें आपल्या मनापुढें उभ्या केलेल्या प्रतिमेनें आपला बराच कार्यभाग होतो व आपल्या ज्ञानाचा सांठाही वाढतो. आपण जें जें वर्णन वाचीत असतों किंवा ऐकत असतों त्याबरहुकूम मनांत पूर्वीं सांचलेल्या प्रतिमांच्या साहाय्यानें आपली कल्पनाशक्ति आपल्या मनापुढें चित्र उभें करीत असते. **ज्ञानेंद्रियांनीं मिळविलेल्या ज्ञानाचे योगानें मेंदूवर उमटलेल्या प्रतिमा, स्मरणशक्तीच्या साहाय्यानें मनापुढें आणून, त्यांतील ज्या लागतील त्या घेऊन, त्यांची ऐकत असलेल्या किंवा वाचीत असलेल्या किंवा मनांत असलेल्या वर्णनाबरहुकूम प्रतिमा तयार करणें हें कल्पनाशक्तीचें पहिलें काम आहे. हें काम करणाऱ्या कल्पनाशक्तीला बौद्धिक कल्पनाशक्ति असें म्हणतात.**

दुसऱ्यानें केलेल्या वर्णनाप्रमाणें चित्र रेखाटणें हा बौद्धिक कल्पनेचा पहिला प्रकार होय. शिक्षकानें जो धडा समजावून दिला तो विद्यार्थ्यांना या कल्पनाशक्तीच्या जोरावर कळतो. बौद्धिक कल्पनेचा दुसरा प्रकार म्हटला म्हणजे स्वतःच आपल्या कल्पनाशक्तीनें नवीनच प्रतिभा किंवा चित्र रेखाटणें हा होय. अशा तऱ्हेची कल्पनाशक्ति कवि, चित्रकार, शास्त्रज्ञ वगैरे लोकांत विशेष असते. संस्कृत कवि बाणभट्ट यानें आपल्या कादंबरी नामक प्रसिद्ध ग्रंथांत यक्ष, किन्नर, अप्सरा, गंधर्वलोक, हिमालय, अच्छोद सरोवर यांचीं केलेलीं वर्णनें त्याच्या कल्पनाशक्तीची साक्ष देतात. आरबी भाषेंतील सुरस गोष्टी लिहिणाऱ्या ग्रंथकारांतही ही शक्ति विशेष असली पाहिजे.

बौद्धिक कल्पनाशक्तीशिवाय दुसरी एक प्रकारची कल्पनाशक्ति असते. हिच्यायोगानें दुसऱ्याच्या सुखदुःखादि भावनांचें चित्र आपणांसमोर ताबडतोब उभें राहातें. थंडी पडली असतां किंवा भूक लागली असतां आपणांस जी व्यथा होते तिच्यावरून व, जेव्हां भुकेनें तडफडणारा व थंडीनें गारठलेला भिकारी आपण पाहातों, तेव्हां त्याच्या व्यथेचें चित्र आपली कल्पनाशक्ति आपल्यापुढें उभें करते, त्याजबरोबर आपलें अंतःकरण द्रवतें व आपण त्या विपत्तींत असणाऱ्या मनुष्याला मदत करण्यास तयार होतों. परोपकार, सहानुभूति, प्रेम वगैरे सामाजिक उच्च भावना उत्पन्न होण्यास कल्पनाशक्ति अवश्य लागते. दुसऱ्याला होणाऱ्या सुख, दुःख, प्रेम वगैरे भावनांचें चित्र कल्पनाशक्तीनें उत्तम रीतीनें रेखाटून आपलेपुढें ठेविलें नाहीं तर आपल्या मनांत सहानुभूति, स्नेह, प्रेम वगैरे भावना उत्पन्न होणार नाहींत. आजपर्यंत जीं परोपकारी सदय अंतःकरणाचीं माणसें होऊन गेलीं त्यांचे आंगीं आपल्या कल्पनाशक्तीनें दुसऱ्याच्या भावना जाणण्याची विशेष शक्ति होती यामुळें दुसऱ्याचे सुखानें त्यांना आनंद होत असे व दुसऱ्याचे दुःखानें त्यांना तळमळ लागत असे.

यावरून हें उघडच आहे कीं, बुद्धीचा विकास करण्याचे कामीं व सहानुभूति वगैरे सद्गुण उत्पन्न करण्याचे कामीं कल्पनाशक्तीचा फार उपयोग होतो, आणि म्हणूनच मुलांच्या कल्पनाशक्तीचा विकास करणें हें शिक्षकाचें व आईबापांचें काम आहे.

मुलांच्या कल्पनाशक्तीचा विकास करितांना आईबापांला व शिक्षकाला फार खबरदारी घ्यावी लागते. स्वयंपाकघरांत नाना तऱ्हेचीं पक्वान्नें व भोजनाचे पदार्थ तयार करण्यास लागणारी सामग्री आहे, पण स्वयंपाक करणाऱ्या माणसानें अवश्य तें सामान योग्य प्रमाणांत मिळविलें तरच सुरेखसें पक्वान्न किंवा भोजनाचा दुसरा एकादा पदार्थ तयार होईल. त्यानें तसें न करितां वाटेल तें सामान वाटेल त्या इतर सामानांत वाटेल त्या प्रमाणांत मिसळलें तर भलताच एकादा पदार्थ तयार होईल व तो खाल्ला असतां खाणारांचे प्रकृतीला अपाय होईल. त्याचप्रमाणें मुलांचे कल्पनाशक्तीनें योग्य त्या प्रतिमा घेऊन, त्यांच्या साहाय्यानें इष्ट ती प्रतिमा बनविली पाहिजे म्हणजे कल्पनाशक्तीवर विचारशक्तीचा दाब पाहिजे. कल्पनाशक्तीवर जर विचारशक्तीचा दाब राहिला नाहीं, व ती जर बेफाम झाली तर तिचा उपयोग न होतां तिजपासून अनिष्ट परिणाम होतील. भलभलत्या कल्पनांनीं जर माणसाचें डोकें भरून गेलें तर तेथें विचारशक्तीला अवसरच सांपडत नाहीं.

तीन चार वर्षांचें मूल झालें कीं, त्याची कल्पनाशक्ति वाढण्याला प्रारंभ होतो. काठीला घोडा समजून तिजवर बसणें, बाहुलीला लहान मूल समजून तिला थोपटून निजविणें किंवा न्हाऊं घालणें, एकमेकांच्या कपड्याचे पदर धरून आगगाडी बनविणें वगैरे खेळांत त्यांची कल्पनाशक्ति दिसून येते. ही कल्पनाशक्ति मुलें ७।८ वर्षांचीं होईपयत सारखी वाढत असते. पुढें जसजसा मुलांचे बुद्धीचा विकास होत जातो तसतसा कल्पनाशक्तीचा जोर कमी होत जातो व विचारशक्तीचे हाताखालीं ती काम करूं लागते. अगदीं लहानपणीं मुलांना मांजर, कुत्रीं, चिमणी, कावळा यांच्या गोष्टी फार आवडतात व त्या मुलें मोठ्या आवडीनें ऐकतात. पहिल्यानें त्यांना त्या गोष्टी जुळवून परत सांगतां येत नाहींत, पण कांहीं दिवसांनीं मुलें ऐकलेली सर्व गोष्ट जुळवून सांगतात. केव्हां केव्हां तीं आपल्या कल्पनेनें एकादी स्वतंत्र गोष्ट देखील तयार करून सांगत असतात. प्राथमिक शाळांतून मुलांना गोष्टी सांगण्याचे तीन हेतु असतात : १ मुलांच्या बौद्धिक कल्पनाशक्तीचा विकास करणें. २ मुलांच्या भावनोत्पादक कल्पनाशक्तीचा विकास करणें. ३ मुलांचे ठिकाणीं सुंदर भाषा व विचार यांची आवड उत्पन्न करणें व त्यांना आपले विचार व्यवस्थित रीतीनें मांडावयास शिकविणें. जेव्हां आपण लहान मुलांना

गोष्ट सांगत असतों, तेव्हां त्यांची कल्पनाशक्ति आपल्या गोष्टींतील वर्णनाप्रमाणें प्रतिमा त्यांचे मनापुढें उभ्या करीत असते. अशा रीतीनें कल्पनाशक्तीला व्यवसाय मिळाल्यामुळें तिचा विकास होत असतो. दुसऱ्या प्रकारच्या गोष्टी म्हणजे नैतिक कथा. यांच्यायोगानें मुलांचे मनांत दुसऱ्याचे सुखदुःखाची कल्पना येते व त्यायोगानें सहानुभूति, दया वगैरे सद्गुणांचें बीज त्याचे मनांत पेरलें जातें. मुलांच्या अगदीं लहान वयांत त्यांची कल्पनाशक्ति आंवरून धरावी लागते. कल्पनाशक्तीनें मुलांची भीति ही भावना फार बळावते. खरोखरीच्या भयंकर पदार्थांपेक्षां किंवा मनुष्यांपेक्षां मुलांनीं आपल्या कल्पनाशक्तीनें बनविलेल्या पदार्थांचीं अगर माणसांचीं चित्रें जास्त भेसूर असतात. भुतें, राक्षस वगैरेंची भीति या वयांत मुलांचे मनांत शिरली कीं, त्यांच्या कोमल मनावर व शरीरप्रकृतीवर तिचा परिणाम फार वाईट होतो. एकदां कां भीति ही भावना लहान मुलाचे मनांत शिरली कीं, ती पुढील वयांत देखील नाहींशी होत नाहीं. लहानपणीं भीतीला जीं कारणें असतात त्यांच्यापेक्षां निराळ्याच कारणांनीं पुढच्या वयांत भीति वाटते, एवढाच कायतो फरक होतो. आपल्या इकडे लहान मुलांना बुवाची भीति घालण्याची फार चाल आहे. "तो पाहा अंधारांत बुवा बसला आहे. त्याचे दांत व दाढा फार लांब लांब आहेत. तो मुलांना धरून आपल्या झोळींत टाकतो" अशा तऱ्हेची कांहीं तरी भीति घरांतील माणसें मुलाला घालीत असतात. पण याचा परिणाम त्या मुलांचे कोंवळ्या मनावर फार वाईट होतो. मूल आपल्या कल्पनाशक्तीनें अत्यंत भेसूर असें बुवाचें चित्र काढीत असतें व त्या भीतीनें मनांत नेहमीं झुरत असतें. कांहीं कांहीं मंडळींना भुताखेताच्या अत्यंत भयंकर व रसभरित गोष्टी सांगण्याची संवय असते. मुलें या गोष्टी फार लक्षपूर्वक ऐकतात. या गोष्टी ऐकत असतांना त्या भुताचें भयंकर चित्र तीं मुलें आपल्या मनांत काढीत असतात. याचा परिणाम असा होतो कीं, रात्रीं अंधारांत जेथें तेथें त्या मुलांना त्यांनीं कल्पनेनें रेखाटलेलें भुताचें चित्र दिसूं लागतें. यामळें कित्येक मुलें अंधारांत जाण्यास भितात. कित्येक भीतीनें आजारी पडतात. एवढ्याकरितां लहान मुलांना भीति घालावयाची तीं शिक्षा करण्याची भीति घालावी; बुवा वगैरे काल्पनिक गोष्टींची भीति घालणें बरें नव्हे. मुल जसजशीं वाढत जातात

तसतशीं इतिहास, भूगोल, चित्रकला, वाङ्मय वगैरे विषयांनीं त्यांची कल्पनाशक्ति वाढत असते.

मुलांची कल्पनाशक्ति वाढविण्यास शिक्षकाचे आंगीं कोणत्याही गोष्टीचें शब्द चित्र रेखाटण्याचा गुण पाहिजे. सृष्टशास्त्राचे अध्ययनानेंही कल्पनाशक्तीची वाढ चांगली होते.

---

# शिक्षक आणि शिक्षण.

## बौद्धिक शिक्षण.

### भाग ५ वा.

### सामान्यबोधशक्ति.

मागील भागांत आपण कल्पनाशक्तीचा विचार केला. आतां या भागांत कल्पनेच्या पुढील मनोव्यापार जो सामान्यबोध त्याजविषयीं विचार करूं. आपण मनुष्यें, घोडे, पक्षी, किडे वगैरे अनेक सजीव पदार्थ पाहातों. त्या सर्वांमध्यें असलेलें साम्य म्हणजे साधारण गुणधर्म आपल्या लक्षांत येतात. नंतर या सर्वांना आपण प्राणी या वर्गांत घालतों व हे सर्व प्राणी आहेत असें म्हणतों. पहिल्यानें अनेक मनुष्यें, घोडे, पक्षी वगैरेंचा आपणांस ज्ञानेंद्रियांनीं बोध होतो व त्या सर्वांच्या प्रतिमा आपल्या मेंदूवर उमटतात. स्मरणशक्ति, जेव्हां आपणांस पाहिजे तेव्हां या सर्व प्रतिमा काढून आपल्या मनापुढें त्या पुन्हा उभ्या करिते. नंतर मन ह्या सर्वांची तुलना करून त्या सर्वांत असणारा गुण जो जीवित्व तो वेगळा काढतें व हा गुण असणाऱ्या पदार्थांचा एक वर्ग करून त्या वर्गाला प्राणी हें नांव देतें. वास्तविक पाहातां ' प्राणी ' ही कल्पना आपणांस इंद्रियांच्या द्वारें किंवा स्मरणशक्तीच्या योगानें किंवा कल्पनाशक्तीच्या योगानें मिळालेली नाहीं. मनुष्य, पशु, पक्षी यांत जें सामान्य स्वरूप आहे, तेवढेंच ज्यांत आहे अशा पदार्थाला आपण प्राणी म्हणतों. अर्थात् अशा पदार्थाचें आस्तित्व असणें शक्य नाहीं. प्राणी या शब्दानें होणारा सामान्य बोध आपणांस ज्ञानेंद्रियांनीं होत नाहीं. हा बोध विचारशक्तीनेंच होतो. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, हा बोध होण्याला ज्ञानेंद्रियांची व स्मरणशक्तीची मदत विचारशक्तीला लागते. या सर्वांच्या मदतीनें विचारशक्तीला सामान्य बोध होतो.

ही गोष्ट अधिक स्पष्ट होण्याकरितां आपण आणखी एक उदाहरण घेऊं. 'वाघ' हा शब्द ऐकिल्याबरोबर भयंकर जबडा, तीक्ष्ण नखें व आंगा-

वर पट्टे असलेल्या, पूर्वी पशुसंग्रहालयांत पाहिलेल्या प्राण्याची प्रतिमा, जर माझ्यासमोर उभी राहिली तर ती प्रतिमा माझ्या स्मरणशक्तीनें उभी केलेली आहे. प्रत्यक्ष वाघ पाहून, ज्ञानेंद्रियांनीं जी वाघाची प्रतिमा माझ्या मेंदूवर रेखिली तीच कांहीं कालानें स्मरणशक्तीनें माझ्यापुढें उभी केली. पण क्रूरपणा, शक्ति, वेग, मांसाशन वगैरे गुण आंगीं असणाऱ्या जनावरांच्या जातीचा जर कल्पना-वाघ शब्दानें माझ्या मनांत आली, तर तें स्मरण नव्हे, तर तो वाघ या जातीबद्दल होणारा सामान्य बोध होय. सामान्य बोधाच्या योगानें कांहीं विशिष्ट गुण असणाऱ्या वस्तूंच्या किंवा प्राण्यांच्या वर्गाची कल्पना दृष्टीसमोर येते;सामान्यबोधाचे योगानें एकाद्या वस्तूचा किंवा प्राण्याचा विचार मनांत न येतां ते गुण ज्यांत आहेत अशा वस्तूंचा वर्ग आपल्या दृष्टीसमोर येतो. सामान्यबोध करून देणाऱ्या विचारशक्तीला आपण सामान्यबोधशक्ति असें म्हणूं.

कल्पनाशक्तीमुळें, एकाद्या विवाक्षित पदार्थाचें चित्र डोळ्यांसमोर राहातें, पण सामान्यबोधशक्तीमुळें, त्या पदार्थाच्या जातीचें सामान्य स्वरूप दृष्टीपुढें उभें राहातें.

सामान्यज्ञान हें विशेषज्ञानापासून आपणांस मिळतें. आपण गुलाब, चमेली, सोनचांफा वगैरे अनेक प्रकारचीं फुलें पाहातों. त्या सर्वांच्या प्रतिमा स्मरणशक्तीमुळें आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहातात. नंतर मन त्या सर्वांचें निरीक्षण करितें, व त्या सर्वांत सामान्य असणारे गुणधर्म निराळे काढितें, व हे गुणधर्म ज्यांत आहेत त्या सर्वांस फूल हें नांव देतें. आधीं संवेदन, मग बोध व मग सामान्य-ज्ञान, असा अनुक्रम आहे. सामान्यबोध स्पष्टपणें होण्यास, प्रथमतः इंद्रियद्वारां पदार्थाचें निरीक्षण चांगलें झालें पाहिजे. त्याची प्रतिमा स्पष्टपणें डोळ्यांसमोर येण्यास स्मृतिही चांगली असली पाहिजे, व पदार्थांतील साम्य ओळखण्यास अनुमानशक्तिही उत्तम पाहिजे. मनुष्य, पशु, घर, पक्षी वगैरे सामान्यनामें हा सामान्यबोधच दाखवितात. अनेक पदार्थांचें निरीक्षण करून त्यांतील साम्य लक्षांत घेऊन, त्या सर्वांस एका वर्गांत घातलें आहे ही गोष्ट सामान्यनामें दाखवितात. अशा तऱ्हेचीं सामान्यनामें नसतीं, तर विचार करणेंच अशक्य झालें असतें, व आपल्या स्मरणशक्तीवर विलक्षण ताण बसला असता. एक सामान्य

नाम घेतलें कीं, त्या जातींत असलेल्या सर्व पदार्थांचा सामान्यबोध आपणांस होतो.

सामान्यबोधशक्तीला विचाराची जोड लागते. यामुळें अगदीं लहान मुलांत ही शक्ति असूं शकत नाहीं. मुलें मोठीं होऊन बोलूं चालूं लागलीं कीं, तीं निरनिराळ्या पदार्थांत तुलना करूं लागतात. सात आठ वर्षांच्या मुलांत देखील सामान्यबोधशक्ति फार कमी असते. या वयाचे नंतर मुलांत ती हळू हळू येऊं लागतें. अपूर्ण निरीक्षण, अस्पष्ट बोध, अपूर्ण अनुमान, अर्थाकडे लक्ष न देतां केलेली चुकीची शब्दयोजना, व वाईट स्मरणशक्ति यांमुळें सामान्यबोध चांगला होत नाहीं. मुलांच्या आंगीं सामान्यबोधशक्तीचा विकास करणें, हें काम बरेंच कठीण आहे. मुलांना अनेक वस्तु पाहाण्यास मौज वाटते, पण त्यांच्यांतील सामान्यभाव ग्रहण करण्याची बरोबर शक्ति त्यांचे आंगीं नसल्यामुळें, त्यांच्या मनावर ताण बसतो. एकदम जर एकादी व्याख्या मुलांस सांगितली, तर ती त्यांना समजतही नाहीं व त्यांत त्यांना गोडीही वाटत नाहीं. अशा तऱ्हेनें मुलांना एकादी व्याख्या एकदम पाठ करावयास सांगणें, ही शिक्षणपद्धति फार चुकीची आहे. मुलांना वस्तूंमधील साम्य किंवा भेद हुडकून काढण्याची आवड असते. या त्यांच्या आवडीचा शिक्षकानें उपयोग करून घ्यावा.

शिक्षकानें अनेक वस्तु मुलांचे पुढें मांडून त्यांच्यामधील साम्य त्यांना शोधून काढण्यास सांगावें. नंतर त्यांच्यांतील सामान्य गुणधर्म एकीकडे काढण्यास सांगून, त्यांना ह्या पदार्थांचें वर्गीकरण करण्यास सांगावें. मग त्या वर्गांची व्याख्या मुलांकडून काढून घ्यावी. आपण एक साधें उदाहरण घेऊं. आपणांस विशेषणाची व्याख्या मुलांस शिकवावयाची आहे. प्रथमच जर "नामाचा गुण दाखविणारा शब्द" ही व्याख्या आपण मुलांस सांगितली, तर ती मुलांना बरोबर कळणार नाहीं. ज्यांत विशेष्य व विशेषणें आहेत अशीं ४।५ वाक्यें घ्यावीं. त्या प्रत्येक वाक्यांतील नाम व विशेषण यांतील भेद मुलांकडून काढून घ्यावा. नामाबद्दल माहिती सांगणारे शब्द एका बाजूस मांडून, त्यांचें वर्गीकरण करावें, व हे शब्द नामाबद्दल विशेष कांहीं तरी माहिती सांगतात हें मुलांकडून काढून घ्यावें. नंतर या वर्गास

विशेषण ह्मणतात हें सांगावें. अशा रीतीनें विशेषणाचा सामान्यबोध मुलांस सहज होईल.

शिक्षकानें मुलांना शब्दाचा अर्थ बरोबर कळला कीं नाहीं, हें वरचेवर प्रश्न विचारून पाहावें. अगोदर वस्तु नंतर शब्द ही गोष्ट त्यानें नेहमीं लक्षांत ठेवावी. गणित, व्याकरण, भूगोल, सृष्टिज्ञान वगैरे विषयांचे अभ्यासानें सामान्यबोधशक्तीचा विकास होतो.

# शिक्षक आणि शिक्षण.

## बौद्धिक शिक्षण.

### भाग ६ वा.

### निर्णय आणि अनुमान.

या जगांत मनुष्यप्राण्याला त्याच्या विचारशक्तीमुळें श्रेष्ठत्व मिळालें आहे. इतर प्राण्यांना ही विचारशक्ति नसल्यामुळें त्यांना आपली सुधारणा करून घेतां येत नाहीं. यामुळें जगाचे प्रारंभीं ते प्राणी ज्या स्थितींत होते त्याच स्थितींत अद्यापिही आहेत. मनुष्याला परमेश्वरानें ज्याप्रमाणें नेत्र दिले आहेत त्याचप्रमाणें कुत्रा, मांजर, ससा, घार वगैरे पशुपक्ष्यांनाही दिलेले आहेत. तसेंच दुसरीं ज्ञानेंद्रियेंही मनुष्याप्रमाणें इतर पशुपक्ष्यांनाही दिलेलीं आहेत. मनुष्याला, ज्याप्रमाणें या ज्ञानेंद्रियांनीं बाह्य जगाचें ज्ञान होतें त्याचप्रमाणें या पशुपक्ष्यांनाही होतें. ज्ञानेंद्रियांच्या योगानें झाड, आकाश, नदी वगैरे पदार्थांचें ज्ञान होऊन त्या पदार्थांच्या प्रतिमा, ज्याप्रमाणें मनुष्यांच्या मेंदूवर उमटून त्यांना त्या त्या पदार्थांची आठवण राहाते, त्याचप्रमाणें या पशुपक्ष्यांनाही राहाते. गुरें नेमकीं आपल्या घरास परत येतात. पक्षी झाडावर केलेल्या आपल्या घरट्यांत दूर अंतरावरूनही नियमानें न चुकतां प्रत्येक संध्याकाळीं परत येतात. यावरून मनुष्याला, ज्याप्रमाणें स्मरणशक्ति आहे, त्याचप्रमाणें पशुपक्ष्यांनाही आहे हें उघड आहे. पशुपक्ष्यादि प्राण्यांचे अंगीं थोडीबहुत कल्पनाशक्तिही असते.

प्रत्यक्ष ज्ञान, स्मरण आणि कल्पना हीं विचारशक्तीचीं साधनें आहेत. यांच्यायोगानें एकादा पदार्थ किंवा त्या पदार्थाची प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी राहाते. विचारशक्तीच्या योगानें आपण पदार्थांच्या गुणधर्मांचा व त्यांच्या एकमेकांशीं असलेल्या संबंधाचा विचार करितों. " मनुष्य मरणाधीन आहे " " तेथें धूर दिसत आहे यावरून तेथें अग्नि असला पाहिजे " " सौजन्यानें मनुष्य सर्वांस प्रिय होतो " " उष्णतेनें पदार्थ प्रसरण पाव-

तात म्हणून हें लोखंड तापविलें असतां प्रसरण पावेल. ” वगैरे विधानें आपण जेव्हां करितों तेव्हां प्रत्यक्ष पदार्थ किंवा त्यांची प्रतिमा यांचेबद्दल विचार न करितां,पदार्थांतील गुणधर्म व त्यांचा एकमेकांशीं असणारा संबंध, यांजबद्दल आपण विचार करीत असतों.

सामान्य बोध, निर्णय व अनुमान या विचाराच्या तीन पायऱ्या आहेत. सामान्यबोधाबद्दलचें विवेचन मागील भागांत केलें आहे. पोपट, मैना, मोर, बगळा वगैरे अनेक प्राणी पाहून व त्यांच्यांत असणारे सामान्य गुण लक्षांत घेऊन, त्यांचा पक्षी या नांवाचा वर्ग तयार करणें ही गोष्ट विचारशक्तीशिवाय होणार नाहीं. मनुष्याशिवाय इतर प्राण्यांना अनेक वस्तूंत असणारे सामान्य गुणधर्म पाहून त्यांचा एक वर्ग बनविण्याची विचारशक्ति नसते. विचारशक्तीच्या पुढील दोन पायऱ्या निर्णय व अनुमान यांचें विवेचन या भागांत केलें आहे. शिक्षकाला मुलांच्या या विचारशक्तीचा विकास करावयाचा असतो. बौद्धिक शिक्षणांतील स्मरण व कल्पना हीं या शक्तीचीं साधनें आहेत म्हणून त्यांचा परिपोष करावयाचा असतो. परंतु शिक्षणाचें ध्येय विचारशक्तीची वाढ हें आहे ही गोष्ट त्यानें पूर्णपणें आपल्या दृष्टीसमोर ठेविली पाहिजे.

## निर्णयशक्ति.

*“ निर्णय म्हणन जो मनोव्यापार आहे, त्याचा समावेश विचार या उच्च मनोव्यापारांतच होतो. दोन सामान्य कल्पनांमधील संबंध मनास समजतो, तेव्हां निर्णय हा मनोव्यापार होतो. या मनोव्यापारास लागणारें सामान, बोधशक्ति व सामान्यबोधशक्ति या पुरवितात. अर्थातच या साहित्याच्या बरेवाईटपणावर या मनोव्यापाराचा बरेवाईटपणा अवलंबून राहातो.” वाक्य हें निर्णयाचें बाह्य स्वरूप आहे. “ मनुष्य हा प्राणी आहे ” असें जेव्हां आपण ह्मणतों, तेव्हां आपल्या मनास काय बोध होतो तें पाहूं. प्रथम मनुष्य आणि प्राणी, या दोन शब्दांनीं दाखविलेल्या कल्पना, आपल्या मनांत उभ्या राहातात. नंतर दोहोंत एक प्रकारचें नातें आहे, ही गोष्ट आपल्या लक्षांत येते. निर्णयामध्यें दोन गोष्टी असतात. १ **तुलना** २ **निष्कर्ष.** आपण एक उदाहरण घेऊं. गुलाब हें फूल आहे हा एक निर्णय

* रा. भावेकृत मानसशास्त्र.

आहे. यांत पहिल्यानें आपण गुलाब व इतर फुलें यांची तुलना करितों, मग असें ठरवितों कीं, फुलांचे आंगीं जे गुणधर्म असतात तेच गुलाबाचे आंगीं आहेत, म्हणून गुलाब हें फूल आहे. निर्णय हा जरी स्वतंत्र व्यापार आपण मानिला आहे, तरी बोध व सामान्यबोध होण्यास निर्णयाची जरूरी आहे, हे सर्व मनोव्यापार एकमेकांत गुरफटलेले असतात. सोईकरितांच आपण ते निरनिराळे मानितों. निर्णयास अवश्य लागणाऱ्या गोष्टी ह्मटल्या म्हणजे कल्पना, स्मरणशक्ति, निरीक्षणशक्ति व योग्य शब्दांचा भरणा या होत. अवधान चांगलें असल्याशिवाय पदार्थांची तुलना करणेंच शक्य नाहीं, म्हणून निर्णयाला अवधानाची अत्यंत जरूरी आहे.

**निर्णयशक्तीची वाढः**--मूल एक वर्षाचें झाल्यावर, त्याला अनेक वस्तू ओळखतां येतात. हा पदार्थ अमुक आहे, असें सांगण्याचा तें प्रयत्न करीत असतें. यावरून त्याचे आंगीं थोडीतरी निर्णयशक्ति उत्पन्न झाली आहे असें दिसतें. दोन वर्षें झाल्यावर, मुलें लहान वाक्यांत आपला निर्णय सांगण्याची सुरुवात करितात " खाऊ चांगला आहे, माऊ वाईट आहे, " वगैरे निर्णय तीं सांगत असतात. पदार्थांची चांगली ओळख होऊन, त्यांची तुलना करितां येऊं लागली, व आपल्या शब्दांत ती गोष्ट मुलांना सांगतां येऊं लागली कीं, मुलांचे निर्णयशक्तीचा बराच विकास झाला आहे, असें समजावें. लहान मुलांचें निरीक्षण अपुरें असल्यामुळें, व त्यांना स्मरणशक्ति चांगली नसल्यामुळें, तसेंच वस्तूंच्या नांवाचा घोंटाळा पडत असल्यामुळें, व भावना प्रबळ असल्यामुळें त्यांचे निर्णय पुष्कळ वेळां अस्पष्ट व चुकीचे असतात. स्मरणशक्ति बरोबर नसल्यामुळें, अपुऱ्या निरीक्षणामुळें व प्रबळ भावनांमुळें पुष्कळ वेळां प्रौढ माणसांचे निर्णय देखील चुकीचे असतात. बालोद्यान, लेखन, चित्रकला, व्याकरण, गणित वगैरे विषयांचा निर्णयशक्ति वाढविण्याचे कामीं पुष्कळ उपयोग होतो.

## अनुमान.

दोन सामान्य कल्पनांचा एकमेकींशीं जो संबंध त्यास, निर्णय म्हणतात. तसेंच दोन निर्णयांचा जो परस्पर संबंध, त्यास अनुमान म्हणतात. निर्णय व अनुमान हे दोन उच्च मनोव्यापार आहेत. या दोहोंचा विकास करून विचारशक्ति वाढवावी हें शिक्षणाचें ध्येय आहे. डॉक्टर आणि वकील, या दोन धंद्यांत असणाऱ्या लोकांस, या दोन मनोव्यापारां-

चाच उपयोग करावा लागतो. म्हणून आपण त्यांस डोक्याचे धंदे म्हणतों. नुसत्या स्मरणशक्तीनें आपणांस कधींही अनुमान बांधितां यावयाचें नाहीं. आपण आपले पूर्वींचे अनुभव व सध्यांचे अनुभव यांची तुलना करितों, नंतर विचार करितों व नंतर अनुमान करितों. अनुमानाचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार **उद्गामी** व दुसरा प्रकार **अवगामी.**

अनेक विशेष गोष्टी पाहून, त्यांच्यामध्यें असणारा सामान्य नियम शोधून काढणें, याला उद्गामी अनुमान म्हणतात. या अनुमानांत आपण विशेष गोष्टींपासून, सामान्य नियम शोधून काढितों. अनेक पदार्थांना उष्णता लावून आपण पाहातों कीं, ते सर्व प्रसरण पावतात. तेव्हां आपण सामान्य नियम बांधितों कीं, उष्णतेनें पदार्थ प्रसरण पावतात. सामान्य नियम विशेष गोष्टीला लावणें, हें अवगामी अनुमान होय. जसें " मनुष्य मरणाधीन आहे " या सामान्य नियमावरून, रामा मरणाधीन आहे हें अनुमान काढणें, हें अवगामी अनुमान होय. मनुष्याचे आयुष्यक्रमांत, त्याला दोन्हीही प्रकारचीं अनुमानें काढावीं लागतात, म्हणून मुलांच्या दोन्हीही प्रकारच्या अनुमानशक्ति वाढविणें हें शिक्षकाचें कर्तव्य होय. या दोन्हीहीं अनुमानांत, शिक्षणाचे दृष्टीनें उद्गामी अनुमानास जास्त महत्त्व आहे. मुलांना स्वतःच्या बुद्धीनें विचार करितां यावा, हें शिक्षणाचें ध्येय आहे. उद्गामी अनुमानानें मुलांची विचारशक्ति वाढते, तीं काळजीपूर्वक विचार करण्यास शिकतात, व त्यांना स्वावलंबनाची संवय लागते; म्हणून शिक्षकानें होईल तितकें करून, मुलांना उद्गामी अनुमानपद्धतीनेंच शिकवावें. कोणतीही व्याख्या नुसती मुलांकडून पाठ करवून घेऊं नये. अनेक उदाहरणें द्यावीं व तीं स्पष्टपणें मुलांच्यापुढें मांडावीं, म्हणजे त्यांच्यांत असणारें सादृश्य मुलांचे लक्षांत येईल, व तीं मुलें व्याख्या आपल्या शब्दांत देऊं शकतील. मग वाटल्यास शिक्षकानें तीच व्याख्या थोडक्या व चांगल्या शब्दांत सांगावी. आपण विशेषणाची व्याख्या मुलांस शिकवीत आहों, अशी कल्पना करूं. प्रथम विशेषणाची व्याख्या "विशेषण म्हणजे नामाचा गुण दाखविणारा शब्द " ही सांगून 'चांगला मुलगा ' यांत चांगला काय आहे, हें मुलांस विचारणें ही खरी शिक्षणपद्धति नव्हे. चांगला मुलगा, पांढरें फूल, गोड आंबे, वगैरे उदाहरणं घेऊन यांत चांगला, पांढरा, गोड हे शब्द मुलगा, फूल, आंबा यांच्याविषयीं विशेष माहिती देतात, ही गोष्ट

मुलांस प्रश्न करून काढून घेणें; व विशेष माहिती देणारा शब्द याबद्द विशेषण हा लहान शब्द आहे हें सांगणें. नंतर व्याख्या मुलांकडून काढून घेणें. ही पद्धति पूर्वोक्त पद्धतीपेक्षां अधिक चांगली आहे.

दोन पदार्थांत कांहीं गोष्टींत साम्य आहे,म्हणून एकांत जो गुण असेल तोच दुसऱ्यांत असेल असें अनुमान करणें, यास सादृश्य अनुमान ह्मणतात. हें अनुमान पुष्कळ वेळां चुकीचें असतें. पृथ्वी हा सूर्याभोंवतीं फिरणारा ग्रह आहे. शुक्र हा पृथ्वीप्रमाणेंच सूर्याभोंवतीं फिरणारा ग्रह आहे. पृथ्वीवर वस्ती आहे म्हणून शुक्रावर वस्ती असलीच पाहिजे हें सादृश्य अनुमान चुकीचें आहे.

लहान मुलांत ३ ऱ्या व ४ थ्या वर्षापासून अनुमानशक्ति दिसूं लागते. आईनें मारल्यास ती वाईट आहे, व खाऊ दिल्यास चांगली आहे, हीं मुलांच्या अनुमानाचीं उदाहरणें होत. ७।८ वर्षांपासून मुलांची अनुमान-शक्ति वाढते. प्रबळ भावना, अस्पष्ट कल्पना व भलत्याच शब्दाचा उप-योग, यामुळें मुलांचें अनुमान पुष्कळ वेळां चुकतें.

मुलांचा अनुभव फार थोडा असल्यामुळें साहजिक असणाऱ्या गोष्टींत त्यांना कार्यकारणसंबंध दिसतो यामुळें त्यांचें अनुमान चुकतें. एका मुलानें पांढऱ्या गाईचें पांढरें दूध निघालेलें पाहून काळ्या गाईचें काळें दूध निघेल असें अनुमान काढलें. या मुलाचा अनुभव फार थोडा असल्यामुळें गाईचा रंग व दुधाचा रंग यांत कार्यकारणसंबंध नसतो ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली नाहीं. शब्दसादृश्यावरून देखील पुष्कळ वेळां मुलांचें अनु-मान चुकतें. एका मुलाला त्याचे बापानें सांगितलें कीं, बाळ सोमवार आला कीं मी तुला मौज पाहाण्यास नेईन बरें ! मुलानें आतुरतेनें सोमवारची वाट पाहिली. पण तो लवकर येईना. तेव्हां बापास त्यानें प्रश्न केला "बाबा सोमवार दमला काय ? तो लवकर कां येत नाहीं बरें ? " यांत ' आला ' या शब्दावरून मुलानें पायीं चालण्याचा तर्क बांधला. मुलांचा अनुभव थोडा असल्यामुळें व त्या अनुभवाला त्यांच्या विलक्षण कल्पनाशक्तीची जोड मिळाल्यामुळें त्यांचीं अनुमानें कित्येक वेळां फार चमत्कारिक होतात. एका लहान मुलीनें आपल्या बापास सांगितलें, " मी तुमच्या एवढी झालें कीं, तुह्मी माझ्या एवढे व्हाल नाहीं बरें ? " आपली स्थिति सध्यांच्या

उलट होईल तेव्हां बापाची स्थितिही सध्यां आहे, तिच्या उलट झाली पाहिजे ही गोष्ट गृहीत धरून तिनें हें अनुमान काढलें. मुलें जशीं मोठीं होत जातात तसें त्यांचें अनुमानही बिनचूक होत जातें. पुष्कळ वेळां मुलांच्या चमत्कारिक अनुमानाला वडील माणसें हसतात, यामुळें मूल खट्टू होतें व स्वतांच्या बुद्धीनें विचार न करितां, वडील माणसांच्या म्हणण्यास होस हो ठोकून देतें. तर असे न करितां मुलांना अनुमान करण्यास नेहमीं उत्तेजन द्यावें.

वस्तुपाठ, व्याकरण, गणित, इतिहास, भूगोल इत्यादि विषयांच्या अभ्यासानें अनुमानशक्ति वाढते.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग ७ वा.

## भावना.

ज्ञान, भावना व प्रवृत्ति हे तीन मनाचे व्यापार आहेत, हें मागें सांगितलेंच आहे. मागील भागांत पहिला मनोव्यापार जें ज्ञान त्याजबद्दल विचार केला आहे. या व पुढील भागांत दुसरा मनोव्यापार जी भावना तिजबद्दल आपण विचार करूं.

भावना ही मनाची विशेषप्रकारची स्थिति आहे. या स्थितींत मनाला सुख होत असतें, किंवा दुःख होत असतें, किंवा सुखदुःखाच्या मिश्रणाचा त्याला अनुभव येत असतो. भूक लागली असतां मनाला त्रास होतो, तेव्हां भूक ही भावना झाली. त्याचप्रमाणें तहान ही भावनाच आहे. भूक व तहान या फार साध्या भावना आहेत. पण सर्वच भावना कांहीं इतक्या साध्या नसतात. हिमालयासारख्या पर्वतावरील किंवा नर्मदेसारख्या नदीच्या कांठावरील अपूर्व सृष्टिशोभा पाहून होणारा आनंद, कालिदास, भवभूति, वामन, मुक्तेश्वर वगैरे कवींच्या काव्यांपासून होणारा आल्हाद, दुःखितांचें दुःख पाहून सदय माणसांच्या मनांत उत्पन्न होणारी दया, कर्तव्य बजाविलें असतां मनाला वाटणारें समाधान, दुर्वर्तनाबद्दल सज्जनांच्या मनांत असलेला तिटकारा, मातेचें पुत्रवात्सल्य किंवा मुलांची पितृभक्ति याही भावनाच आहेत.

भावनांचा परिणाम शरीरप्रकृति, बुद्धि व शील यांजवर घडतो. यामुळें प्रत्येक शिक्षकाला भावनांचें स्वरूप व त्यांचा होणारा परिणाम यांची साधारण तरी माहिती पाहिजे. भीति, राग, मत्सर वगैरे भावनांचा शरिरावर किती वाईट परिणाम घडतो हें सर्वांस माहीत आहेच. आनंदी, धीट, शांत व समाधानी मनुष्याची शरीरप्रकृति जशी निकोप राहाते, त्याप्रमाणें रागीट, भित्र्या व असंतुष्ट मनुष्याची राहात नाहीं. बौद्धिक शिक्ष-

णांत तर शिक्षकाला मुलांच्या भावनांचा नेहमीं उपयोग करून घ्यावा लागतो. ज्या गोष्टींत आपणांला गोडी वाटते किंवा जी गोष्ट समजण्याची आपणांस जिज्ञासा होते, त्या गोष्टीकडे आपलें लक्ष साहाजिकपणेंच लागतें, हा नेहमींचा नियम आहे. आतां गोडी व जिज्ञासा या दोन्हीही भावना आहेत. जो उत्तम शिक्षक आहे, तो शिकवितांना मुलांच्या या दोन्ही भावनांचा उपयोग करून घेतो, व मुलांचें लक्ष आपण शिकवीत असलेल्या धड्याकडे ओढून घेतो. दुसरे कांहीं शिक्षक मुलांचें लक्ष धड्याकडे नसलें कीं, त्यांना शिक्षा करितात. यामुळें, जरी या शिक्षकांचा धडा मनोरंजक नसतो, तथापि मुलें शिक्षेच्या भीतीनेंच त्या धड्याकडे लक्ष देत असतात. पण भीति ही भावनाच आहे. तेव्हां मुलांच्या मनांत जिज्ञासा, कुतूहल किंवा भीति यांपैकीं कोणतीतरी भावना उत्पन्न झाल्याशिवाय त्यांचें लक्ष आपल्या धड्याकडे लागणार नाहीं. उत्तम शिक्षक पहिल्या दोन भावनांचा उपयोग करून घेईल. आपल्या धंद्यांत वाकबगार नसलेला शिक्षक शेवटच्या भावनेचा उपयोग करील. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, कोणताही व्यवसाय—मग तो बौद्धिक असो किंवा शारीरिक असा—बेताचा केला तर त्याजपासून मनाला सौख्य वाटतें. पण तो जर जास्त झाला तर शरिराला व मनाला थकवा येतो व त्रास होतो. शाळेमध्यें मुलांना बेताचा बौद्धिक व शारीरिक व्यवसाय मिळून त्यांना आनंद झाला पाहिजे, ही गोष्ट शिक्षकानें आपल्या लक्षांत नेहमीं ठेविली पाहिजे. मुलांच्या बुद्धीचे विकासाच्या कामीं त्यांच्या भावनांचा शिक्षकाला पुष्कळ उपयोग करून घ्यावा लागतो.

ज्या मनुष्याच्या अंतःकरणांत सहानुभूति, दया, सत्यप्रीति वगैरे चांगल्या भावना प्रबळ असतात, व ज्याचें वर्तन त्या भावनांचे अनुरोधानें असतें, तोच मनुष्य सुशील व सज्जन असतो. ह्याच्या उलट, ज्या मनुष्याचे अंतःकरणांत मत्सर, भीति, व इतर हलक्या भावना प्रबळ असतात व त्यांच्याच अनुरोधानें ज्याचें वर्तन होत असतें तो दुर्जन होय. शील हें सर्वस्वी भावनांवर अवलंबून असतें.

ज्याअर्थी शिक्षकाला मुलांची शरीरसंपत्ति वाढवावयाची असते, त्यांच्या बुद्धीचा विकास करावयाचा असतो, व शील बनवावयाचें असतें, त्याअर्थीं मुलांच्या भावनांस वळण लावणें हें त्याचें कर्तव्य आहे. अहंपर

भावना ताब्यांत ठेवण्यास शिकविणें, उच्च भावनांचा विकास करणें व त्यांच्या अनुरोधानें मुलांना वागण्याची संवय लावणें हें भावनांचें शिक्षण होय.

भावनांचे साधारणपणें तीन प्रकार करितां येतील. १ अहंपर भावना, २ सामाजिक भावना व ३ उच्च भावना. अगदीं लहानपणीं मुलांच्या भावना फार साध्या असतात. त्या शरिराला झालेल्या सुखापासून किंवा दुःखापासून उद्भवतात. नंतर मुलाला हळू हळू कळूं लागतें. बाळपणीं मुलें अगदीं पराधीन असतात. आपणांला लागणाऱ्या गरजा त्यांना विशेष रीतीनें आपल्या वडील माणसांच्या नजरेस आणाव्या लागतात. स्वतांच्या संरक्षणाची उपजतबुद्धि प्रत्येक प्राण्याला परमेश्वरानें दिलेली असते व तिच्यामुळें मुलाच्या लहानपणच्या भावना अहंपर असतात व त्या वयांत त्यांना त्या फार उपयोगीं पडतात. ‘ मी अमुक करीन ’ ‘ मला अमुक पाहिजे ’ ‘ हें माझें आहे ’ अशा रीतीनें लहान मूल नेहमीं स्वतःविषयींच विचार करीत असतें. लहान मुलांना स्वतांपेक्षां अधिक महत्त्वाचा दुसरा विषयच नसतो. परोपकार, दया, सहानुभूति वगैरे भावना अगदीं लहान मुलांचे अंतःकरणांत असणें शक्यच नाहीं. त्यांची शरीरप्रकृतिच अशी असते कीं, त्यांच्या हातून दुसऱ्यास मदत होणें अशक्य असतें. मुलांची ही स्वार्थबुद्धि अगदीं साहजिक आहे व तिच्याच योगानें पुढील आयुष्याची मूल तयारी करीत असतें. या वयांतील मुख्य भावना म्हटल्या म्हणजे भीति, राग, स्तुतिप्रियता, स्पर्धा व कृतिप्रेम या होत. लहान मुलांच्या भावना फार जोरदार असतात, पण त्या फार थोडा वेळ टिकतात. एकादी वस्तु मुलाला दिली नाहीं कीं, तें रागानें रडूं लागतें, ओरडूं लागतें, जमिनीवर आंग टाकतें, पण जरा पलीकडे नेऊन त्याला खाऊ दिला, किंवा गमतीचा पदार्थ दाखविला, तर आपण कशाकरितां रागावलों हें तें विसरून जातें व हसूंही लागतें. लहान मुलांच्या वर सांगितलेल्या सर्व भावना अहंपर असतात.

भीतिः— ही भावना परमेश्वरानें स्वसंरक्षणाकरितां सर्व प्राण्यांत ठेविलेली आहे. ज्या गोष्टींच्या योगानें आपणांस इजा होईल असें वाटतें, त्या गोष्टींची आपणांस भीति वाटते. लहान मुलाला जगाची विशेष माहिती नसते. यामुळें कोणी अपरिचित मनुष्य पाहिला किंवा पदार्थ पाहिला कीं, त्याला भीति वाटते. या भावनेचा स्वतांचें रक्षण करण्याचे कामीं

मुलांना फार उपयोग होतो. भीति या भावनेपासून शरिराला त्रास होतो. भीतीमुळें हृदयाची क्रिया फार जोरानें होऊं लागते. सर्व इंद्रियांची शक्ति कमी होते. मूल जसजसें मोठें होत जाईल तसतशी त्याची भीति कमी होत गेली पाहिजे. विनाकारण एकाद्या गोष्टीची भीति त्याला न वाटली पाहिजे. भित्रेपणा हा दुर्गुण आहे. तो मुलांतून घालविण्याचा यत्न शिक्षकानें व आईबापांनीं केला पाहिजे. तिसऱ्या वर्षापासून मुलांना कळूं लागतें व त्यांचे कल्पनाशक्तीच्या विकासाला सुरुवात होते. या वेळेपासूनच भीतीला सुरुवात होते. जो मनुष्य किंवा जें जनावर प्रत्यक्ष दिसतें, त्याजपेक्षां कल्पनेनें काढलेल्या मनुष्याची किंवा जनावराची भीति जास्त वाटते. यामुळें मुलें अंधारांत जाण्यास फार भितात. या भीतीमुळें कित्येक मुलांना फार दुःख भोगावें लागतें. त्यांना जी भीति वाटत असते, तिजबद्दल वडील माणसें त्यांची टर उडवितात. यामुळें आपल्या भीतीमुळें होत असलेला त्रास तीं मुकाट्यानें सोसतात. वडील माणसांनीं मुलांशीं प्रेमानें वागून. त्यांची भीति कमी करण्याचा यत्न करावा. अंधारांत जर त्यांना भीति वाटत असेल तर दिवा आणन तेथें कांहीं नाहीं अशी त्यांची खात्री करावी. लहान मुलांना बुवाची भीति घालण्याची चाल फार वाईट आहे. मूल आपल्या कल्पनाशक्तीनें या भेसूर बुवाचें चित्र काढतें व प्रत्येक अंधाराचे जागीं मुलांना हा बुवा दिसूं लागतो. या बुवाच्या भीतीनें मुलें फार भेकड होतात व त्यांच्या प्रकृतीवर या भीतीचा परिणाम होतो. या भेकडपणाची एकदां कां संवय लागली कीं, मनुष्य पुढील आयुष्यांत अगदीं भेकड बनतो. एवढ्याकरितां मुलांची भीति कमी करण्याचा शिक्षकानें व पालकांनीं प्रयत्न करावा. अंधारांत एकाद्या वस्तूची भीति मुलांना वाटत असल्यास, ती वस्तु त्यांना दाखवून, त्यांत भिण्याजोगें कांहीं नाहीं, हें त्यांच्या नजरेस आणावें. धैर्य धरून भित्रेपणा सोडण्यास त्यांना उत्तेजन द्यावें. बुवा वगैरे काल्पनिक गोष्टींची दहशत मुलांना घालण्यापेक्षां त्यांना शारीरिक शिक्षेची भीति घालणें फार चांगलें. विचार करून, ज्या गोष्टीपासून अपाय होईल त्या गोष्टीपासून दूर राहाणें व त्या गोष्टीची भीति बाळगणें गोष्टही वाईट नाहीं, पण विनाकारण भीति बाळगल्यानें मनुष्याची प्रवर्तक शक्ति दुर्बळ होते. मुलांना वाईट कृत्यापासून होणारी फजीती, तें केल्यानें होत असलेली स्वतःच्या सदसद्विचाराची टोंचणी व

ईश्वराचा आपणांवर होणारा राग, यांची मात्र भीति बाळगण्यास शिकविलें पाहिजे.

राग ही भावना देखील शरिराला त्रास देणारी आहे. हिच्यायोगानें प्रवर्तक शक्ति दुर्बळ होत जाते. आपल्या इच्छेविरुद्ध एकादी गोष्ट झाली किंवा तिच्यायोगानें आपणांस अपाय होईल असें वाटलें कीं, आपणांस राग येतो. राग ही देखील स्वसंरक्षकच भावना आहे. लहान मुलें फार रागीट असतात. त्यांची प्रवर्तक शक्ति दुर्बळ असल्यामुळें त्यांना आपला राग आपल्या ताब्यांत ठेवतां येत नाहीं. शिक्षकानें व आईबापांनीं मुलांना आपला राग ताब्यांत ठेवण्याची संवय लाविली पाहिजे. राग ही भावना अजिबात घालवितां कामा नये. तिला मर्यादेच्या आंत ठेविलें पाहिजे. कित्येक मुलांचे घरीं लाड होत असल्यामुळें, तीं फार रागीट बनतात. एकादी क्षुल्लक गोष्ट त्यांचे मनाचे विरुद्ध झाली कीं, तीं संतापतात. शाळेंतील शिस्त या मुलांची ही खोड घालविण्याचे कामीं फार उपयोगी पडते. शिस्तीच्या विरुद्ध केलेल्या वर्तनाबद्दल, अनीतीच्या कृत्याबद्दल, व स्वतःचे विनाकारण झालेल्या अपमानाबद्दल मुलांचे मनांत राग उत्पन्न झाला पाहिजे. अशा तऱ्हेचा राग ही भावना सर्व आयुष्यांत फार उपयोगीं पडते.

**कृतिप्रेमः**—लहान मुलांना नेहमीं कांहीं तरी करण्याची आवड असते. त्यांना पुढील आयुष्याची तयारी करावयाची असते, ती या कृतिप्रेमाच्या योगानें तीं करीत असतात. मुलांच्या या भावनेमुळें तीं अनेक गोष्टी शिकतात. अनुकरण करणें हा देखील कृतिप्रेमाचाच भाग होय. परमेश्वरानें ही भावना मुलांचे आंगीं बुद्ध्याच ठेविलेली आहे. याच भावनेमुळें मुलें बोलावयास, चालावयास, खेळावयास, लिहावयास व दुसऱ्या अनेक गोष्टी करावयास शिकतात. शरीर व बुद्धि यांचा विकास व्हावयास कृतिप्रेम हें फार उपयोगीं पडतें, किंबहुना मुलांचा विकास बहुधा याच भावनेवर अवलंबून असतो, असें म्हटलें तर चालेल. शिक्षकानें शिकवितांना जितक्या शक्य तितक्या गोष्टी मुलांकडून करून घ्याव्या म्हणजे मुलांना त्या धड्यांत गोडी लागते. बालोद्यान शिक्षणपद्धतीचेंही हेंच तत्त्व आहे.

**स्पर्धा**:—हीं भावना देखील मुलांची सुधारणा होण्यास फार उपयोगीं पडते. एकादी कृति दुसऱ्याचेपेक्षां आपण यत्न करून अधिक चांगल्या रीतीनें करून दाखवूं, अशा तऱ्हेचा उत्साह मनांत धरून, त्याप्रमाणें प्रयत्न केल्यानें खात्रीनें मनुष्याची सुधारणा होते. कित्येक शिक्षक मार्क देणें, वर नंबर देणें, बक्षिसें देणें वगैरे गोष्टींच्या योगानें मुलांत स्पर्धा लावण्याचा प्रयत्न करीत असतात. पण या स्पर्धेच्या योगानें मुलांचे मनांत द्वेष, मत्सर आप्पलपोटेपणा वगैरे भावना उत्पन्न होऊं नयेत, याजबद्दल शिक्षकानें फार काळजी घ्यावी.

**स्तुतिप्रियता**:—लहान मुलें फार स्तुतिप्रिय असतात. आपली वाहवा व्हावी, वडील माणसांनीं, शिक्षकानें व आपल्या सोबत्यांनीं आपणांस चांगलें म्हणावें, अशी त्यांना फार इच्छा असते. मुलांना आपलें काम चांगल्या रीतीनें करावयास उत्तेजन देण्याला, व त्यांना चांगल्या तऱ्हेनें वागण्याची संवय लावण्यास, शिक्षकानें मुलांच्या या भावनेचा उपयोग करून घेतला पाहिजे. पण प्रत्येक बारीकसारीक कामाबद्दल सर्व दिवसभर मुलांची स्तुति करणें किंवा त्यांना शाबासकी देणें, हें इष्ट नव्हे. या योगानें शिक्षकाच्या चांगल्या मताची किंमतच राहात नाहीं. शिवाय मुलांचे आंगीं अहंपणा जडण्याला ही शिक्षकाची स्तुति कारण होते. एकादें चांगलें काम विद्यार्थ्यानें केलें म्हणजे शिक्षकानें थोडक्यांत आपली पसंती दाखवावी व आपणांस वाटत असलेला संतोष व्यक्त करावा म्हणजे झालें.

---

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग ८ वा.

### सामाजिक भावना.

आरिस्टॉटल नांवाच्या एका प्रख्यात तत्त्ववेत्त्यानें असें म्हटलें आहे, कीं, ज्या मनुष्याला एकांतवासांत आनंद वाटतो, तो महान् साधु तरी असला पाहिजे किंवा पशु तरी असला पाहिजे. संसारांतील अनेक पाश दूर सारून जे साधु पुरुष ईश्वराचें ध्यान करण्याकरितां एकांतवासांत जाऊन राहातात, त्यांची गोष्ट सोडून दिली तर सामान्यतः असें आढळून येतें कीं, ज्या मनुष्याला कोणत्याही माणसाच्या सहवासांत आनंद वाटत नाहीं, असा मनुष्य या जगांत क्वचितच सांपडतो. मनुष्याप्राण्याच्या सहवासाला पूर्णपणें कंटाळून एकाद्या हिंस्र पशूप्रमाणें मनुष्याच्या वसतीपासून लांब राहाणारा अभागी माणूस या जगांत एकादा दुसरा सांपडल्यास न कळे.

ही सहवासाची आवड मनुष्यप्राण्यांत त्याच्या स्वतःच्या कल्याणाकरितां व समाजाच्या हिताकरितां परमेश्वरानें जन्मतःच ठेवलेली असते. लहान मुलें चालूं लागण्याच्या पूर्वींच आपल्या वडील माणसांच्या सहवासाची आवड दाखवूं लागतात. त्यांना जर एकटेंच ठेवलें तर तीं रडूं लागतात. पण कुटुंबांतील मंडळी त्यांच्याभोंवतीं जमली ह्मणजे त्यांना आनंद वाटतो व तीं हसूं लागतात. मुलें तीनचार वर्षांचीं झालीं कीं, त्यांना आपल्या समवयस्क मुलांत खेळण्याची गोडी लागते. एकमेकांची बोबडी व अस्पष्ट भाषा देखील त्यांना चांगली कळते. आपल्या बरोबरीच्या मुलांत खेळण्याच्या योगानें मुलांच्या ज्ञानांत किती तरी भर पडते व त्यांच्या कल्पनाशक्तीचा व विचारशक्तीचा विकास होत जातो. या सहवासाच्या आवडीमुळें मनुष्यांत ज्या भावना उत्पन्न होतात, त्यांना सामाजिक भावना म्हणतात. या भावनांचा संबंध दुसऱ्याशीं येतो, पण त्यांजपासून दुसऱ्याचें हित होतें.

दुसऱ्याचे सुखानें आनंद वाटणें व दुसऱ्याचे दुःखानें आपणांला दुःख होणें, या गुणाला सहानुभूति असें म्हणतात. प्रेम, परोपकार, स्वदेशप्रीति, स्वार्थत्याग वगैरे अनेक सद्गुणांचें बीज या सहानुभूतींत आहे. सहानुभूति उत्पन्न होण्याला दोन गोष्टी आवश्यक आहेत. पहिली गोष्ट ही कीं, मनुष्याचे आंगीं उत्तम कल्पनाशक्ति लागते, व दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे, सुखदुःखांचा अनुभव लागतो. दुःखिताच्या दुःखाचें हुबेहुब चित्र कल्पनाशक्तीनें डोळ्यांपुढें उभें केल्याशिवाय, दुसऱ्याचे दुःखाबद्दल सहानुभूति वाटणें शक्य नाहीं. ज्या मनुष्याला दुःखाचा अनुभव नसतो, त्याला दुसऱ्याचे दुःखाबद्दल सहानुभूति वाटणें कठीण असतें. मनुष्याच्या कल्पनाशक्तीचा विकास जसजसा होतो व त्याचा सुखदुःखांचा अनुभव जसजसा वाढतो, तसतशी त्याची सहानुभूतिही वाढत जाते. अगदीं लहान मुलांना ही दुःखाची कल्पना नसल्यामुळें, कित्येक वेळां मुंगी, किडे व दुसरे लहान प्राणी, यांना त्यांचेपासून फार त्रास होतो. कित्येक वेळां लहान मुलें या प्राण्यांना ठार देखील मारतात. याजवरून तीं मुलें फार निष्ठुर आहेत, असें दुसऱ्यांना वाटण्याचा संभव असतो.त्या प्राण्यांना आपल्या कृतीच्यायोगानें काय दुःख होत असेल,याची त्यांना कल्पनाच नसल्यामुळें, हा निष्ठुरपणाचा दोष मुलांचे पदरीं येत नाहीं.

ज्याअर्थीं सहानुभूति हा अनेक सामाजिक गुणांचा पाया आहे, त्याअर्थीं आपल्या मुलांत या सहानुभूतीचा विकास करणें, हें आईबापांचें व शिक्षकांचें अत्यंत महत्त्वाचें कर्तव्य आहे. मनुष्यामध्यें हा सहानुभूतीचा गुण जितका जास्त असतो,तितका तो थोर निपजतो. आजपर्यंत अनेक देशांत जीं उदार, परोपकारी, स्वार्थत्याग करणारीं व दुसऱ्याचे सुखाकरितां निरंतर झटणारीं माणसें होऊन गेलीं, त्यांच्या अंतःकरणांत हा सहानुभूतीचा गुण विशेषेंकरून वास करीत होता. मनुष्यप्राण्याच्या दुःखानें त्यांच्या अंतःकरणास तळमळ लागे व त्याच्या सुखानें त्या थोर विभूतींच्या अंतःकरणास सुख होत असे.

आपल्या विद्यार्थ्यांत या भावनेचा विकास करण्याची शिक्षकाला शाळेंत पुष्कळ संधी सांपडते. शाळेंत शिकणाऱ्या मुलांच्या आंगीं सहानुभूति उत्पन्न होण्यास अगदीं आवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे,त्यांचा शिक्षक प्रेमळ

असणें ही होय. शिक्षक तामसी असेल, आपल्या हाताखालीं शिकणाऱ्या मुलांबद्दल जर त्याला प्रेम वाटत नसेल, तर वर्गाचा अभ्यास नीट चालणार नाहीं व त्या वर्गांत शिक्षक व शिष्य या दोघांनाही आनंद वाटणार नाहीं, ही गोष्ट तर होईलच; पण दुसरी अशी होईल कीं, या शिक्षकाच्या हाताखालील मुलें आयुष्यांत अत्यंत अवश्य लागणारा सहानुभूतीचा गुण कधींहि शिकणार नाहींत.

शिक्षक प्रेमळ असला कीं, त्याच्या विद्यार्थ्यांचे मनांत त्याच्याबद्दल आदर उत्पन्न होतो व तो जें कांहीं सांगेल तें करण्याला ते नेहमीं तयार असतात. अशा रीतीनें शिक्षक आणि शिष्य यांच्या मनांत परस्परांविषयीं सहानुभूति असल्यशिवाय, अभ्यास चांगला चालणें शक्य होत नाहीं. शिक्षकाच्या सहवासांत ही जी सहानुभूति मुलांच्या मनांत उत्पन्न होते, तिचा विकास शिक्षकाला अनेक रीतीनें करितां येतो. वर्गांतील शिस्त उत्तम असली कीं, एकत्र अभ्यास करणें, एकत्र खेळणें व दुसऱ्या अनेक गोष्टी एकविचारानें करणें, यामुळें वर्गांतील सर्व मुलांच्या मनांत एकमेकांबद्दल सहानुभूति साहजिकपणें उत्पन्न होते. कित्येक शिक्षक मुलांनीं अभ्यास झटून करावा, म्हणून मुलांमध्यें, नंबर देणें वगैरे गोष्टींच्या योगानें अतिशय स्पर्धा लावितात, पण यामुळें राग, द्वेष वगैरे मुलांच्या अहंपर भावना वाढतात व सामाजिक भावनांच्या वाढीला प्रतिबंध होतो. ज्या मुलाचा अभ्यास मागें राहिला असेल, त्याला मदत करण्यास वर्गांतील मुलांना शिक्षकानें उत्तेजन द्यावें. शिक्षकानें जे कोणी आंधळे, पांगळे किंवा पंगू असतील, त्यांच्याबद्दल मुलांच्या मनांत दया उत्पन्न करून, त्यांना मदत करण्याची मुलांना संवय लावावी. इंग्लंडांतील बालोद्यान शाळांतून शिकणारीं मुलें, हंगामाच्या दिवसांत येणाऱ्या सणाचे वेळीं व नाताळाच्या सणांत, आपल्याला खाऊकरितां दिलेल्या पैशांतून पैसे काढून, त्यांचीं बिस्किटें, फळें वगैरे जिन्नस विकत घेतात व ते गरीब लोकांच्या मुलांकरितां चालविलेल्या बालोद्यान शाळांत, तेथील मुलांना वांटण्याकरितां पाठवितात. आपल्या आनंदाच्या वेळीं आपणांपेक्षां कमी भाग्यवान असलेल्या मुलांना, आपल्या सुखाचा वांटा देऊन त्यांना सुखी करावयास, मुलांना लहानपणासून आईबाप व शिक्षक यांनीं

शिकवावें; हाच सहानुभूतीचा खरा धडा होय. सहानुभूतीच्या बाबतींत एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, मुलांची सहानुभूति नेहमीं कृतींत उतरली पाहिजे. जोंपर्यंत दुसऱ्याच्या सुखाकरितां कांहीं तरी करण्याची इच्छा उत्पन्न होत नाहीं, तोंपर्यंत त्या सहानुभूतीची कांहींच किंमत नाहीं. उलटपक्षीं नेहमीं शाब्दिक सहानुभूति दाखविण्याचे योगानें मुलें ढोंगी होण्याचा संभव असतो.

महाभारत, रामायण वगैरे ग्रंथांतील गोष्टी मुलांना सांगितल्यानें, मुलांमध्यें सहानुभूतीचा विकास होण्याला मदत होते. या कामीं महाराष्ट्रांतील साधूंच्या प्रेमळ चरित्रांचा देखील पुष्कळ उपयोग होईल. लहान मुलांचीं मनें फार कोमल असतात. भरतलक्ष्मणाची बंधुप्रीति, सीतेचें पतिप्रेम, रामाची पितृभक्ति, अयोध्येंतील लोकांची राजनिष्ठा वगैरे गोष्टींचा त्यांच्या मनावर तेव्हांच परिणाम होतो. इतिहासांतील उदात्त प्रसंगांच्या वर्णनानें मुलांच्या मनांत आपल्या देशाबद्दल प्रेम उत्पन्न होतें. ज्यांनीं आपल्या स्वतांच्या सुखाकडे दुर्लक्ष करून, मानवजातीच्या कल्याणाप्रीत्यर्थ आपलें सर्व आयुष्य घालविलें, अशा गौतमबुद्ध, जॉन हॉवर्ड, फ्लॉरेन्स नाइटिंगेल वगैरे महात्म्यांचीं चरित्रें मुलांना सांगावीं. हीं चरित्रें, सहानुभूतीचा विकास करण्याला फार उपयोगीं पडतात.

जसजसा बुद्धीचा व उच्च भावनांचा विकास होत जातो, तसतसें सहानुभूतीचें क्षेत्र वाढत जातें. ज्यांना कांहीं विशेष कळत नाहीं, त्यांची सहानुभूति आपल्या कुटुंबांतील किंवा गांवांतील माणसांपुरतीच राहील. बुद्धीचा विकास झाल्यावर सहानुभूतीचें क्षेत्र जास्त वाढतें, व आपल्या प्रांतांतील व देशांतील लोकांविषयीं आपणांस सहानुभूति वाटूं लागते. जगांत जे अत्यंत थोर पुरुष होऊन गेले, त्यांच्या सहानुभूतीचें क्षेत्र फार विस्तीर्ण होतें. जगांतील सर्व मनुष्यजात त्यांच्या प्रेमाचें स्थान असे.

१६३०
क्र. क्र.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग १ ला.

## उच्च भावना.

उच्चभावनांचे बौद्धिक, नैतिक व सौंदर्यविषयक असे तीन भाग करितां येतील. बुद्धीच्या विकासाबरोबर उच्चभावनांचा विकास होत जातो. या भावनांचा विकास करणें हें शिक्षणाचें महत्त्वाचें कार्य आहे. आपण प्रथमतः बौद्धिक उच्चभावनांचा विचार करूं.

बौद्धिक व्यवसायामुळें मनाला जो आनंद होतो, किंवा दुःख होतें त्याला बौद्धिक भावना म्हणतात. एकादें कठीण उदाहरण आपण सोडवीत असतांना, तें जर आपणांला सुटलें तर जो आनंद होतो, किंवा तें जर न सुटलें तर मनाला जो त्रास होतो, तो या बौद्धिक भावनांचें उत्कृष्ट उदाहरण आहे. बौद्धिक भावनांमध्यें कुतूहल व जिज्ञासा यांचा विशेषंकरून समावेश होतो. या दोन्ही भावना बीजरूपानें प्रथमपासूनच मुलांमध्यें असतात. या दोन्ही भावनांच्या साहाय्यानें मुलांनीं आपल्या भोंवतालच्या सृष्टीचें ज्ञान मिळवावें असा ईश्वरी संकेत दिसतो. लहान मुलांना सर्व सृष्टि नवीनच असते. यामुळें तिच्यांतील प्रत्येक गोष्टीबद्दल त्यांना आश्चर्य वाटत असतें. अगदीं लहान मूल असलें तरी त्याला विशेष रंगाचा कागद किंवा विशेष प्रकारचा आवाज ऐकून आनंद वाटतो. एकाद्या गोष्टीबद्दल कुतूहल वाटल्यानंतर, ती काय आहे हें जाणण्याची इच्छा जिज्ञासा-मुलांत उत्पन्न होते. या जगांत मनुष्यप्राण्याच्या ज्ञानाची जी वृद्धि झाली आहे, तिचें कारण कुतूहल व जिज्ञासा याच दोन भावना होत. टिक् टिक् वाजणाऱ्या घड्याळाचें कौतुक वाटून तें काय आहे, हें पाहाण्याकरितां कानाशीं धरणाऱ्या व आपटणाऱ्या लहान मुलापासून, झाडावरील फळ जमिनीवर पडलेलें पाहून, त्याबद्दल विचार करणाऱ्या व

गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढणाऱ्या सर ऐझाक न्यूटनपर्यंत, सर्वांना ज्ञानप्राप्ति करून देण्याला याच दोन भावना कारण होतात.

मुलें बोलूं लागल्यावर ' हें काय आहे? तें काय आहे ?' असे प्रश्न वडील माणसांना विचारण्याला सुरुवात करितात. वस्तूंचीं व क्रियांचीं नांवें त्यांना माहीत झालीं कीं, " हें तुम्ही कशाला करितां ? हें तुम्ही कां करितां? हें तुम्ही कसें करितां? " वगैरे प्रश्न, वस्तूंचे उपयोग व क्रियेचें कारण यांजबद्दल चौकशी करण्याकरितां तीं विचारूं लागतात. कांहीं दिवसांनीं मुलें वस्तूंच्या मुळांबद्दल शोध करूं लागतात, व मग "हें कोठून आलें? तें कोठून आलें? " वगैरे प्रश्न तीं विचारूं लागतात. यानंतर अनेक वस्तूंत व अनेक क्रियांत दिसून येणारा सामान्य नियम काय आहे, हें शोधून काढण्याकडे त्यांची प्रवृत्ति वळते. मग "सूर्य मावळला, आतां अंधार पडला" अशा तऱ्हेचीं विधानें तीं करूं लागतात. पुढें पुढें कार्य व कारण यांच्याबद्दल चौकशी करणाऱ्या प्रश्नांची हे बालतत्त्ववेत्ते आपल्या वडील माणसांवर वृष्टि करितात. मग कित्येक वेळां वडील माणसांना या प्रश्नांचीं उत्तरें देतां न आल्यामुळें तीं संतापून जातात, आणि " आतां जर तूं गप्प बसणार नाहींस तर तुला थप्पड मिळेल. मला आतां त्रास देऊं नकोस. " असें सांगून त्यांस गप्प बसवितात व अशा रीतीनें या बालपंडितांची संभावना करितात.

बालपणीं जिज्ञासा व कुतूहल हीं सारखीं वाढत असतात. पण तीं शाळेंतील अभ्यासक्रमामुळें व शिकविण्याचे पद्धतीमुळें कमी होण्याचा फार संभव असतो. ज्या गोष्टींत मुलांना कांहींच गोडी वाटत नाहीं असे शब्द, अक्षरें व आंकडे त्यांना शिकवूं लागलें कीं, साहजिकच त्यांच्या कुतूहल व जिज्ञासा या दोन्हीही भावना नाहींशा होतात. मुलांना बुद्ध्या होऊन एकाद्या गोष्टीकडे लक्ष देतां येत नाहीं, ही गोष्ट मागें सांगितलीच आहे. लहान मुलांच्या शिक्षकाला या कारणामुळें त्यांच्या अनैच्छिक अवधानावर अवलंबून राहावें लागतें. ज्या गोष्टीबद्दल मुलांच्या मनांत कुतूहल व जिज्ञासा हे उत्पन्न होतात, त्या गोष्टीबद्दल मुलांना गोडी लागते व तिजकडे तीं लक्ष देऊं लागतात. एकादा सुंदर किडा किंवा फूल किंवा दुसरा कोणताही गंमतीचा पदार्थ याच्याकडे मुलांचें लक्ष साहजिकपणेंच वेधतें, व तीं त्याचें लक्षपूर्वक निरीक्षण करूं लागतात परंतु ' बे ' चा पाढा घोकीत असतांना

मुलांचें त्याच्याकडे लक्ष लागणें शक्य नसतें. कारण त्यांत त्यांना कोणत्याही प्रकारें कुतूहल व जिज्ञासा उत्पन्न होत नाहींत. यामुळें त्यांत त्यांना गोडीही वाटत नाहीं. एवढ्याकरितां शिक्षकानें प्रत्येक धडा असा शिकविला पाहिजे कीं, त्यांत मुलांना कुतूहल वाटेल व मुलें तो समजावून घेण्याचा प्रयत्न करतील. शिक्षकानें मुलांतील ही जिज्ञासा कायम ठेविली पाहिजे, एवढेंच नव्हें तर तिची वाढ करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुलांनीं आपल्या प्रयत्नानें ज्ञान संपादन करावें हा शिक्षणाचा हेतु आहे, आणि तो हेतु साध्य होण्यास मुलांच्या या भावनांची वाढ होणें अवश्य आहे. एवढ्याकरितां लहान मुलांना कोणताही विषय शिकवितांना साहित्याचा उपयोग करावा लागतो व मुलांच्या बुद्धीला व्यवसाय मिळेल अशी धडा शिकविण्याची पद्धति ठेवावी लागते.

धडा शिकवीत असतांना मुलांच्या मनांत त्याजबद्दल नुसतेंच कुतूहल उत्पन्न झालें, व जिज्ञासा उत्पन्न झाली नाहीं, ह्मणजे मुलांना धड्यांत नुसती गंमत वाटली, पण तो समजून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं, तर तो धडा फुकट गेला. अलीकडे कांहीं शिक्षक मुलांचें लक्ष आपल्या धड्याकडे लागावें म्हणून, अनेक प्रकारचें साहित्य आपल्या टेबलावर गोळा करितात. गारुड्याप्रमाणें रचलेलें हें सामान पाहून मुलांना गंमत वाटते. तीं त्या धड्याकडे लक्ष देतात, पण तो समजून घेण्याचा बिलकूल प्रयत्न करीत नाहींत. असेच धडे वारंवार पाहिल्यानें कोणत्याहि तऱ्हेचा बौद्धिक व्यवसाय न करितां, स्वस्थ राहून गंमत पाहाण्याची संवय मुलांना लागते. त्यांची जिज्ञासा मंद होऊं लागते व मानसिक शक्तीला व्यवसाय न मिळाल्यामुळें ती दुर्बळ होते. मग तीं ज्या धड्यांत अशा तऱ्हेची कांहीं गंमत नाहीं, त्याजकडे मुळींच लक्ष देत नाहींत. वर सांगितलेल्या प्रकारचे धडे जो शिक्षक देतो तो मुलांचें फार नुकसान करितो. ज्याप्रमाणें, मुलांना खुष करण्याकरितां वारंवार त्यांना साखर दिली तर त्यांच्या शरीरप्रकृतीला अपाय होतो, त्याचप्रमाणें मुलांना, ज्या धड्यांत नुसतीच गंमत वाटते पण ज्यांत त्यांच्या जिज्ञासेचा उपयोग होत नाहीं, व त्यांच्या कोणत्याही मानसिक शक्तीला व्यवसाय मिळत नाहीं, असे धडे वारंवार दिल्यानें त्यांच्या मानसिक शक्ति दुर्बळ होतात.

मुलें जे प्रश्न विचारतील त्यांचीं, शिक्षकानें व आईबापांनीं उत्तरें देण्याचा प्रयत्न करावा. शिक्षकानें आपल्या धड्याची रचना व्यवस्थित करावी. ज्या गोष्टी मुलांकडून काढून घेण्याजोग्या असतील त्या त्यांना प्रश्न विचारून काढून घ्याव्या. सृष्टिनिरीक्षण, चित्रकला, गणित वगैरे शाळेंत शिकविले जाणारे विषय योग्य पद्धतीनें शिकविल्यास, मुलांची जिज्ञासा वाढविण्यास ते उपयोगी पडतात.

## सौंदर्यविषयक उच्चभावना.

सुंदर पक्षी, चित्रविचित्र रंगाचीं व मनोहर आकाराचीं फुलें, रवि-वर्म्यासारख्या कुशल चित्रकारानें काढलेलीं चित्रें, म्हात्र्यासारख्या प्रवीण कारागिरानें केलेले पुतळे, इंद्रधनुष्याचे किंवा उषःकालीं आणि संध्याकाळीं आकाशांतील बदलणारे रंग, सतत सूर्यप्रकाशांत तळपणारीं व हिमाच्छादित असणारीं हिमालयाचीं शिखरें किंवा गिरसप्पासारखे जलप्रपात,यांच्यासारखे सृष्टीचे देखावे पाहून मनाला अत्यंत आनंद होतो. त्याचप्रमाणें मधुर वाद्यांचे किंवा नांवाजलेल्या गवयाचे कोमल व प्रमाणशुद्ध आवाज ऐकूनहि आनंद होतो. याच्या उलट कुरूप व बेढब आकृति पाहून किंवा कठोर व कर्कश शब्द ऐकून मनाला त्रास होतो. एकादा सुंदर पदार्थ पाहून किंवा मधुर ध्वनि ऐकून मनाला वाटणारा आनंद व उलटपक्षीं एकादा वाईट व अव्यवस्थित पदार्थ पाहून व कठोर ध्वनि ऐकून होणारा त्रास, याला सौंदर्यविषयक भावना म्हणतात. या भावना नेत्र व कर्ण या दोन ज्ञानेंद्रियांनीं विशेष होतात. काव्य व इतर वाङ्मय यांच्यापासून होणारा आनंदही याच भावनेंत मोडतो.

या भावना उत्पन्न होण्याला बुद्धीचा विकास बराच व्हावा लागतो. राजा रविवर्मा यानें काढलेली एकादी उत्तम तसबीर, ज्याला चित्रकलेचें बिलकूल ज्ञान नाहीं अशा मनुष्यापुढें ठेविली, तर त्याला जो आनंद होईल, त्याचे शतपट आनंद चित्रकलेचें ज्ञान असणाऱ्या मनुष्याला होईल. एकाद्या उत्कृष्ट गवयाचें गाणें ऐकून, गायनाचें ज्ञान असणाऱ्या मनुष्याला जसा आनंद होईल,तसा आनंद, गायनाविषयीं अज्ञ असणाऱ्या मनुष्याला कधींहि होणार नाहीं. ज्याला विशेषसें भाषाज्ञान नाहीं, त्याच्या पुढें वामनाच्या वेणुसुधेसारखी किंवा भरतभावासारखी कविता वाचली तर त्याला कसला आनंद होणार ?

सौंदर्यविषयक उच्चभावना, या सृष्टींतील अत्यंत शुद्ध व सहज मिळणारा आनंद मनुष्याला देतात व त्या मनुष्याच्या स्वार्थी भावना नाहींशा करण्याच्या कामीं उपयोगीं पडतात. परमेश्वरानें ही पृथ्वी अनेक सुंदर पदार्थांनीं भरून ठेविलेली आहे. फुलें, फळें, अनेक प्रकारचे वृक्ष व वेली, फुलपांखरें, अनंत ताऱ्यांनीं शोभणारें नील आकाश, प्रत्येक ऋतूंत पालटणारें पृथ्वीचें मनोहर स्वरूप, हीं पाहून मनुष्याला होणारा आनंद हा शुद्ध आनंद होय, व तो फार उच्च दर्जाचा आहे. हा आनंद असा आहे कीं, तो वाटेल त्याला अनुभवितां येतो व त्याची गोडी कधींहि कमी होत नाहीं. सृष्टींतील अनेक सुंदर व कुशलतेनें घडलेले पदार्थ व देखावे पाहून, मन सहजच विश्वकर्त्या परमेश्वराकडे वळतें, व त्याची अगाध लीला पाहून त्याच्या ठिकाणीं लीन होते. कारागिरानें केलेलीं कुशलतेचीं कामें पाहून होणारा आनंद असाच सुपरिणामकारक आहे. त्याजपासून मनुष्याचे आंगीं नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा, वगैरे गुण जडतात.

मुलांच्या भावनांचा विकास करण्याचें काम आईबाप व शिक्षक यांनीं लहानपणापासून केलें पाहिजे. आईबापांनीं घर व शिक्षकानें शालागृह सुव्यवस्थित ठेवावें. मुलाला लहानपणापासून व्यवस्थितपणाची संवय लावावी. सृष्टींतील अनेक सुंदर पदार्थ व देखावे त्यांना दाखवून, त्यांतील सौंदर्याकडे मुलांचें लक्ष लावावें. मुलांना कागदाच्या किंवा मातीच्या सुरेख आकृति करण्यास शिकवावें व चित्रकलेचें शिक्षण त्यांना द्यावें. मुलांना गायनाचें थोडेंसें तरी ज्ञान असावें म्हणजे त्यांना उत्तम गायक होतां न आलें तरी गायनापासून होणारा आनंद अनुभवितां येईल. चांगल्या गोष्टी व गाणीं यांजबद्दल त्यांचे मनांत आवड उत्पन्न करावी. काव्य व इतर वाङ्मय यांजबद्दल एकदां का अभिरुचि मुलांचे मनांत उत्पन्न झाली कीं, ही अभिरुचि आनंद मिळविण्याचें मोठें साधन होतें. सौंदर्यविषयक भावनांची वाढ झाल्यानें मनुष्याच्या शीलावरहि चांगला परिणाम होतो.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग १० वा.

## नैतिक उच्च भावना.

कोणत्याही मनुष्याच्या वर्तनाचा आपण जेव्हां विचार करितों, तेव्हां त्या वर्तनाचा हेतु विशेषेंकरून लक्षांत घेतों. परोपकार, सहानुभूति, देशप्रीति, राजभक्ति, प्रेम वगैरे सद्धेतूंनीं जर तें वर्तन घडलें असेल, तर आपल्या मनाला आनंद वाटतो.वर्तनाचा हेतु जितका थोर व उदात्त असतो,तितका मनाला होणारा आनंदही जास्त असतो. वर्तनाचा हेतु जर मत्सर, भीति, आप्पलपोटेपणा वगैरे असला तर आपल्या मनाला त्या वर्तनापासून त्रास होतो. संपूर्ण राज्यवैभवाचा त्याग करून बंधुप्रेमामुळें वनवासांतील अनंत दुःखें भोगण्यास तयार झालेल्या लक्ष्मणाच्या वर्तनामुळें, किंवा आपल्या पतिप्रेमामुळें सर्व सुखांना झुगारून देऊन, पतीबरोबर वनांत जाऊन, त्याच्या दुःखांची वांटेकरीण होण्यास इच्छिणारी सीता, हिच्या उदात्त चरित्रामुळें आपल्या मनास अत्यंत संतोष वाटतो. स्वार्थानें व मत्सरानें प्रेरित होऊन, आपल्या पतीच्या सुखाची व जिवाची पर्वा न करितां आपला हेतु साधण्याकरितां अनेक अनर्थ करण्यास उद्युक्त झालेल्या कैकेयीची कृति पाहून मनाला त्रास होतो. मनुष्याच्या वर्तनाच्या हेतूचा विचार करून मनाला जें सुख किंवा दुःख होतें, त्यास नैतिक भावना म्हणतात.

एकाद्याच्या वर्तनापासून आपल्या मनाला सुख किंवा दुःख होण्याच्या आधीं आपल्या मनांत दोन क्रिया व्हाव्या लागतात. त्या वर्तनांतील हेतु शोधून काढावा लागतो व नंतर तो हेतु थोर आहे किंवा हलका आहे हें ठरवावें लागतें. या दोन्ही गोष्टी होण्याला विचारशक्तीचा बराच विकास झाला पाहिजे. जर आपल्या विचारशक्तीचा विकास झाला नसेल तर नैतिक भावना उत्पन्न होणें अशक्य होईल. यावरून हें

उघड आहे कीं, अगदीं लहान मुलांत नैतिक भावना असणें अशक्य आहे. शिक्षणाच्या योगानें विचारशक्तीचा व सहानुभूति, आदर, प्रेम वगैरे सामाजिक भावनांचा जसजसा विकास होत जातो, तसतशा मनुष्याच्या नैतिक भावना प्रबळ होत जातात. मनुष्याचें वर्तन पुष्कळ अंशीं भावनांवर अवलंबून असतें, हें आपण मागील भागांत पाहिलेंच आहे. नैतिक भावनांचा तर मनुष्याच्या वर्तनावर पुष्कळच परिणाम घडतो. ज्या मनुष्याला परोपकार, सहानुभूति, दया वगैरे थोर हेतूंनीं केलेल्या वर्तनानें आनंद होतो व मत्सर, आप्पलपोटेपणा वगैरे हलक्या हेतूंनीं केलेल्या वर्तनापासून दुःख होतें, तो मनुष्य नेहमीं चांगलेंच वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करील. नैतिक भावना या कांहीं अंशीं जन्मसिद्ध असतात व पुष्कळ अंशीं शिक्षणावर अवलंबन असतात. आईबाप व घरांतील इतर माणसें, शिक्षक व सोबती यांच्या सहवासावर मुलांच्या नैतिक भावनांचा विकास बऱ्याच अंशीं अवलंबून असतो. अगदीं लहानपणीं नैतिक भावना मुलांत मुळींच नसतात. या वयांत मुलांना नीति म्हणजे काय याचीच कल्पना नसते. बाळपणीं स्वार्थीभावना फार प्रबळ असतात. त्यांच्याच अनुरोधानें मुलांच्या कृति घडत असतात. कांहीं कृति वडील माणसांना पसंत पडत नाहींत व कांहीं त्यांना आवडतात, हें मुलांच्या लक्षांत येऊं लागतें. ज्या कृति आपल्या वडील माणसांना आवडतात त्या चांगल्या व ज्या कृति आपल्या वडील माणसांना आवडत नाहींत त्या वाईट आहेत, असें मूल ठरवितें. मुलाचें हें चांगलें किंवा वाईट ठरविणें नैतिकदृष्ट्या नसतें. जी गोष्ट केली असतां, आपणांस शाबासकी मिळते किंवा खाऊ मिळतो ती चांगली, व जी केली असतां, आपणांस रागें भरतात किंवा शिक्षा देतात ती वाईट, असें मूल ठरवितें. एकाद्या कृतीच्या स्वतांवर होत असलेल्या परिणामावरून, मूल त्या कृतीचा चांगलेपणा किंवा वाईटपणा ठरवीत असतें. मुलांना कोणत्या संवयी लागतील, त्यांना कोणत्या गोष्टी चांगल्या वाटतील व कोणत्या वाईट वाटतील हें सर्व त्यांना मिळत असणाऱ्या शिक्षणावर अवलंबून राहातें. एवढ्याकरितां या वयांत आईबापांना व शिक्षकाला मुलांची फार काळजी घ्यावी लागते. गृहशिक्षण—म्हणजे आईबापांनीं मुलाला लाविलेलें वळण—जर चांगलें असेल तर शिक्षकाचें काम बरेंच हलकें होतें. पण तें जर कां चांगलें नसेल, तर मात्र मुलांच्या नैतिक भावनांचा विकास करण्याला शिक्षकाला त्रास पडतो.

मूल शाळेंत जाऊं लागलें व आपल्या सोबत्यांत खेळूं लागलें कीं, त्याच्या विचारशक्तीचा व सामाजिक भावनांचा विकास होत जातो व मग त्याची चांगल्याची व वाइटाची कल्पनाही विस्तृत होत जाते. जिच्या योगानें दुसऱ्याला आनंद होतो ती कृति चांगली व जिच्या योगानें दुसऱ्याला त्रास होतो ती वाईट, असें त्यास कळूं लागतें. शाळेंतील शिस्तीनें मुलांच्या नैतिक भावना दृढ होत जातात. त्याला स्वतांला नैतिक नियमांचें महत्त्व कळूं लागतें व त्यांचेबद्दल आवड उत्पन्न होते. सदसद्विचारशक्तीचा विकास होत जातो व तिच्या अनुरोधानें त्याची कृति घडूं लागते. सदसद्विचारशक्तीचा पूर्ण विकास झाला व तिच्याच अनुरोधानें मनुष्याची प्रत्येक कृति घडूं लागली कीं, नैतिक भावनांचाही पूर्ण विकास होतो. मुलांच्या नैतिक भावनांचा विकास होणें हें आईबाप, शिक्षक व खेळगडी यांजवर अवलंबून असतें, हें वर सांगितलेंच आहे. लहानपणीं मुलें फार भित्रीं व नम्र असतात. वडील माणसें जें सांगतील तें ऐकण्याची व तदनुरूप वर्तन करण्याची त्यांची साहजिकच प्रवृत्ति असते, म्हणून आईबापांनीं अमुक एक कृति चांगली व अमुक एक वाईट, हें मुलाच्या मनांत नीट भरवून द्यावें. चांगल्याचा परिणाम चांगला व वाइटाचा वाईट असतो हें तत्त्व लहानपणापासून त्यांच्या मनावर बिंबलें पाहिजे. एवढ्याकरितां आईबापांनीं व शिक्षकानें आपल्या कृत्यांत संगति ठेविली पाहिजे. एकादी वाईट गोष्ट मुलानें केली तर एक दिवस त्याला शिक्षा द्यावयाची व दुसऱ्या दिवशीं मुलानें तीच कृति केली तर तिकडे लक्षच द्यावयाचें नाहीं, किंवा थोडेंसें रागें भरून मग त्याला खाऊ द्यावयाचा, असें कधींही करूं नये. या योगानें आपल्या कृतीचा परिणाम मुलांच्या पूर्णपणें लक्षांत येत नाहीं. शिक्षक प्रेमळ असावा. शाळेंतील शिस्त फार कडकही नसावी किंवा फार शिथिलही नसावी. प्रेमळ शिक्षकाला संतोष व्हावा, व त्याचें आपणांविषयीं चांगलें मत असावें, म्हणून मुलें सतत झटत असतात व त्यामुळें सहजच त्यांना चांगलें वागण्याची संवय लागते. शाळेंत गोष्टी व इतिहास या दोन विषयांनीं मुलांच्या नैतिक भावना विकास पावतात. कर्तव्यनिष्ठ व कर्तव्यपराङ्मुख माणसें, सज्जन व दुर्जन, मायाळू व निर्दय अशा दोन विरुद्ध स्वभावांच्या माणसांच्या गोष्टी सांगून, चांगल्याचा परिणाम कसा चांगला होतो व वाइटाचा कसा वाईट होतो, हें तत्त्व मुलांचे मनांत शिक्षकानें बिंबवून द्यावें. गोष्टी सांगत असतांना

उपदेश करण्याच्या भानगडींत मात्र कधीं पडूं नये. त्यांतील उपदेशाचा भाग मुलांनाच ग्रहण करूं द्यावा. रामायण व महाभारत यांचा या कामीं फार उपयोग होतो. 'बाळमित्र' 'इसापनीति' 'हितोपदेश' वगैरे पुस्तकेंही या कामीं फार उपयोगीं पडतात. मुलें जशीं मोठीं होत जातील तसें तसें शिक्षकानें व आईबापांनीं त्यांना आपल्या स्वतांच्या इच्छेनें कर्तव्य करण्याची संवय लावावी, म्हणजे त्यांनीं मुलांना "हें कर मग तें कर" असें सांगण्याऐवजीं मुलांनीं स्वतांच त्या गोष्टी व्यवस्थित रीतीनें कराव्या, ही गोष्ट फार अवश्य आहे. उत्तम शिस्तीचा परिणाम वर्गांतील सर्व मुलांचे मनांत नैतिक भावना उत्पन्न करण्यांत दिसून आला पाहिजे. ज्या वर्गांतील मुलांना शिस्तीनें वागलें कीं आनंद वाटतो व शिस्तीच्या विरुद्ध कोणीं वर्तन केलें तर संताप येतो, त्या वर्गांतील मुलांच्या नैतिक भावनांचा खरोखरच विकास झाला आहे, असें समजावें. ज्या समाजांतील पुष्कळ माणसांच्या नैतिक भावना तीव्र असतात तो समाज सदाचरणी राहातो. कारण त्यांतील कांहीं व्यक्ति दुराचरणी असल्या तरी सर्व समाजाचें मत आपल्या विरुद्ध होईल, या भीतीनें त्यांना सुमार्गाचें अवलंबन करावें लागतें. शाळेनें जर या नैतिक भावनांचा विकास करण्याचें कार्य केलें, तर सर्व समाजावर व परंपरेनें देशावर देखील सुपरिणाम होईल, यांत शंका नाहीं.

---

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग ११ वा.

## प्रवृत्ति.

मनाचे ज्ञान, भावना व प्रवृत्ति हे तीन व्यापार नेहमीं चालू असतात, हें मागें सांगितलेंच आहे. या तीन व्यापारांपैकीं ज्ञान व भावना यांचा विचार मागील भागांत केला आहे. राहिलेला जो तिसरा व्यापार प्रवृत्ति याचा आतां आपण विचार करूं. प्रवृत्ति या व्यापाराचा विचार करितांना मनाच्या प्रवर्तक शक्तीचा उदय कसा होतो, ती आपलें काम कसें करते, तिचा विकास कसा होतो, याच गोष्टींचा विचार विशेषतः आपणांस करावा लागेल. **आपल्या भावना अगर विचार कृतींत आणावयाची मनाची जी शक्ति, तिला प्रवर्तक शक्ति असें म्हणतात.** आपल्या भावना अगर विचार कृतींत आणावयाचें काम दोन तऱ्हांनीं आपणांस करितां येईल. स्नायूंच्या योगानें ती क्रिया आपणांस ताबडतोब करितां येईल, किंवा कोणत्या तरी योग्य प्रसंगीं ती क्रिया करण्याचा आपण निश्चय करूं. आतां माझ्या मनांत पत्र लिहावयाचें आलें, त्याबरोबर मी उठून दऊत, लेखणी, कागद आणून पत्र लिहिण्यास बसलों, किंवा माझ्या मनांत मुंबईस जाण्याचें आलें व पुढील सोमवारीं मीं मुंबईस जाण्याचें ठरविलें. तरी दोन्ही वेळीं प्रवर्तकशक्तीनें आपलें काम केलें आहे. क्रिया तांबडतोब केली जावो, किंवा ती पुढें करण्याचा मनाचा निश्चय होवो, दोन्हीही ठिकाणीं प्रवर्तकशक्ति आपलें कार्य करते.

आपण बुद्ध्या करीत असलेल्या कृतींपैकीं एकादी कृति घेऊन ती कशी घडते तें पाहूं. दुपारीं उकडूं लागलें कीं, आपण पंखा घेऊन वारा घेऊं लागतों. पंखा घेऊन वारा घेण्याची क्रिया जरी इतकी साधी दिसते तरी तींत कित्येक गोष्टींचा समावेश होतो. पहिल्यानें उकाडा होणें ही त्रासदायक भावना आपणांस भासूं लागते. नंतर पंख्याची आपणांस आठवण होते. मग पंख्यानें वारा घेतल्यानें होणाऱ्या आनंदाची कल्पना आपल्या डोळ्यां-

समोर उभी राहाते, व पंखा घेऊन वारा घ्यावा ही इच्छा आपले मनांत येते. नंतर पंखा कसा आणावयाचा व त्यानें वारा कसा घ्यावयाचा या कृतीची कल्पना आपल्या डोळ्यांसमोर येते. इच्छेच्या अनुरोधानें आपले स्नायु काम करूं लागतात. पाय पंख्यापाशीं चालत जातात, हात तो धरितात व हालवूं लागतात. या सर्व क्रियेंत मुख्य तीन गोष्टी दिसून येतात. पहिली गोष्ट भावना, दुसरी गोष्ट क्रिया कोणत्या रीतीनें करावयाची याविषयींची कल्पना व तिसरी इच्छेच्या अनुरोधानें होणारें स्नायूंचें चलन. ज्या इच्छेनें आपण एकादी क्रिया करितों तिला त्या क्रियेचा हेतु असें म्हणतात. यावरून हें उघडच आहे कीं, जेव्हां एकादा मनुष्य बुद्धिपुरःसर एकादी गोष्ट करितो, तेव्हां ती करण्यांत त्याचा कांहींतरी हेतु असतो; ती क्रिया कशी घडवून आणावयाची याचें त्याला ज्ञान असतें, व त्याचे इच्छेप्रमाणें त्याचे स्नायु ी चलन पाव-तात. या तीन गोष्टी असल्याशिवाय कोणाहि मनुष्याला कोणतीही कृति बुद्ध्या करितां यावयाची नाहीं. प्रवर्तनामध्यें या तिन्ही गोष्टींचा समावेश होतो.

अगदीं लहानपणीं मुलाच्या भावना फार साध्या असतात. शारीरिक सुखदुःखांपलीकडे त्याच्या भावना जात नाहींत. एकादी कृति कशी करा-वयाची याचें ज्ञानही त्याला नसतें. शिवाय त्याच्या स्नायूंवरही त्याचा ताबा नसतो. या सर्व कारणांमुळें लहान मुलांत प्रवर्तकशक्ति बिलकूल नसते. मूल जसजसें मोठें होतें, तसतसें त्याचें ज्ञान वाढत जातें. अमुक एक क्रिया केली असतां तिचा अमुक एक परिणाम होतो, हें त्याला हळू हळू कळूं लागतें. त्याचे स्नायु त्याच्या इच्छेप्रमाणें काम करूं लागतात. यावेळीं त्याच्या प्रवर्तकशक्तीचा व्यापार सुरू होतो. सहा महिन्यांच्या मुलाला भूक लागली ह्मणजे तें रडतें व सहा वर्षांच्या मुलाला भूक लागली म्हणजे तेंही रडतें. पण या दोन मुलांच्या रडण्यांत पुष्कळ फरक आहे. आपणांला भूक लागली आहे, तेव्हां आपण जर रडलों तर आपली आई दुधाची वाटी घेऊन येईल, व आपणांस दूध पाजील, मग आपणांस बरें वाटेल, या सर्व गोष्टी लक्षांत आणून सहा महिन्यांचें मूल कांहीं रडत नाहीं. भूक लागली कीं रडावें ही स्वाभाविक वृत्ति परमेश्वरानें त्या मुलांत ठेविली आहे, यामुळें तें रडतें. हें त्याचें रडणें हेतपुरःसर नसतें व म्हणून हा मनाच्या प्रवृत्तीचा व्यापार होत नाहीं. याच्या उलट सहा वर्षांच्या मुलाची गोष्ट आहे. त्याला

भूक लागली कीं, त्या भुकेचा त्रास त्याला होऊं लागतो. घरांत असलेल्या लाडू, पोळी वगैरे पदार्थांची त्याला आठवण होते. हा पदार्थ आपण खाल्ला असतां आपणांस तो गोड लागेल व आपली भूकही शमेल ही कल्पना त्याचे डोळ्यांसमोर उभी राहाते. आईकडे जाऊन डोळ्यांत आंसवें आणून, " आई मला फार भूक लागली आहे, कांहीं तरी खावयास दे " असें म्हट-ल्यावर आई आपणांस खात्रीनें तो खावयाचा पदार्थ देईल, हा आपला हेतु साध्य करण्याचा मार्ग त्याच्या लक्षांत येतो. त्याचे इच्छेप्रमाणें त्याचे पाय आई बसली असेल तेथें जातात, जिव्हा त्याचे इच्छेप्रमाणें बोलते, व डोळेही अश्रू गाळूं लागतात. ही सर्व कृति सहेतुक झाली, म्हणूनच ती प्रवर्तक-शक्तीमुळें घडलेली आहे.

मनाच्या प्रवर्तकशक्तीनें ज्या क्रिया घडतात, त्यांत हेतु आणि स्नायूंचें ऐच्छिक चलन हीं स्पष्टपणें दिसून येतात. या दोन गोष्टी ज्या क्रियेंत नसतात ती क्रिया मनाच्या प्रवर्तकशक्तीमुळें घडलेली नसते. आपण श्वासोच्छ्वास करितों, आपल्या पचनेंद्रियाची व हृदयाची क्रिया सारखी सुरू असते व रुधिराभिसरणही सारखें चालू असतें. पण या सर्व क्रियांत प्रवर्तकशक्तीचा कांहीं संबंध नसतो. कारण या क्रियांवर मनुष्याचा कोणत्याही तऱ्हेचा ताबा नसतो. त्या आपोआपच सतत चालू असतात. अगदीं लहान मुलाच्या डोळ्यांजवळ बोट नेलें तर तें डोळे मिटतें, त्याच्या जिभेला कडू पदार्थ लावला तर तें तोंड वेडें वांकडें करितें, त्याचे हाताला किंवा पायाला हळूच जरी खाजविलें, तरी तें आपला हात किंवा पाय झटकन दूर करितें. या सर्व क्रिया स्वाभाविक रीतीनेंच होत असतात. यांना प्रतिक्षिप्त क्रिया म्हणतात. या सर्व अनैच्छिक क्रिया आहेत. यांतही प्रवर्तकशक्तीचा कांहीं संबंध नसतो. लहान मुलें जन्मतांच बोटें चोखूं लागतात व पिऊं लागतात, पक्षी घरटीं बांधितात, मधमाशा मध गोळा करितात. ह्या क्रिया साहजिकपणेंच घडतात. यांना प्रकृतिसिद्ध क्रिया असें म्हणतात. प्राण्यांचें संरक्षण व्हावें या हेतूनें परमेश्वरानें प्रकृति-सिद्ध क्रिया करण्याची उपजत बुद्धि त्यांना दिलेली असते. यांतही प्रवर्तकशक्तीचा कांहीं संबंध नसतो.

प्रारंभीं मुलांच्या सर्व क्रिया अनैच्छिक असतात. लहान मुलांची हाल-चाल सारखी चाललेली असते. या हालचालीमुळें इच्छेप्रमाणें स्नायूंचें चलन

कसें करावें हें त्यांना कळूं लागतें. परमेश्वरानें मुलांच्या आंगीं अनुकरणशक्ति ठेविलेली आहे. या शक्तीमुळें मुलें वडील माणसांच्या कृतीप्रमाणें बहुतेक कृति करितात, व बोलणें चालणें वगैरे क्रिया फार लवकर शिकतात. मुलांच्या भावना वाढूं लागल्या कीं, त्यांचे मनांत हेतु उत्पन्न होऊं लागतात. इच्छेप्रमाणें स्नायूंना चलन देण्याचें सामर्थ्य आलें असल्यामुळें, त्यांचे हातून कृति घडूं लागतात. या हेतुपुरःसर केलेल्या सर्व कृतींत प्रवर्तकशक्ति अवश्य असते.

कित्येक वेळां दोन किंवा अधिक हेतु मनांत येतात. हे हेतु सजातीय म्हणजे परस्परांस अनुकूल असले तर कृति जलद करितां येते. पण हेतु जर परस्परांच्या विरुद्ध असले तर प्रवर्तकशक्तीला त्या हेतूंचा विचार करावा लागतो. कोणता हेतु जास्त चांगला आहे हें ठरवून, नंतर प्रवर्तकशक्तीला आपलें काम करावें लागतें. यालाच निश्चय किंवा विचारपूर्वक कृति असें म्हणतात. विचारपूर्वक कृति घडण्याला बुद्धीचा विकास व्हावा लागतो, उच्च भावना जोरदार असाव्या लागतात व प्रवर्तकशक्तिही जोराची असावी लागते. ज्ञान, भावना व प्रवर्तकशक्ति हीं आपलें काम व्यवस्थित रीतीनें करूं लागलीं कीं, मनुष्याच्या हातून चांगल्या कृति घडतात. यांपैकीं एक दुर्बळ व बाकीच्या प्रबळ असतां कामा नयेत. प्रवर्तकशक्ति जर दुर्बळ असेल तर मनाचा निश्चय लवकर होणार नाहीं व हातून कृतिही घडणार नाहीं. भावना जर दुर्बळ असल्या तर मनुष्याच्या हातून थोर कृत्यें घडणार नाहींत. ज्ञानच जर नसेल तर अज्ञानामुळें भलतींच कृत्यें मनुष्य करूं लागेल. कोणतेंही कृत्य करण्याचे आधीं ज्ञान व भावना यांचें म्हणणें प्रवर्तकशक्तीला ऐकून घेऊन, त्यांतील कोणाचें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे हें ठरवून, ती कृति करण्याचा निश्चय करावा लागतो.

एकादी क्रिया प्रथमच करण्याला प्रवर्तकशक्तीची जोराची मदत लागते. पण तीच क्रिया आपण रोज करूं लागलों तर दिवसानुदिवस प्रवर्तकशक्तीची मदत कमी कमी लागते, व शेवटीं ती क्रिया अगदीं सहज केली जाते. सकाळींच पांच वाजतां उठावयास आपण सुरुवात केली कीं, पहिल्या दिवशीं आपणांला उठण्याला त्रास पडेल. मनाचा बराच निश्चय करून आपणांस अंथरुणांत पडून राहाण्याचा मोह दाबून धरावा लागेल. दुसरे दिवशीं उठण्याला इतका त्रास पडणार नाहीं. कांहीं दिवस अशाच रीतीनें

उठण्याचा सारखा क्रम ठेविला तर पहांटे उठण्याचें आपणांस कांहींच वाटणार नाहीं. आपण नेमके त्या वेळेला उठून काम करावयास लागूं एवढेंच नव्हे, तर पांच वाजण्याचे पुढें आपणांस झोंप देखील लागणार नाहीं. तीच तीच क्रिया नेहमीं करीत गेल्यानें ती आपणांस सहज करितां येते व ती क्रिया करण्याला प्रवर्तकशक्ति दिवसानुदिवस फार कमी लागते. अशानें आपला वेळही वांचतो व ती क्रिया करीत असतांना तिजकडे विशेषसें अवधानही द्यावें लागत नाहीं, व विचारही करावा लागत नाहीं. यालाच आपण संवय म्हणतों. कित्येक गोष्टी आपण संवयीच्या जोरावर प्रवर्तकशक्तीच्या अगदीं थोड्या मदतीनेंच करीत असतों. पोषाक करणें, जेवणें, स्नान करणें, वेळेवर आपल्या उद्योगाला लागणें इत्यादि क्रिया करीत असतांना, आपण ह्या क्रिया जणूं प्रकृतिसिद्ध क्रियांप्रमाणेंच करितों. या योगानें आपला काळ वांचतो व आपणांस त्रास बिलकूल पडत नाहीं. प्रत्येक वेळेला आपण विचार करून क्रिया करण्याचे पूर्वीं प्रवर्तकशक्तीची मदत घेऊं लागलों तर ती करण्याला अतिशय वेळ लागून ती क्रिया आपल्या हातून नीटही होणार नाहीं.

---

# शिक्षक आणि शिक्षण.

## बौद्धिक शिक्षण.

### भाग १२ वा.

### प्रवर्तकशक्ति व संवय.

" आतां शाळेंत जावयाचें " एवढें ठरविल्याबरोबर आपण चालूं लागतों. चालण्याची क्रिया आतां करावयाची एवढेंच ठरविण्याला प्रवर्तक शक्तीची मदत लागते. एकदां कां ती क्रिया सुरू झाली कीं, आतां डावा पाय पुढें टाकावा किंवा उजवा टाकावा, व तो कसा टाकावा वगैरे गोष्टींचा विचार करण्याची व तिकडे अवधान देण्याची जरूर लागत नाहीं. एवढेंच नव्हे, तर चालतांना जर आपण प्रत्येक पाऊल कसें टाकावयाचें हें ठरवून पावलें टाकावयास लागलों, तर आपणांस जलद चालतां येणार नाहीं, व कदाचित् अडखळून आपण पडूं देखील. पण लहान मूल जेव्हां चालावयास शिकतें, तेव्हां प्रत्येक पाऊल सावकाश व लक्षपूर्वक टाकीत असतें. त्याचें सर्व अवधान चालण्याच्या क्रियेकडे लागलेलें असतें. पण एकदां कां त्याला चालण्याची संवय होऊन तें चांगलें चालूं लागलें कीं, त्याला स्वतांच्या चालण्याचे क्रियेकडे मुळींच लक्ष द्यावें लागत नाहीं. संवयीचे योगानें ही क्रिया इतक्या कांहीं सहज रीतीनें होऊं लागते कीं,ती क्रिया करण्याचे प्रारंभीं मात्र प्रवर्तकशक्तीची अनुमति लागते. क्रिया सुरू झाल्यावर जर कांहीं अड-थळा आला नाहीं, तर प्रवर्तकशक्तीची मुळींच जरूर लागत नाहीं. चालतांना समोरून जर गाडी आली किंवा पुढें खड्डा आला, तर मात्र प्रवर्तकशक्तीची मदत लागते.

वरील विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं, संवयीच्या योगानें दोन मोठे फायदे होतात. चालणें, जेवणें, धुणें, स्नान करणें, पोषाक करणें, वगैरे अनेक व्यापार दररोज आपणांस करावे लागतात. संवयीच्यामुळें अवधान, विचार, प्रवर्तकशक्ति वगैरे मानसिकशक्तींचा फारसा व्यय न करितां, आपणांस या क्रिया करितां येतात. दररोज आपणांला ज्या क्रिया कराव्या लागतात त्यांजबद्दलचा विचार करावा लागला, त्यांजकडे पूर्ण अवधान द्यावें लागलें,व प्रत्येक क्रिया कशी व केव्हां करावयाची हें ठरविण्यास प्रवर्तकशक्तीची मदत घ्यावी लागली, तर आपला किती तरी वेळ खर्च होईल व मानसिक शक्तीचाही व्यय होईल. असें झालें तर, महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करण्यास व त्या करण्यास वेळ व मानसिकशक्ति मुळींच राहाणार नाहींत. खाणें, पिणें वगैरे क्रिया करण्यांतच जर मनुष्याचा सर्वकाळ गेला, तर आयुष्यांतील महत्त्वाचीं कर्तव्यें करण्यास त्याला वेळच सांपडणार नाहीं. **संवयीच्या योगानें एकादी क्रिया करण्यास लागणाऱ्या मानसिकशक्तीचा व्यय वांचतो, हा संवयीचा पहिला मोठा फायदा आहे. एकादी क्रिया रोज नियमानें करीत गेल्यास कांहीं काळानें ती क्रिया सहज करितां येते व तिजपेक्षां जास्त कठीण अशी क्रिया करितां येते, हा संवयीचा दुसरा मोठा फायदा आहे.** मुलें जेव्हां प्रथम लिहावयास शिकतात तेव्हां एकेक अक्षर लिहिण्याला व वाचण्याला त्यांना किती तरी वेळ लागतो. पण लिहिण्याची व वाचण्याची एकदां कां त्यांना संवय झाली कीं, तीं ओळीच्या ओळी भराभर लिहूं व वाचूं लागतात. फ्रेंच ग्रंथकार मांटेग यानें संवयीच्यायोगानें, मनुष्याला अशक्य दिसणाऱ्या गोष्टी देखील कशा सहज करितां येतात,याविषयींची एक मौजेची गोष्ट सांगितली आहे. त्याच्या ओळखीच्या एका शेतकऱ्याची एक गाय होती. त्या शेतकऱ्याची बायको त्या गाईचें वांसरूं अगदीं लहान असतांना, उचलून जवळ असणाऱ्या शेतांत चरावयास नेत असे. वांसरूं उचलून त्याला चरावयास नेण्याचा नियम तिनें अव्याहत रीतीनें पुष्कळ दिवस सुरू ठेविला. कांहीं दिवसांनीं त्या वांसराचा पुष्ट खोंड बनला. तरी देखील ती बाई त्या खोंडाला उचलून चरावयास नेत असे. वास्तविक पाहातां एकाद्या बाईनें खोंड उचलून पलीकडे अंतरावर नेणें ही गोष्ट अशक्य दिसते. पण संवयीच्या योगानें ही असंभवनीय दिसणारी गोष्ट देखील त्या

बाईला करितां आली ! महाराष्ट्रांतील प्रसिद्ध साधु तुकाराम यांनींही आपल्या एका अभंगांत* संवयीपासून होणाऱ्या या दुसऱ्या फायद्याचें वर्णन केलें आहे. ते म्हणतात "कित्येक माणसें बचनागासारखें जालीम विष संवयीच्या योगानें एक एक तोळ्यापर्यंत सहज खातात. इतर मनुष्यांना नाग लांबूनच पाहिल्यानें आंगावर शहारे येतात. दररोजच्या संवयीनें गारोडी लोक खुशाल त्याला हातांत खेळवितात. अशा रीतीनें असंभवनीय दिसणाऱ्या गोष्टी देखील संवयीच्या योगानें करितां येतात."

पोषाक करणें, स्नान करणें वगैरे दररोजच्या शारीरिक व्यापारांत ज्याप्रमाणें संवयीच्या योगानें फायदे होतात, त्याचप्रमाणें बौद्धिक व नैतिक व्यापारांत देखील संवयीच्या योगानें फायदे होतात. तीच तीच कृति नेहमीं केल्यानें तिची संवय होते व ती सहज करितां येते, हें वर सांगितलें आहे.

एकादा लंगडापांगळा पाहिल्याबरोबर आपल्या मनांत दया उत्पन्न झाली व त्याला जर आपण मदत केली, तर या क्रियेचा परिणाम मनावर घडतो. दुसऱ्या वेळीं असाच एकादा अनाथ पंगु पाहिला व त्यालाही मदत केली, तर याही क्रियेचा मनावर परिणाम होईल, व असेंच आणखी कांहीं वेळां झालें म्हणजे गरीब अनाथांना मदत करण्याची संवय लागेल. सामाजिक व उच्च भावना कृतींत उतरविण्याची संवय मुलांना अवश्य लाविली पाहिजे. त्या भावना जर मनुष्याच्या कृतींत उतरल्या नाहींत, म्हणजे त्यांच्या प्रेरणे-प्रमाणें आपले हातून कृति घडली नाहीं, तर त्या भावनांचा कांहींच उपयोग होत नाहीं. या भावनांच्या प्रेरणेप्रमाणें मनुष्याच्या हातून जर कृति घडली नाहीं, तर कांहीं दिवसांनीं त्या दुर्बळ होतात व मनुष्याचा स्वभाव

---

*साधोनी बचनाग खाती तोळा तोळा
इतरांतें डोळा पाहावेना ॥
गारोडी ते सर्प धरिताती हातीं
× ×
असाध्य ते साध्य करितां सायास
कारण अभ्यास तुका म्हणे ॥

ढोंगी व स्वार्थी बनण्याची भीति उत्पन्न होते. गरिबाला पाहून आपल्या मनांत दया उत्पन्न झाली, व दयेनें त्या मनुष्यास मदत करण्याची प्रेरणा आपल्या मनांत उत्पन्न केली, पण आपण त्या प्रेरणेकडे लक्ष न देतां तसेच चालते झालों व गरिबाला मदत करण्याची संधि घालविली, व अशाच रीतीनें जर आणखी कांहीं वेळां आपल्या हातून वर्तन घडलें, तर आपल्या मनांतील दयेची भावना कमजोर होईल. कदाचित्, 'तोंडानें दयेच्या गोष्टी सांगावयाच्या, पण करावयाचें मात्र कांहीं नाहीं,' अशी वाईट संवय आपणांस लागेल व आपण ढोंगी बनूं.

बौद्धिक व्यापारांना देखील हाच नियम लागू आहे. शांतपणानें विचार करण्याची, चौकस बुद्धीनें पाहाण्याची, व्यवस्थित रीतीनें अनुमान काढण्याची क्रिया सारखी कांहीं दिवस मनुष्यानें केली कीं, मनुष्याला त्या क्रियेची संवय लागते, व मग ती क्रिया त्याचे हातून सहज व चांगल्या रीतीनें घडते.

पुष्कळ वेळां मनुष्याच्या इच्छा फार चांगल्या असतात. पण नुसत्या इच्छा चांगल्या असून कार्य होत नाहीं. जोंपर्यंत इच्छा कृतींत उतरत नाहींत तोंपर्यंत त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. सदिच्छेच्या प्रेरणे-प्रमाणें वागण्याची मनुष्याला संवय लागली, तर त्याचे हातून सत्कृत्यें घडतील.

मनुष्याच्या आयुष्यांत संवयीचें फार महत्त्व असतें. किंबहुना मनुष्य हा संवयीचा दास असतो असें म्हटलें तरी चालेल. यासाठीं मनु-ष्याला चांगल्या संवयी असणें हें फार इष्ट आहे. अव्यवस्थितपणा, अ-प्रामाणिकपणा वगैरे वाईट संवयींच्या तडाक्यांत मनुष्य सांपडला म्हणजे त्याच्या हातून त्याचें कर्तव्य चांगल्या रीतीनें पार पडत नाहीं व त्याला फार त्रास पडतो. वाईट संवय ही एकाद्या राक्षसीप्रमाणें मनुष्यावर आपला अंमल चालविते. तिच्या योगानें प्रवर्तकशक्ति दुबळी होते व मग भावना व विचार-शक्ति यांचें कांहींच चालत नाहीं. "आपण आपला व आपल्या कुटुंबाचा नाश आपल्या व्यसनामुळें करीत आहों" ही गोष्ट व्यसनी लोकांना कळते. आपल्या व्यसनाबद्दल त्यांना वाईट वाटत असतें व त्यांना पश्चात्तापही होत असतो. पण त्या व्यसनाचा (वाईट संवयीचा) त्यांच्यावर इतका कांहीं

भयंकर परिणाम झालेला असतो कीं, त्यायोगानें त्यांची प्रवर्तकशक्ति अगदीं दुर्बळ झालेली असते. तिचें कांहींच न चालल्यामुळें, व्यसनी लोकांची आपल्या व्यसनापासून मुक्त होण्याची इच्छा सफल होत नाहीं. संवय–मग ती चांगली असो किंवा वाईट असो–एकदां लागली कीं, तींतून मोकळें होणें फार कठीण आहे. आईबाप व शिक्षक यांना मुलांच्या संबंधानें जें महत्त्वाचें कर्तव्य बजवावयाचें असतें तें, मुलांना चांगल्या संवयी लावणें व वाईट संवयींचा त्यांना स्पर्शही लागूं न देणें, हें होय. गृहशिक्षण व शाळेंतील शिक्षण या दोहोंचाहि महत्त्वाचा भाग हाच आहे. स्वच्छता, नियमितपणा, व्यवस्थितपणा, प्रामाणिकपणा, स्वावलंबन, परोपकार, सहानुभूति, चौकस-पणा, विनय, स्वाभिमान, आज्ञाधारकपणा वगैरे चांगल्या संवयी मुलांना लावण्याचा आईबाप व शिक्षक यांनीं प्रयत्न केला पाहिजे, व याच्या उलट असणाऱ्या अस्वच्छपणा, अप्रामाणिकपणा, परावलंबन, पोकळ गर्व वगैरे वाईट संवयींचा मुलांना स्पर्श न होईल, याजबद्दल त्यांनीं काळजी घेतली पाहिजे. ज्या कृतीची संवय मुलांना लावावयाची असेल, ती कृति मुलांच्या हातून नियमितपणें घडवून आणण्याची तजवीज शिक्षक व आईबाप यांनीं केली पाहिजे. एक कृति नियमितपणें कांहीं दिवस केल्यावर मनुष्याला त्या कृतीची संवय लागते. मनुष्याला असणाऱ्या अनेक संवयींनीं त्याचें शील बनतें. कृति, संवय व शील यांत फार निकटचा संबंध आहे. कृतींनीं संवय होते व संवयींनीं शील बनतें. शील म्हणजे मनुष्याच्या आंगीं अस-णाऱ्या संवयींचा समुदाय होय. यावरून हें उघडच आहे कीं, मुलांना सुशील बनविण्यास त्यांना चांगल्या संवयी लाविल्या पाहिजेत. आतां संवयीच्या संबंधाचे कांहीं सामान्य नियम सांगून हा भाग संपवूं.

मनुष्याला संवय लागण्याचा उत्तम काळ म्हटला म्हणजे बाळपण हा होय. या वयांत नवीन संवयी लवकर लागतात व जडलेल्या संवयीही लवकर नाहींशा होतात. तरुण वयांत नवीन संवय लागण्यास जड जातें व प्रौढ वयांत तर तसें करण्यास फारच त्रास पडतो. रांजणाचा कांठ जसा ओलेपणीं वाटेल तसा वळतो, त्याचप्रमाणें बालपणीं इष्ट त्या संवयी मुलांस लावितां येतात. “ बाळपणीं बाळांची कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल । घेईल ज्या गुणाला तो गुण मति वेष्टुनीहि फांकेल ॥ ” ही कवीची उक्ति सर्वांस माहीतच आहे. एकादी क्रिया अनियमितपणें फार दिवस जरी केली, तरी

तिची संवय लागत नाहीं. संवय लागण्यास ती कृति नियमितपणें, खंड न पाडतां कांहीं दिवस केली पाहिजे. एका ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, साधारणपणें, एकादी क्रिया तीन वारपर्यंत सारखी केली कीं, त्या क्रियेची संवय लागते. एकादी चांगली संवय लावण्यास प्रारंभीं मुलांना कांहीं आमिष दाखवावें लागलें तरी हरकत नाहीं. पुढें तें आमिष हळूहळू कमी करावें म्हणजे झालें. मुलांना जर लवकर उठण्याची संवय लावावयाची असेल, तर प्रथम प्रथम लवकर उठण्याची इच्छा त्यांस होण्यास शाबासकी दिली किंवा एकादें चित्र दिलें किंवा त्यांना बाहेर हिंडावयास नेलें तरी हरकत नाहीं. परंतु थोडक्याच दिवसांनीं हें आमिष काढून टाकिलें पाहिजे. नाहीं तर चित्र घेतल्याशिवाय लवकर उठावयाचेंच नाहीं, अशी संवय मुलांना लागण्याची भीति असते. लहान मुलांना स्वतां कांहीं तरी करण्याची आवड असते. या त्यांच्या कृतिप्रेम भावनेचा शिक्षकाला व आईबापांला, मुलांना संवय लावण्याचे कामीं, चांगला उपयोग करून घेतां येईल. मुलांना कोणत्याही गोष्टीची संवय लागण्यास प्रथम जड जातें, तेव्हां ती संवय लावतांना मुलांना त्रास न होईल व त्या कृतींत त्यांना आनंद वाटेल अशी तजवीज ठेवावी. मुलें जेव्हां शाळेंत प्रथम येऊं लागतात, तेव्हां त्यांचें नेहमींचें स्वातंत्र्य गेल्यामुळें त्यांना शाळेंत गोडी वाटत नाहीं. शिक्षकानें त्यांना चित्रें दाखविलीं, गोष्टी सांगितल्या, व गोडीगुलाबीनें शाळेंत येण्याविषयीं जर त्यांचें मन वळविलें, तर नियमित वेळीं शाळेंत येण्याची त्यांना संवय लागेल. शिक्षक आणि घरचीं माणसें, जें कांहीं सांगतात, त्याजपेक्षां तीं जें कांहीं करितात, त्याकडे मुलांचें लक्ष विशेष असतें व त्यांच्या कृतीचें अनुकरण करण्याची त्यांची नेहमीं तयारी असते. मुलांची ही अनुकरणप्रियता लक्षांत ठेवून घरांतील मंडळी व शिक्षक वागतील तर, सहजच मुलांना चांगल्या संवयी लागतील. मुलांना संवयी लागण्याचे कामीं शिक्षकाला प्रत्येक मुलाच्या स्वभावाचें निरीक्षण करून उपायाची योजना करावी लागेल. निरनिराळ्या स्वभावांच्या मुलांना एकच उपाय लागू पडणार नाहीं.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग १३ वा.

## प्रवर्तकशक्तीचें शिक्षण.

प्रवर्तकशक्तीचा विकास झाला म्हणजे ती आपल्या स्वतांच्याच प्रेरणेनें, भावना व विचारशक्ति यांना न विचारतां किंवा त्यांचें म्हणणें न जुमानतां, एकादी क्रिया उतावीळपणानें करीत नाहीं. ती प्रथमतः उच्च भावना व विचारशक्ति यांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेते, व मग काय करावयाचें हें ठरविते, व त्या ठरविलेल्या निश्चयाप्रमाणें कृति करते. गृहशिक्षण व शाळेंतील शिक्षण या दोहोंच्या योगानें मुलांच्या प्रवर्तकशक्तीचा विकास झाला पाहिजे. हा विकास होण्यास पुढील चार गोष्टींची आवश्यकता असते. मुलांना चांगलें कोणतें व वाईट कोणतें, योग्य कोणतें व अयोग्य कोणतें हें, स्पष्टपणें समजलें पाहिजे; त्यांच्या अंतःकरणांत नेहमीं सदिच्छा उत्पन्न झाल्या पाहिजेत; विचार करून योग्य मार्गानें जाण्याची त्यांना संवय लागली पाहिजे व त्यांना आत्मसंयमन करितां आलें पाहिजे.

प्रवर्तकशक्तीचा विकास होण्याला, चांगलें कोणतें व वाईट कोणतें, योग्य कोणतें व अयोग्य कोणतें, या गोष्टींचें ज्ञान होणें हें अगदीं आवश्यक आहे. हें ज्ञान जर नसेल तर प्रवर्तकशक्तीला आपलें कार्यच करितां येणार नाहीं. अगदीं लहानपणीं मुलांना हें ज्ञान बिलकुल नसतें. दौतींतील शाई सांडली, पुस्तक फाडलें किंवा लेखणी मोडली तर बाबा रागावतात; भांडें फेकून दिलें, दूध सांडलें किंवा शेजारच्या बाबूला चावलें, तर आई रागावते व द्वाड म्हणते, एवढेंच नव्हे तर चापट देखील देते; यावरून या गोष्टी वाईट आहेत अशी लहान मुलांची कल्पना होते. मागितलेली वस्तु आईला किंवा बाबाला आणून दिली, हातांतील खेळणें किंवा खाऊ रडत असलेल्या धाकट्या भावाला दिला, तर आईला व बाबाला आनंद होतो व तीं शाबासकी देतात, यावरून या गोष्टी चांगल्या आहेत अशी मुलांची कल्पना

होते. ज्या गोष्टी केल्या असतां वडील माणसें रागावतात व आपणांला शिक्षा करितात, त्या गोष्टी वाईट आहेत, व ज्या गोष्टी आपण केल्या असतां वडील माणसांना आनंद होतो, व तीं आपणांस शाबासकी देतात त्या गोष्टी चांगल्या, असें लहान मुलें आपल्या मनांत ठरवीत असतात.

कांहीं काळानें बीजरूपानें असणाऱ्या सदसद्विचारशक्तीचा उदय लहान मुलांत होऊं लागतो. मुलानें केलेल्या एकाद्या वाईट कृतीबद्दल, जसें घरांतील माणसांस वाईट वाटतें, तसेंच त्यालाही वाईट वाटूं लागतें. पण हें वाईट वाटणें फार वेळ टिकत नाहीं. आपल्या कुटुंबांतील वडील माणसांच्या कृतींवर व शब्दांवर लहान मुलांचें फार लक्ष असतें. एकादी गोष्ट नैतिक दृष्ट्या चांगली आहे किंवा वाईट आहे, हें मुलें आपल्या वडील माणसांच्या वर्तनावरून ठरवीत असतात. घरांतील माणसांचें वर्तन जर शुद्ध असेल, तर योग्य कोणतें व अयोग्य कोणतें, चांगलें कोणतें व वाईट कोणतें, याबद्दलची मुलाची कल्पना स्पष्ट व बरोबर होते. कितीएक वेळां वडील माणसांचें मुलांशीं वर्तन निश्चित धोरणाचें नसतें. बापानें आदले दिवशीं मुलाच्या एकाद्या कृतीला वाईट म्हणावें तर, दुसरे दिवशीं आईनें त्या कृतीबद्दल मुलाला शाबासकी द्यावी, असें झालें म्हणजे मुलाला कोणती कृति वाईट व कोणती चांगली याची कल्पनाच होत नाहीं. घडवंचीवर चढून फळीवरील डबा उघडून मुलानें लाडू खाल्ल्याबद्दल आईनें त्याला रागें भरावें, तर बापानें मुलाकडे कौतुकानें पाहून, " नको त्याला रागं भरूं, लागली असेल त्याला भूक. खाल्ला असेल त्यानें लाडू. जा बाबू, तूं आपल्या आईचें काय ऐकतोस. " असें म्हटलें तर बाबूला आपल्या कृतीच्या बरेवाईटपणाची कल्पना तरी कशी व्हावी ? एक दिवस मुलावर अगदीं सक्त नजर ठेवावयाची व दुसरे दिवशीं त्यानें कांहीं केलें तरी लक्षच द्यावयाचें नाहीं; असें जर आईबापांनीं किंवा शिक्षकानें केलें, तर मुलांना चांगल्यावाइटाची कल्पना होणार नाहीं. कित्येक वेळां वडील माणसें मुलांच्या कृतींचा विचार न करितां, एकदम उतावीळपणानें त्याला द्वाड किंवा मूर्ख असें म्हणतात. पुष्कळ वेळां असें होतें कीं, मुलांची कृति योग्य असते व वडील माणसें त्या कृतीबद्दल त्यांना विनाकारण दोष देत असतात. यामुळें मुलांना बऱ्यावाइटाची नीटशी कल्पनाच होत नाहीं.

मुलांना चागलें व वाईट कळल्यानेंच प्रवर्तकशक्तीचा विकास होत नाहीं. प्रवर्तकशक्तीला काम करण्यास लावण्यास ‘ हेतु ’ नेहमीं कारण असतो ही गोष्ट मागें सांगितलीच आहे. “ ज्या इच्छेनें एकादी क्रिया करण्यास मनुष्य प्रवृत्त होतो त्या इच्छेला त्या क्रियेचा हेतु म्हणतात, ” ही व्याख्याही मागें दिलीच आहे. यावरून हें उघड आहे कीं, मुलांच्या मनांत सदिच्छांचा उदय व्हावा व त्या दिवसानुदिवस वाढत जाव्या, ही गोष्ट प्रवर्तकशक्तीच्या विकासाला आवश्यक आहे. इच्छा या नेहमीं भावनेवर अवलंबून असतात. लहानपणीं स्वार्थी भावनांचा मुलांवर फार अंमल असतो, यामुळें नेहमींच त्यांच्या इच्छा चांगल्या नसतात. आपल्यावर कामाची पाळी कधीं येऊं नये, खाऊ व खेळाचे पदार्थ आपणांलाच मिळावे, घरांतील माणसांनीं आपलेच लाड करावे, अशा प्रकारच्या अनेक स्वार्थी इच्छा लहान मुलांच्या मनांत असतात. लहान मुलांची प्रवर्तकशक्ति दुबळी असल्यामुळें त्यांना या स्वार्थी भावनांचा जोर कमी करवत नाहीं. शिक्षकाला व आईबापांला या भावनांचा जोर कमी करण्याचे कामीं आपल्या प्रवर्तकशक्तीची लहान मुलांना मदत द्यावी लागते. जसजशी सामाजिक भावनांची वाढ मुलांचे मनांत होते, तसतशा स्वार्थी भावना कमी होतात. तेव्हां मुलांच्या मनांत सदिच्छा उत्पन्न करण्याचे कामीं या सामाजिक भावनांचा शिक्षकानें व आईबापांनीं उपयोग करून घेतला पाहिजे. उदाहरणार्थ, जीं मुलें फार आप्पलपोटीं असतात, त्यांना खेळगड्यांची संगत लावल्यानें किंवा कुत्रें, पोपट वगैरे पाळीव पशु व पक्षी त्यांना दिल्यानें, त्यांचा आप्पलपोटेपणा कमी होतो. आईबापांनीं व शिक्षकानें मुलांना प्रेमानें सांगितल्यामुळें देखील, मुलें आपल्या स्वार्थी इच्छा टाकून देतात व चांगल्या इच्छा धरितात. याकामीं शिक्षकानें व आईबापांनीं फार जपून वागलें पाहिजे. धमकीनें किंवा मारानें एकादी इच्छा नाहींशी करून तिच्या ऐवजीं दुसरी कोणती तरी इच्छा मुलांच्या मनांत कोंबविण्याचा प्रयत्न करणें कधींही श्रेयस्कर होणार नाहीं. मुलांच्या मनांत सदिच्छा उत्पन्न करण्यास व वाईट इच्छा घालविण्यास अनेक वेळां शिक्षकाला व आईबापांला निरनिराळ्या युक्त्या योजाव्या लागतील.

आपल्या प्रेमाच्या योगानें, आपल्या स्वतांच्या अनुकरणीय वर्तनानें व शिस्तीनें, आईबाप व शिक्षक यांना, मुलांच्या मनांत सदिच्छा उत्पन्न

करितां येतील. या सदिच्छा मुलांकडून कृतींत उतरविण्याचा मात्र प्रयत्न झाला पाहिजे. नाहींतर नुसत्या सदिच्छांचा कांहीं उपयोग नसतो.

मुलांना योग्य कोणतें, अयोग्य कोणतें, बरें कोणतें, वाईट कोणतें हें जरी समजलें, त्यांच्या अंतःकरणांत नेहमीं सदिच्छा जरी असली, तरी पुष्कळ वेळां तात्कालिक उत्पन्न झालेली इच्छा इतकी कांहीं जोरदार असते, कीं, आपल्या हातून वाईट गोष्ट घडूं नये असें त्या मुलाला वाटत असतांही, ती इच्छा त्या मुलाचे हातून एकादी वाईट कृति घडविते. ताटांत पेढे ठेवून आई थोडा वेळ दुसऱ्या कांहीं कामाला गेली आहे असें पाहून, एका सहा वर्षांच्या मुलाला त्यांतील एक पेढा तोंडांत टाकण्याची इच्छा उत्पन्न झाली. या इच्छेचा—मोहाचा—प्रतिकार त्याच्यानें होईना. आई नसतांना व तिला न विचारतां पेढा घेणें म्हणजे चोरी करण्यासारखें आहे, ही गोष्ट त्याला कळत होती. चोरी करण्याची त्याला इच्छाही नव्हती. पण पेढे पाहून मनांत उत्पन्न झालेली ही इच्छा—मोह—इतकी कांहीं प्रबळ होती कीं, ती त्या मुलाला आवरली नाहीं. अशा प्रकारचा मोह आवरून, विचारपूर्वक व योग्य मार्गानें वागण्याची संवय मुलांना लागावी म्हणून आईबापांनीं व शिक्षकानें झटलें पाहिजे. अशी संवय मुलांना लावणें हा शिक्षणाचा महत्त्वाचा भाग आहे. मनुष्याचें शील बनण्याला हीच संवय कारण होते हें मागें सांगितलें आहे.

लहान मुलांना चालावयास शिकवितांना प्रथम आपण त्यांना आपल्या बोटांचा आधार देतों; त्यांना वाचावयास शिकवितांना प्रथम आपण वाचून दाखवितों; त्याचप्रमाणें त्यांना स्वतां विचारपूर्वक योग्य कृति करण्याची संवय लागण्यास आपण त्यांना मदत केली पाहिजे. बाळपणीं मुलांची प्रवर्तकशक्ति दुर्बळ असते, म्हणून तिच्याकडून योग्य कृति घडवून आणण्याचे कामीं शिक्षक व आईबाप यांनीं तिला मदत केली पाहिजे. मूल खेळांत गुंतलें आहे अशा वेळीं आईनें जर कामाकरितां हाक मारली, तर खेळ सोडून जाण्याचें मुलाच्या जिवावर येतें. तरी देखील आईच्या प्रेमानें, खेळण्याची इच्छा आवरून तें आईकडे धांवत जातें. खेळ आटोपल्यावर खेळाचे पडलेले जिन्नस उचलून जागचेजागीं ठेवण्याचा मुलाला कंटाळा येतो, पण बाबांनीं हे पदार्थ पडलेले पाहिले तर त्यांना राग येईल, म्हणून मूल ते जिन्नस उच-

लून ठेवितें. कित्येक वेळां आईबाप व शिक्षक यांना योग्य कृति मुलांकडून बळेंच करून घ्यावी लागते. शिक्षक आणि आईबाप यांनीं योग्य ती कृति करवून घेण्याचे कामीं कधींही आळस करूं नये. जितकें होईल तितकें करून गोडीनेंच ती कृति मुलांकडून करून घ्यावी. अगदीं जरूरच असेल तर, शिक्षेच्या देखील या कामीं उपयोग करण्यास हरकत नाहीं. मुलें प्रथम प्रथम जरी वडील मनुष्याच्या धाकानें किंवा त्यांच्या प्रेमानें योग्य कृति करितात, तरी स्वतःचा मोह आवरून ती कृति करितांना मुलांना जी शक्ति येते, तीच शक्ति दुसऱ्यावेळीं मोह दूर करण्यास उपयोगीं पडते. जें मूल आईनें हाक मारली असतां खेळ टाकून जातें, तेंच रस्त्यावर चाललेल्या गारोड्याचा खेळ पाहाण्याचा मोह आवरून वेळेवर शाळेंत जाईल. या इच्छा दाबून टाकून योग्य ती कृति करण्याचें पहिल्यानें मुलांना जड जातें. शाळेंतील व घरचे नियम याच कारणानें त्यांना प्रथम फार त्रासदायक वाटतात. तथापि लवकरच त्या नियमांची उपयुक्तता त्यांना कळूं लागते व ते नियम पाळण्यांत त्यांना आनंद वाटतो. वडील माणसानें सांगितल्यावर किंवा आग्रह केल्यावर एखादी कृति करण्यापेक्षां, स्वतांच्या इच्छेनेंच ती कृति करणें हें अधिक चांगलें आहे, ही गोष्ट मुलांच्या मनांत ठसली पाहिजे. मुलांना स्वतांच्या इच्छेनें योग्य कृति करण्याची संवय आपणांस लावावयाची आहे, ही गोष्ट वडील माणसांनीं नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. मुलांना चांगल्यावाइटाचें जर ज्ञान नसेल, व त्यांच्या मनांत जर सदिच्छा नसतील, तर चांगली कृति आईबापांनीं व शिक्षकानें अनेकवेळां जरी त्यांच्याकडून करवून घेतली, तरी त्यांच्या स्वभावावर इष्ट तो परिणाम बिलकूल घडत नाहीं. पण मुलांना जेव्हां चांगल्यावाइटाचें ज्ञान होतें व त्यांच्या मनांत सदिच्छा वास करितात, तेव्हां मधून मधून होणारा मोह दाबून टाकण्याचे कामीं जर आपण त्यांना मदत केली, तर त्यांच्या मनावर सुपरिणाम घडतो व विचार करून योग्य कृति करण्याची त्यांना संवय लागते. हातून योग्य ती कृति घडली कीं, मुलांना समाधान वाटतें व मोहाशीं झगडून तो जिंकण्याचा त्यांचा उत्साह वाढतो. सदसद्विचारबुद्धि मुलांत उत्पन्न झालेली असते व ती त्यांच्या कृतीबद्दल पसंती किंवा नापसंती व्यक्त करीत असते. चांगली कृति केल्यानंतर होणारें समाधान या सदसद्विचाराच्या पसंतीमुळें होतें. कित्येक वेळां स्वार्थी भावने-

पासून होणाऱ्या इच्छा आणि सद्सद्विचारबुद्धि यांच्यामध्यें, मुलांच्या मनांत चालत असलेला झगडा आपल्या नजरेस पडतो. दोन लहान भाऊ होते. थोरल्या भावाच्या हातांत आईनें एक लाडू दिला. ' यांतील अर्धा तुझ्या धाकट्या भावाला दे ' हें सांगण्याचें आई विसरली. पण नेहमीं आई कोणताही जिन्नस दोघांमिळूनच देत असे. आई कांहीं बोलली नाहीं, तेव्हां हा सबंध लाडू आपणच खावा असा त्यास मोह झाला. परंतु त्याच्या सद्सद्विचारबुद्धीला असें करणें पसंत पडेना. बराच वेळ हा झगडा त्याच्या मनांत चालला होता. शेवटीं सद्सद्विचारबुद्धीचा जय झाला व त्यानें भावाला हांक मारली व लाडूचे दोन भाग करून मोठा भाग त्याला दिला व धाकटा आपण खाल्ला.

" जॉर्ज, हें झाड कोणीं जायबंदी केलें, हें तुला माहीत आहे काय?" असा बापानें प्रश्न विचारल्यावर जॉर्ज वाशिंगटनचे मनांत स्वार्थी भावना, भीति व सद्सद्विचार यांचा झगडा सुरू झाला. " बाबा माझ्याच्यानें खोटें बोलवत नाहीं. मींच तें तोडलें ' असें जेव्हां त्यानें आपल्या बापास उत्तर दिलें, तेव्हां या झगड्यांत सद्सद्विचारबुद्धीचा जय झाला होता. अशा तऱ्हेनें मुलानें विचारपूर्वक योग्य कृति करणें हें अत्यंत श्रेयस्कर आहे.

स्वतांच्या स्वार्थी भावनेपासून होणाऱ्या इच्छा, व विचार न करतां, झटकन एकादी कृति करून टाकण्याविषयीं होणारी प्रवर्तकशक्तीची प्रेरणा, यांना दाबून व विचारशक्तीचें व उच्चभावनांचें म्हणणें ऐकून, नंतर प्रवर्तकशक्तीला योग्य तो निकाल करूं देणें व तो निश्चय अंमलांत आणण, यालाच आत्मसंयमन म्हणतात. आत्मसंयमन करणें म्हणजेच प्रवर्तकशक्तीची वाढ करणें हें होय. वडील माणसांनीं मुलांना आत्मसंयमन करण्यास शिकविलें पाहिजे. आत्मसंयमन करण्याचे प्रसंग जेव्हां मुलांना येतील, तेव्हां त्यांना वडील माणसांनीं प्रोत्साहन दिलें पाहिजे. त्यांनीं, मुलांना ज्या गोष्टींनीं अयोग्य कृति करण्याचा मोह पडेल अशा गोष्टी दूर करून, विनाकारण मुलांच्या प्रवर्तकशक्तीस पडणारा त्रास वांचविला पाहिजे.

दुसऱ्याच्या भीतीनें योग्य कृति करणारा मनुष्य व आत्मसंयमन करून स्वतांच्या सद्सद्विचारबुद्धीच्या पसंतीकरितां व तिजपासून होणाऱ्या

समाधानाकरितां योग्य कृति करणारा मनुष्य, या दोघांत महदंतर आहे. सदसद्विचारबुद्धीच्या पसंतीकरितां योग्य मार्गानें वागणारा मनुष्य आयुष्यांत यशस्वी होतो व त्याच्या हातून थोर कृत्यें घडतात. आपल्या मुलांनीं आत्मसंयमन करून सदसद्विचारबुद्धीच्या अनुरोधानें वागावें असा प्रयत्न शिक्षकानें व आईबापांनीं केला पाहिजे.

लहानपणापासून मुलांचेपुढें उत्कृष्ट असें ध्येय ठेवावें ह्मणजे त्याच्या योगानें मुलांना सत्कृति करण्याला व आत्मसंयमन करण्याला उत्तेजन येतें. एकाद्या कुटुंबांत एकादा थोर पुरुष होऊन गेला असेल, तर त्याचें उदाहरण दृष्टीपुढें ठेवून, त्या कुटुंबांतील मुलें आपणही मोठे होऊं अशी इच्छा धरून, योग्य कृति करण्याचा प्रयत्न करीत असतात.

मुलांचे दृष्टीपुढें लहानपणापासून चांगलें ध्येय ठेविल्यानें केवढे फायदे होतात, हें इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या अनेक व्यक्तींच्या चरित्रापासून आपणांस कळेल. दृष्टीपुढें एकादें ध्येय ठेविल्यानें, त्याचा सुपरिणाम मुलांच्या आचरणावर कसा घडतो, याजविषयीं एका इंग्लिश ग्रंथांत पुढील गोष्ट दिली आहे. एका मुलाच्या कुटुंबांत पूर्वी बरीच शूर मंडळी होऊन गेली. या शूर पुरुषांच्या गोष्टी ऐकून आपणही त्यांच्याप्रमाणेंच होऊं, असें त्या मुलास वाटत होतें. शिपायाच्या आंगीं विशेष गुण कोणते असतात याची त्यानें कल्पना ठरविली होती आणि त्याप्रमाणें तो वागण्याचा प्रयत्न करी. एकदां वर्गांतील सर्व मुलांनीं मिळून कांहीं खोडी केली. शिक्षकानें जेव्हां ह्याजविषयीं चवकशी केली, तेव्हां एकजण देखील बोलेना. पण हा मुलगा उभा राहून यानें आपला अपराध कबूल केला. त्याच्या शिक्षकाला त्याच्या या कृतीचें फार आश्चर्य व कौतुक वाटलें, व त्यानें सर्व मुलें नाकबूल गेलीं असतां तूंच आपला अपराध कसा कबूल केला, म्हणून त्याला विचारलें; तेव्हां त्यानें उत्तर दिलें, “ गुरुजी, मला शिपाई व्हावयाचें आहे, आणि शिपाई लोक आपल्या हातून झालेला अपराध कधींही लपवीत नाहींत.”

शाळेंतील अभ्यासक्रमानें बुद्धीचा विकास होतो, त्यामुळें मुलांची विचारशक्ति वाढते व त्यांना बरें वाईट कळूं लागतें. महाभारत, रामायण इत्यादि ग्रंथांतील सत्पुरुषांचीं चरित्रें ऐकून व त्याचप्रमाणें इतिहासांतील थोर पुरुषांच्या गोष्टी ऐकून उच्च भावनांचा विकास होतो, व शाळेंतील

शिस्तीच्या योगानें मुलांना चांगल्या संवयी लागतात आणि त्यांना आत्मसंयमन करण्याचीही संवय लागते. शिक्षकाचें स्वतांचें आचरण शुद्ध असल्यास मुलें त्याच्याप्रमाणें वागूं लागतात. या सर्व गोष्टी प्रवर्तकशक्तीचा विकास करण्याचे कामीं उपयोगीं पडतात. शाळेंत शिस्त राखण्याच्या म्हणजे चांगल्या संवयी लावण्याच्या साधनांपैकीं दोन साधनें जीं बक्षिस व शिक्षा, त्यांजबद्दल पुढील एका भागांत विचार करूं.

---

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग १४ वा.

## नीतिशिक्षण.

आपल्या शाळांतून आजपर्यंत नीतिशिक्षणाची हयगय झाली आहे, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. बौद्धिक आणि शारीरिक शिक्षणांपेक्षां, नीतिशिक्षणाचें महत्त्व अधिक आहे. मनुष्याची शरीरसंपत्ति कितीही चांगली असली व त्याची बुद्धि कितीही तीव्र असली, तरी एका शीलाशिवाय या गोष्टी फुकट होत. ज्या मनुष्याला बुद्धि आहे परंतु शील नाहीं, तो मनुष्य आपल्या बुद्धीचा दुरुपयोग करून समाजाला घातक होईल, यांत शंका नाहीं. मनुष्याला सुशीलाशिवाय खरें सुख या आयुष्यांत कधींहि होणार नाहीं. ज्या समाजांत किंवा ज्या राष्ट्रांत, सुशील माणसांची संख्या जास्त, तोच समाज किंवा तेंच राष्ट्र भरभराटीस पोहोंचतें. तेव्हां मुलांचें शील बनविणें म्हणजे त्यांना सद्गुणी करणें, हें शिक्षकांचें आद्य कर्तव्य आहे. मुलांना शाळेंत धाडण्यांत त्यांना अनेक विषयांचें ज्ञान व्हावें, एवढाच कांहीं पालकांचा हेतु नसतो; तर आपल्या मुलांना शाळेंत चांगलें वळण लागावें, त्यांना चांगल्या संवयी लागाव्या व तीं सुशील व्हावीं, हाही हेतु असतो. म्हणून जो शिक्षक मुलांच्या नीतिशिक्षणाकडे लक्ष देत नाहीं, तो आपल्या कर्तव्याची अगदीं हेळसांड करितो असें म्हणण्यास हरकत नाहीं. नीतिशिक्षण देणें म्हणजे मुलांकडून नीतिशास्त्राचे नियम पाठ करून घेणें, किंवा भूतदया, प्रामाणिकपणा, सत्यभाषण व आत्मसंयमन वगैरे विषयांवर त्यांचेकडून निबंध लिहून घेणें हें नव्हे; तर मुलांना सन्मार्गानें व प्रामाणिकपणानें वागण्याची संवय लावणें, त्यांच्या मनांत सुविचार उत्पन्न करणें, त्यांच्या अंतःकरणांतील उच्च भावनांचा परिपोष करणें व त्यांना आत्मसंयमनहि शिकविणें, हें खरें नीतिशिक्षण होय.

मुलांना सुशील बनविण्याचे कामीं शाळेंतील शिक्षणाला गृहशिक्षणाची जोड लागते. मुलांच्या प्रवर्तकशक्तीचा विकास करून, त्यांना सुशील

बनविणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य आहे व हें साधण्यास आईबाप व शिक्षक यांना झटावें लागतें. मुलांना नीतिशिक्षण देण्याला शिक्षकापेक्षां आईबापांला उत्कृष्ट संधि असते. शाळेंतील शिक्षणापेक्षां गृहशिक्षणाला प्रारंभ फार लवकर होतो व मुलांच्या मनावर संस्कार होण्याला घरींच प्रारंभ होतो. आजपर्यंत जगांत जीं माणसें आपल्या अंगच्या थोर सद्गुणांनीं पुढें आलीं आहेत, त्यांनीं आपल्या मोठेपणाचें श्रेय, घरीं आईनें त्यांना बाळपणीं दिलेल्या शिक्षणालाच दिलें आहे. लहानपणीं मूल सर्वस्वीं पराधीन असतें, यामुळें त्याच्या सर्व कृतींवर आईबापांची नजर असते. मुलांचा बाळपणचा सर्व काळ घरांतच जातो. यामुळें त्यांचें खाणें, पिणें, बोलणें, चालणें, खेळणें वगैरे सर्व कृति आईबापांचे देखरेखीखालींच चाललेल्या असतात. या सर्व कृतींत आईबापांकडून मुलांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वळण मिळत असतें. आईबाप व कुटुंबांतील माणसें यांच्या सहवासापासून होणारा परिणाम, मुलें शाळेंत जाऊं लागलीं व आपल्या सोबत्यांत खेळूं लागलीं तरी, पुष्कळ अंशीं कायम राहातो.

कुटुंबांतील माणसें प्रेमानें एकमेकांशीं बद्ध असतात. या प्रेमामुळें व त्यांच्या निरंतरच्या निकट सहवासामुळें, मुलांच्या नैतिक शिक्षणावर त्यांचा जास्त परिणाम होतो. अगदीं बाळपणीं आईबापांला, विशेषतः आईला, मुलाला वळण लावण्याची फारच चांगली संधि असते. आईवरील प्रेमामुळें व तिजवर सर्वस्वीं अवलंबून असल्यामुळें, आई जें कांहीं सांगेल तें करण्यास मूल नेहमीं तयार असतें. मुलाला आईपासून मिळत असलेल्या या शिक्षणाला बापाच्या शिक्षणाची जोड मिळते. बाळपणीं मुलांच्या प्रवर्तकशक्तीचा विकास करण्याचें व त्यांना चांगल्या संवयी लावण्याचें काम साहजिकपणेंच या दोघांच्या हातून चांगल्या रीतीनें पार पडतें. यावरून हें उघड आहे कीं, कुटुंब हें नीतिशिक्षण मिळण्याचें उत्कृष्ट स्थान आहे. या कुटुंबांतच मुलाला खेळण्याला समवयस्क सोबती असतील व या सर्व मुलांवर वडील मंडळीची देखरेख असेल, तर व्यवस्थितपणा, न्यायप्रियता, सहानुभूति वगैरे गुणांचें बीजारोपण मुलांचे अंतःकरणांत होतें. प्रेमळ व सुशील आईबापांचे सहवासांत दया, सौजन्य, सद्भिरुचि, सत्कृत्यांची आवड, ईश्वरावरील श्रद्धा वगैरे गुण मुलांचे अंगीं जडतात व या सहवासामुळेंच मुलांच्या उच्च भावनांचा परिपोष होण्याला सुरुवात होते,

मूल शाळेंत नियमित वेळपर्यंत राहात असतें. दिवसाच्या २४ तासांपैकीं मुलांचे फार तर ६ तास शाळेंत जातात. शिवाय एकाच शिक्षकाचे हाताखालीं पुष्कळ मुलें असतात. यामुळें आईबापांला ज्याप्रमाणें आपल्या मुलांच्या कृतींवर, विचारांवर व भावनांवर लक्ष ठेवून त्यांना वळण लावितां येतें, त्याप्रमाणें शिक्षकाला प्रत्येक मुलावर सारखें लक्ष देऊन त्याला वळण लावणें अशक्य असतें. आणखी एक गोष्ट अशी आहे कीं, मुलांचें आपल्या आईबापांवर जें प्रेम असतें, त्यांचेबद्दल त्यांना जो आदर वाटत असतो, तो आदर व तें प्रेम शिक्षकाबद्दल त्यांना कधींही वाटणार नाहीं. घरीं मुलांच्या सर्व कृतींवर आईबापांची नजर असते. शाळेंत मुलांचा आयुष्यक्रम ठरलेला असतो व तेवढ्यावरच शिक्षकाची नजर असते. यामळें सुशिक्षित आईबापांच्या हातून मुलांचे आचार, विचार व भावना यांना वळण लावण्याचें, म्हणजे मुलांना नीतिशिक्षण देण्याचें काम, जितक्या चांगल्या रीतीनें होईल तितकें, तें शिक्षकाच्या हातून नियमित वेळांत शाळेंतील परिस्थितींत होणें शक्य नाहीं.

असें जरी आहे तरी, शाळेंतील नैतिक शिक्षणाचें महत्त्व कांहीं कमी नाहीं. या शिक्षणाचे योगानें, पुढील आयुष्यांत अत्यंत आवश्यक लागणारे अनेक सद्गुण मुलांचे आंगीं जडतात. "प्रत्येक संस्थेचे कांहीं ठराविक नियम असतात व ते नियम त्या संस्थेंतील प्रत्येक माणसानें पाळले पाहिजेत;" ही गोष्ट मुलांना शाळेंत गेल्यावरच समजूं लागते. शाळेंत अनेक समवयस्क मुलें असतात. त्या सर्वांशीं मिळून मिसळून वागण्याची व सर्वांनीं मिळून जुटीनें एकादें काम करण्याची संवय मुलांना शाळेंतच लागते. ज्याप्रमाणें घरीं कुटुंबांतील माणसांची मदत मिळते, त्याचप्रमाणें शाळेंत मिळत नसल्यामुळें, मुलाला स्वतांच विचार करून कसें वागावें, हें पुष्कळ वेळां ठरवावें लागतें; यामुळें त्याला शाळेंत स्वतांच विचार करण्याची संवय लागते. स्वतांच्या हक्कांचें संरक्षण करून दुसऱ्यांच्या हक्कांना योग्य मान देणें, ही गोष्ट मुलें शाळेंतच शिकतात. हा फार महत्त्वाचा गुण आहे आणि हा गुण जर आंगीं नसेल, तर मनुष्याला समाजांत वागतांच येणार नाहीं. याशिवाय स्वावलंबन, स्वाभिमान, स्वार्थत्याग वगैरे अनेक गुण शाळेंतील शिस्तीमुळें मुलांच्या आंगीं जडतात.

ज्या मुलांचे आईबाप सुशिक्षित असतात, त्या मुलांना गृहशिक्षण फार चांगलें मिळतें. हीं मुलें जेव्हां शाळेंत येतात तेव्हां त्यांना नीतिशिक्षण देण्याचें काम शिक्षकाला फार सोपें जातें. शाळेंतील शिक्षणाला जर अशा रीतीनें गृहशिक्षणाची जोड मिळाली, तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें होतें. पण जीं मुलें अशिक्षित कुटुंबांतून शाळेंत येतात, त्यांना नीतिशिक्षण देण्याचें काम फार अवघड होतें. कारण घरीं मुलांवर होत असलेला वाईट परिणाम नाहींसा करून, त्या मुलांना चांगल्या संवयी लावावयाच्या असतात. हें काम करण्यास शिक्षकाचे अंगीं धिमेपणा व दृढनिश्चय लागतो. या गुणांशिवाय हें अत्यंत परिश्रमाचें कार्य त्याचे हातून होणार नाहीं. मुलांना सुशील बनविणें हाच शिक्षणाचा प्रधान हेतु आहे. सुशील मुलांवरच त्यांच्या कुटुंबाची, समाजाची व राष्ट्राची भावी उन्नति अवलंबून असते. तेव्हां ज्या मुलांना गृहशिक्षण मिळ नाहीं त्यांना सुशील बनविणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य आहे, व तें करण्यास शिक्षकानें मनापासून झटलें पाहिजे.

मनुष्याचा स्वभाव हा त्याला लहानपणापासून जडलेल्या संवयींचा परिणाम असतो. तीच गोष्ट पुनः पुनः केल्यानें त्या गोष्टीची आपणांस संवय होते. एवढ्याकरितां, शिक्षकानें मुलांना चांगल्या गोष्टी करण्यास लावावें, म्हणजे त्यांना तसें वागण्याची संवय लागेल आणि अशा तऱ्हेच्या चांगल्या संवयी लागल्या, म्हणजे तीं मुलें सुशील बनतील. मुलांना चांगल्या संवयी लावणें हा नीतिशिक्षणाचा पाया होय. १ शाळेंतील शिस्त. २ शिक्षकाचें स्वतःचें वर्तन. ३ लोकापवादाची भीति. ४ व्यवस्थित खेळ. ५ तालीम वगैरे शारीरिक शिक्षण. ६ दररोज शाळेंत चाललेला शिक्षणक्रम. ७ धार्मिक शिक्षण. व ८ नीतिपाठ, यांच्या साहाय्यानें शाळेंत नीतिशिक्षण देतां येतें.

१ शाळेंतील शिस्तः—मुलांना लहानपणीं चांगल्या किंवा वाईट संवयी लागणें, हें तीं ज्या शाळेंत शिकत असतात, त्या शाळेंतील शिस्तीवर अवलंबून असतें; ज्या शाळेंतील शिक्षक दक्ष असतात व जेथील शिस्त चांगली असते तेथें मुलें आपलें काम वेळचे वेळेवर व काळजीपूर्वक करितात. असत्यभाषण, अप्रामाणिकपणा वगैरे वाईट गोष्टींपासून त्या शाळेंतील मुलें अलिप्त असतात. उलटपक्षीं शाळेंत शिस्त चांगली नसेल, तर मुलें

वाटेल तेव्हां शाळेंत येतात व तीं वेळच्यावेळीं, काळजीपूर्वक व व्यवस्थित रीतीनें आपला अभ्यास करीत नाहींत. तीं स्वच्छ व नीटनेटकीं राहात नाहींत. वाटेल त्याचें उदाहरण पाहून करावें, दुसऱ्याचें ऐकून उत्तर द्यावें, इत्यादि गोष्टींमुळें त्यांना अप्रामाणिकपणाची संवय लागते. अशा शाळेंत मुलांचा अभ्यास तर चांगला होत नाहींच, परंतु त्यांना ज्या वाईट संवयी जडतात, त्यांचा परिणाम त्यांना सर्व आयुष्यभर भोगावा लागतो. शाळेंतील शिस्त, ही विद्यार्थ्यांचे आंगीं उत्तम संवयी लावण्याचें एक उत्कृष्ट साधन आहे. वक्तशीरपणा, स्वच्छता, उद्योग, सत्यभाषण, आज्ञाधारकता, प्रामाणिकपणा, दुसऱ्याविषयीं आदर वगैरे अनेक चांगल्या संवयी मुलांस लाविल्या, तर हे सद्गुण त्यांचे आंगीं सहजच येतील, व तीं मुलें सुशील बनतील.

पुढील आयुष्यांत सन्मार्गानें चालणें ही गोष्ट मनोनिग्रहावर अवलंबून असते. म्हणून मुलांना आपले मनोविकार व इच्छा आपल्या ताब्यांत ठेवण्यास शिकविणें, हें शिक्षकाचें कर्तव्य होय. शाळेंतील शिस्तीचे योगानें ही गोष्ट करितां येते. जेव्हां जेव्हां मुलें एकादी वाईट गोष्ट करितात, तेव्हां शिक्षकानें त्यांना शिक्षा करण्यास कधींहि मागें घेऊं नये. वाईट गोष्टीबद्दल शिक्षा करण्यांत शिक्षक त्या मुलांचें कल्याण करितो. शिक्षकानें आपल्या शाळेंत कडक शिस्त राखिली पाहिजे. मुलानें अपराध केल्यास जो शिक्षक कानाडोळा करितो, तो त्या मुलाचें अकल्याण करीत असतो. अपराधाबरोबर शिक्षा मिळते, ही गोष्ट मुलांचे मनांवर पक्की बिंबली पाहिजे. हें तत्त्व मुलांचे मनांत बिंबलें, म्हणजे सहजच तीं शाळेंतील शिस्तीचें उल्लंघन कधींही करीत नाहींत. एवढेंच नव्हे, तर ती शिस्त पाळण्याची त्यांना संवय जडते व त्यांत त्यांना आनंद वाटतो. प्रत्येक शिक्षक न्यायी, दृढनिश्चयी व शिस्तीच्या कामांत दक्ष, असा असला पाहिजे.

२ शिक्षकाचें वर्तनः—शिक्षकाच्या शब्दांपेक्षां त्याच्या आचरणाचा परिणाम मुलांचे मनावर जास्त होतो. एवढ्याकरितां शिक्षकाचें वर्तन शुद्ध व अनुकरणीय असें असलें पाहिजे. खरें बोलावें, आळशी राहूं नये वगैरे उपदेश करून, शिक्षक जर आपल्या उपदेशाच्या विरुद्ध स्वतांच वर्तन करीत असला, तर त्याच्या उपदेशाचा यत्किंचित्‌हि परिणाम मुलांचे मनावर होणार नाहीं. उलट त्यांना शिक्षकाचे सहवासानें, ढोंग माजविण्याची मात्र

संवय लागेल. शिक्षकाची खरी वर्तणूक काय आहे, त्याचा स्वभाव कसा आहे, या गोष्टी मुलांचे लक्षांत तेव्हांच येतात. ज्या मनुष्याचें वर्तन चांगलें नसेल, त्यानें शिक्षणासारख्या पवित्र धंद्यांत पडूं नये. दुसरा वाटेल तो धंदा करावा. आपल्या अशुद्ध वर्तनानें शुद्ध अंतःकरणाच्या कोमल मनाचे मुलांवर जर वाईट परिणाम होत असेल, तर आपल्या हातून घोर अपराध होत आहे व त्याबद्दल ईश्वर आपणास शिक्षा करील, ही गोष्ट शिक्षकानें नेहमीं लक्षांत ठेवावी. सत्य भाषण, प्रामाणिकपणा, स्वच्छता, नियमितपणा उद्योग, सहनशीलता, कर्तव्यजागृति, आज्ञाधारकता, वगैरे गुण शिक्षकानें आपल्या अनुकरणीय आचरणानें मुलांना लावावे.

३ मुलांचे मनांत दुर्गुणाबद्दल व वाईट कृत्याबद्दल तिटकारा उत्पन्न करावा. आपण एकादें वाईट कृत्य केलें, तर आपले सहाध्यायी आपणांस वाईट म्हणतील, ही भावना मुलांचे मनांत जागृत झाली कीं, तीं कधींही वाईट कृत्य करणार नाहींत. अशी भावना आपले मुलांचे मनांत उत्पन्न करणें हें शिक्षकाचें कर्तव्य होय. समाजांत झालेली अपकीर्ति हीच सर्वांत मोठी शिक्षा, असें ज्या मनुष्यास वाटतें, तो अपकीर्तीच्या भीतीनें कधींही वाईट कृत्य करणार नाहीं. म्हणून ही अपकीर्तीची भीति मुलांचे मनांत उत्पन्न करण्यास शिक्षकानें झटावें.

४ खेळ हें नीतिशिक्षण मिळण्याचें एक उत्कृष्ट साधन आहे. व्यवस्थित रीतीनें चाललेल्या खेळापासून, किती तरी चांगल्या संवयी मुलांना लागतात व किती तरी सद्गुण त्यांचे आंगीं जडतात. आज्ञाधारकता, प्रसंगावधान, एक जुटीनें काम करण्याचा गुण, धैर्य, स्वार्थत्याग व आत्मसंयमन वगैरे अनेक सद्गुण खेळाच्याच योगानें मुलांचे आंगीं जडतात. म्हणून व्यवस्थित खेळांना उत्तेजन देणें हें प्रत्येक शिक्षकाचें कर्तव्य आहे.

५ कसरत—ड्रिल वगैरे व्यायामापासूनही नीतिशिक्षणास मदत होते. या व्यायामांत मुलांना मन एकाग्र करावें लागतें व त्यायोगानें त्यांना आत्मसंयमनाची संवय लागते, **आणि सर्व सद्गुणांचा पाया आत्मसंयमन हाच आहे.** दुसरें असें कीं, शरीरसंपत्ति चांगली असली कीं, मन देखील चांगलें राहातें. दुर्बळ माणसाच्या मनांत नाना तऱ्हेचे विकार येण्याचा जास्त संभव असतो.

६ शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या अनेक विषयांचे योगानेंही मुलांना बरेंच नीतिशक्षण मिळतें; मात्र ते विषय शास्त्रोक्त पद्धतीनें शिकविले पाहिजेत. गणितानें मुलांचे आंगीं व्यवस्थितपणा येतो. त्यांना विचार करण्याची संवय लागते व सत्याचें महत्त्व त्यांस कळतें. भूगोल जर चांगला शिकविला, तर त्यायोगानें मुलांच्या मनाचा संकुचितपणा नाहींसा होतो व त्यांचे मनांत दुसऱ्या राष्ट्रांबद्दल आदर उत्पन्न होतो. पृथ्वीवर शांतता असावी अशी त्यांना इच्छा होते; सृष्टींतील अनंत चमत्कार पाहून कौतुक वाटतें व सृष्टिकर्ता जो परमेश्वर, त्याजबद्दल कृतज्ञता व प्रेम उत्पन्न होतें. इतिहासाचे अभ्यासानें मुलांच्या मनांत स्वराष्ट्राबद्दल प्रेम जागृत होतें. सद्गुणांचा जय होतो व दुर्गुणांचा पराजय होतो, हें तत्त्व मनांत बिंबतें. मोठ्या लोकांच्या चरित्रांचें अनुकरण करण्याची इच्छा उत्पन्न होते. शास्त्रीय विषयाचे शिक्षणानें शोधक बुद्धि वाढते, नीटनेटकेपणा आंगीं येतो व या विश्वांतील अनंत चमत्कार पाहून मन आनंदानें व आश्चर्यानें भरून जातें. **पण घोकंपट्टी केल्यानें यांतील एकही गुण आंगीं येत नाहीं.**

७ धार्मिक शिक्षणः–सज्जन व धर्मशील शिक्षकानें जर विद्यार्थ्यांस धर्मशिक्षण दिलें, तर त्यापासून विद्यार्थ्यांचें कल्याण होईल. शिक्षकानें विशिष्ट धर्ममतें व आचार मुलांस शिकविण्यापेक्षां, सदाचार व सत्कृत्यें यांचें महत्त्व मुलांचे मनावर विशेष बिंबवावें. कोणत्याही शिक्षकानें सरकारचे परवानगीशिवाय मुलांस आपल्या धर्माचें शिक्षण देऊं नये.

ईश्वरावर दृढ श्रद्धा ठेवावयाची, त्याला सत्कर्में अत्यंत प्रिय आहेत म्हणून तीं आचरावयाचीं, व वाईट कृत्यांनीं त्याचा राग होईल म्हणून त्यांच्यापासून दूर राहावयाचें, ही भावना मुलांच्या मनांत दृढ करण्याकरितां शिक्षकानें झटलें पाहिजे. ही भावना ज्याच्या मनांत पूर्णपणें रुजली आहे तो नीतिमार्गाचें उल्लंघन कधींही करणार नाहीं.

थोर माणसांच्या सत्कृत्यांबद्दलच्या गोष्टी मनोरंजक रीतीनें सांगितल्यास, त्यायोगानें नीतिशिक्षणास मदत होते, ही गोष्ट खरी आहे. परंतु सत्य, प्रामाणिकपणा वगैरे सद्गुणांसंबंधीं लांबलचक व्याख्यानें दिलीं, तर त्यांपासूनच यत्किंचित् फायदा न होतां मुलांना कंटाळा मात्र येतो.

थोर माणसांच्या सत्कृत्यांच्या वर्णनाचे योगानें, मुलांचे मनांत सदाचरण व थोर कृत्यें यांजबद्दल प्रेम उत्पन्न होतें ही गोष्ट खरी आहे; तथापि त्यायोगानें त्यांना सदाचरणाची संवय लागेल असें मात्र नाहीं. मुलांचे मनांत सदाचरणाची आवड असल्यानें, शिक्षकाचें काम भागत नाहीं. त्याला, मुलांना सदाचरणाची संवय लावावयाची आहे, म्हणून नीतिपाठांनींच शिक्षकाचें काम कधींहि पुरें व्हावयाचें नाहीं. मुलें जेव्हां शाळेंत येतात, तेव्हांच त्यांना चांगलें कोणतें, वाईट कोणतें, खरें कोणतें, खोटें कोणतें, या गोष्टी कळत असतात. शिक्षकाचें काम, मुलांना शाळेंतील शिस्तीच्या योगानें सदाचरणाची संवय लावणें, हें होय. नुसत्या जेवणाच्या गोष्टी सांगून जसें पोट भरत नाहीं, तसें सदाचरणाच्या नुसत्या गोष्टी सांगून मुलें सदाचरणी होत नाहींत. मुलांना चांगल्या संवयी लावणें, हीच गोष्ट महत्त्वाची आहे. नीतिशिक्षणाचे कामीं, शिक्षकाची मुख्य भिस्त, शाळेंतील शिस्त व आपलें आचरण यांवर असली पाहिजे. व्यवस्थित खेळ व ड्रिल वगैरे व्यायाम यांचीही या कामीं त्याला फार मदत होईल.

ज्याप्रमाणें दूषित हवेंत क्षयरोग, पटकी वगैरे रोगांचे जंतु उत्पन्न होतात, अथवा दूषित पाण्यांत ज्याप्रमाणें डांस वगैरे कीटक उत्पन्न होतात, तद्वत् ज्या शाळेंत शिस्त बरोबर नाहीं, शिक्षकांचें वर्तन असावें तसें नाहीं, तेथेंच खोटें बोलणें, अप्रामाणिकपणा आणि दुसरे अनेक दुर्गुण मुलांचे आंगीं जडतात. एवढ्याकरितां आपलें स्वतःचें वर्तन शुद्ध ठेवणें हें प्रत्येक शिक्षकाचें कर्तव्य आहे. वार्षिक तपासणीचे वेळीं नीतिशिक्षणाची परीक्षा होत नाहीं ही गोष्ट खरी आहे, परंतु आपल्या मुलांच्या कल्याणाकरितां आपण झटत आहों व आपलें कर्तव्य आपण बजावीत आहों, हा विचार खऱ्या शिक्षकाचे अंतःकरणास जें समाधान देतो, तें समाधान दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें त्यास मिळणार नाहीं. अशा शिक्षकावर त्याच्या विद्यार्थ्यांचें पूर्ण प्रेम असतें व त्याचेविषयीं जी आदरबुद्धि सर्व आयुष्यभर त्यांचे अंतःकरणांत राहाते, तिजपेक्षां जास्त बक्षीस तें कोणतें ?

---

धार्मिक शिक्षणाचेसंबंधानें लिहितांना, कित्येक शाळांतून अभ्यासक्रमाला सुरवात करण्याचे पूर्वीं सर्व विद्यार्थ्यांनीं व शिक्षकांनीं एकत्र जमून ईशस्तवन करावयाचें व नंतर आपआपल्या वर्गांत जाऊन कामाला

सुरवात करावयाची अशी जी चाल आहे, तिचा उल्लेख या ठिकाणीं करणें जरूर आहे. अशा तऱ्हेच्या प्रार्थनेनें अनेक फायदे होतात. प्रेमळवाणीनें ईश्वराची प्रार्थना केल्यानें सर्वांचें मन प्रसन्न होतें व दररोजचें काम करण्याला उत्साह येतो. हा जो प्रार्थनेचा गंभीर देखावा असतो ह्याचा परिणाम मुलांच्या कोमल मनावर हितकर होतो. कोणतेंही काम करितांना ईश्वरावर श्रद्धा ठेवून, त्याचें साहाय्य मागून, मनापासून करावयाचें ही संवय मुलांना लागते. ही प्रार्थना अगदीं साधी असावी व तींत विशिष्ट धर्ममतें येऊं नयेत. तींत ईश्वराचें दयालुत्व, चातुर्य, वगैरे गुणांबद्दल उल्लेख असावा. अशा तऱ्हेच्या प्रार्थनेकरितां कविता पसंत करितांना फार खबरदारी ठेविली पाहिजे. मुलांना तीं पद्यें सर्वांनीं मिळून योग्य स्वरांत म्हणण्यास शिकविलें पाहिजे. त्यांनीं या वेळीं गडबड न करितां शांत उभें राहून हीं पद्यें म्हणण्याची त्यांना संवय लाविली पाहिजे. या प्रार्थनेच्या योगानें त्यांना नियमितपणाची संवय लागते. प्रार्थना सुरू झाल्यावर उशीरां येणाऱ्या मुलांना वर्गाच्या बाहेर उभें राहाण्यास सांगावें. एकदा त्यांना प्रार्थनेची संवय झाली कीं, तीं या प्रार्थनेकरितां अगदीं नियमित वेळीं मोठ्या आवडीनें येतात. एखाद्या वेळीं एखाद्या मुलाला उशीर झाला व त्याला जर वर्गाबाहेर उभें राहण्याची पाळी आली, तर त्याला फार वाईट वाटतें. ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन या संस्थेंतील या वर्षाच्या प्रार्थनेचीं पद्यें पुढें नमुन्याकरितां दिलीं आहेत.

## श्लोक.

तेजस्वी रमणीय वस्तु भुविं ज्या नेत्रांस आकर्षिती ।
तारे चंद्र रवी अनेक गगनीं रत्नेंहि जीं राजती ॥
प्राणी सान तसेच थोर भुवनीं सौख्यांत जे नांदती ।
निर्मी जो जगदीश या सकलिकां भावें नमूं त्याप्रती ॥ १ ॥

नाना चित्र सुगंधि रम्य कुसुमें वायूसवें डोलती ।
नाना गोड फळें तशा तरुलता प्राणीहि रम्याकृती ॥
पक्षी सुस्वर गात ते मधुपही जे गुंजती साजिरे ।
ऐश्वर्यें नटवीत जो भुवन हें वंदूं तया आदरें ॥ २ ॥

दया सर्वाभूतीं सम जननिचे जो परि करी ।
उपेक्षीना कोणा प्रभु सदय कारुण्यलहरी ॥
जयाच्या विश्वाची बघुनि रचना विस्मित मन ।
तया गाऊं ध्याऊं करुनि जगदीशास नमन ॥ ३ ॥

हीं पद्यें प्रौढ विद्यार्थ्यांसाठीं आहेत, लहान मुलांकरितां नाहींत.

# शिक्षक आणि शिक्षण.

भाग १५ वा.

## शारीरिक शिक्षण.

आयुष्ययात्रा सुखकर होण्याला शरीरसंपत्ति हें उत्कृष्ट साधन आहे. पुरुष असो अगर स्त्री असो, प्रत्येकास आपल्या आयुष्यांत अनेक कर्तव्यं करावयाचीं असतात व तीं चांगल्या तऱ्हेनें पार पाडण्यास शरीरसंपत्तीचें अत्यंत साहाय्य लागतें. तिजाशिवाय मनुष्याचे हातून कांहींच होणार नाहीं. रोगी किंवा दुबळा मनुष्य स्वतांच्या कुटुंबाकरितां किंवा समाजाकरितां काय करणार? त्याची बरदास्त राखतां राखतां घरच्या माणसांस पुरेसें होतें. दुसरें असें कीं, मनुष्याच्या सुखाकरितां परमेश्वरानें ज्या अनेक गोष्टी निर्माण केल्या आहेत, त्यांचा अनुभव घेण्याला उत्तम शरीरसंपत्ति पाहिजे. जोरानें अगर मंदगतीनें वाहाणाऱ्या नद्या, हिरव्यागार गवतांतून लपंडाव खेळत चाललेले झरे, रमणीय जलप्रपात, सूर्योदयाचे किंवा सूर्यास्ताचे वेळीं शोभणारीं गिरिशिखरें वगैरे सृष्टींतील सुंदर देखावे पाहून मनाला होणारा शुद्ध आनंद अवर्णनीय आहे. पण रोगी माणसाला हें सर्व व्यर्थ आहे. शरीरसंपत्तीशिवाय मनुष्याला मानसिक किंवा शारीरिक श्रम करवत नाहींत, आणि श्रमानंतर मिळणाऱ्या विश्रांतीचें सौख्यही त्याला मिळत नाहीं. शरीरसंपत्तीशिवाय आत्मसंयमन करणें हें देखील फार कठीण आहे. विपुल ऐश्वर्य असूनही जर शरीरसंपत्ति नसेल, तर तें ऐश्वर्य व्यर्थ आहे. शरीरसंपत्तीचें महत्त्व जाणून एका प्राचीन ग्रंथकारानें म्हटलें आहे, " धर्मार्थकाममोक्षाणां मूलमुक्तं कलेवरम् । तच्च सर्वार्थसंसिद्ध्यै भवेद्यदि निरामयम् ॥ " शरीर हें धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारी पुरुषार्थांचें मुख्य साधन आहे. परंतु केव्हां? निरोगी असेल तेव्हां. करितां त्याचें यत्नपूर्वक रक्षण करावें, म्हणजे सर्वार्थसिद्धि होईल.

मुलें प्रौढ झाल्यावर, त्यांना जीं अनेक कर्तव्यें करावयाचीं असतात, तीं करण्याची पात्रता त्यांचे आंगीं आणणें हाच शाळेंतील शिक्षणाचा व गृहशिक्षणाचा हेतु असतो. मनुष्याचे हातून त्याचीं कर्तव्यें चांगल्या रीतीनें पार पडण्यास व त्याचा आयुष्यक्रम सुखकर होण्यास निरोगी व बळकट शरीर, तीक्ष्ण बुद्धि व सुशील या तीन गोष्टी अवश्य आहेत. शिक्षणाचे योगानें या तिन्ही गोष्टी मुलांचे आंगीं आल्या पाहिजेत. बाळपणींच जर मुलांचें शरीर निकोप व निरोगी बनून, त्यांच्या शारीरिक शक्तींचा विकास झाला नाहीं, तर पुढील आयुष्यांतील कर्तव्यें त्यांच्या हातून पार तरी कशीं पडणार? आयुष्यांतील अनेक संकटांशीं झगडण्याचें सामर्थ्य तरी त्यांच्या आंगीं कसें येणार? त्यांना आपलें आयुष्य तरी आनंददायक कसें वाटणार? एवढ्या-करितां शारीरिक शिक्षण हें बौद्धिक शिक्षणाइतकेंच किंवा त्याजपेक्षां जास्त महत्त्वाचें आहे. शारीरिक शिक्षणानें मुलांची शरीरप्रकृति निरोगी राहून त्यांच्या हात, पाय, डोळे वगैरे अवयवांना आपलें काम व्यवस्थित रीतीनें करितां आलें पाहिजे आणि म्हणूनच शारीरिक शिक्षणांत हस्त-व्यवसायाचें विशेष महत्त्व आहे.

मुलांच्या शारीरिक शिक्षणाच्या संबंधानें शिक्षकाला तीन गोष्टींकडे लक्ष द्यावें लागतें. १ शाळेंतील अभ्यासक्रमाचे योगानें व व्यवस्थेनें मुलांचे प्रकृतीवर अपायकारक परिणाम न होईल, याजबद्दल त्याला काळजी घ्यावी लागते. २ मुलांची शरीरप्रकृति सुधारण्याकरितां खेळ, ड्रिल वगैरे उपायांची योजना त्याला करावी लागते. ३ मुलांचे हात, डोळे वगैरे अवयवांना आपलें काम व्यवस्थित रीतीनें व चातुर्यानें करावयाचें सामर्थ्य यावें म्हणून, कागद कापणें, मातीचीं चित्रें करणें, शिवणकाम, वगैरे हस्तव्यवसायाचीं कामें त्यांना शिकवावीं लागतात.

मुलांच्या दृष्टीला त्रास होऊं नये म्हणून शाळेंत उजेड भरपूर असावा; पण तो मुलांचे डोळे दिपतील इतका त्रासदायक नसावा. शाळागृहांतून स्वच्छ हवेचा भरपूर पुरवठा असावा. मुलांचीं बसावयाचीं बाकें त्यांच्या वयाला अनुरूप अशीं असावीं. तीं फार उंच किंवा बुटकीं असूं नयेत. पाठ नसलेलीं बाकें मुलांना बसावयास कधींही देऊं नयेत. मुलांनीं अशा बाकांवर बसण्यापेक्षां भुईवर बसावें हें जास्त चांगलें. वर्गांतील फळा अशा जागीं

ठेवावा कीं, तेथून त्याजवर जें काय लिहिलें असेल, तें मुलांना स्पष्ट दिसेल. शिक्षकानें फळ्यावर लिहितांना, अक्षरें व आंकडे मोठे काढावे म्हणजे मुलांना पाहाण्यास त्रास होणार नाहीं. लहान मुलांना फार वेळ एकाच स्थितींत बसवत नाहीं, म्हणून एक विषय अर्ध्या तासापेक्षां जास्त वेळाचा नसावा. मधून मधून मुलांना विश्रांति मिळावी. वेळापत्रकांत मानसिक श्रमाचे विषय एक सारखे येऊं नयेत, अशाबद्दल शिक्षकानें काळजी घ्यावी. चित्रकला, कवाईत, गाणें, खेळ इत्यादि विषय वेळापत्रकांत मधून मधून घालावे म्हणजे मुलांना कंटाळा येणार नाहीं. लहान मुलांना अभ्यास घरीं करण्याला फारसा देऊं नये. अगदीं लहान मुलांना तर शिक्षकानें घरीं लिहिण्यास किंवा उदाहरणें करण्यास बिलकुल सांगूं नये. मुलें लिहितांना किंवा वाचीत असतांना विशेष वांकत नाहींत, अशाबद्दल शिक्षकानें काळजी घ्यावी.

मुलांच्या शारीरिक शिक्षणाच्या बाबतींत आपल्याकडे उदासीनपणा दिसून येत आहे. अलीकडे या विषयाचें महत्त्व समजून पालकांचें व शिक्षकांचें लक्ष या विषयाकडे लागत आहे. मुलांच्या शारीरिक शिक्षणाच्या बाबतींत दिसून येणारा हा उदासीनपणा मुलींच्यासंबंधानें तर विशेष दिसून येतो. खेडेगांवांत राहाणाऱ्या मुलींना खेळण्यास जागा भरपूर असल्यामुळें, त्यांना अनेक खेळ खेळण्यास सांपडतात. शिवाय नदीवर, शेतांत किंवा गांवाच्या बाहेर असलेल्या देवालयांत, त्या आपल्या वडील माणसांबरोबर नेहमीं जात असल्यामुळें, साहजिकच त्यांना मोकळ्या हवेंत व्यायाम मिळतो; पण शहरांत राहाणाऱ्या मुलींची स्थिति फारच निराळी असते. शहरांतील मुलींच्या प्राथमिक शाळांतून, त्यांना खेळण्याजोगी मोकळी जागा बहुतेक नसते. यामुळें तेथें खेळण्याची किंवा ड्रिल वगैरे व्यायाम मुलींना मिळण्याची गोष्टच नको. शहरांतून वस्ती वाढत असल्यामुळें जागेची फार पंचाईत झालेली आहे. मध्यम स्थितींत असणाऱ्या माणसांना देखील मोकळी जागा असणारें घर मिळणें अशक्य झालें आहे. यामुळें शेंकडा ९० लोकांना संकुचित जागेंत दिवस घालवावे लागतात. घरांत मोकळी जागाच नसल्यावर मुलें खेळ ते काय खेळणार? त्यांतल्या त्यांत मुलगे रस्त्यांतून किंवा शहराचे बाहेरच्या मैदानांत खेळत असतात किंवा हिंडावयास जातात, परंतु बिचाऱ्या मुली कोठें खेळणार?

त्यांना घरची बाप, काका, भाऊ वगैरे वडील मंडळी कधींही बाहेर हिंडावयास नेत नाहींत.

घरीं त्यांना स्वस्थ बसावें लागतें. यत्किंचित् गडबड त्यांनीं केली किंवा जरा जोरानें इकडून तिकडे त्या चालत गेल्या कीं, "काय द्रांडगी पोर आहे ? मुलीच्या जातीनें असें करूं नये." असें तावडतोव घरची मंडळी म्हणतात,व त्यांना रागें भरतात. शाळेंतही हीच स्थिति असते. याचा परिणाम मुलींच्या पुढील आयुष्यावर दिसून येतो. हिंदुसमाजाच्या तरुण मुलींत जी वाढती मृत्युसंख्या आहे, तिचीं अनेक कारणें आहेत. पण ह्यांतील एक कारण, लहानपणीं व्यायामाचा अभाव हें आहे, यांत शंका नाहीं. एवढ्याकरितां आईबापांनीं व शिक्षकांनीं मुलींच्या शारीरिक शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. शहरांत असणाऱ्या मुलींच्या शाळांना, मुलींना खेळ खेळतां येतील अशा जागा ज्या दिवशीं मिळतील, तो सुदिन म्हणावयाचा. आईबापांनीं मुलींना यथास्थित खेळण्याची परवानगी द्यावी. मुलींनीं अभ्यास करणें हें जितकें आवश्यक आहे, तितकेंच किंवा त्याहूनही जास्ती त्यांनीं खेळणें हें आवश्यक आहे. तालुक्यांत असणाऱ्या शाळा मोकळ्या हवेंत असतात, त्या ठिकाणीं शिक्षकिणीला ड्रिल वगैरे व्यायाम मुलींकडून करून घेतां येईल. कित्येक वेळां आईबाप देखील मुलींच्या व्यायामाच्या विरुद्ध असतात. शाळेंत ड्रिल वगैरे व्यायाम जर मुलींना मिळत असेल, तर "आम्ही आपल्या मुली शाळेंत धिंगाणा घालण्यास धाडीत नाहीं," असा शिक्षकिणीला त्यांचा निरोप येतो. परंतु शिक्षकिणीनें, जर आईची समजूत घातली, तर मुलींच्या व्यायामाच्या विरुद्ध असणारा पालकांचा आक्षेप हळूहळू कमी होईल. आपल्याकडे मुलींचे नेहमींचे फुगड्या, झिंमा, छापापाणी, कोंबडा वगैरे जे खेळ आहेत, ते खेळल्यानें भरपूर व्यायाम मिळून मुलींची शरीरप्रकृति सुधारते. तेव्हां शिक्षकानें मुलींना हे खेळ खेळण्यास उत्तेजन द्यावें.

वासरें, हरणांचीं पाडसें,लहान कुत्रीं व मांजरें हीं खेळतांना व आनंदानें बागडतांना आपण पाहातों. तशींच पक्ष्यांचीं पिलेंही किलबिल करीत मौजेनें या झाडावरून त्या झाडावर उडतांना आपल्या दृष्टीस पडतात. दुसऱ्या प्राण्यापासून आपलें रक्षण करणें, आपलें भक्ष्य मिळविणें वगैरे ज्या गोष्टी त्यांना मोठेपणीं करावयाच्या असतात, त्या गोष्टी हे प्राणी लहान-

पणीं खेळांत शिकतात. खेळाची ही स्वाभाविक प्रवृत्ति व आवड अशा रीतीनें या प्राण्यांच्या उपयोगीं पडतात. परमेश्वरानें खेळण्याची ही प्रवृत्ति व आवड लहान मुलांतही त्यांच्या कल्याणाकरितां ठेविलेली आहे. खेळाच्या योगानें मुलांच्या हात, पाय वगैरे अवयवांना चलन मिळून योग्य रीतीनें काम करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत येतें. खेळाच्या योगानें मुलांच्या नेत्रेंद्रियास शिक्षण मिळतें व पदार्थांचे रंग, आकार व त्यांचीं अंतरें यांचें त्यांना अनायासें ज्ञान होतें. मुलांची विचारशक्ति व कल्पनाशक्ति वाढण्याचें खेळ हें उत्कृष्ट साधन आहे. बाहुलीला बाळ समजून तिला न्हाहू घालावयाचें व दूध पाजावयाचें, काठीला घोडा समजून तिच्यावर बसावयाचें, दगडाचीं घरें बांधावयाचीं, बाबा, आई किंवा भाऊ बनून त्यांच्याप्रमाणें भाषण व कृति करावयाची, इत्यादि मुलांच्या कृति पाहिल्यावर, खेळण्याच्या योगानें मुलांची कल्पनाशक्ति कशी जागृत होते व तिला कसा व्यवसाय मिळतो, याची कल्पना होते. सौंदर्याभिरुचि, कृतिप्रेम, सहानुभूति वगैरे भावनांचा परिपोष होण्याचे कामीं खेळाचा किती उपयोग होतो हें मागें सांगितलेंच आहे. सारांश, मुलांच्या शारीरिक, मानसिक व नैतिक शक्तींचा विकास करण्याचे कामीं खेळाचा फार उपयोग होतो. अशा या उत्कृष्ट साधनाचा शिक्षणाचे कामीं शिक्षकानें व पालकानें उपयोग अवश्य करून घेतला पाहिजे.

शिक्षणदृष्ट्या खेळाचें असलेलें महत्त्व न कळल्यामुळें, कित्येक आईबापांना व शिक्षकांना असें वाटतें कीं, मुलांनीं सारा दिवस अभ्यास करावा व थोडा वेळ राहिल्यास मग तो खेळांत घालवावा. किती एक आईबापांस असें वाटतें कीं, आमच्या मुलांनीं यत्किंचित् वेळ जरी खेळांत घालविला तरी तो व्यर्थ गेला. लहान मुलांच्या शिक्षकानें, या सर्व अपायकारक समजुतींस मनांत कधींहि थारा देऊं नये. ज्याप्रमाणें पौष्टिक अन्न, शुद्ध पाणी, स्वच्छ हवा, हीं मुलांच्या वाढीस आवश्यक आहेत, त्याचप्रमाणें मुलांच्या शारीरिक, मानसिक व नैतिक उन्नतीस खेळ हे अवश्य आहेत. खेळ हे तीन प्रकारचे असतात. १ लहान मुलांच्या ज्ञानेंद्रियांस व हात पाय वगैरे अवयवांस वळण लावण्याकरितां शाळेंत चालविलेले बालोद्यानाचे खेळ, २ मनोरंजनाकरितां खेळलेले खेळ, ३ ज्यांचे योगानें व्यायाम मिळून नैतिक शिक्षण मिळतें असे खेळ. आतां आपण पहिल्या प्रकारच्या खेळांचा विचार करूं.

१. लहान मुलांना खेळतांना जो कोणी लक्षपूर्वक पाहील, त्याचे दृष्टीस त्यांचे अंगीं असणारे तीन गुण येतील. ते तीन गुण म्हटले म्हणजे त्यांची कल्पना, अनुकरणप्रियता व चपलता हे होत. त्यांच्या कल्याणाकरितांच परमेश्वरानें हे तीन गुण त्यांचे अंगीं ठेविले आहेत. म्हणून शिक्षकानें या त्यांच्या स्वाभाविक वृत्तीचा फायदा घेऊन आपला शिक्षणक्रम ठरविला पाहिजे. लहान मुलांचा अभ्यासक्रम खेळण्याच्या रूपाचा असावा, म्हणजे त्यांना असें वाटावें कीं, आपण खेळतच आहों; पण ते खेळ शिक्षकानें स्वतः बसविले असल्यामुळें, त्यांचे द्वारें मुलांस बौद्धिक, नैतिक व शारीरिक शिक्षण देतां यावें. बालोद्यान—व्यवसाय हे अशा प्रकारचे खेळ होत. मुलें शाळेंत आल्यावर, जर आपण त्यांच्या स्वाभाविक वृत्तीकडे लक्ष न देतां, मोठ्या विद्यार्थ्यांप्रमाणें फार वेळ एकाच जागीं बसवून अनेक विषय शिकवूं लागलों, तर त्यांना त्यांत कांहीं गोडी वाटत नाहीं व तीं कंटाळून जातात. त्यांची चपलता व कल्पनाशक्ति यांचा परिपोष न होतां त्या जागच्या जागीं दबून जातात, ही गोष्ट फार अनिष्ट आहे. म्हणून लहान मुलांचे शिक्षकानें त्यांचा अभ्यासक्रम खेळाच्याच रूपाचा ठेवावा, म्हणजे त्यांच्या ईश्वरदत्त वृत्तींचा विकास होऊन त्यांचें हित होईल.

मुलांनीं ओरडावें व हातांनीं कांहीं तरी करीत असावें, एका जागेवर न बसतां इकडे तिकडे फिरावें, असा सृष्टीचा नियम आहे; तर मग शिक्षकानें हा नियम लक्षांत ठेवून वागलें पाहिजे. आपल्या लहान विद्यार्थ्यांस जो शिक्षक अगदीं एका जागीं एका स्थितींत बसण्यास लावितो, तो शिक्षक सृष्टिक्रमाचे विरुद्ध आचरण करून, मुलांचें नुकसान करितो. मुलांनीं ओरडावें असा सृष्टिक्रमाचा नियम आहे, तर त्यांना उत्तम रीतीनें शिकविलेलीं गाणीं गाऊं द्यावीं. त्यांनीं नेहमीं हालचाल करावी असा जर सृष्टीचा नियम आहे, तर त्यांना ड्रिल वगैरे खेळांत ती करूं द्यावी. त्यांनीं हातांनीं कांहीं तरी करावें अशी सृष्टीची इच्छा आहे, तर त्यांनीं मण्यांनीं व काड्यांनीं अक्षरें, आकृति वगैरे काढाव्या अगर मातीचीं चित्रें करावीं. सारांश, लहान मुलांचा अभ्यासक्रम त्यांच्या वयाला अनुरूप अशा खेळांच्या रूपाचा असल्यास, मुलांच्या बुद्धीचा, शरिराचा व मनाचा परिपोष होतो, एरवीं तो होत नाहीं.

२. मनोरंजनाकरितां व विश्रांतीकरितां खेळलेले खेळ हे दुसऱ्या प्रकारचे खेळ. प्रत्येक दोन तासांचे शेवटीं मुलांना थोडा वेळ विश्रांति मिळणें अवश्य आहे; व मुलांनीं हा वेळ खेळांत घालवावा, हें फार चांगलें. थोडा वेळ खेळल्यानें मुलांच्या मनास हुषारी वाटते, मेंदूस तरतरी येते व नवीन धडा करण्यास हुरूप येतो. एवढ्याकरितां प्रत्येक वर्गाच्या वेळापत्रकांत या विश्रांतीच्या खेळांकरितां वेळ पाहिजे. शाळेच्या भोंवतीं खेळण्याकरितां उघडी जागा असली म्हणजे, या विश्रांतीचे वेळाचा खरा उपयोग होतो.

३. व्यायामाकरितां व नैतिक शिक्षणाकरितां खेळलेले खेळः— या खेळांचें महत्त्व मागील भागांत वर्णन केलें आहे. मुलांचे आंगीं अनेक चांगले सद्गुण जडण्याचे कामीं त्यांचा फार उपयोग आहे. तेव्हां शाळेंतील इतर अभ्यासक्रमाइतकेंच या खेळांचें महत्त्व आहे.

४. ड्रिल वगैरे शाळेंतील शारीरिक शिक्षणः— नुसत्या खेळाचे योगानें मुलांच्या सर्व शरिराची वाढ योग्य प्रमाणांत होत नाहीं व त्यांच्या सर्व स्नायूंस इष्ट तितका व्यायाम मिळत नाहीं, म्हणून सर्व शाळांतून ड्रिल वगैरे व्यायाम मुलांकडून करवून घेण्याची व्यवस्था केलेली असते. मुलींच्या बाबतींत ड्रिल हा विषय फार महत्त्वाचा आहे. सध्यांच्या स्थितींत शाळेंत ड्रिल वगैरे व्यायामानें त्यांच्या शरिराची योग्य वाढ व्हावी व स्नायु बळकट व्हावे ही गोष्ट फार अवश्य आहे, म्हणूनच या विषयाचा एथें विस्तृतपणें विचार केला आहे.

शाळेंतील व्यायामाचा उद्देश मुलांना तालीमबाज बनवावें व त्यांना अंगबळाचे किंवा कसरतीचे खेळ खेळतां यावे, हा नसतो, तर मुलांच्या सर्व शरिराची सारखी वाढ व्हावी व त्यांचे सर्व स्नायु बळकट व्हावे हा असतो. मुलें शाळेंत आल्यापासून त्यांची वाढ चालू आहे तोंपर्यंत त्यांना शाळेंतील व्यायामाची आवश्यकता आहे. अतिशय लहान मुलें सारखीं हात पाय हालवीत असतात. तोच व्यायाम त्यांना पुरेसा होतो. मुलें चालूं लागलीं कीं, तीं एकसारखीं धावत असतात व या वस्तूस हात लाव त्या वस्तूस हात लाव, असें त्यांचें एकसारखें चाललें असतें, यामुळें त्यांना पुष्कळ व्यायाम मिळतो. परंतु तीं एकदां शाळेंत आलीं कीं, त्यांच्या हालचाली बंद होतात, म्हणून शाळेंत व्यायामाची जरूर आहे.

प्रथमतः थोडा थोडा व्यायाम शाळेंत सुरू करावा, वै लहान मुलांना त्याची गोडी लागावी म्हणून तो खेळाचे रूपाचा असावा. मात्र वेळापत्रकांत त्याचा तास नियमित असावा. पुढें हळूहळू ड्रिलचे प्रकार सुरू करावे. मुलांना व्यायामाची गोडी लावावी, कारण त्यांना गोडी न लागल्यास सर्व व्यायाम फुकट जातो. या व्यायामाचा सुपरिणाम मुलांचे शरिरावर व मनावरही दिसून येतो. त्याच्या योगानें मुलांची शरीरसंपत्ति सुधारते व त्यांचे सर्व स्नायूंस चलन मिळून ते बळकट होतात. मुलें आनंदी व उत्साही बनतात व त्यांचे आंगीं चपलता, मनोनिग्रह व निश्चय हे गुण जडतात.

धांवणें, कवायतींत चालणें, उड्या मारणें, दोरीवरून उड्या मारणें वगैरे ज्या खेळांमध्यें सर्व शरिरास व्यायाम मिळतो, अशा खेळांनीं सर्व शरिराची वाढ फार चांगली होते. मुलांची वाढ होत असतांना, याच खेळांची फार आवश्यकता असते. वेडें वांकडें बसण्यानें व उभें राहाण्यानें किंवा चालण्यानें, शरिराच्या कित्येक अवयवांस जें वाईट वळण लागलेलें असतें, तें ड्रिलच्या कितीएक प्रकारांनीं नाहींसें होऊन, त्या अवयवांना योग्य तें वळण लागतें. उदाहरणार्थ, श्वास घेण्याचे व सोडण्याचे ड्रिलचे प्रकार. कांहीं मुलांना नेहमीं तोंड उघडें ठेवून श्वास घेण्याची संवय असते. या योगानें फुप्फुसें पुरतीं न फुगल्यामुळें पुरेसा ऑक्सिजन शरिरांत येत नाहीं. वर सांगितलेल्या ड्रिलच्या प्रकारांनीं तोंड उघडें ठेवून श्वास घेण्याची खोड जाते व फुप्फुसें इष्ट तितकीं फुगूं लागतात. आंगीं वळविणें, या व्यायामानें छातीची वाढ होते, व मानेचे व पाठीचे स्नायु बळकट होतात. खांद्यासंबंधानें जे ड्रिलचे प्रकार असतात, त्यांनीं पाठीला बांक येण्याचें बंद होतें. टांचा वर उचलण्याच्या प्रकारांनीं पावलांचा तळ सपाट न होतां पाहिजे तसा होतो. अगदीं लहान मुलांचें ड्रिल घेतांना शिक्षकानें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, त्यांना व्यायामाचे प्रकार अगदीं बरोबर रीतीनें करितां येत नाहींत. जसजशीं मुलें मोठीं होत जातात, तसतसा त्यांच्या मनाचा शरिरावर ताबा जास्त वाढत जातो; म्हणजे मनाच्या इच्छेप्रमाणें स्नायूंचें चलन होऊं लागतें. म्हणून अगदीं लहान मुलांनीं ड्रिलचा एकादा प्रकार बरोबर रीतीनें न केल्यास त्यांजवर रागावूं नये. ड्रिल वगैरे व्यायाम मुलांकडून करून घेतांना शिक्षकानें खालील गोष्टी लक्षांत ठेवाव्या.

१. व्यायामाचे जागीं खेळती व शुद्ध हवा भरपूर असावी. २. व्यायामाचा एकेक पाठ २० मिनिटांपेक्षां जास्त असूं नये. ३. आठवड्यांत ३।४ तरी व्यायामाचे पाठ असावे. ४ अर्ध्यातासाचे दोन पाठ देण्यापेक्षां २० मिनिटांचे तीन पाठ दिलेले बरे. ५ ज्या ड्रिलच्या प्रकाराला किंवा व्यायामाला मनाची एकाग्रता लागते, ते व्यायाम मुलांच्या मेंदूला श्रम झाल्यानंतर त्यांच्याकडून करून घेऊं नयेत. या शिवाय ड्रिलचे कांहीं प्रकार करण्यास फार सोपे असतात व त्यांना मनाची एकाग्रताही लागत नाहीं. जेव्हां एकाच जागीं बसून व अभ्यास करून मुलें दमतात, तेव्हां त्यांच्याकडून जर शिक्षकानें ड्रिलचे हे सोपे प्रकार ३।४ मिनिटें करून घेतले, तर मुलांना बरें वाटतें व त्यांच्या मेंदूला विसांवा मिळतो.

ड्रिल शिकविण्याची रीतः—पाठ शक्य तितका मनोरंजक करावा. शिक्षकांत त्रासिकपणा व अनिश्चितपणा बिलकूल नसावा. मुलांना जे सहज रीतीनें, चपलतेनें व अवसानांत करितां येतील, असले व्यायामाचे प्रकार प्रथम घ्यावे. नंतर क्रमाक्रमानें जास्त श्रमाचे व कठीण प्रकार घ्यावे. कठीण असा ड्रिलचा प्रकार मुलांनीं केल्यानंतर, त्यांना धांवणें, उडी मारणें किंवा चालणें हा प्रकार सांगावा, म्हणजे त्यांचे मनाला हुषारी वाटते व आलेला कंटाळा जातो. ड्रिलचा कठीण प्रकार मुलांना थकवा येईपर्यंत त्यांच्याकडून कधींहि करून घेऊं नये, किंवा मुलांना थकवा येईल अशा एकाच स्थितींत त्यांना फार वेळ उभें करूं नये. शिक्षकाने व्यायामाचा प्रकार घरीं करून नंतर तो मुलांस शिकवावा.

हुकूमः—हुकुमाचे दोन भाग असतात. पहिल्या भागांत वर्णन असतें व दुसऱ्यांत हुकुमाचा शब्द असतो. जसेंः—

| वर्णन. | हुकुमाचा शब्द. |
|---|---|
| मान मागें... ... ... .. | वळवा. |
| हात वर .. .. ... — | ताठ करा. |

वर्णनाचा पहिला भाग शिक्षकानें सावकाश व स्पष्ट सांगावा. हुकुमाचा पुढचा शब्द हळू किंवा झटकन बोलणें, हें त्या प्रकारावर अवलंबून आहे ड्रिलचा प्रकार जर चपळपणानें करण्याचा असेल, तर हुकुमाचा शब्द झटकन पण स्पष्ट यावा. सावकाश करण्याचा तो प्रकार असल्यास हुकुमाचाही शब्द सावकाश बोलावा. वर्णन सांगून शिक्षकानें जरा थांबावें म्हणजे पुढें जी क्रिया करावयाची असते, तिची मुलें तयारी करितात.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग १५ वा.

## शिक्षकाच्या आंगचे गुण.

लहान मुलांचे शिक्षकाचे आंगीं अनेक गुण लागतात. या सर्व गुणांत आत्मसंयमन हा गुण महत्त्वाचा होय. या गुणाखेरीज शिक्षकाचें एक क्षणभर देखील चालणार नाहीं. शिक्षकाच्या मनाची शांति नाहींशी होण्याचे प्रसंग दिवसांतून अनेक वेळां येतात. लहान मुलांची वृत्ति स्वभावतःच फार चंचल असते. ती त्यांना घटकाभर देखील स्वस्थ बसूं देत नाहीं. शिक्षकाची इच्छा नेहमीं अशी असते कीं, आपण जें कांहीं शिकवीत आहों तिकडे मुलांनीं लक्ष द्यावें; पण धडा जर मनोरंजक नसेल किंवा तो जर फार लांबलचक झाला असेल, तर सहजच त्यांचें चित्त धड्यावरून उडून जातें व तीं इतर कांहीं तरी व्यवसाय करूं लागतात. अशा वेळीं शिक्षकाच्या मनाची शांति नाहींशी होऊन, त्याला राग येण्याचा संभव असतो. मुलांना एकाद्या गोष्टीकडे सारखें लक्ष देतां येत नाहीं, यांत त्यांचा कांहीं दोष नाहीं, हें लक्षांत आणून शिक्षकानें आत्मसंयमन केलें पाहिजे व आपल्या मनाची शांति कायम ठेविली पाहिजे. अशाच तऱ्हेच्या अनेक प्रसंगीं शिक्षकाला आत्मसंयमन करावें लागतें. रागाच्या तडाक्यांत त्यानें मुलांना शिक्षा केली किंवा त्यांना तो रागें भरला, तर त्या कोमल मनाच्या मुलांना फार वाईट वाटतें. आपला अन्याय नसतांना शिक्षकानें आपणांस शिक्षा केली, ही गोष्ट त्यांना चांगली कळते, आणि जरी तीं शिक्षकानें केलेली शिक्षा निमूटपणें सोसतात, तरी त्यांचें शिक्षकावरील प्रेम नाहींसें होतें. शिक्षक आणि शिष्य यांत प्रेमसंबंध नसेल, तर अभ्यासक्रम सुरळीत कसा चालावा? दुसरी गोष्ट अशी आहे कीं, मुलांना सुशील बनविणें हा शिक्षणाचा प्रधान हेतु आहे. शिक्षकाच्या सहवासांत मुलांचा बराच काळ जातो. यामुळें साहाजिकच शिक्षकाच्या स्वभावाचा मुलांचे स्वभावावर फार परिणाम होतो. मनुष्य सद्वर्तनी

व सुशील होण्याला आत्मसंयमनाचा गुण अतिशय अवश्य आहे. शिक्षकाचे आंगीं आत्मसंयमन नसेल, तर मुलांचे आंगीं तें कधींही येणारनाहीं. मुलांनीं अपराध केला, तर शिक्षकानें त्यांना शिक्षा करणें जरूर आहे. पण अशा वेळींही आत्मसंयमन करून योग्य ती शिक्षा फार शांतपणानें करणें हें अवश्य असतें. रागाच्या भरांत केलेली शिक्षा अन्यायाची किंवा अपराधाच्या मानानें जास्त होण्याचा संभव असतो, व अशा शिक्षेपासून मुलांवर हितकारक परिणाम कधींही होत नाहीं.

शिक्षकाचे आंगीं दुसरा आवश्यक गुण म्हटला म्हणजे आपल्या कामावरील आसक्ति किंवा आवड हा होय. ज्या मनुष्याला शिकविण्याची आवड आहे, तो मनुष्य आपलें काम अधिक चांगलें करील, यांत शंका नाहीं. कित्येक शिक्षकांना आपळा हा व्यवसाय फार कमी दर्जाचा वाटतो, व ते निरंतर असंतुष्ट राहातात. अशा मनुष्यांचे हातून आपल्या कर्तव्याची हेळसांड होते. एकदां कोणताही व्यवसाय पतकरला म्हणजे तो मनःपूर्वक करणें हेंच योग्य आहे. शिवाय शिक्षण हें फार पवित्र कार्य आहे व शिक्षकाचा धंदा फार उच्च दर्जाचा आहे, हें कोणीही सुज्ञ मनुष्य कबूल करील. इंग्लंडमधील प्रसिद्ध विद्वान् प्रोफेसर टिंडाल यांनीं म्हटलें आहे "आपल्या देशांतील चालत असलेल्या सर्व व्यवसायांत श्रेष्ठ व्यवसाय कोणता, हें जर मला कोणीं विचारलें, तर मी सांगेन कीं, शिक्षकाचा व्यवसाय हा सर्वांत श्रेष्ठ व्यवसाय आहे. हा व्यवसाय करणाऱ्या लोकांविषयीं सर्वांनीं पूज्यबुद्धि बाळगावी व त्यांच्याशीं थोर मनानें वागावें." शिक्षक जेव्हां आपलें काम प्रेमानें व मनःपूर्वक करितो, तेव्हांच मुलांना शिक्षणांत गोडी वाटते व तीं आपला अभ्यास मनापासून करितात. मुलांच्या कल्याणार्थ शिक्षकानें आपल्या कामाची आवड बाळगली पाहिजे.

शिक्षकांत अवश्य लागणारा तिसरा गुण म्हटला म्हणजे मुलांची आवड हा होय. ज्या मनुष्याला लहान मुलांबद्दल प्रेम वाटत नाहीं, त्यानें या धंद्यांत पडूं नये. कारण अशा मनुष्याला हा धंदा फार कंटाळवाणा वाटेल व त्याचे हातून आपलें काम कधींही नीट होणार नाहीं. शिक्षकाची वृत्ति निरंतर प्रेमळ पाहिजे. "लहान मुलें हीं आपल्या देशाची भावी पिढी आहे. अनेक कुटुंबांचें, आपल्या समाजाचें व आपल्या देशाचें सुखदुःख त्यांजवर अवलंबून आहे. आईबाप आपलीं आवडतीं मुलें शिक्षकानें ओंड-

पावीं म्हणून शाळेंत धाडीत नाहींत." या सर्व गोष्टी लक्षांत ठेवून शिक्षकानें मुलांशीं प्रेमानें वागावें. प्रेमळ शिक्षकाचे हाताखालीं मुलें मोठ्या आवडीनें शिकतात व अशाच शिक्षकाच्या वर्गांतील शिस्त फार नामी असते. प्रेमळ शिक्षक जें कांहीं सांगतो तें मुलें लक्षपूर्वक ऐकतात, यामुळें त्या शिक्षकाला मुलांना चांगल्या संवयी लावितां येतात. अशा शिक्षकाचे हाताखालीं मुलांना शिकण्याला आनंद वाटतो; व तो शिकवीत असतां मुलांची व त्याची एकचित्तता होते, यामुळें त्यांना धडे सहज कळतात.

शिक्षकाला अवश्य लागणारा चौथा गुण म्हटला म्हणजे आनंदी वृत्ति हा होय. मुलांची वृत्ति नेहमीं आनंदी असते. जगांतील अनेक चिंतांचा किंवा दुःखांचा त्यांना अनुभव नसतो. फुलें, पानें, सूर्य, चंद्र, तारे, जनावरें, पांखरें वगैरे सर्व सृष्टि त्यांना आनंदमय दिसत असते. लहान मुलांच्या सहवासांत काळ घालविणाऱ्या शिक्षकाला देखील आपली वृत्ति आनंदी ठेविली पाहिजे. आपलीं सर्व दुःखें व काळजी त्यानें शाळेंत शिरल्याबरोबर विसरली पाहिजे. दुर्मुखलेल्या, तामसी, चिडखोर व त्रासिक अशा माणसाच्या सहवासांत प्रौढ माणसाला देखील राहवणार नाहीं. मग लहान मुलांची गोष्ट कशाला पाहिजे? शिक्षकाचा स्वभाव जर तामसी असेल किंवा जर तो सदा खिन्न किंवा तिरसट असेल, तर मुलांच्या आनंदावर विरजण पडतें. तींही खिन्न किंवा चिरडखोर बनतात. शाळेंतील अभ्यासक्रमांत त्यांना गोडी वाटत नाहीं व तीं शाळेंत जाण्याचा कंटाळा करितात. आनंदी व प्रेमळ स्वभावाच्या शिक्षकाच्या सहवासांत मुलांना सौख्य वाटतें व शिक्षकालाही मुलांचा आनंद पाहून सुख वाटतें.

शिक्षकांतील पांचवा व अत्यंत महत्त्वाचा गुण म्हटला म्हणजे सद्वर्तन हा होय. ज्या माणसांना दुसऱ्याचे स्वभावाला वळण लावावयाचें असतें, त्याचें स्वतःचें वर्तन अत्यंत शुद्ध पाहिजे हें उघडच आहे. ज्या मनुष्याचें स्वतःचें वर्तन शुद्ध नाहीं, तो दुसऱ्याच्या वर्तनाला वळण तें काय लावणार? घरांतील वडील माणसांच्या व शिक्षकाच्या आचरणाचा परिणाम मुलांच्या स्वभावावर होतो. मुलांचें लक्ष वडील माणसांच्या शब्दांपेक्षां त्यांच्या कृतीवर फार असतें. तीं अत्यंत अनुकरणप्रिय असतात. वडील माणसें जशीं वागतात, तसें वागण्याची लहान मुलांची साहजिकच प्रवृत्ति असते. मनुष्यस्वभावाची पारख मुलांना चांगली असते. शिक्षकाचे अंगीं जर कांहीं दुर्गुण असेल,

तर तो मुलांचे लक्षांत तेव्हांच येतो. सदाचरणी शिक्षकाबद्दल मुलांच्या मनांत पूज्यबुद्धि राहाते आणि मुलें त्याच्याप्रमाणें वागण्याचा यत्न कारितात. एवढ्याकरितां शिक्षकाची वागणूक शुद्ध व सरळ असावी. विद्यार्थ्यांना आपण जसें वागण्यास सांगतों, त्याप्रमाणें त्यानें वागण्यास जपावें. आपली उक्ति व कृति यांत जर शिक्षकानें मेळ ठेविला नाहीं, तर त्याच्या उपदेशाचा व शिक्षणाचा कांहींच परिणाम होत नाहीं व अशा वागणुकीनें मुलें ढोंगी बनण्याचा संभव असतो. सदाचरणी शिक्षकाबद्दल मुलांच्या पालकांना सहानुभूति वाटते व ते त्याला मदत करण्यास नेहमीं तयार असतात. अशा रीतीनें शिक्षक व पालक यांच्यांत सहानुभूति असेल, तर गृहशिक्षणाला शाळेंतील शिक्षणाची जोड मिळून मुलांना सुशील बनविण्याचें काम सोपें होतें.

प्रसंगावधान हा शिक्षकास लागणारा सहावा गुण होय. लहान मुलांशीं वागतांना निरनिराळ्या प्रसंगीं ताबडतोब विचार करून कसें वागावयाचें, हें शिक्षकाला ठरवितां आलें पाहिजे. निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या स्वभावांच्या मुलांशीं एकाच प्रकारें वागून भागावयाचें नाहीं. हा गुण वर्ग व्यवस्थित रीतीनें चालविण्याचे कामीं व वर्गाची शिस्त राखण्याचे कामीं फार उपयोगीं पडतो. शिक्षकाचे आंगीं प्रसंगावधान नसलें म्हणजे त्याला व त्याच्या मुलांना फार त्रास पडतो.

याशिवाय शिक्षकाचे आंगीं व्यवहारचातुर्य, दक्षता, दृढनिश्चय, मनुष्यस्वभावाची पारख वगैरे गुण लागतात. याबद्दलचें विवेचन पुढें 'शिस्त' या भागांत केलें आहे.

शिक्षकानें आपल्या वाचनाचा व्यासंग नेहमीं चालू ठेविला पाहिजे. ट्रेनिंग कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाचें सर्टीफिकेट मिळालें कीं, आपल्या आंगीं सर्वज्ञता आली, असें समजून वाचन बंद ठेवणें हें अनिष्ट आहे. जें कांहीं शिकवावयाचें आहे त्याच्याच संबंधानें वाचावयाचें, पण त्याच्याशिवाय दुसरें कांहीं वाचावयाचें नाहीं, असें करूं नये. अनेक प्रकारचे ग्रंथ वाचल्याचे योगानें जो बहुश्रुतपणा येतो, त्याचा परिणाम शिक्षणावर दिसून येतो. या वाचनाचे योगानें शिकवावयाचा विषय मनोरंजक करितां येतो. शिक्षकानें आपला आवडता विषय घेऊन त्याचा विशेष व्यासंग चालू

ठेवावा. वाचनानें मनाला समाधान वाटतें व बहुश्रुतपणा येतो. शिवाय दररोज तेच ते विषय शिकवून मनाला जो कंटाळा येतो, तो वाचनानें नाहींसा होतो.

शिक्षकाचा पोषाक साधा व स्वच्छ असावा व त्यांत ‘ फ्याशन’चें प्राबल्य नसावें. प्राथमिक शाळांतून काम करणाऱ्या शिक्षकांना खेडेगांवांत दिवस घालावयाचे असतात. तेव्हां त्यांच्या पोषाकांत व वागणुकींत ‘फ्याशन’चें प्राबल्य मुळींच नसावें. विशेषतः स्त्रीशिक्षकानें ही गोष्ट चांगली लक्षांत ठेविली पाहिजे. शिक्षकाची शाळेंतील वागणूक व्यवस्थित असावी. वर्गांत शिकवितांना आळसत आळसत टेबलावर पाय ठेवून किंवा खुर्ची भिंतीला टेकवून, किंवा टेबलावर आडवें पडून त्यानें कधींही शिकवूं नये. तसें केल्यानें मुलांचा शिकण्याचा उत्साह कमी होतो व तीं आळशी बनतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे शिक्षकाला कोणतीही खोड असूं नये. कित्येक माणसांना कांहीं विशेष कृति करण्याची किंवा कांहीं विशेष शब्द बोलण्याची संवय जडते. ती संवय त्या मनुष्यांचे लक्षांत येत नाहीं किंवा आली तरी ती त्यांच्यानें दूर करवत नाहीं. अशा तऱ्हेची संवय जर शिक्षकाचे अंगीं असेल, तर ती शिक्षकानें अवश्य काढून टाकावी, नाहीं तर ती खोड मुलांच्या थट्टेचा एक विषय होऊन बसतो.

शिक्षकाचा आवाज फार मोठा असूं नये. शांत चित्तानें लक्ष दिल्यास तो सर्वांस ऐकूं येईल इतका मोठा तो असावा. कित्येक शिक्षकांना फार मोठ्या आवाजांत शिकविण्याची खोड असते, ती फार वाईट आहे. ज्या शिक्षकाचा आवाज फार मोठा आहे, त्याच्या शिकविण्याकडे मुलें लक्ष पुरवीत नाहींत. विनाकारण शिक्षकाचा घसा मात्र दुखतो. तरुणपणीं अशा तऱ्हेनें ओरडून फुप्फुसांना विनाकारण जास्त त्रास दिल्यामुळें, प्रौढपणीं फुप्फुसांचे विकार शिक्षकांना जडण्याचा संभव असतो. शिवाय आवाज हें वर्गांत शिस्त राखण्याचें साधन आहे. या साधनाचा उपयोग होईल तितका जपून करावा.

लहान मुलांच्या शिक्षकाला उत्तम रीतीनें गोष्टी सांगतां आल्या पाहिजेत. त्या जर त्याला सांगतां न येतील, तर मुलांना आनंद देण्याचें एक मोठें साधनच त्याच्याजवळ नाहीं असें होईल. शिक्षकाला वर्णन करण्याची

हातोटी असेल, त्याची भाषा साधी व गोड असेल व मनुष्यस्वभावाचें चित्र जर त्याला चांगलें रेखाटतां येत असेल, तर त्याच्या गोष्टींत मुलें तल्लीन होऊन जातात व गोष्टींतील पात्रांच्या मनोविकारांप्रमाणें त्यांच्या चेहऱ्यावर मनोविकार दिसून येतात. गोष्टींचा तास केव्हां येतो, याची मुलें वाट पाहात असतात. मुलांचें प्रेम संपादन करण्यास गोष्टी चांगल्या सांगतां येणें, हें एक मोठें साधन आहे.

शिक्षकाचा स्वभाव एकलकोंडचा नसावा. ज्या समाजांत तो राहात आहे त्या समाजाशीं, विशेषतः मुलांच्या पालकांशीं, त्यानें मिळून मिसळून वागलें पाहिजे. पालकांची सहानुभूति जर शिक्षकाला असेल, तर शाळेंतील शिस्तीला ही गोष्ट उपयोगीं पडते. शिक्षक आणि पालक यांची ओळख नसेल, तर पुष्कळ वेळां शिस्तीचें उल्लंघन करूनही कांहीं तरी थाप मारून मुलांना शिक्षकाला फसवितां येतें. पालकांची व शिक्षकाची ओळख असली, म्हणजे मुलांना अशा तऱ्हेनें कांहीं तरी थाप मारून आपला अपराध जिरविण्याची संधीच मिळत नाहीं. शिवाय पालकाला शिक्षकाची माहिती असल्यामुळें, तो शिक्षकाला मूल सुधारण्याचे कामीं साहाय्य करण्यास तयार असतो. स्त्रीशिक्षकांनीं मुलींच्या आयांची सहानुभूति संपादन केली पाहिजे. ‘ आपण विद्वान् आहोंत, खेड्यांतील स्त्रिया अशिक्षित आहेत, त्यांना कांहीं कळत नाहीं,’ अशी भ्रामक समजूत त्यांनीं कधींही करून घेऊं नये. शिक्षकानें गांवांतील दुफळींत कधींही पडूं नये.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग १६ वा.

## वर्गाची जागा आणि सामान.

एकाद्या गांवीं शाळेकरितां नवीन इमारत बांधणें किंवा गांवांत असलेल्या इमारतींपैकीं शाळेकरितां एकादी पसंत करणें, ही गोष्ट त्या ठिकाणचें लोकलबोर्ड किंवा म्युनिसिपालिटी याजवर अवलंबून असते. या बाबतींत शिक्षकाचा कांहीं संबंध नसतो; म्हणून, " शाळागृहाची रचना कशी असावी, त्यांत मुलांकरितां कोणकोणत्या सोयी कराव्या " वगैरे प्रश्नांचा एथें विचार करण्याची आवश्यकता नाहीं. शाळागृह विस्तृत असून त्यांत भरपूर प्रकाश यावा; त्यांत मुबलक व स्वच्छ हवा खेळावी; इमारतीचे पुढें मुलांना खेळण्याकरितां, मधून मधून उघड्या जागेंत वर्ग घेण्याकरितां व लहानसा बाग करण्याकरितां मोकळी जागा असावी; या जागेंत मुलांना पाणी पिण्याची सोय असावी; या गोष्टी इष्ट व आवश्यक आहेत. शाळेकरितां स्वतंत्र इमारत असल्याशिवाय या सर्व सोयी होणें शक्य नाहीं. खेडेगांवांत किंवा दाट वस्तीच्या शहरांत शाळेला योग्य अशी इमारत भाड्यानें मिळणें शक्य नसतें. तेव्हां साधारणपणें त्यांतल्या त्यांत चांगली अशी इमारत पाहून म्युनिसिपालिटी किंवा लोकलबोर्ड तींत शाळा भरवितात. आपल्या ताब्यांत शाळेकरितां आलेली इमारत व तिच्या भोंवतालची जागा स्वच्छ राखणें व असलेल्या इमारतींत व जागेंतच शक्य त्या सोयी करून घेणें, एवढेंच शिक्षकाच्या स्वाधीन असतें.

वर्गाची जागा स्वच्छ, सुशोभित व व्यवस्थित असेल, तरच तेथें काम करण्यास शिक्षक व मुलें यांना उत्साह वाटतो. जमिनीवर व भिंतीवर धूळ बसली आहे, कडीपाटाला कोळीष्टकें लागलीं आहेत, अशा जागीं बसण्यानें देखील जिवावर येतें; मग तेथें उत्साहानें काम करण्याची गोष्टच बोला-

वयास नको. वर्गांतील जागेंत किंवा सामानावर यत्किंचितही धूळ बसूं न देण्याची खबरदारी शिक्षकानें घेतली पाहिजे. वर्गाची जागा स्वच्छ ठेवणें, ही गोष्ट शिक्षकाच्या व मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीनें इष्ट व आवश्यक आहेच, शिवाय या योगानें मुलांना स्वच्छतेनें राहाण्याची संवय जडते. वर्गाची जागा सुशोभित ठेवण्याला विशेषसा खर्च किंवा परिश्रम लागतात असें नाहीं. थोड्याशा खर्चानें व परिश्रमानें ही गोष्ट साध्य होण्याजोगी आहे. वर्षाचीं क्यालेंडरें, शिक्षकानें व मुलांनीं काढलेलीं चित्रें, नकाशे व आकृति हीं भिंतीला जर चिकटविलीं, तर वर्गाला शोभा येते. त्याचप्रमाणें इतिहास, भूगोल, सृष्टिज्ञान वगैरे विषयांसंबंधानें काढिलेलीं चित्रें भिंतीला लावावीं. शाळेंत आपण भाषाविषय, इतिहास किंवा भूगोल शिकवितांना, ज्या पुरुषांचा किंवा स्थलांचा संबंध येतो, त्यांपैकीं कांहीं पुरुषांचीं व स्थलांचीं चित्रें वर्तमानपत्रांतून किंवा मासिक पुस्तकांतून येतात. हीं चित्रें कापून जर शाळागृहाच्या भिंतीला लाविलीं, तर त्यांचा दुहेरी उपयोग होण्यासारखा आहे. शिक्षकानें व मुलांनीं तयार केलेलीं मॉडेल्स, हस्त-व्यवसायाच्या वेळीं केलेलीं कामें, सृष्टिनिरीक्षणाकरितां जमविलेली सामुग्री वगैरे वस्तु व्यवस्थितपणें वर्गांत मांडून ठेवाव्या. सारांश, शिक्षकानें वर्गाची जागा अशी सुशोभित व स्वच्छ ठेवावी कीं, तिच्यांत काम करण्यास आनंद वाटावा.

वर्गाच्या जागेविषयीं लिहितांना, तेथील हवा व उजेड यांसंबंधानें विचार करणें अवश्य आहे. या बाबतींसंबंधानें मागील भागांत कित्येक वेळां उल्लेख केला आहे. उजेड व हवा यांसंबंधानें या इलाख्यांतील शिक्षण-खात्यानें केलेल्या सूचना फार महत्त्वाच्या आहेत. त्या प्रत्येक शिक्षकानें अवश्य वाचाव्या. त्यांतून खालील उतारा घेतला आहे:—

" हवेच्या पुरवठ्यासंबंधानें, आरोग्यरक्षणाच्या कामावर जे अधि-कारी नेमले आहेत, त्यांचें असें म्हणणें आहे कीं, प्रत्येक विद्यार्थ्यास २०० किंवा याहूनही जास्त घनफूट हवा पाहिजेच पाहिजे. परंतु या देशांत घराचे दरवाजे व खिडक्या नेहमीं उघड्याच ठेवण्याची चाल पडून गेली आहे. म्हणून नुसत्या जमिनीच्या क्षेत्रफळावर नजर देऊन भागण्यासारखें आहे. खोल्या १० किंवा १२ फूट उंचीच्या आहेत असें आपण धरून चाललों, तर कमींत कमी १० चौरस फूट जागा प्राथमिक शाळेंत जाणाऱ्या

प्रत्येक विद्यार्थ्याच्या वांट्यास आलीच पाहिजे. खराब झालेली हवा बदलण्यासंबंधानें मुख्य गोष्ट साधिली पाहिजे ती ही कीं, हवा तर खेळती राहावी, पण वारा तर सों सों करीत आंत येऊं नये. तसेंच वारा खोलींत खेळावा, पण तो प्रत्यक्ष मुलांच्या आंगाला लागूं नये."

* * *

"शाळेचा प्रत्येक वर्ग बसण्याच्या खोलीचे सगळे दरवाजे व खिडक्या उघडून टाकाव्या व ताज्या हवेची आंत रेलचेल करून घ्यावी, ही गोष्ट एथें सांगितली पाहिजे असें नाहीं. शाळेच्या मुख्य शिक्षकानें वर्गांत जास्त मुलं न होतील अशी तजवीज ठेविली पाहिजे. अनेक जणांच्या श्वासानें दूषित झालेल्या हवेंत बसल्यानें आंगांत सुस्ती येते, डोकें जड होतें व कांहीं सुचेनासें होतें. अशा हवेंत काम केल्यानें शिक्षकाचें व मुलांचें आरोग्य बिघडतें. शाळा सुरू असतांना मधून मधून सुटी देऊन मुलांना मोकळ्या हवेंत बाहेर धाडणें हेंही इष्टच आहे."

वर्गांत प्रकाश कसा असावा यासंबंधानें खालीं दिलेला उतारा त्याच सूचनांतून घेतला आहे.

" उजेडाचा उपयोग कसा करावा ह्यासंबंधानें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे ही. जेणेंकरून मुलांच्या दृष्टीस ताण बसेल किंवा त्यांच्या डोळ्यांस त्रास होईल, अशा प्रकारचा उजेड सर्वथा वर्ज्य करावा. दृष्टि त्रासते ती एक अतिशय सहन होत नाहीं इतका उजेड असेल तर, किंवा उजेड पाहिजे त्यापेक्षां कमी असेल तर. कमी उजेडांत किंवा सावलींत काम करणें आणि भगभगीत उजेडांत काम करणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच अपायकारक आहेत. मुलें बसण्याच्या जागेची व्यवस्था अशी केलेली असावी कीं, वर्गांतील बहुतेक मुलांस किंबहुना एकूणएक मुलांस उजेडांत काम करतां यावें. आतां ज्या उजेडांत काम करावयाचें तो उजेड त्यांच्या डाव्या बाजूकडून येईल व साधेल तितका वरून येईल, अशीहि त्यांतल्यात्यांत आणखी तजवीज होईल असें करावें. ह्याच्या खालोखाल चांगला उजेड म्हटला म्हणजे उजव्या बाजूकडून येणारा होय. पाठीकडून येणारा उजेड वाईट. कारण अशा उजेडांत मुलें जें काम करीत असतात त्यावर त्यांच्याच आंगाचा अंधार पडतो. सर्वांत अपायकारक उजेड

म्हटला म्हणजे समोरून येणारा, व मुलांच्या तोंडावर पडणारा उजेड हा होय. ह्या उजेडाचे परिणाम फारच वाईट आहेत, व हा वर्ज्य करण्याविषयीं नेहमीं खबरदारी ठेवावी.

नुसती सफेती दिलेल्या भिंतींपेक्षां रंग दिलेल्या भिंती चांगल्या. कारण सफेती दिलेल्या भिंतींच्या योगानें उजेड भणभणीत पडून त्रास होण्याचा बराच संभव असतो. फ्रेंच, करडा, फिका दगडी किंवा फिकानिळा हे रंग इकडच्या प्रांतांतून सहज मिळण्यासारखे आहेत व नुसत्या पांढऱ्या रंगापासून खोलींत उजेड फांकण्यास जी मदत होते, तिजपेक्षां वर सांगितलेल्या रंगांपासून जास्त मदत होते. ”

आपल्या इकडच्या प्राथमिक शाळांतून डेस्कचा आपण उपयोग करीत नाहीं. मुलें बहुतकरून भुईवरच आपलें बसकर पसरून त्याजवर बसतात. कित्येक शाळांतून मुलांना बसण्याकरितां पाठ नसलेलीं बाकें वापरतात. अशा बाकांवर बसल्यामुळें मुलांच्या पाठीला बांक येतो व त्यांना पाटी किंवा वही मांडीवर ठेवून वांकून लिहावें लागतें. यामुळें लिहितांना त्यांना फार त्रास होतो. मुलांच्या उंचीला योग्य अशीं बाकें नसल्यामुळें, मुलांचे पाय या बाकांवर बसल्यानें फार ताटकळतात. अशा बाकांवर कांहीं दिवस बसल्यानें मुलांची दृष्टि बिघडते, व फुप्फुसें व रक्ताशय यांच्यावर दाब पडल्यामुळें श्वासोच्छ्वासाचें व रुधिराभिसरणाचें कार्य नीट होत नाहीं. म्हणून अशा बाकांवर बसण्यापेक्षां मुलांनीं भुईवर बसावें हेंच जास्त चांगलें. मुलांनीं बसण्यास बसकरें वापरावीं. तीं लहान व स्वच्छ असावीं. मुलें आपलीं बसकरें स्वच्छ ठेवतात कीं नाहीं याजवर शिक्षकांनीं नजर ठेवावी.

वर्गातील सामानांत अत्यंत महत्त्वाची वस्तु म्हटली म्हणजे फळा ही होय. ज्या शिक्षकाला फळ्याचा उपयोग करितां येत नाहीं किंवा ज्याला फळ्याचा उपयोग करण्याची लाज वाटते किंवा आळस येतो, तो खरा शिक्षकच नव्हे. फळ्यावर लिहिलेलें मुलांना जेथून सहज दिसेल अशा ठिकाणीं तो ठेवावा. कोरड्या फडक्यानें फळा स्वच्छ करण्यापेक्षां तो ओल्या फडक्यानें स्वच्छ करणें, हें अधिक चांगलें. ओल्या फडक्यानें फळा जास्त स्वच्छ निघतो व शिवाय त्यांतील धूळ खोलींत पसरून मुलांच्या नाकातोंडांत शिरत नाहीं.

प्रत्येक वर्गांत वेळापत्रक हें अवश्य असलेंच पाहिजे. सर्वांना तें जेथून दिसेल तेथें तें लावावें. वर्गांतील मुलांचा अभ्यासक्रम व्यवस्थित रीतीनें चालणें, ही गोष्ट पुष्कळ अंशीं त्या वर्गाचे वेळापत्रकावर अवलंबून असते. वर्गांतील वेळापत्रकाप्रमाणें शिक्षकानें आपल्या वर्गाचा अभ्यास घेतला पाहिजे. वेळापत्रकाप्रमाणें वर्गाचा अभ्यास न चालल्यास मुलांचा घोंटाळा होतो, व त्यांचे आंगीं नियमितपणाच्या संवयी लागत नाहींत. एवढ्याकरितां शिक्षकानें आपल्या वर्गाचें वेळापत्रक फार काळजीपूर्वक तयार करावें व त्याजप्रमाणें अभ्यास घ्यावा. शिक्षकानें आपलें वेळापत्रक जर व्यवस्थित रीतीनें केलें नसेल, तर त्याच्या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीलाही अपाय होण्याचा संभव असतो.

वर्गाच्या अभ्यासक्रमांत जे जे विषय येतात, त्या सर्वांना त्यांच्या महत्त्वाप्रमाणें वेळापत्रकांत वेळ मिळाला पाहिजे. वर्गांतील मुलें जितकीं लहान असतील, तितके त्यांचे धडे कमी वेळाचे असावे. शिशुवर्ग व पहिली इयत्ता यांतील प्रत्येक धडा अर्ध्यातासापेक्षां जास्त वेळाचा कधींही असूं नये. लहान मुलांचें लक्ष एकाच विषयाकडे फार वेळ लागत नाहीं, म्हणून त्यांच्या वर्गांत एक एक तासाचा धडा घेणें बरें नव्हे. एकाच विषयाला आठवड्यांत जे तास दिले असतील, ते नियमित वेळानें यावे. उदाहरणार्थ, एकाद्या वर्गांत भूगोल आठवड्यांतून दोन वेळां असेल, तर तो लागोपाठ दोन दिवशीं न येतां, दोन दिवसांचे अंतरानें यावा. सोमवारीं व मंगळवारीं भूगोल, नंतर सर्व आठवड्यांत त्याचें नांवही नाहीं असें होऊं नये. सकाळीं व दुपारीं मुलें जेव्हां शाळेंत येतात, त्यावेळीं त्यांचा मेंदू तरतरीत असतो. म्हणून त्यावेळीं गणितासारखे बौद्धिक विषय घ्यावे. ज्या ठिकाणीं ११ वाजतां शाळा भरते व मुलें जेवून शाळेंत येतात, त्या ठिकाणच्या शाळेंत मुलें आल्याबरोबर गणिताला सुरुवात होऊं नये. एका पाठोपाठ एक असे सारखे कठीण विषय वेळापत्रकांत घालूं नयेत. गणितासारख्या कठीण विषयाचे मागून गाणें, ड्रिल वगैरे विषयांसारखा सोपा विषय यावा. लहान मुलांना एकाच स्थितींत फार वेळ ठेवणें आरोग्यदृष्ट्या अपायकारक असतें, म्हणून ज्यांचेमुळें एकाच स्थितींत त्यांना फार वेळ सारखें राहावें लागेल, असे विषय लागोपाठ येऊं नयेत. उदाहरणार्थ, गणिताचे मागून लेखन हा विषय वेळापत्रकांत नसावा. लहान मुलांना

मधून मधून विश्रांति मिळणें फार अवश्य आहे. म्हणून दोन घड्यांचे शेवटीं त्यांना १०।१५ मिनिटांची विश्रांति मिळावी. हा विश्रांतीचा वेळ फुकट गेला असें समजूं नये. कारण, या विश्रांतीनंतर मुलें जास्त उल्हासानें अभ्यास करूं लागतात. शाळेचे मागें किंवा पुढें जागा असल्यास शिक्षकाचे देखरेखीखालीं मुलांनीं खेळ खेळण्यास वेळापत्रकांत नियमित वेळ असावी. अशा तऱ्हेचा खेळ हा देखील शिक्षणाचा एक भाग आहे. सारांश, जेणें करून मुलांचे मानसिक शक्तीवर ओझें न पडतां व शरीरप्रकृतीला अपाय न होतां, मुलांचा अभ्यासक्रम सुरळित चालेल, अशा तऱ्हेनें वर्गाचें वेळापत्रक तयार करावें.

आसपासच्या प्रदेशांत उत्पन्न होणारीं निरनिराळीं धान्यें, विशेष प्रकारचीं फळें, फुलें, दुसरे कांहीं खनिज पदार्थ, शिंपा व अशाच तऱ्हेचे इतर पदार्थ, या सर्वांचा संग्रह शाळेंत असावा. मुलांनीं हे पदार्थ गोळा करून, शाळेंतील एकाद्या जागीं व्यवस्थित ठेवावे. शिक्षकानें मुलांना पदार्थ गोळा करून त्यांचा संग्रह करण्यास उत्तेजन द्यावें. या योगानें मुलांची शोधक बुद्धि वाढते व प्रत्येक पदार्थ निरीक्षण करण्याची त्यांना संवय लागते.

वर्गांत लागणारीं पुस्तकें, वर्गाचें रजिस्टर व दुसरे दप्तरचे कागद एकादे पेटींत अगर फडताळांत ठेवावे. तसेंच, नकाशे, चित्रें, हींही व्यवस्थित ठेवावीं. वर्गांतील व्यवस्था जर चांगली नसेल, तेथील सामान जर अस्ताव्यस्त पडेल, नकाशांवर किंवा पुस्तकांवर धूळ सांचेल, तर मुलांना व्यवस्थितपणाची संवय लागणें शक्य होणार नाहीं.

शिक्षक नसतांनाही मुलांनीं वर्गाचे जागेंत दंगाधोपा न करितां शांतपणानें आपलें काम करावें, अशी संवय शिक्षकानें मुलांना लावावी. वर्गांतील वस्तूंबद्दल प्रत्येक मुलानें काळजी घेतली पाहिजे. वर्गाची जागा ही फार पवित्र जागा आहे, तींत व्यवस्थितपणें व शांतपणानें वागणें व तेथील प्रत्येक वस्तूबद्दल काळजी घेणें हें आपलें कर्तव्य आहे, ही भावना शिक्षकानें विद्यार्थ्यांच्या मनांत उत्पन्न केली पाहिजे.

वर्गांतील बसण्याचे बाक, सूर्यप्रकाश व स्वच्छ हवा यांबद्दल मागें सांगितलेंच आहे.

लिहीत असतांना लेखणी किंवा टाक झटकून, आसपासची जमीन खराब करण्याची संवय पुष्कळ मुलांस असते. ही संवय फार वाईट आहे. विद्यार्थ्यांची ही संवय अजिबात काढून टाकण्याचा प्रत्येक शिक्षकानें प्रयत्न करावा. विद्यार्थ्यानें निष्काळजीपणानें शाई सांडल्यास, त्यास शिक्षा केल्याखेरीज राहूं नये. कारण विद्यार्थ्यास स्वच्छपणाची संवय लावणें व त्यांना व्यवस्थित रीतीनें काम करण्यास शिकविणें हें शिक्षकाचें काम आहे.

---

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग १७ वा.

## शाळेंतील शिस्त.

उत्तम शिस्त ही सर्व शिक्षणाचा पाया आहे. शिस्तीशिवाय शाळेंत शारीरिक, बौद्धिक किंवा नैतिक या तिन्ही शिक्षणांपैकीं एकही शिक्षण मिळणें शक्य नाहीं. शिस्तीशिवाय असणारी शाळा ही शिक्षणसंस्थाच नव्हे. ज्या शाळेंत उत्तम शिस्त असते, तेथील मुलें आपल्या शाळेचे नियम आनंदानें व खुषीनें पाळतात. तीं आपल्या शिक्षकाला योग्य मान देऊन त्याच्याशीं प्रेमानें वागतात व त्याच्या आज्ञेचें उल्लंघन करीत नाहींत. तीं एकमेकांशीं सहानुभूतीनें वागतात व आपलें काम व्यवस्थितपणें, नियमितपणें व अंतःकरणपूर्वक करितात. त्याच मुलांना सहकारितेनें एकादें कार्य चांगलें करितां येतें. तीं आपलें काम स्वतःच्या हिंमतीनें करितात व त्याजकरितां विनाकारण दुसऱ्यावर अवलंबून राहात नाहींत. त्यांना खरें बोलण्याची संवय लागते व खोटें बोलण्याचें त्यांचे जिवावर येतें. त्यांच्या हातून एकादी चूक घडली, तर ती कबूल करण्यांत त्यांना बिलकूल कमीपणा वाटत नाहीं व तसें करण्यास तीं भीतही नाहींत. शाळेंत तीं आत्मसंयमनाचा जो धडा शिकतात तो त्यांना पुढें फार उपयोगीं पडतो. स्वाभिमान व विनय हे दोन्ही गुण त्यांच्या आंगीं जडतात. त्यांना उद्योग करण्यांत आनंद वाटतो व स्वस्थ बसण्यानें त्यांना त्रास होतो. अशा रीतीनें ज्या संवयींच्या योगानें व गुणांनीं मनुष्याला हातीं घेतलेल्या कामांत यश येतें व आयुष्य सुखांत जातें, त्या संवयी व ते गुण, शाळेंतील उत्तम शिस्तीचे योगानें लहानपणापासूनच या मुलांचे आंगीं जडतात.

ज्या शाळेंत शिस्त नसते, तेथील मुलांची स्थिति याच्या अगदीं उलट असते. या शाळेंतील मुलें नियमितपणें वेळेवर येऊन, आपले धडे

मन लावून, व्यवस्थितपणें करीत नाहींत. शिक्षक शिकवीत असतांना वर्गांतील कांहीं मुलें त्याच्याकडे लक्ष देत असतात, कांहीं आपसांत बोलत असतात, कांहींजण दुसऱ्याची खोडी काढून मनाची करमणूक करीत असतात. वर्गांत उदाहरणें चाललीं असतांना, कांहीं मुलें उदाहरणें करीत असतात, कांहीं दुसऱ्याच्या पाटीवरून उतरून घेत असतात, तर कांहीं स्वस्थ बसत असतात. शिक्षकानें प्रश्न विचारले असतां, वाटेल त्यानें उत्तर द्यावें अगर पांचसातजणांनीं मिळून कल्ला करून उत्तर द्यावें, असा प्रकार नित्यशः या शाळेंत दृष्टोत्पत्तीस येतो. ही स्थिति नेहमींच चालत असल्यामुळें साहाजिकपणें मुलांच्या आंगीं अव्यवस्थितपणा, अनियमितपणा, आळस, कामाचा कंटाळा वगैरे दुर्गुण जडतात. सहकारितेनें व सहानुभूतीनें शाळेंत वागण्याचा प्रसंग न आल्यामुळें, मुलांच्या आंगीं हे गुण कधींही येत नाहींत. कांहीं तरी थाप देऊन वेळ मारून नेण्याची खोड लागल्यामुळें मुलांच्या आंगीं अप्रामाणिकपणा व असत्य भाषण हे दोन मोठे दुर्गुण जडतात. मनावर दाब ठेवून नियमांप्रमाणें वागण्याची संवय न लागल्यामुळें व नेहमीं स्वेच्छेप्रमाणें वागल्यामुळें, आत्मसंयमनाची उत्कृष्ट संवय या शाळेंतील मुलांना कधींही लागत नाहीं. कधीं धडे करावे तर कधीं करूं नये, असा मुलांचा क्रम असल्यानें, नेटानें उद्योग करण्याचें या मुलांच्या जिवावर येतें. शाळेंत बंदोबस्त नसल्यामुळें मुलें विनय, आज्ञापालन, स्वाभिमान इत्यादि गुणांना पारखीं होतात. सारांश, ज्या शाळेंत शिस्त नाहीं त्या शाळेच्या विद्यार्थ्यांच्या आंगीं, ज्या उत्तम गुणांच्या योगानें व संवयींमुळें, मनुष्यांना यश व सुख हीं प्राप्त होतात, ते गुण व त्या संवयी जडत नाहींत. उलटपक्षीं, कित्येक दुष्ट संवयी व दुर्गुण या मुलांना जडतात व ते पुढील आयुष्यांत प्रबळ होतात.

अभ्यासाच्या दृष्टीनें पाहिलें असतां, ज्या शाळेंतील शिस्त चांगली असते तेथें जो अभ्यास होतो, त्याचा चौथा हिस्साही, ज्या शाळेंत शिस्त नाहीं तेथें होत नाहीं. शिक्षक जें कांहीं सांगेल तिकडे सर्व मुलांचें लक्ष असेल, तो जें कांहीं विचारीत असेल त्याचा विचार करून मुलें उत्तर देतील, तो जें कांहीं सांगत असेल त्याप्रमाणें मुलें कृति करीत असतील, शिक्षकाची व शिष्यांची एकचित्तता होत असेल, तरच मुलांना शिक्षक शिकवीत असलेला धडा खरोखरी समजतो. बंदोबस्त नसल्यामुळें, जेव्हां

कांहीं मुलें पाठाकडे लक्ष न देतां दुसराच कांहीं तरी व्यवसाय करीत असतात, व मध्यंतरींच कांहीं तरी प्रश्न विचारतात किंवा चालत असलेल्या धड्याचा बिलकूल विचारच करीत नाहींत, तेव्हां मुलांना धडा समजणें शक्य नसतें. अशीच स्थिति नेहमीं चालली, तर मुलांचा अभ्यास नेहमीं रेंगाळत राहाणार. एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें अशा शाळांतून अति हुशार मुलांचें काय शिकणें होईल तेवढेंच. बाकीच्यांचें कांहींएक होणार नाहीं, आणि ज्यांना कांहीं थोडें ज्ञान मिळेल, त्यांना तरी तें त्या शिक्षकाच्या शिकविण्यानें मिळेल असें नव्हे, तर त्याच्या शिकविण्यांत कांहीं अर्थ नसून देखील तें त्यांना प्राप्त होईल असें म्हटलें पाहिजे.

खरोखर पाहिलें असतां, मुलांना शिस्त आवडत नाहीं, असें नाहीं. ज्या शाळेंत अभ्यास व्यवस्थितपणें व नियमितपणें चालतो, त्या शाळेंत शिकणाऱ्या मुलांना संवय होईपर्यंत शाळेंतील नियमांप्रमाणें वागणें प्रथमतः जड वाटतें. पण एकदां कां संवय झाली कीं, शाळेचे नियम पाळण्यांत त्यांना अभिमान व आनंद वाटतो. वर्गांतील जर कोणी मुलगा नियमांचें उल्लंघन करीत असला, तर त्यांना तें बरें वाटत नाहीं. शिक्षक आणि मुलें या दोघांचेही प्रत्येक दिवशीं ५।६ तास शाळेंत जातात. विद्यार्थ्यांच्या आयुष्यांत शाळेंतील काळ फार महत्त्वाचा असतो. या काळांत मिळणाऱ्या शिक्षणावरच त्यांचें सुखदुःख अवलंबून असतें. शाळेंत जर शिस्त असेल, तर शिक्षक व शिष्य या दोघांनाही ही शाळेंतील वेळ फार आनंदांत जाते. दोघांनाही आपलें काम उत्तम रीतीनें करण्यास उत्साह वाटतो. शाळेंत शिस्त नसल्यानें शिक्षकाला व विद्यार्थ्यांना हा काळ कंटाळवाणा वाटतो. मुलांच्या दंगाधोप्यामुळें शिक्षक त्रस्त होतो व त्याचा स्वभाव चिडखोर बनतो. या त्रासिक वृत्तीचा परिणाम त्याच्या शरीरप्रकृतीवरही होतो व मुलांच्या शिक्षणावरही होतो.

मुलांचा अभ्यास चांगला व्हावा, त्यांना चांगल्या संवयी लागाव्या, त्यांच्या अंगीं चांगले गुण जडावे, त्यांना व स्वतः शिक्षकाला आपलें काम करण्यास उत्साह व आनंद वाटावा, दोघांचा शाळेंतील काळ सुखांत जावा, या सर्व कारणांकरितां शिक्षकानें शाळेंत शिस्त राखणें अत्यंत अवश्य आहे.

आपल्या कामावरील आसक्ति, मुलांची आवड, आनंदी वृत्ति, आत्मसंयमन, प्रसंगावधान वगैरे गुण शिक्षकाच्या आंगीं अवश्य लागतात, हें मागील भागांत सांगितलेंच आहे. हे सर्व गुण, वर्गांत शिस्त राहाण्यास आवश्यक आहेतच, पण यांशिवाय वर्गांत शिस्त राखण्यास दुसरे महत्त्वाचे गुण म्हटले म्हणजे दृढता, दक्षता, व्यवहारचातुर्य व मनुष्यस्वभावाची पारख हे होत. शिक्षकाचें वजन मुलांवर पडल्याशिवाय तीं त्याचे कह्यांत राहाणें शक्य नाहीं आणि मुलांवर वजन ठेवण्याला शिक्षकाचे आंगीं दृढता हा गुण अवश्य असला पाहिजे. शिक्षक जरी प्रेमळ असला, जरी त्याची कामावर आसक्ति असली, जरी तो विद्वान् असला, तरीही जर त्याचे आंगीं दृढता नसेल, तर त्याच्या आंगच्या या सर्व गुणांचा बिलकूल उपयोग होत नाहीं. पुष्कळ वेळां आपण असें पाहातों कीं, एकादा शिक्षक आपलें शिकविण्याचें काम अंतःकरणपूर्वक करीत असतो, हाताखालच्या मुलांबद्दल त्याला फार प्रेम व कळकळ वाटत असते, त्याच्या विद्वत्तेबद्दल सर्वांची खातरी असते, तथापि या शिक्षकाचें काम समाधानकारक रीतीनें होत नाहीं. व त्याच्या शिक्षणापासून मुलांना जो फायदा व्हावयास पाहिजे तो बिलकूल होत नाहीं. या सर्वांचें कारण त्या शिक्षकाचे आंगीं दृढता नसणें हें होय. आंगीं दृढता नसली म्हणजे, एकाद्या मुलानें जर शाळेंतील एकादा नियम पाळला नाहीं किंवा शिस्तीचें उल्लंघन केलें, तर त्या मुलाला शिक्षा करण्यास शिक्षक कचरतो. लवकरच मुलांच्या लक्षांत ही गोष्ट येते, यामुळें मुलांना शिस्तीचें उल्लंघन करण्यास बिलकूल दिक्कत वाटत नाहीं. एकानें एक नियम मोडला, तर दुसऱ्यानें दुसराच मोडावा, असें होतां होतां सर्व वर्गांत बंडाळी माजून राहाते व ती शिक्षकाला आवरेनाशी होते. वर्गांत अभ्यास समाधानकारक चालल्यामुळें, शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही आपलें काम उत्तम रीतीनें करण्यास उत्साह वाटतो व त्यामुळें दोघांचेंही काम चांगलें वठतें. शाळेंत शिस्त नसल्यानें शिक्षकाचा व विद्यार्थ्यांचा काळ फुकट जातो व दोघांच्याही हातून काम चांगलें होत नाहीं. मुलांच्या दंग्याधोप्यामुळें शिक्षकाला आपला जीव नकोसा होतो व त्याचा स्वभाव त्रासिक व चिडखोर बनतो. यामुळें त्याच्या आंगीं असलेल्या चांगल्या गुणांचा परिणाम मुलांवर होत नाहीं.

शिक्षकानें मुलांना शाळेंतील नियम व आपले हुकूम पाळण्यास भाग पाडलें पाहिजे. या कामांत त्याच्याकडून कसूर होतां कामा नये. जो कोणी नियमांचें उल्लंघन करील किंवा ते मोडील, त्याला शिक्षकानें शिक्षा केलीच पाहिजे. शिक्षक जर मुलाला अपराधाबद्दल शिक्षा न करील किंवा त्यानें केलेल्या अपराधाकडे दुर्लक्ष करील, तर वर्गांत शिस्त राहाणें अशक्य होईल. अपराधाकडे दुर्लक्ष करणें किंवा त्याजबद्दल मुलाला शिक्षा न करणें, हें कांहीं शिक्षकाच्या दयाळूपणाचें चिन्ह नव्हे. या त्याच्या पिळपिळित-पणामुळें व मनाच्या दुर्बळपणामुळें हाताखालील मुलांचें तो जन्माचें नुकसान करितो.

शिक्षकानें शाळेंत नियम ठरवितांना मात्र विशेष काळजी घेतली पाहिजे. या नियमांसंबंधानें प्रोफेसर काथवटे यांच्या 'शिक्षण व अध्यापन' या पुस्तकांतून पुढें दिलेला उतारा प्रत्येक शिक्षकानें लक्षांत ठेवण्याजोगा आहे.

" १. कोणते नियम अमलांत आणणें इष्ट आहे याचा प्रथम पूर्णपणें निश्चय करावा आणि मग ते नियम खास पाळावे.

२. अधिक महत्त्वाचे नियम लिहून ठेवावे, म्हणजे त्यांजविषयीं कोणाच्या मनांत भ्रांति राहाणार नाहीं. ते दर एक वर्गांत सहज दिस-तील अशा ठिकाणीं लावून ठेवावे. ते थोडे असावे, लहान लहान असावे व असंदिग्ध असावे, ते वारंवार बदलूं नयेत.

३. अमलांत आणतां येणार नाहींत असे नियम करूं नयेत. मुलांनीं नियम मोडले आणि त्यांना शिक्षा झाली नाहीं, म्हणजे ते नियम अमलांत आणण्याचें ज्याचें काम असेल, त्याजविषयीं त्यांच्या मनांत मान राहात नाहीं आणि तशीच शिक्षा चुकावयाजोगी असेल, तेथें नियम मोडण्याचा त्यांना मोह होतो.

४. जेव्हां जेव्हां हुकूम करावयाचा तेव्हां तेव्हां सर्वांनीं तो मानला किंवा नाहीं, हें बरोबर पाहावें आणि तो बरोबर अमलांत आला असें पाहि-त्याशिवाय दुसरें कांहीं करूं नये. प्रथम असें वाटेल कीं, हें पाहाण्याकरितां थांबल्यानें वेळ फुकट जातो; परंतु एकंदरींत त्यामुळें वेळही थोडा लागतो आणि मेहनतही थोडी पडते. शिक्षक करीन म्हणेल तें करीलच असा

आहे, किंवा मनाचा लेचापेचा आहे, तें विद्यार्थी तेव्हांच ओळखतात आणि लेचापेचा आहे असें समजलें म्हणजे, त्याच्या हुकुमाप्रमाणें वागण्यानें त्रास व्हावयाजोगा असला, तर ते त्या पंचाइतींत पडतच नाहींत. पण जर त्यांना समजलें कीं, आपणांस जें करायाला सांगितलें तें बरोबर करून घेतल्याशिवाय, कधीं सोडावयाचा नाहीं असा हा माणूस आहे, तर ते मुकाट्यानें करावयाला पाहिजे, तें करावयाच्या मागीला लागतात.

५. आपण दिलेला हुकूम तोडावा, असें विद्यार्थ्यांस वाटणार आहे असा गर्भित अर्थ निघेल असें बोलूं नये. धमकावणीच्या बोलण्यानें एकादे वेळेस धाक पडण्याचें एकीकडेसच राहातें, आणि उलटें जे कोणी विद्यार्थी जरा धीट असतील त्यांना, जें काम करूं नये म्हणून सांगितलें असेल तें करून पाहूं, असें वाटतें. खेरीज गुरुशिष्यांमध्यें जी परस्परप्रीति असावी, जो एकमेकांवर भरंवसा असावा, ती प्रीति आणि तो भरंवसा आणि वारंवार धमकी देणें यांत परस्परविरोध आहे. आपला हुकूम अमलांत आणण्यास विद्यार्थी उत्सुक आहेत असें घेऊन चालावें, आणि विद्यार्थ्यांना स्वतांची पत राखण्यासाठीं हुकूम मानावयाला लावावें, हें फारच बरें होय. शिक्षेच्या भयानें मात्र त्यांनीं आपण दिलेल्या हुकुमाची अमर्यादा करूं नये, असा प्रकार असण्यांत कांहीं मजा नाहीं.

६. जो हुकूम करावयाचा तो दृढ व गंभीर स्वरानें करावा, फार ओरडूं नये. त्याच त्या गोष्टीचा वारंवार उच्चार करूं नये. कोणीही आज्ञा मानतात ते ती मोठ्यानें ओरडून केली आहे किंवा पुष्कळ वेळां तिचा उच्चार केला आहे म्हणून मानीत नाहींत. परंतु आज्ञा जेथून निघत आहे, तेथें कर्तृत्वशक्ति जबरदस्त आहे आणि ही आज्ञा मानिल्याशिवाय गत्यंतर नाहीं अशी खात्री असते, म्हणून मानतात. चांगली बंदोबस्ताची शाळा असली म्हणजे पुष्कळ गोष्टी करावयाला मुळीं बोलून सांगावें लागतच नाहीं. उठणें, बसणें, जागा बदलणें वगैरे कामें हाताच्या वगैरे खुणांनींच चालतात. धड्याचें काम चालत असतांना तर, बंदोबस्त राखण्याचा आणि दुसरीं लहानसहान कामें सांगण्याचा प्रकार नुसत्या डोळ्याच्या इषाऱ्यावर होऊन जातो.

७ पुस्तकें अगर वह्या घेणें अगर ठेवणें, पाट्या घेणें किंवा ठेवणें, नंबर बदलणें, वर्गांतून बाहेर जाणें, वगैरे कामें नेहमीं एका नेमलेल्या प्रकारेंच करून घेत जावीं, आणि काय कसें करावयाचें तें दरएक विद्यार्थ्यास बरोबर ठाऊक असावें.

८ एक विषय संपून दुसऱ्यास आरंभ करावयाच्या वेळेस, जरा अधिक सावधगिरी राखावी. पूर्वी सक्ति सोसलेली असते त्याबद्दलची बाकी थोड्या करून फेडून घ्यावी, असें त्या संधीस मुलांना वाटावयासारखें असतें.

९ नेहमीं वर्गाला कांहींना कांहीं तरी काम खास करावयाला असावें. काम नसलें म्हणजे जशी बंडाळी होते तशी आणखी केव्हां सुद्धां होत नाहीं. वेळापत्रक चांगलें व्यवस्थित केलें असलें म्हणजे, बहुतकरून दिवसभर काम भरपूर असतेंच; परंतु अशी संधि पुष्कळ वेळ असते कीं, वर्ग गुंतलेला खरा, पण थोड्या विद्यार्थ्यांना फुरसत सांपडते. अशा वेळेस ज्या विद्यार्थ्यांना अधिक फुरसत असेल, त्यांना कांहीं तरी लहानसें काम सांगावें.

१०. जरूर तर, जें विद्यार्थ्यास करावयास सांगावयाचें त्याचें कारणही त्यांना कळवावें, म्हणजे समजून उमजून आणि आपल्या मनाच्या हौशीनें ते आज्ञा पाळतील. पण एकंदर हुकुमाचीं कारणें सांगत बसलेंच पाहिजे असें नाहीं. विद्यार्थ्यांनीं गुरूजींचें जसें ऐकिलें पाहिजे तसाच त्यांजवर त्यांचा भरंवसाही पाहिजे, आणि क्रमाक्रमानें अशी स्थिति झाली पाहिजे कीं, गुरूजींनीं आज्ञा केली ती सयुक्तिक आहे असें विद्यार्थ्यांना विचार केल्याशिवाय वाटावें."

शिस्त राखण्याला आणखी अवश्य लागणारा गुण म्हटला म्हणजे दक्षता हा होय. शिक्षकाचें लक्ष नेहमीं सर्व मुलांवर सारखें पाहिजे. ज्या वेळेला मुलांना असें दिसतें कीं, शिक्षकाचें लक्ष आपणांवर नाहीं, त्या वेळीं खोडी करण्याचा किंवा कामांत टंगळमंगळ करण्याचा त्यांना मोह होतो शिक्षकाचें लक्ष आपल्या सर्व कृतींवर आहे, आपण आपला अभ्यास लक्षपूर्वक केला आहे किंवा नाहीं, हें तो नेहमीं पाहातो,आपणांस विषय समजला किंवा नाहीं याजवरही त्याचें लक्ष आहे, हें एकदां मुलांच्या लक्षांत आलें कीं, तीं आपलें काम व्यवस्थित करितात. धड्याकडे लक्ष देतात. व

खोड्याही करीत नाहींत. मनुष्यस्वभावाची पारख व व्यवहारचातुर्य हे गुणही शिस्त राखण्याचे कामीं फार उपयोगीं आहेत. निरनिराळ्या स्वभावांच्या मुलांना वळण लावण्यास व शाळेंतील नियम पाळण्याविषयीं त्यांचें मन वळविण्यास अनेक उपायांचें अवलंबन शिक्षकाला करावें लागेल आणि अशा उपायांची योजना करण्याचें चातुर्य जर शिक्षकाचे अंगीं असेल, तरच त्याला या कामांत यश येईल. एकच उपाय अनेक प्रसंगीं निरनिराळ्या स्वभावांच्या मुलांना लावून भागणार नाहीं. वर्गांत शिस्त राखण्याचा उत्तम उपाय म्हटला म्हणजे शिक्षकानें आपला धडा मनोरंजक करणें हा होय. धडा मनोरंजक असला म्हणजे मुलांना खोडी करण्याचा मोहच होत नाहीं.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग १८ वा.

## शिक्षा.

शाळेंत शिस्त राखण्याच्या साधनांपैकीं शिक्षा आणि बक्षिसें हीं दोन महत्त्वाचीं साधनें आहेत. यांपैकीं पहिलें साधन जी शिक्षा तिचा या भागांत विचार करूं. शिस्त राखण्याचे कामीं शिक्षा आणि बक्षिसें या दोन साधनांवर शिक्षकाला सर्वस्वीं अवलंबून राहातां येणार नाहीं. शिक्षा ही एकाद्या औषधाप्रमाणें आहे. ज्या वेळीं प्रकृति नीट नसते, तींत कांहीं तरी बिघाड होतो, त्याच वेळेला औषधाचा उपयोग करितात. औषधाच्या योगानें आलेला रोग नाहींसा होतो व प्रकृति ताळ्यावर येते. पण आरोग्य व शरीरसंपत्ति संपादन करून देण्याचा गुण औषधाचे आंगीं नसतो. सात्त्विक अन्न, भरपूर व्यायाम, पुरेशी विश्रांति, मुबलक स्वच्छ हवा, नियमित वर्तन वगैरे साधनांच्या योगानें आरोग्य व शरीरसंपत्ति हीं संपादन करितां येतात. नुसत्या शिक्षेच्या योगानें शाळेंत शिस्त राहून मुलांच्या आंगीं चांगल्या संवयी लागणार नाहींत. ज्या वेळीं शिस्त बिघडते त्याच वेळीं शिक्षेचा उपयोग करून, पुन्हां पूर्वींप्रमाणें शिस्तीची घडी बसावयाची असते. मुलांना आपल्या शाळेबद्दल प्रेम वाटून, व शाळेचे नियम पाळणें हें आपलें कर्तव्य आहे असें समजून, त्यांनीं ते स्वतःच्या खुषीनें व आनंदानें पाळावे, हा जो शिक्षणाचा हेतु तो नुसत्या शिक्षेच्या योगानें कधीं तडीस जात नाहीं. हा हेतु साध्य होण्यास शिक्षा व बक्षिसें यांशिवाय दुसरींही साधनें अवश्य लागतात. आपल्या कामावर आसक्ति, मुलांची आवड, दक्षता, दृढनिश्चय वगैरे गुण जर शिक्षकाचे आंगीं असतील, तरच शिक्षा या साधनाचा शिस्त राखण्याचे कामीं त्याला उपयोग होईल, एरवीं होणार नाहीं. शिक्षकानें या शिक्षासाधनाच उपयोग फार जपून व बेतानें केला पाहिजे. नेहमीं नेहमीं औषध दिल्यानें

ज्याप्रमाणें औषधाचा गुण कांहीं येत नाहीं, त्याचप्रमाणें नेहमींच शिक्षा या साधनाचा उपयोग केल्यानें तिचा फारसा उपयोग होत नाहीं.

शिक्षकास शिक्षा देण्याचा प्रसंग आला म्हणजे वाईट वाटतें. तथापि आपल्या मुलांच्या कल्याणार्थ ती गोष्ट त्याला करावी लागते. शिक्षा देण्याचे कामीं कसूर करणें किंवा टंगळमंगळ करणें, म्हणजे वर्गाची शिस्त बिघडविण्यासारखें व पर्यायानें मुलांचें नुकसान करण्यासारखें आहे. शाळेंत मुलांना शिक्षा देण्याचे उद्देश दोन असतात. आपण अमुक एक अपराध केला आहे, ही गोष्ट शिक्षेच्या योगानें मुलांचे नजरेस येते, व शिक्षा मिळाल्यामुळें वाईट वाटून लाजेनें व भीतीनें तो अपराध पुन्हां न करण्याविषयीं मुलें काळजी घेतात, व या योगानें त्यांच्यांत सुधारणा होत जाते. मुलांमध्यें अशी सुधारणा होत जावी, हा शिक्षा देण्याचा पहिला उद्देश होय. अन्याय केला असतां किंवा ठरलेल्या नियमांचें उल्लंघन केलें असतां, शिक्षा ही व्हावयाचीच हा नियम मुलांच्या मनांत पूर्णपणें बिंबावा, हा शिक्षा देण्याचा दुसरा हेतु असतो. ‘ आपण आज अभ्यास केला नाहीं म्हणून, शाळा सुटल्यावर बाकीचीं मुलें खेळत असतांनाही आपणांला वर्गांत बसून अभ्यास करावा लागला ’ ‘वर्ग चालला असतां आपण एका मुलाशीं बोललों म्हणून, गुरूजीनें आपणांस वर्गाच्या बाहेर उभें केलें,’ ‘नेमून दिलेलें शुद्धलेखन लिहून न आणल्यामुळें आपणांस तें दोन वेळां गुरूजीनें लिहून आणण्यास सांगितलें, ’ या गोष्टी, शिक्षा झाली कीं, सहजच मुलांच्या लक्षांत येतात. नियमांचें उल्लंधन केलें किंवा अन्याय केला कीं, ताबडतोब शिक्षा होते, ही भावना शाळेंत मुलांच्या मनांत दृढ होते, व मग सहजच नियमांना योग्य मान देण्याची व अन्यायासापासून दूर राहाण्याची त्यांना संवय लागते. शाळेंत मुलें जो हा धडा शिकतात, तो त्यांना पुढील आयुष्यांत फार उपयोगीं पडतो. आपली कोणती कृति वाईट आहे व कोणती चांगली आहे, हें मुलांना कळावें व त्यांच्यांत सुधारणा व्हावी आणि वाइटाचा परिणाम वाईट होतो, हें तत्त्व त्यांच्या मनावर पूर्ण बिंबून त्यांनीं त्याच्यापासून दूर राहाण्यास झटावें, या दोन गोष्टी शिक्षेच्या योगानें साध्य झाल्या, तरच शिक्षेचा उपयोग होतो, नाहीं तर केलेली शिक्षा फुकट जाते.

मुलांना आपली एकादी कृति वाईट आहे व तिचा परिणाम वाईट होणार हें कळलें नाहीं, तर तीं तीच कृति पुढेंही करीत राहातात. यामुळें

त्यांना त्या कृतीची संवय लागते व पुढील आयुष्यांत आपल्या दुष्कृतींचे भयंकर परिणाम त्यांना सोसावे लागतात. शिक्षेच्या योगानें हा सर्व भावी अनर्थ टळतो. लहानपणीं पेरू चोरणाऱ्या मुलाला त्याच्या कृतीबद्दल त्याच्या आईनें शिक्षा न केल्यामुळें, आपली कृति वाईट आहे व तिचा परिणाम वाईट होईल हें न कळून, त्यानें चोरी करण्याचा क्रम सुरू ठेविला, व पुढें चोरीची संवय लागून त्याला त्याच्या कृत्यांबद्दल देहांतशिक्षा झाली. या गोष्टीचें तात्पर्य हेंच आहे. शिक्षेपासून आणखी एक इष्ट परिणाम होतो व तो वर्गांतील सर्व मुलांवर होतो. एका मुलानें एक अपराध केला व त्या अपराधाबद्दल त्याला अमुक एक शिक्षा झाली, ही गोष्ट पाहिली म्हणजे बाकीचीं मुलेंही तो अपराध करीत नाहींत. उशिरां आल्याबद्दल एक मुलाला जर उभें राहाण्याची शिक्षा केली, तर इतर मुलांनाही 'उशिरां येणें चांगलें नव्हे, उशिरां आलें असतां आपणांसही अशीच शिक्षा मिळेल' असें वाटतें व तीं नेहमीं शाळेंत वेळेवर येण्याचा प्रयत्न करितात.

शाळेंत चालू असलेल्या शिक्षांचे आपणांला स्थूलमानानें दोन प्रकार करितां येतील. ज्या शिक्षेचे योगानें मुलांना शारीरिक दुःख किंवा त्रास होतो ती शिक्षा व ज्या शिक्षेच्या योगानें मुलांना शारीरिक दुःख किंवा त्रास होत नाहीं, परंतु जिच्या योगानें आपली मानखंडना झाली आहे असें वाटून त्यांना वाईट वाटतें ती शिक्षा. शिक्षकानें रागानें पाहाणें किंवा बोलणें, वर्गांत उभें करणें, जागा खालीं देणें किंवा मार्क कमी करणें किंवा वर्गाच्या शेवटीं बसविणें, या सर्व शिक्षा दुसऱ्या प्रकारांत येतात; छड्या देणें, घरीं कांहीं लिहावयास व वाचावयास देणें, वर्ग सुटल्यावर वर्गांत बसवून ठेवणें या सर्व शिक्षा पहिल्या प्रकारांत येतात. शिक्षा देण्याच्या बाबतींत शिक्षकानें खालील गोष्टी लक्षांत ठेवाव्या.

आपण एकादा अपराध केला, तर त्याबद्दल आपणांस शिक्षा होईलच अशी मुलांची खात्री झाली कीं, तो अपराध करण्याचा मोह मुलांना कधीं होत नाहीं. मुलानें दहावेळां अपराध केला, त्यांपैकीं नऊ वेळां तो अपराध शिक्षकाच्या लक्षांतच आला नाहीं किंवा कांहीं वेळां लक्षांत येऊनही, त्यानें त्या अपराधाकडे कानाडोळा केला, आणि दहाव्या वेळीं मात्र त्या अपराधाबद्दल मुलाला जबर शासन केलें, तर त्या शिक्षेचा इष्ट परिणाम मुलांवर होणार नाहीं. पुष्कळ वेळां अपराध करूनही निसटून जातां येतें, ही गोष्ट

मुलांच्या डोळ्यासमोर असल्यामुळें त्यांना अपराध करण्याचा मोह होतो. **एकाद्या अपराधाबद्दल कधींमधीं कडक शिक्षा करण्यापेक्षां तो अपराधी झाल्याबरोबर, नियमानें सौम्य शिक्षा करणें ही गोष्ट, शिस्तीच्या दृष्टीनें अधिक इष्ट आहे. ज्या मुलाला एकाद्या अपराधाबद्दल शिक्षा करावयाची त्या मुलाला, आपणांस कोणत्या अपराधाबद्दल शिक्षा मिळाली हें अवश्य कळलें पाहिजे; म्हणजे झालेल्या अपराधाची त्याला लाज वाटून, तें मूल तो अपराध आपल्या हातून पुन्हां न होऊं देण्याविषयीं खबरदारी घेईल.** अशा रीतीनें शिक्षेच्या योगानें मुलांत सुधारणा व्हावी, हा जो शिक्षा करण्याचा हेतु असतो, तो तडीस जातो. ज्या मुलाला आपणास शिक्षा झाली याबद्दल लाज वाटत नाहीं व ज्याला शिक्षेच्या योगानें झालेल्या मानहानीमुळें मुळींच वाईट वाटत नाहीं, त्या मुलावर शिक्षेचा इष्ट परिणाम घडणार नाहीं, व त्याच्यांत सुधारणाही होणार नाहीं. लहान मुलांना देखील मानाची आवड असते व आपली फजीती झालेली पाहून त्यांना वाईट वाटतें. शिक्षकानें मुलांच्या या वृत्तीचा शाळेंत परिपोष करावा, म्हणजे शिस्त राखण्याचे कामीं त्याला या वृत्तीचा फार फायदा होईल. **अपराधाबद्दल शिक्षा करितेवेळीं शिक्षकाची समदृष्टि पाहिजे.** वर्गांत कांहीं मुलें फार हुशार असतात किंवा वर्गांतील सर्व कामें तीं मनापासून करितात, त्यामुळें सहजच शिक्षकाची त्यांच्यावर मर्जी असते. या मुलांच्या हातून जर एकादे वेळेस अपराध झाला, तर त्याच्याकडे कानाडोळा करण्याचा शिक्षकास मोह होतो. इतर मुलांच्या लक्षांत ही गोष्ट तेव्हांच येते व शिक्षकाची वागणूक अन्यायाची आहे असें त्यांना वाटून, त्यांचा शिक्षकावरील भरंवसा उडून जातो. म्हणून प्रोफेसर काथवटे यांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ कोणीं केली ही खोडी ? ’ ‘ गोंद्यानें ’ तर ‘ त्याला चार छड्या द्या ’ ‘ छे ! छे ! मुराररावनें ’ ‘ बरें तर त्याला जाऊं दे. त्याला म्हणावें पुन्हां असें करूं नकोस. ’ असें कधींही शिक्षकानें करूं नये. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, कधीं कधीं एकाच शिक्षेचा परिणाम तोच अपराध करणाऱ्या दोन मुलांवर सारखा होत नाहीं. अशा वेळीं अपराध करणाऱ्या मुलांचा विचार करून शिक्षकाला कमजास्त शिक्षा करावी लागते. एक मुलगा फार खोडकर आहे व त्याला वर्ग चालला असतां मधून मधून वर्गांत

बोलण्याची खोड आहे. दुसरा एक मुलगा आहे, तो फार सज्जन आहे व खोडी करण्याच्या नादांत कधींही नसतो. एके दिवशीं वर्ग चालू असतां हीं दोन्हीही मुलें बोलतांना शिक्षकाला आढळलीं. दोघांचेही १० मार्क उणे केले, तर एकाला ती शिक्षा फारच सौम्य होईल व तिचा परिणाम त्याच्यावर कांहींही होणार नाहीं, व दुसऱ्याला हीच शिक्षा पुरेशी होईल. शिक्षकानें शिक्षा देतांना समदृष्टि ठेवावी व अपराध करणाऱ्या मुलांची नेहमींची वृत्तिही ध्यानांत घ्यावी. या दोन गोष्टी एकमेकांच्या विरुद्ध आहेत असें वाटतें; पण वास्तविक पाहातां त्या तशा नाहींत व मुलांना शिक्षा देतांना शिक्षकानें या दोन्हीही गोष्टी विचारांत घ्याव्या. **जितक्या सौम्य शिक्षेनें शिक्षकाचा कार्यभाग होईल तितकी सौम्य शिक्षा देणें बरें.** जेथें रागाच्या नजरेनें कार्यभाग होण्याजोगा असेल, तेथें रागाच्या वाणीचा उपयोग करूं नये. जेथें वाणीनें कार्यभाग होण्याजोगा असेल, तेथें त्याहून जास्त कडक शिक्षेचा उपयोग करूं नये. **एकच औषध नेहमीं घेतल्यानें, तें ज्याप्रमाणें आंगवळणीं पडतें व त्याचा कांहीं गुण येत नाहीं, त्याचप्रमाणें एकच शिक्षा नेहमीं दिल्यानें, तिचा इष्ट परिणाम कांहींच होत नाहीं.** कित्येक शिक्षकांना वर्गांतील सर्व मुलांना एकदम एकादी शिक्षा करण्याची खोड असते. **पण सर्व मुलांना एकच शिक्षा दिल्यानें कोणालाच त्या शिक्षेची लाज वाटत नाहीं व वाईटही वाटत नाहीं.**' उलट पक्षीं अशा शिक्षेपासून मुलांना गंमत वाटते व शिक्षकाबद्दलची त्यांची भीतिही कमी होते. 'शिक्षकाला आपल्या वर्तनापासून त्रास होतो, म्हणूनच तो सूड उगवण्याच्या बुद्धीनें आपणांस शिक्षा करीत आहे,' अशीमुलांची भावना शिक्षकानें कधींही होऊं देऊं नये. 'आपण सुधारावें, एवढ्याकरितां शिक्षक आपणांस शिक्षा करीत आहे व तसें करतांना त्याला फार वाईट वाटतें,' अशीच मुलांची खात्री असेल, तर शिक्षेचा योग्य व हितकर परिणाम होईल. 'आपण केलेल्या अपराधाबद्दल शिक्षा झाली, तेव्हां आपण केलेल्या अपराधाचें परिमार्जन झालें, आतां पुन्हा दुसरा अपराध करण्यास हरकत नाहीं,' अशी मुलांची वृत्ति न होण्याबद्दल शिक्षकानें काळजी घेतली पाहिजे. शिक्षेसंबंधीं अत्यंत महत्त्वाची लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे **कीं, शिक्षा ही बुद्धीच्या मंदपणाबद्दल किंवा हाताच्या जडपणा-**

बद्दल केव्हांही करावयाची नसते. जेव्हां मुलें शिस्तीच्या नियमांचें समजून उमजून उल्लंघन करतील, तेव्हांच शिक्षेची जरूर असते.

शिक्षेच्या कडकपणाच्या मानानें शिक्षेच्या निरनिराळया प्रकारांचा अनुक्रम पुढें लिहिल्याप्रमाणें लावितां येईल. १ मुलांचें एकादें कृत्य आपणास पसंत नाहीं सबब त्याजबद्दलचा आपणास राग आला आहे,हें शिक्षकानें नजरेनें दाखविणें; २ रागें भरणें;३ उभें करणें; ४ मार्क कमी करणें; ५ वर्गांतील खालची जागा देणें; ६ कांहीं वेळ वर्गाबाहेर उभें करणें; ६ खेळाच्या जागीं किंवा शाळेच्या पुस्तकालयांत जाण्याची परवानगी न देणें; ७ शाळा सुटल्यावर वर्गांत मुलांना बसवून त्यांचेजवळून कांहीं लिहून घेणें; ८ घरीं कांहीं लिहावयास किंवा पाठ करण्यास देणें; ९ शारीरिक शिक्षा; १० दंड; ११ कांहीं दिवस शाळेंतून घालवून देणें; १२ शाळेंतून नांव कमी करणें. या सर्व शिक्षांच्या गुणावगुणांचा थोडक्यांत विचार करूं.

१. अभ्यास चालू असतां चाललेल्या धड्याकडे लक्ष न देणें, मुलांशीं बोलणें वगैरे अपराध थांबविण्याचा, जीं मुलें तो अपराध करीत असतील त्यांना त्यांचा अपराध दाखविण्याचा व शिक्षकाला आपल्या कृत्याचा राग आला आहे, हें त्या मुलांच्या निदर्शनास आणण्याचा उत्तम उपाय म्हटला म्हणजे, शिक्षेकाची रागाची नजर हा होय. वर्ग चालत असतां शिक्षकाची नजर सर्व मुलांवर असावी म्हणजे कोण काय करीत आहे हें त्याला कळतें. शिक्षकाबद्दल जर मुलांचे मनांत आदर व भीति असेल, तर नुसत्या रागाच्या दृष्टीनेंही शिक्षकाचें कार्य होतें. ज्या मुलाचें धड्याकडे लक्ष नसेल किंवा जो मुलगा शेजारच्या मुलाशीं बोलत असेल, त्याजकडे रागाचे दृष्टीनें शिक्षकानें पाहिलें कीं, तो लगेंच आपल्या धड्याकडे लक्ष देऊं लागतो. असें केलें असतां चाललेला धडा थांबवून, आरडाओरड करून वेळ घालविण्याचा व सर्व मुलांचें लक्ष धड्यावरून काढून दुसरीकडे घालविण्याचा प्रसंग शिक्षकास येत नाहीं. मुकाट्यानेंच सर्व कार्य होतें.

२. रागें भरणें ही शिक्षा आपल्या धंद्यांत निष्णात असणाऱ्या शिक्षकाला फार उपयोगीं पडते. जो शिक्षक प्रेमळ आहे, ज्याच्याबद्दल मुलांच्या

मनांत आदर आहे, अशाच शिक्षकाच्या रागें भरण्याला महत्त्व असतें व त्याजपासून हितकर परिणाम होतो. शिक्षकानें भर वर्गात मुलांना रागें न भरतां, शाळा सुटल्यावर किंवा मधल्या सुटींत एकीकडे बोलावून, मुलांना त्यांच्या वर्तनाबद्दल आपणांला किती वाईट वाटत आहे व त्यांच्या कृत्याचा आपणांस किती राग आला आहे, हें सांगितलें, तर कित्येक वेळां त्यांच्यावर फारच चांगला परिणाम होतो व तीं मुलें सुधारतात. मुलांना रागें भरतांना शिक्षकानें मर्मभेदक किंवा छद्मी भाषणाचा बिलकूल उपयोग करूं नये. अशा भाषणानें मुलांच्या मनांत झालेली जखम फार वेळ टिकते व शिक्षकावरील त्यांचें प्रेमही नाहींसें होतें. रागें भरतांना शिक्षकाचा आवाज शांत व गंभीर असावा. उगाच आरडाओरड केल्यानें मुलांना त्या बोलण्याची भीति न वाटतां गंमत मात्र वाटते. नेहमीं नेहमीं रागें भरण्यानें मुलांच्या तें आंगवळणीं पडतें व शिक्षा या नात्यानें त्याची किंमत अगदीं नाहींशी होते.

३. वर्गांत उभें करणें. या शिक्षेचा जर जपून उपयोग केला, तर ही शिक्षा बरीच परिणामकारक होते. वर्गांत एकदम चार पांच मुलें उभीं केलीं, तर तीं आपसांत टिवल्या बावल्या करूं लागतात व वर्गांतील इतर मुलांचेंही लक्ष आपणांकडे वेधून घेतात.

४।५. मार्क उणे देणें, जागा खालीं देणें, वर्गाच्या बाहेर कांहीं वेळ बसाविणें, या शिक्षा एकाच जातीच्या आहेत. मुलांनीं अभ्यास कसा केला आहे हें मार्कांच्या योगानें कळतें व मार्कांच्या योगानें मुलांना प्रोत्साहन देतां येतें. या साधनाचा शिक्षकानें शाहाणपणानें जपून उपयोग केला, तर मुलें झटून अभ्यास करितात व एक प्रकारची चांगली स्पर्धाही त्यांच्यांत उत्पन्न होते. शाळेंत वेळेवर येणें, घरीं नेमून दिलेले धडे व्यवस्थित व नीटनेटके करणें वगैरे कामें लहान मुलें मार्कांच्या लालुचीनें मोठ्या खुषीनें व आनंदानें करीत असतात. मार्क उणे दिल्यानें, जागा खालीं दिल्यानें किंवा वर्गाच्या बाहेर उभें केल्यानें मुलांना आपलें मार्कांचें नुकसान झालें असें वाटतें, व आपणांस दिलेली शिक्षा पाहून त्यांना लाज वाटते, आणि वाईटही वाटतें व पुन्हां तो अपराध न करण्याची तीं काळजी घेतात.

६. खेळाचे जागीं किंवा पुस्तकालयांत जाऊं न देणें. आपल्या प्राथमिक शाळांत मुलांकरितां पुस्तकालयें किंवा क्रीडांगणें नसल्यामुळें या शिक्षांचा जास्त विचार करणें अनावश्यक आहे.

७. मुलांनीं अभ्यास न केला, तर शाळा सुटल्यावर त्यांना बसवून त्यांच्याकडून तो धडा करवून घेण्याची शिक्षा करण्याची कांहीं शाळांतून चाल आहे. धडा केला नाहीं तर संध्याकाळीं शाळा सुटल्यावर सर्व विद्यार्थी बाहेर खेळत असतांना, एकाद्या मुलास बसवून धडा करवावयाचा ही शिक्षा दिली असतां, अपराध केला असतां त्याचें प्रायश्चित्त हें मिळावयाचेंच, व जें आपलें कर्तव्य आपण आळसामुळें करीत नाहीं तें आपणाला भलत्याच वेळीं करावें लागतें, यामुळें आपणांला त्रास होतो, ही गोष्ट मुलांच्या लक्षांत येते व तीं हा अपराध आपल्या हातून न होऊं देण्याची काळजी घेतात. पण ही शिक्षा अगदीं लहान मुलांना कधींही देऊं नये. शाळेंत एके ठिकाणीं पुष्कळ वेळ बसून मुलांना आधींच कंटाळा आलेला असतो. त्यांत त्यांना आणखी कांहीं वेळ शाळेंत बसविलें म्हणजे, त्यांना शाळेचाच अतिशय कंटाळा येतो. त्यांचें डोकें दुखूं लागतें व त्यांना चैन पडत नाहीं. ज्या ठिकाणीं शाळा सुटल्यावर मुलांना बसवून ठेवण्याची शिक्षा देतात, त्या ठिकाणीं कोणा तरी शिक्षकाला आळीपाळीनें शाळा सुटल्यावर बसावें लागतें, यामुळें अप्रत्यक्षपणें शिक्षकालाही शिक्षा होते.

८. मुलांना कांहीं तरी घरून पाठ करावयास किंवा लिहावयास सांगणें. ही शिक्षा अगदीं लहान मुलांना कधींही करूं नये. मुलांचा घरचा वेळ जितका खेळांत जाईल तितका चांगला. एवढ्याचकरितां मुलांना घरीं अभ्यास किती द्यावा, याबद्दल शिक्षणखात्याचे नियम प्रसिद्ध झालेले आहेत. कित्येक शिक्षकांना लहान मुलांना घरीं भरपूर अभ्यास देण्याची खोड असते. मग मुलें रात्रीं रॉकेलच्या दिव्याजवळ बसून झोंपेच्या वेळांतही अभ्यास करीत असतात. जो शिक्षक अशा रीतीनें मुलांना अभ्यास करण्यास सांगतो, तो त्यांची शरीरप्रकृति बिघडविण्याचें पाप मात्र जोडतो. लहान मुलांच्या प्रकृतीस अपाय होईल म्हणून, त्यांना घरीं फारसा अभ्यास करावयास द्यावयाचा नाहीं, असें जर आहे, तर त्यांना शिक्षा म्हणून घरीं अभ्यास देऊं नये हें उघडच आहे. आतां वयानें मोठ्या विद्यार्थ्यांच्या बाबतींत ही शिक्षा कितपत लागू पडते हें आपण पाहूं. कांहीं मुलांना घरीं

लिहावयास दिलें असेल, तें त्यांनीं लिहून न आणल्यास किंवा जें कांहीं पाठ करावयास सांगितलें असेल तें त्यांनीं पाठ करून न आणल्यास, पुन्हां त्यांना तें लिहून आणण्यास सांगणें किंवा पाठ करण्यास सांगणें ही गोष्ट वेगळी. ही कांहीं शिक्षा नव्हे. पण मुलगा उशीरां शाळेंत आला किंवा मध्यंतरीं बोलला किंवा त्यानें सांगितलेलीं दोन उदाहरणें केलीं नाहींत म्हणून त्यास एकादा धडा लिहून आणावयास सांगणें किंवा कवितेच्या कांहीं ओळी पाठ करावयास देणें, ही शिक्षा होय. शिक्षा म्हणून कांहीं ओळी पाठ करावयास देणें चांगलें नव्हे. कोणतीही गोष्ट पाठ होण्यास त्यांत मौज वाटली पाहिजे आणि शिक्षा म्हणून पाठ करण्यास दिलेल्या ओळींत मौज ती काय वाटणार? दुसरें असें कीं, प्रत्येकाची स्मरणशक्ति कांहीं सारखी नसते. तेव्हां मुलांना ही पाठ करण्याची शिक्षा देते वेळेस, ज्या मुलांस ही शिक्षा द्यावयाची, त्याच्या स्मरणशक्तीचा विचार केला पाहिजे, मग ही शिक्षा दिली पाहिजे. घरीं शिक्षेदाखल जें कांहीं लिहावयास द्यावयाचें तें जरी उत्तम गद्य किंवा पद्य असलें तरी तें लिहीत असतांना मुलांना त्याच्याबद्दल कांहीं गोडी वाटत नाहीं; उलट त्या गद्यपद्याबद्दल एका तऱ्हेची शिसारी मुलांचे मनांत उत्पन्न होते. शाळेचा उद्देश मुलांच्या मनांत भाषेंतील गद्यपद्यात्मक उत्कृष्ट लेखांविषयीं आवड उत्पन्न करणें हा आहे. म्हणून शिक्षेदाखल उत्कृष्ट गद्य किंवा पद्य लिहिण्यास अगर पाठ करण्यास कधींही देऊं नये.

पुढील शिक्षांचा विचार करण्यापूर्वीं ही गोष्ट एथें सांगितली पाहिजे कीं **मुलींच्या शाळांतून शिक्षा देण्याची आवश्यकता फार कमी असते.** मुली कोमळ स्वभावाच्या असतात व त्यांच्यांत दांडगाई करण्याची प्रवृत्ति ही कमी असते. मुलींच्या शाळांतून फार झालें तर मार्क उणे करणें, वर्गांत कांहीं वेळ उभें करणें, याच शिक्षा बस्स होतात. **शाळेंत शिक्षेचें प्रमाण जितकें कमी तितकें शिक्षकाचें कौशल्य** जास्त असा नेहमींचा नियम आहे.

**मुलाला कांहीं दिवस शाळेंत येऊं न देणें.** ही शिक्षा प्राथमिक शाळांतून केव्हांही उपयोगांत आणीत नाहींत. दुय्यम प्रतीच्या शाळांत किंवा कॉलेजमध्यें अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष नैतिक अपराधाबद्दल कधीं कधीं ही शिक्षा देतात. म्हणून या शिक्षेचा एथें विचार करण्याची जरूर नाहीं.

**शारीरिक** शिक्षा—कांहीं वर्षांपूर्वी प्रत्येक देशांतील शाळांतून शारीरिक शिक्षेचा उपयोग फार करीत असत. किंबहुना मुलांच्या शिक्षणाला शारीरिक शिक्षा ही अत्यावश्यक आहे आणि तिजवांचून मुलांचा शिक्षणक्रम पुरा व्हावयाचा नाहीं, असा लोकांचा समज असे. '**छडी लागे छम छम विद्या येई घम घम**,' 'Spare the rod and spoil the child' 'लालयेत् पंचवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत्' वगैरे म्हणीवरून या बाबतींत लोकमत काय होतें हें सहज कळतें. आपल्या देशांत देखील थोड्या वर्षांपूर्वी खुर्ची, घोडी, कोलदांडे वगैरे शारीरिक शिक्षेचे अनेक प्रकार शाळांतून दिसत असत. मुलांना गप्प बसवून त्यांना उजळणी, अक्षर वगैरे शिकवावयाचें, एवढेंच शिक्षकाचें कर्तव्य आहे, अशी जेव्हां समज होती, तेव्हां मुलांना गप्प बसाविण्यास व जें आपण सांगूं तें करावयास लावण्यास, त्यांना झोडण्यापेक्षां जास्त सोपें असें दुसरें साधन शिक्षकाचे जवळ नसे. शिक्षणाचें महत्त्व व त्याचें कार्य यांची जाणीव जसजशी जास्त होऊं लागली, तसतसें लोकमत शारीरिक शिक्षेचे विरुद्ध जास्त होत गेलें. आतां शारीरिक शिक्षेचे बाबतींत साधारणपणें खालील गोष्टी सर्वसंमत आहेत असें दिसतें. १ शारीरिक शिक्षा फारच क्वचित् प्रसंगीं करावयाची असते. २ ती एकाद्या मोठ्या नैतिक अपराधाबद्दल—चोरी, नेहमीं खोटें बोलणें, किंवा बुद्ध्या होऊन शाळेच्या शिस्तीच्या नियमांचें उल्लंघन करणें इत्यादि अपराधांबद्दलच—मात्र करावयाची असते. ३ ती हेडमास्तराशिवाय दुसऱ्या कोणत्याही शिक्षकानें करूं नये. ४ तळहातावर छड्या देणें याशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्रकारची शारीरिक शिक्षा करूं नये.

मुलाला त्याच्या आयुष्यांत अत्यंत जाचक होईल, अशी एकादी खोड लागली असेल आणि ती जर इतर उपायांनीं नाहींशी होत नसेल, तर या कामीं शारीरिक शिक्षेचा चांगला उपयोग होतो. मागें चोरी करणाऱ्या मुलाची गोष्ट सांगितली आहे. आईनें जर मुलाला पेरू चोरल्याबद्दल दोन छड्या दिल्या असत्या, तर चोरी करणें ही फार वाईट गोष्ट आहे, अशी त्याची खात्री झाली असती व त्यानें ती वाईट खोड टाकून दिली असती.

ज्या वेळेला मुलाला सुधारण्याबद्दल शिक्षकानें केलेले सर्व उपाय निष्फळ होतात व तें मूल शाळेंत राहिलें, तर ज्याप्रमाणें नासलेल्या

आंब्याच्या योगानें आढींतील चांगले आंबेही नासतात, त्याप्रमाणें इतर मुलेंही त्या मुलाच्या संगतीनें वाईट होतील, अशी शिक्षकास भीति वाटते, त्या वेळेसच त्या मुलाला शाळेंतून बाहेर काढण्याची पाळी शिक्षकावर येते. पण असा प्रसंग प्राथमिक शाळेंत बहुधा कधींही येत नाहीं.

आतां शिक्षेच्यासंबंधानें पुन्हा एकदां महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख करून हा लांबलेला भाग संपवूं.

१. शिक्षा ही बौद्धिक दोषाबद्दल—पाठ न होणें, उदाहरणें, कविता वगैरे न समजणें—कधींही देऊं नये. त्याचप्रमाणें हाताच्या जडपणाबद्दल शिक्षा देऊं नये.

२. शिस्तीच्या साधनांपैकीं शिक्षा हें एक गौण साधन आहे, असें समजून शिक्षकानें त्याजवर विशेष अवलंबून राहूं नये.

३. शिक्षेचा उपयोग जितका जपून करावा तितका तिजपासून कार्यभाग जास्त होतो.

४. लहान शिक्षेनें जेथें कार्य होईल तेथें मोठी शिक्षा कधींही करूं नये.

५. अपराध केला कीं शिक्षा होणार, अशी विद्यार्थ्यांची खात्री असली तरच शिक्षेपासून फायदा होतो.

६. मुलींच्या शाळेंत बहुतेककरून शिक्षेचा उपयोग करूं नये. करणें असेल तेव्हां अत्यंत सौम्य शिक्षेचा उपयोग करावा.

७. मुलाला रागें भरतांना त्याला लागेल असें छद्मी भाषण शिक्षकानें कधींही करूं नये.

८. शिक्षा ही सूड उगविण्याकरितां द्यावयाची नसून, मुलांत सुधारणा व्हावी ह्या हेतूनें द्यावयाची असते.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग १९ वा.

### बक्षिसें.

शाळेंत शिस्त राखण्याच्या साधनांपैकीं दोन साधनें जीं शिक्षा व बक्षिसें, त्यांपैकीं शिक्षा या साधनाचा आपण मागील भागांत विचार केला. आतां या भागांत आपण बक्षिसें या साधनाचा विचार करूं. लहान मुलांची प्रवर्तकशक्ति फार दुर्बल असते, यामुळें एकादी योग्य कृति त्यांचे हातून घडण्यास त्यांना बक्षीस किंवा प्रशंसा यासारखें कांहीं तरी आमिष दाखवावें लागतें, हें आपण मागें पाहिलेंच आहे. मुलांनीं केलेल्या एकाद्या कृतीबद्दल वडील माणसांनीं त्यांना शाबासकी दिली किंवा त्यांची स्तुति केली किंवा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें त्यांची ती कृति आपणांस पसंत आहे, व तिच्यापासून आपणांस आनंद होत आहे असें दाखविलें, तर लहान मुलांना त्यापासून संतोष होतो, व ती कृति पुन्हा करण्यास त्यांना प्रोत्साहन मिळतें. तेव्हां अशा तऱ्हेच्या स्तुतीला किंवा शाबासकीला देखील बक्षिसाच्या वर्गांत घालण्यास हरकत नाहीं. या दृष्टीनें बक्षिसांचा विचार केला, तर शिक्षकानें मुलांना प्रोत्साहन देण्याचे व त्यांच्या एकाद्या कृतीपासून आपणांस संतोष झाला आहे हें दाखविण्याचे पुढें लिहिलेले प्रकार शाळांतून दृष्टीस पडतात. १ मुलानें केलेल्या एकाद्या कृतीबद्दल आपला संतोष व पसंती नजरेनें व्यक्त करणें. २ ‘ वा ! ठीक ’ ‘ उत्तम आहे ! ’ ‘ शाबास ’ अशा कांहीं तरी शब्दांनीं शिक्षकानें मुलांच्या एकाद्या कृतीबद्दलची आपली पसंती व संतोष व्यक्त करणें. ३ मार्क देणें, वर्गांत वर जागा देणें. ४ वर्गांत मानाचा अधिकार देणें. ५ पदकें, बिल्ले वगैरे सन्मानदर्शक चिन्हें देणें. ६ पुस्तकें पैसे वगैरे देणें. वरील यादींत एकापेक्षां एक जास्त असा, बक्षिसांचा अनुक्रम दाखविला आहे.

लहान मुलांची प्रवर्तकशक्ति दुर्बल असते, म्हणून योग्य कृति त्यांनीं करावी व अशा रीतीनें त्यांना ती कृति करण्याची संवय लागावी, एवढ्याकरितां

शिक्षकाला व वडील माणसांना त्यांना उत्तेजन द्यावें लागतें. मुलांनीं स्वतः प्रयत्न करून एकादी चांगली कृति केली व शिक्षकानें त्या कृतीबद्दल त्यांना शाबासकी दिली, तर त्यांना आनंद होतो व आपले श्रम सफल झाले असें वाटतें. शिक्षकाचे बद्दल मुलांचे मनांत आदर व पूज्यबुद्धि असली म्हणजे, मुलें त्याच्या शाबासकीला फार मान देतात. आपल्या शाबासकीचा उपयोग शिक्षकानें फार जपून केला पाहिजे. एकादें गणित मुलांनीं केलें कीं, दे त्यांना शाबासकी, मुलें वेळेवर आलीं कीं, दे त्यांना शाबासकी, धडा चांगला वाचला कीं, दे त्यांना शाबासकी, असें जर शिक्षक करूं लागला, तर त्याच्या शाबासकीची किंमत अगदींच कमी होते. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, या शाबासकीपासून मुलांची अशी समजूत होते कीं, शाळेंतील प्रत्येक कृतीबद्दल आपणांस शाबासकी ही मिळालीच पाहिजे. मग अशी स्थिति होते कीं, मुलांना या शाबासकीचें व्यसनच लागतें व तिजशिवाय त्यांना बरें वाटत नाहीं. एकादी योग्य कृति केली, तर स्वतांच्या मनाला जें समाधान होतें तें या मुलांना होत नाहीं, व त्यांना आपल्या कृतीबद्दल संतोष होण्यास प्रत्येक वेळीं दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागतें. ही परावलंबी होण्याची संवय चांगली नव्हे. ही संवय पुढील आयुष्यांत फार जाचक होते. योग्य कृति केल्यापासून स्वतांच्या मनाला जो आनंद वाटतो तो होत नसल्यामुळें, 'लोकांना ही आपली कृति कशी आवडेल, लोक हिला चांगलें म्हणतील कीं नाहीं,' याच विचारानें मनुष्य व्यग्र होतो. मग त्याच्या हातून चांगल्या कृति कशा घडणार ? शिक्षकानें व घरच्या वडील माणसांनीं आपल्या शाबासकीचा उपयोग फार जपून करावा म्हणजे, मुलांना ही परावलंबनाची वाईट खोड लागणार नाहीं. मुलांच्या प्रत्येक कृतीबद्दल ' वाहवा ! शाबास ! ' असें म्हणत जाणें म्हणजे, आपल्या शब्दांची किंमत कमी करून, शिस्त राखण्याचें एक साधन अजीबात आपल्या हातून गमावण्यासारखें आहे.

उदाहरण बरोबर करणें, उत्तर बरोबर देणें, वगैरे बारीक सारीक दररोजच्या कृतींत आपली पसंती दाखविण्याचा योग्य मार्ग म्हटला म्हणजे, शिक्षकाची नजर हा होय. या योगानें मुलांच्या कृतीबद्दल आपली पसंती

गाजावाजा न करितां किंवा त्या गोष्टीला विशेष महत्त्व न देतां सहज दाखवितां येते. मागील भागांत सांगितलें आहे कीं, बारीक सारीक गोष्टींत आपली नापसंती व असंतोष दाखविण्याचें नजर हें उत्कृष्ट साधन आहे. त्याचप्रमाणें शिक्षकाला मुलांच्या दररोजच्या बारीक सारीक गोष्टींबद्दल पसंती व संतोष दाखविण्याचें नजर हें उत्कृष्ट साधन आहे.

'मार्क' हें शाळेंत शिस्त राखण्याचें व मुलांचा अभ्यासक्रम कसा चालला आहे, त्यांत त्यांची कोठपर्यंत प्रगति झाली आहे, हें कळण्याचें चांगलें साधन आहे. मार्क व इतर बक्षिसें देतांना,एक महत्त्वाचा नियम आहे, तो शिक्षकानें नेहमीं आपल्या लक्षांत ठेविला पाहिजे. कठीण उदाहरणें सोडवितां येणें, गद्य व पद्य चांगलें समजणें, उत्कृष्ट स्मरणशक्ति वगैरे बौद्धिक गुणांबद्दल व अक्षर चांगलें काढणें, ड्रॉइंग उत्तम काढणें वगैरे हाताच्या सफाईच्या कामाबद्दल मुलांना बक्षीस मिळतें. आतां उत्तम बुद्धि व हाताची सफाई या गोष्टी ईश्वरदत्त आहेत. या गोष्टी फार इष्ट आहेत व ज्या मुलांना या मिळतील तीं भाग्यवान् होत. बक्षिसें देतांना—मग तीं बक्षिसें मार्क, पुस्तकें वगैरे कोणत्या का स्वरूपाचीं असोत—नेहमीं, आपण ज्यांच्यावर ईश्वरानें कृपा केली आहे अशाच मुलांना तीं देतों. पण बक्षिसें देण्याचा मुख्य हेतु, मुलांना स्वतांच्या प्रयत्नांनीं योग्य कृति करण्यास उत्तेजन देणें हा आहे. पण तो अशा रीतीनें बक्षिसें देण्याच्या पद्धतीनें सफल होत नाहीं. परीक्षेंत सगळीं बक्षिसें बुद्धिमान् मुलांना मिळतात. साधारण बुद्धीच्या मुलानें किती जरी श्रम केले, तरी त्याला बक्षिसें मिळण्याची आशाच नसते. यामुळें, असें होतें कीं, बुद्धिमान् मुलांना बक्षिसें मिळणें हा आपला हक्कच आहे असें वाटतें, व मग बक्षिसें मिळाल्यानें त्यांना विशेषसें प्रोत्साहन मिळत नाहीं. उलट पक्षीं, साधारण बुद्धीच्या मुलांनीं कितीही प्रयत्न केले, तरी बक्षीस मिळण्याची आशा नसल्यामुळें तीं निराश होतात, व प्रयत्न करण्यास त्यांना बिलकुल उत्साह राहात नाहीं. एवढ्याकरितां शिक्षकानें, जीं मुलें विशेष प्रयत्न करतील तीं जरी वर आलीं नाहींत, तरी त्यांच्या प्रयत्नाबद्दल कांहीं तरी बक्षीस देण्यास विसरूं नये; म्हणजे मग बक्षिसें देण्याचा जो हेतु तो तडीस जाईल. एकादें कठीण उदाहरण बरोबर सोडविण्याबद्दल जर १० मार्क असले, तर ज्या मुलांनीं तें सोडविण्याचा मनापासून प्रयत्न केला असेल त्यांचें उत्तर बरोबर न आलें, तरी शिक्षकानें

कांहीं तरी मार्क त्यांना द्यावे. तसेंच बुद्धीच्या श्रेष्ठतेबद्दल बक्षिसें देतांना, जीं मुलें उत्तम रीतीनें वागत असतील त्यांनाही बक्षिसें देऊन, आज्ञापालन, सहानुभूति, नियमितपणा, प्रामाणिकपणा वगैरे नैतिक गुणांनाही आपण मान देतों ही गोष्ट व बुद्धीपेक्षां शील कोणत्याही प्रकारें कमी नाहीं ही गोष्ट मुलांच्या मनावर बिंबविली पाहिजे. जीं मुलें नियमितपणें येत असतील व वर्गांत चांगल्या रीतीनें वागत असतील, त्यांनाही या त्यांच्या उत्तम वर्तनाबद्दल बक्षीस मिळणें अवश्य आहे.

मार्कांच्या बाबतींत एक गोष्ट अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, या मार्क देण्याच्या पद्धतीपासून वर्गामध्यें मुलांत मत्सर उत्पन्न होतां कामा नये. श्रम करण्याला प्रोत्साहन मिळण्याचेऐवजीं,जर वर्गांत मार्क देण्याच्या पद्धतीनें भांडणें उपस्थित होऊं लागलीं व वर्गांतील जूट नाहींशी होऊन मुलांतील सहानुभूति जर अजीबात नाहींशी झाली, तर मार्क शिस्त राखण्याचे ऐवजीं वर्गांतिल शिस्त मोडण्याचें साधन होईल. तेव्हां या बाबतींत शिक्षकानें फार जपलें पाहिजे व मार्क देण्याच्या पद्धतीपासून अनिष्ट परिणाम होऊं नयेत, याजबद्दल त्यानें खबरदारी घेतली पाहिजे.

बुद्धिमान् मुलांना वर्गनियंता नेमण्याची कित्येक शाळांतून चाल आहे, पण अशा मानाचे जागीं मुलांना नेमतांना, त्यांच्या वर्तनाकडेही शिक्षकाचें विशेष लक्ष पाहिजे, आणि ही जागा मिळण्याला नुसती बुद्धि असून चालणार नाहीं, तर उत्तम वर्तनही अवश्य लागतें अशी मुलांची खात्री झाली पाहिजे. साधारण बुद्धीचा मुलगा जर उत्तम वर्तनाचा असेल, व बुद्धिमान् मुलगा असूनही जर तो फार खोडकर असेल, तर साधारण बुद्धीच्या मुलाला मानाची जागा देणें हें बरें.

हायस्कूलस आणि कॉलेजें यांच्यामधून मानाच्या अधिकारावर असणाऱ्या विद्यार्थ्यांना फीत, फूल, बिल्ला वगैरे, कांहीं तरी सन्मानदर्शक चिन्ह देतात. जे विद्यार्थी चांगल्या रीतीनें वागतात अशाच विद्यार्थ्यांना हे अधिकार देतात. यामुळें या जागेवर असणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल इतर विद्यार्थ्यांचे मनांत आदर असतो व आपणांलाही असेच अधिकार मिळावे म्हणून ते झटत असतात. कांहीं शाळांतून सन्मानदर्शक चिन्हें, पुस्तकें व इतर बक्षिसें हीं देण्याचे वेळीं मोठा समारंभ करितात. त्या समारंभास मुलांचे

सर्व पालक, शाळेचे पंच किंवा इतर व्यवस्थापक मंडळी, गांवांतील शिष्ट मंडळी या सर्वांना निमंत्रण देतात. या वेळीं हीं बक्षिसें कोणा तरी थोर गृहस्थाचे हातून वांटतात. हा सर्व समारंभ पाहून मुलांच्या मनावर चांगला परिणाम होतो. अशा या समारंभांत बक्षिसें मिळणें हें बहुमानाचें चिन्ह आहे असें तीं समजतात. अशीं बक्षिसें आपणांस मिळावीं म्हणून साहजिकपणें सर्व मुलांना इच्छा होते व त्याजकरितां झटण्यास त्यांना उत्तेजन येतें. ज्यांना बक्षिसें मिळतात, त्यांना आपल्या श्रमाचें सार्थक्य झालें असें वाटून समाधान होतें व जास्त श्रम घेण्यास त्यांना उत्साह येतो.

बक्षिसाच्या संबंधानें खालील गोष्टी लक्षांत ठेवण्याजोग्या आहेतः—

१. बक्षिसें किंवा प्रशंसा या दोहींचाही उपयोग फारच बेतानें केला पाहिजे, नाहीं तर त्यांजपासून अनिष्ट परिणाम होतो.

२. बक्षिसें हीं नेहमींच बुद्धीच्या श्रेष्ठपणाबद्दल किंवा स्वाभाविक असलेल्या हातसफाईबद्दल देऊं नयेत. जीं मुलें मनापासून प्रयत्न करीत असतील, त्यांनाही त्यांच्या परिश्रमाबद्दल बक्षीस मिळावें व जीं मुलें शाळेंत उत्तम वर्तन ठेवीत असतील, त्यांनाही बक्षीस मिळणें योग्य आहे.

३. बक्षिसें हीं मोठ्या किंमतीचीं नसावीं.

४. मुलें जसजशीं मोठीं होतील तसतशी बक्षिसांची संख्या कमी व्हावी.

५. 'जें आपलें कर्तव्य आहे तें मनापासून केलेंच पाहिजे, मग त्याजपासून आपला स्वार्थ साधो वा न साधो, त्याजबद्दल लोक आपली स्तुति करोत, वा निंदा करोत; त्याची पर्वा करावयाची नाहीं. कर्तव्य केल्यानें स्वतःच्या अंतःकरणाला जें समाधान होतें तेंच कर्तव्याचें खरें बक्षीस होय,' हें ध्येय शिक्षकानें मुलांच्या नजरेपुढें ठेविलें पाहिजे व मुलांच्या हातून या ध्येयाप्रमाणें कृति घडावी, याजकरितां त्यानें प्रयत्न केला पाहिजे.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग २० वा.

## शिकविण्याचीं साधनें.

शिकविण्याच्या सर्व साधनांत प्रश्न हें फार महत्त्वाचें साधन आहे. लहान मुलांच्या शिक्षकाचें तर या साधनावांचून बिलकुल चालावयाचें नाहीं. उत्तम प्रश्न विचारतां येणें ही एक कला आहे आणि ही कला साध्य झाल्याशिवाय, शिक्षकाला आपलें काम चांगल्या रीतीनें करितां यावयाचें नाहीं.

मुलांचें लक्ष धड्याकडे वेधून घेण्यास, त्यांच्या विचारशक्तीला व्यवसाय देण्यास, मुलांना स्वतांच्या प्रयत्नांनीं नवीन ज्ञान संपादन करण्याचे कामीं मदत करण्यास, आपण जें कांहीं शिकवीत आहों तें आपल्या विद्यार्थ्यांना कोठपर्यंत कळलें आहे हें समजण्यास, व याचसारख्या दुसऱ्या अनेक कामांत शिक्षकाला प्रश्नांचा फार उपयोग होतो. शिक्षकाला प्रश्न-पद्धतीचे मुख्यत्वेंकरून पुढें दिलेले पांच उपयोग होतात.

१. एकादा नवीन पाठ देण्याचे आधीं मुलांची पूर्वतयारी कोठपर्यंत आहे, म्हणजे नवीन धडा समजण्यास अवश्य लागणारें ज्ञान मुलांना आहे किंवा नाहीं, नसल्यास कोणत्या रीतीनें तें अपुरें आहे, हें कळल्याशिवाय शिक्षकाला आपला धडा चांगल्या रीतीनें देतां येत नाहीं. धड्याच्या आरंभीं थोडेसे प्रश्न विचारले म्हणजे, मुलांना आपला पाठ कोणत्या रीतीनें शिकविला म्हणजे तो चांगला कळेल, याची यथार्थ कल्पना शिक्षकाला होते. दुसरें असें कीं, शिक्षकाच्या या प्रश्नांनीं अमुक एक गोष्ट आपणांस एथपर्यंत माहीत आहे, पण याच्या पुढें ती आपणांस येत नाहीं व तीच शिक्षक आपणांस शिकविणार आहे, हें मुलांना कळतें व जिज्ञासेमुळें त्यांचें लक्ष धड्याकडे लागतें.

२. शाळेच्या अभ्यासक्रमांतील निरनिराळे विषय शिकत असतांना, मुलांच्या मानसिक शक्तींना व्यवसाय मिळून त्यांचा विकास होतो, हें मागें सांगितलेंच आहे. या प्रश्नपद्धतीच्या योगानें मुलांना विचार करावा लागतो. यामुळें साहाजिकपणेंच त्यांच्या बुद्धीला व्यवसाय मिळून तिची वाढ होते. हा प्रश्नांचा फार महत्त्वाचा उपयोग आहे. जो शिक्षक पाठ देतांना आपण स्वतःच बोलत राहातो व फक्त ऐकण्याचें काम मुलांकडे सोंपवितो, त्याच्या धड्याकडे थोड्याच वेळांत मुलें लक्ष देईनाशीं होतात, व तीं स्वतः मुळींच विचार करीत नाहींत, यामुळें शिक्षणदृष्ट्या असा पाठ अगदीं निरुपयोगी ठरतो.

३. मुलांना आपल्या प्रयत्नानें ज्ञान मिळविण्यास शिकवावें व अशा रीतीनें त्यांना आपल्या परिश्रमानें नवीन ज्ञान संपादन करण्याची संवय लावावी, हें शाळेंतील शिक्षणक्रमाचें ध्येय असलें पाहिजे. जेव्हां एकादा पाठ कठीण असेल, तेव्हां खरा शिक्षक त्याचे योग्य ते भाग पाडतो, व एकेक भाग क्रमाक्रमानें घेऊन, मुलांना एकामागून एक असे प्रश्न विचारून, त्यांना विचार करावयास लावितो; अगदीं अवश्य असेल त्याच ठिकाणीं तो त्यांना मदत करितो व अशा रीतीनें तो नवीन पाठ मुलांना समजावून देतो. हें नवीन ज्ञान मुलांनीं बहुतेक आपल्याच प्रयत्नानें संपादन केलें असल्यामुळें तें मुलांच्या मनांत कायमचें राहातें. उलटपक्षीं शिक्षकानें आपण जर सर्व धडा समजावून दिला, तर मुलांच्या विचारशक्तीला व्यवसाय न मिळतां अनायासें प्राप्त झालेलें हें ज्ञान घरीं आलेल्या पाहुण्याप्रमाणें थोडे दिवस राहून नाहींसें होतें. प्रश्नपद्धतीनें मुलांना स्वतां विचार करण्याची व स्वतांच्या प्रयत्नानें एकादी कठीण गोष्ट समजावून घेण्याची संवय लागते, हा या पद्धतीचा तिसरा फायदा आहे.

४. पाठ चालू असतां त्याचा एक भाग संपला कीं, प्रश्न विचारून मुलांना आपण जें कांहीं शिकविलें तें कोठपर्यंत कळलें हें शिक्षकाला कळतें. पुष्कळ वेळां असें होतें कीं, शिक्षकाला वाटतें कीं, जें कांहीं मी शिकवीत आहें तें मुलांना पूर्णपणें समजत आहे. उलटपक्षीं मुलांचा पाठाविषयींचा समज कांहीं निराळाच झालेला असतो. पूर्व भाग न कळल्यामुळें सहजच त्यांना पुढील भाग मुळींच कळत नाहीं. यामुळें शिक्षकाचे श्रम व मुलांचा काळ अगदीं फुकट जातात. पाठाचा एक भाग झाल्यावर

त्याच्या संबंधानें प्रश्न विचारले म्हणजे, जें कांहीं शिकविलें तें पूर्णपणें मुलांना कळलें कीं नाहीं, त्यांच्या समजुतींत कांहीं गोंधळ झाला आहे कीं काय, कांहीं भाग अर्धवट समजला आहे कीं काय, हें सर्व शिक्षकाला समजतें व त्याप्रमाणें त्याला आपला शिकविलेला भाग पुन्हा सुधारून घेतां येतो व मग मुलांना पुढील दुसरा भाग समजण्यास सोपा जातो, हा या पद्धतीचा चौथा मोठा फायदा आहे.

५. शिक्षक देत असलेला पाठ संपला कीं, मुलांना थोडेसे प्रश्न विचारून झालेल्या धड्याची त्याला उजळणी करितां येते व त्यांतील मुख्य मुख्य गोष्टी मुलांच्या मनांवर बिंबवितां येतात आणि पाठांतील निरनिराळ्या मुद्द्यांची संगति जुळवून, ती मुलांचे पुढें स्पष्टपणें मांडतां येते, हा या प्रश्नपद्धतीचा पांचवा फायदा आहे.

शिक्षक जो विषय शिकवीत आहे, त्याचें जर त्याला चांगलें ज्ञान असेल, त्यानें आपल्या पाठाचा सर्व बाजूंनीं विचार करून तयारी करून ठेविली असेल, त्याला जर आपल्या विद्यार्थ्यांपैकीं प्रत्येकाच्या विचारशक्तीची यथार्थ कल्पना असेल, त्याला आपले प्रश्न सोप्या व सरळ भाषेंत व थोड्या शब्दांत विचारतां येत असतील, प्रश्न विचारतांना जर त्याची वृत्ति उल्हासित व तरतरीत असेल, तर प्रश्नपद्धतीपासून होणारे सर्व फायदे त्याच्या विद्यार्थ्यांना मिळतील.

प्रश्नांचे जें वर निरनिराळे उपयोग सांगितले आहेत त्यावरून हें लक्षांत येईल कीं, प्रश्नांचे साहजिकपणेंच दोन प्रकार होतात. १ ल्या प्रकारच्या प्रश्नांनीं मुलांच्या स्मरणशक्तीला जास्त काम पडतें व विचारशक्तीला कमी काम पडतें. धड्याच्या प्रारंभीं मुलांची पूर्व तयारी किती आहे हें पाहाण्याचे कामीं, धड्याचा एक भाग संपला कीं, तो मुलांना समजला कीं नाहीं हें समजण्यास व धड्याचे शेवटीं उजळणी घेण्याचे कामीं या प्रश्नांचा उपयोग होतो. दुसऱ्या प्रकारच्या प्रश्नांत मुलांच्या विचारशक्तीला विशेष काम पडतें. नवीन ज्ञान संपादन करण्याचे कामीं या प्रश्नांचा फार उपयोग होतो.

शिक्षणदृष्ट्या योग्य अशा प्रश्नांत पुढें दिलेल्या गोष्टी अवश्य असल्या पाहिजेत.

१. प्रश्नांची भाषा अतिशय सोपी, सरळ व सहज कळण्याजोगी असावी, म्हणजे प्रश्नांचे योगानें शिक्षकाला काय पाहिजे याची मुलांना सहज कल्पना होते. प्रश्न स्पष्ट नसला किंवा त्याचीं अनेक उत्तरें संभवत असलीं, तर मुलांचा घोटाळा होतो व प्रश्नाला उत्तर काय द्यावें हें त्यांना स्पष्ट समजत नाहीं. मग विचार न करितां कांहीं तरी उत्तर देण्याचा किंवा उत्तरच न देण्याचा त्यांना मोह होतो. प्रश्न जितका लहान असेल तितका चांगला. कारण प्रश्न मोठा असून त्यांत जर बरींच वाक्यें असतील, तर मुलांना प्रश्न समजण्यासच बराच वेळ लागतो व प्रयत्न करावा लागतो; यामुळें शिक्षकाचें प्रश्नोत्तराचें काम भराभर चालत नाहीं व वर्गाचा विनाकारण वेळ जातो. प्रश्नामध्यें प्रस्तावनेदाखल किंवा मुलांना प्रोत्साहनपर शब्द घालून तो फुगविण्याची कित्येक शिक्षकांना खोड असते, पण ती चांगली नव्हे. ‘ बरें तर मुलांनो, उंच पर्वतावर थंड हवा कां असते हें सांगा पाहूं. मीं तुम्हांला काल जें सांगितलें तें जर आठवत असेल व जरा तुम्हीं विचार केला, तर या प्रश्नाचें उत्तर देणें तुम्हांला कांहीं कठीण वाटणार नाहीं ! ’ अशा प्रश्नांत इतर शब्दांच्या अवडंबराखालीं मूळच्या प्रश्नांतील शब्द लपून जातात. तसेंच अर्धवट प्रश्न विचारल्यावर मुलांना हा प्रश्न समजणार नाहीं, अशी कल्पना मनांत येऊन कित्येक शिक्षकांना आपला प्रश्न अर्धवट बदलून एक निराळाच प्रश्न विचारण्याची संवय असते. या योगानें मुलांचा गोंधळ उडतो. एकादा प्रश्न मुलांना कळणार नाहीं असें जर शिक्षकाला वाटलें, तर त्यानें तो प्रश्न तसाच सोडून देऊन पुन्हा निराळाच प्रश्न विचारावा. ज्याच्या योगानें प्रश्न विचारणाराचा आशय स्पष्ट होत नाहीं असा प्रश्न विचारूं नये. ‘ गंगानदी कशी आहे ?’ ‘ शिवाजी राजा कसा होता ? ’ या प्रश्नांवरून विचारणाराला कोणत्या विशेष गोष्टीबद्दल माहिती पाहिजे याचा बोध होत नाहीं.

२. प्रश्न असा असावा कीं, त्या योगानें मुलांना कांहीं तरी विचार करावा लागेल. कित्येक शिक्षक जी गोष्ट मुलांनीं विचार करून सांगावयास पाहिजे, ती स्वतांच सांगतात व नंतर मुलांना प्रश्न विचारण्याचा आव आणतात. पण हे प्रश्न असे असतात कीं, त्यांचें उत्तर होय किंवा नाहीं असेंच असतें, व हें उत्तर मुलें विचार न करतां तेव्हांच देतात. शिक्षकाच्या आवाजावरून, त्यानें ज्या शब्दावर जोर दिला असेल त्या शब्दा-

वरून त्याला काय उत्तर पाहिजे हें मुलांना चटकन कळतें. खालील उताऱ्यावरून या प्रश्नोत्तराची स्पष्ट कल्पना होईल. हा उतारा मि. ल्यांडन यांच्या ‘ शिक्षणसूत्रें ’ नामक ग्रंथांतून घेतला आहे.

मुलगा उदाहरण वाचतो, ‘ एका शेतकऱ्याचीं दोन शेतें होतीं. पहिल्या शेतांत आठ गाई होत्या व दुसऱ्या शेतांतील गाईंच्या संख्येचा $\frac{1}{3}$ पहिल्या शेतांतील गाईंच्या संख्येच्या $\frac{3}{4}$ बरोबर होता, तर शेतकऱ्या-जवळ एकंदर गाई किती होत्या ?’

**शिक्षकः**—बरें तर मुला, पहिल्याप्रथम आपणांला ८ चा $\frac{3}{4}$ काढला पाहिजे. नाहीं बरें ?

**मुलगाः**—होय गुरूजी.

**शिक्षक**—८ चा $\frac{1}{4}$ दोन असतो. मग ८ चा $\frac{3}{4}$ हा दोहोंच्या तिप्पट म्हणजे ६ होईल. असेंच कीं नाहीं ?

**मुलगाः**—होय गुरूजी.

**शिक्षकः**—( जरा थांबून ) मग उदाहरणांत काय सांगितलें आहे ? सहा गाई या दुसऱ्या शेतांतील गाईंच्या एका तृतीयांशाबरोबर आहेत. असेंचना ?

**मुलगाः**—होय गुरूजी.

**शिक्षकः**—एकतृतीयांश गाईंची संख्या जर ६ आहे, तर सर्व गाईंची संख्या सहाच्या तिप्पट होईल कीं नाहीं ?

**मुलगाः**—होईल तर.

**शिक्षकः**—मग दुसऱ्या शेतांत सहा त्रिक अठरा गाई व पहिल्या शेतांतील आठ गाई मिळून एकंदर गाई सव्वीस झाल्या कीं नाहीं ?

**मुलगाः**—होय गुरूजी.

अशा रीतीनें ज्या प्रश्नांत मुलांना बिलकूल विचार करावा लागत नाहीं, पण नुसत्या शिक्षकाच्या म्हणण्याचा प्रतिध्वनि करावा लागतो, ते प्रश्न शिक्षणदृष्ट्या अगदीं निरुपयोगी होत.

३. प्रश्न असे असावेत कीं, ते मुलांच्या आटोक्याबाहेरचे नसावे. विचार केला असतां मुलांना सोडवितां यावे असेच प्रश्न असावे. जी

माहिती मुलांना नाहीं तिजबद्दलचे प्रश्न किंवा ज्याचें उत्तर विचार करूनही मुलांच्या लक्षांत येणार नाहीं असे प्रश्न कधींहि विचारूं नयेत. शिक्षकाला कित्येक प्रश्न फार सोपे वाटतात, परंतु वास्तविक ते फार कठीण असतात. हे प्रश्न मुलांच्या आवांक्याबाहेरचे आहेत ही कल्पना कित्येक शिक्षकांला येत नाहीं, यामुळें त्यांना कठीण प्रश्न विचारण्याचा मोह होतो. असे प्रश्न नेहमींच विचारले, म्हणजे मुलांना असें वाटतें कीं, आपणांस कांहीं येत नाहीं. मग तीं खिन्न होतात व शिक्षकानें कांहींही विचारलें असतां त्याचें उत्तर देण्याचा प्रयत्नच करीत नाहींत. अशी स्थिति होणें इष्ट नाहीं. मुलांना व्याख्या विचारल्या असतां, तीं नेहमीं गोंधळून जातात. व्याख्या देणें हें काम फार कठीण आहे. मुलांना एकाद्या गोष्टीचें वर्णन करितां येतें, पण त्यांना त्या गोष्टीची व्याख्या देणें फारच कठीण वाटतें. सबंध पाठ समजावून दिल्यावर त्यांत येणाऱ्या व्याख्या मुलांना विचारल्यास हरकत नाहीं व धडा चांगला समजला असल्यास मुलें आपल्या शब्दांत ती व्याख्या देण्याचा प्रयत्न करितात, पण मुलांना धडा समजण्याचे आधींच व्याख्या विचारणें बरें नव्हे.

साधारणपणें प्रश्न असे असावे कीं, विचार केला असतां ते वर्गांतील बहुतेक मुलांना सोडवितां आले पाहिजेत. वर्गांत अगदींच मागें असणाऱ्या मुलांकरितां, अगदीं सोपे असे कांहीं प्रश्न विचारले पाहिजेत. मधून मधून कांहीं कठीण प्रश्न वर्गांतील हुशार मुलांकरितां विचारावे. कित्येक वेळां एकादा कठीण प्रश्न असल्यास तो मुलांना घरीं विचार करून सोडवून आणण्यास सांगावा.

एकादा भाग समजण्यास कठीण असेल, तर त्याचें पृथक्करण करून अनेक लहान लहान प्रश्न विचारून मुलांच्याकडून उत्तरें घेऊन, तो सर्व कठीण भाग स्पष्टपणें मुलांच्या लक्षांत आणण्यांतच शिक्षकाचें खरें चातुर्य असतें. पर्वताच्या उंच शिखरावर एकदम जाणें अशक्य असतें. ह्मणून रस्ते बांधणारे इंजिनियर रस्त्याला वांकणें देत देत व आपण चढत आहोंत हें चालणाऱ्याच्या लक्षांत येणार नाहीं व त्याला श्रम वाटणार नाहींत, एवढाली चढण रस्त्याला हळूहळू देऊन, रस्ता शिखराकडे नेतात. त्या योगानें प्रवाशी हळूहळू, श्रम न होतां शिखरास जाऊन पोहोंचतो. ह्याप्रमाणें शिक्षकाचें आहे. कठीण भागाचें पृथक्करण करून, त्यांतील लहान

लहान मुद्दे निरनिराळे स्पष्ट करून, सर्व भाग समजावून देण्यांतच शिक्षकाचें चातुर्य असतें.

४ एकाच पद्धतीनें प्रश्न कधींही करूं नयेत. असें झाल्यास मुलांना एकाच पद्धतीनें उत्तरें देण्याची संवय जडते. कित्येक वेळां आपल्या पाठांची तयारी केली नसल्यामुळें शिक्षकाला असे प्रश्न विचारणें भाग पडतें. ‘ पुढें काय झालें ’ ‘ मग काय होतें ? ’ अशा प्रश्नांची त्याला माळ गुंफावी लागते. पण असें होणें चांगलें नव्हे. त्याचप्रमाणें शिक्षकानें पुस्तकांतल्या भाषेंतच प्रश्न विचारूं नयेत. या योगानें पुस्तकांत लिहिलेला मजकूर पाठ करून येण्याचा व अशा रीतीनें विचार करण्याचें काम टाळण्याचा मुलांना मोह होतो. पुष्कळ वेळां एकादी महत्त्वाची गोष्ट मुलांचे मनांत बिंबवावयाची असल्यास पुढें सांगितल्याप्रमाणें प्रश्न निरनिराळ्या रूपांत विचारतां येतील. जसें,–शिवाजीच्या बापाचें नांव काय ? शिवाजी कोणाचा मुलगा होता ? शहाजीच्या मुलाचें नांव काय ? शाहाजी कोणाचा बाप होता ?

५. प्रश्नांमध्यें संगति पाहिजे. एकादा पाठ चालला असतांना प्रश्न असे पाहिजेत कीं, त्यांच्या योगानें धड्यांतील गोष्टी अनुक्रमानें एकामागून एक येऊन धडा संपूर्ण होईल. नाहीं तर एक प्रश्न इकडे तर दुसरा प्रश्न भलतीकडे. असे प्रश्न विचारले कीं, धड्यांतील गोष्टींची संगति न राहिल्यामुळें मुलांना तो धडा बरोबर कळत नाहीं. प्रश्नांत अशी संगति ठेवण्यास शिक्षकानें आपला पाठ फार काळजीपूर्वक वाचला पाहिजे. धड्याची उजळणी करितांना देखील, प्रश्नांची संगति असलेला धडाच मुलांचे उपयोगीं पडतो. शिवाजी कधीं जन्मला ? तो कोठें वारला ? कशानें वारला ? त्याचे सरदार कोण होते ? त्याला किती मुलें होतीं ? अशा तऱ्हेचे विस्कळित प्रश्न विचारले, तर उजळणी देखील चांगली होणार नाहीं.

६. प्रश्न विचारीत असतांना, शिक्षकाची वृत्ति आनंदी व तरतरीत असावी. आळसत आळसत प्रश्न विचारल्यानें मुलांनाही आळस येतो व प्रश्नांचीं उत्तरें देण्याची तीं टाळाटाळ करूं लागतात व केव्हां केव्हां विचार न करितां, कांहीं तरी उत्तर देऊन वेळ मारून नेण्याची त्यांना संवय लागते. प्रश्नोत्तररूपानें चाललेला पाठ नेहमीं आनंदांत

व जोरांत चालला पाहिजे. एकामागून एक असे प्रश्न विचारले पाहिजेत व मुलांनीं त्यांचीं उत्तरेंही भराभर दिलीं पाहिजेत. तरच या पाठाचा उपयोग होतो.

७. शिक्षकानें प्रश्न विचारतांना तो सर्व वर्गाला अनुलक्षून विचारावा. प्रथम एका मुलाला उभें करून नंतर त्याला प्रश्न विचारल्यानें, बाकीचीं मुलें त्या प्रश्नाकडे मुळींच लक्ष देत नाहींत व त्याचा विचारही करीत नाहींत. सर्व वर्गाला प्रश्न विचारल्यानंतर, ज्या मुलांना त्याचीं उत्तरें येत असतील त्यांनीं आपले हात वर करावे. मग शिक्षकानें त्यांजपैकीं कोणा तरी एक दोघांना उभे करून, त्यांना उत्तर देण्यास सांगावें. मंदबुद्धीच्या मुलांना व दुर्लक्ष करणाऱ्या मुलांना प्रश्नांचा मोठा भाग मिळावा. साधारणतः सर्वांना प्रश्नांचीं उत्तरें देण्याची पाळी येईल, अशी काळजी शिक्षकानें घ्यावी. एकादे वेळीं एकादा कठीण प्रश्न मुलांना सांगून त्याचें उत्तर त्यांनीं दुसरे दिवशीं लिहून आणावें, अशीही व्यवस्था कधीं कधीं करण्यास हरकत नाहीं.

वरील विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं, प्रश्नांसंबंधानें पुढें दिलेल्या महत्त्वाच्या गोष्टी शिक्षकानें लक्षांत ठेविल्या पाहिजेत.

१. प्रश्नांची भाषा शुद्ध, सरळ व सुबोध असावी. प्रश्नापासून एकापेक्षां जास्त अर्थ संभवूं नयेत.

२. प्रश्नांच्या योगानें उत्तर देण्यास मुलांना कांहीं तरी विचार करावा लागला पाहिजे.

३. प्रश्न मुलांच्या आटोक्याबाहेरचे नसावे.

४. प्रश्न एकाच प्रकारचे व एकाच पद्धतीनें विचारूं नयेत.

५. प्रश्नांमध्यें संगति असावी.

६. प्रश्नांची वांटणी योग्य प्रकारें व्हावी.

७. प्रश्न विचारतांना शिक्षकाची वागणूक आनंदी व तरतरीत असावी.

प्रश्नांच्या बाबतींत शिक्षकानें जितकी काळजी घ्यावयास पाहिजे, तितकीच काळजी त्यानें उत्तरांच्या बाबतींत घेतली पाहिजे. जेव्हां वर्गांतील सर्वच मुलें कांहीं तरी उत्तरें देतात, तेव्हां ही गोष्ट उघडपणें दिसते कीं,

शिक्षकानें दिलेला पाठ मुलाला समजला नाहीं व तो त्यानें पुन्हा दिला पाहिजे. वर्गातील मुलें जर बुद्धूचाच उत्तरें देत नसतील, तर शिक्षकानें आपले वर्गाला चांगली शिस्त लाविली नाहीं ही गोष्ट उघड दिसून येते.

१. मुलांचीं उत्तरें स्पष्ट असावीं व त्यांची भाषा शुद्ध, साधी व सरळ असावी. प्रश्नांचीं उत्तरें अर्धवट व अपुरीं असल्यास, शिक्षकानें तीं तशींच स्वीकारूं नयेत. आणखी प्रश्न विचारून ज्या मुलानें अर्धवट किंवा अपुरें उत्तर दिलें असेल, त्याजकडून तें स्पष्ट व शुद्ध करून घ्यावें. मुलाला जी गोष्ट विचारली आहे ती जर चांगली कळली नसेल, तर पुन्हा त्याला ती समजावून सांगावी. शिक्षकाच्या प्रश्नांची भाषा जशी असेल त्याजप्रमाणें मुलांच्या उत्तरांचीही भाषा असते. म्हणून शिक्षकानें नेहमीं सरळ व सुबोध वाक्यरचना करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. कित्येक वेळां मुलें प्रश्नांचें अर्धवट उत्तर देतात व मग शिक्षक त्यांत स्वतः भर घालून तें उत्तर पूर्ण करितो. पण हें बरें नव्हे. नेहमीं प्रश्नांचें पूर्ण उत्तर मुलानें दिलें पाहिजे. तें तसें न दिल्यास शिक्षकानें आणखी प्रश्न विचारून मुलांकडून तें पुरें करून घ्यावें. जे प्रश्न सोडविण्याला विचारशक्तीची विशेष जरूर लागते, अशा प्रश्नांचीं उत्तरें मुलांनीं पूर्ण वाक्यांत द्यावीं हें बरें. ज्यावेळीं धड्याची भराभर उजळणी करावयाची असतें, त्यावेळीं पूर्ण वाक्यांत मुलांनीं उत्तरें द्यावींच, अशी नेहमींच शिक्षकानें अपेक्षा करूं नये. मुलें उल्हासित वृत्तीनें व भराभर उत्तर देत आहेत कीं नाहींत इकडे शिक्षकानें लक्ष द्यावें.

कित्येक मुलांना विचार न करितां अदमासानें उत्तर ताबडतोब देण्याची संवय असते. प्रश्न विचारण्याचा अवकाश कीं ताबडतोब या मुलांनीं उत्तर दिलेंच समजावें. जी पहिली कल्पना डोक्यांत येईल तेंच उत्तर. शिक्षकानें या मुलांची ही संवय काढून टाकण्याचा यत्न करावा. विचार करून उत्तर चुकणें व विचार न करितां कांहीं तरी उत्तर देणें, या दोन गोष्टींत महदंतर आहे. विचार न करितां उत्तर देणें हा दोष आहे व तो निष्काळजीपणाचा व आळसाचा परिणाम आहे. कांहीं मुलांना मुद्द्याला सोडून उत्तरें देण्याची खोड असते. जसें पानिपतची लढाई केव्हां झाली? उ०—ही लढाई मराठे व अफगाण यांत झाली व विश्वासराव या लढाईंत मारला गेला. प्र०—दक्षिण हिंदुस्तानांत पूर्ववाहिनी नद्या कोणत्या? उ०—या नद्या बंगालच्या उपसागरास मिळतात. हीं उत्तरें देखील निष्काळजीपणा-

चाच परिणाम आहेत. अशीं उत्तरें देणाऱ्या मुलाला उभें करून शिक्षकानें त्याच्याजवळून योग्य तें उत्तर घेतल्याशिवाय राहूं नये. मुलांनीं प्रयत्न करून दिलेलें उत्तर चुकलें असेल, तर शिक्षकानें एकदम त्या मुलास खालीं बसण्यास न सांगतां, सहानुभूतीनें त्याची चूक त्यास समजावून द्यावी.

सर्व वर्गानें एकदम उत्तर देण्याची पद्धति नेहमीं असणें चांगलें नव्हे. एकादे वेळीं लहान मुलांच्या वर्गांत या पद्धतीचा उपयोग केला, तर हरकत नाहीं. पण एरवीं या पद्धतीचा उपयोग होत नाहीं.

कित्येक शिक्षकांना वाटतें कीं, मुलांना शिक्षकानें कांहींही स्वतां बिलकूल सांगूं नये. सर्व कांहीं मुलांना प्रश्न विचारून काढून घ्यावें; जी गोष्ट मुलांना माहीतच नाहीं, जिची कल्पना त्यांना होणें अशक्य आहे, अशी गोष्ट मुलांना शिक्षकानें सांगणेंच इष्ट आहे. अशा वेळीं प्रश्नोत्तरपद्धतीचा उपयोग करून, उगीच द्राविडीप्राणायामांत वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं.

**साहित्य** हें शिकविण्याचें दुसरें मोठें साधन आहे. हा शब्द फार व्यापक आहे. ज्यांच्या योगानें मुलांना कल्पना स्पष्ट करून देतां येते, त्या सर्व गोष्टींचा समावेश यांत होतो. मग ती गोष्ट पदार्थ असो, अगर शिक्षकानें काढलेलें त्या पदार्थाचें शब्दचित्र असो. त्या सर्वांचा समावेश साहित्य या शब्दांत होतो. साहित्याचा उपयोग जितका जास्त करावा, तितका धडा अधिक मनोरंजक व सुगम होतो. वस्तुपाठाच्या पलीकडे आपल्या प्राथमिक शाळांतून पदार्थ, चित्रें वगैरे साहित्याचा उपयोग करण्याची फारशी प्रवृत्ति दिसत नाहीं. 'शिक्षण नेहमीं इंद्रियद्वारां द्यावें,' 'मुलांना माहीत असलेल्या गोष्टींच्या साहाय्यानें त्यांना माहीत नसलेल्या गोष्टी शिकवाव्या,' 'प्रत्यक्ष पदार्थ मुलांना दाखवून मग त्याबद्दल विचार करण्यास मुलांना सांगावें,' 'धडा शक्य तितका मनोरंजक करावा' इत्यादि शिक्षणशास्त्राच्या नियमांवरून पदार्थ, चित्रें वगैरे साहित्याचें महत्त्व किती आहे हें स्पष्ट होतें. बौद्धिक शिक्षणासंबंधानें विचार करीत असतांना साहित्याबद्दलचें विवेचन केलेंच आहे.

जेव्हां प्रत्यक्ष वस्तु मिळत नसेल, तेव्हां शिक्षकानें त्या वस्तूचें चित्र तरी मुलांना दाखवावें; व तेंही न मिळाल्यास, आपण ती आकृति फळ्यावर काढावी. शिक्षकाला पदार्थांच्या आकृति फळ्यावर काढण्याची

कला अवश्य आली पाहिजे. पुष्कळ वेळां वस्तूच्या चित्रापेक्षां शिक्षकानें काढलेल्या त्या वस्तूच्या आकृतीपासूनच मुलांना जास्त बोध होतो. वस्तु किंवा चित्र दाखवून शिक्षकानें आपणच त्याजबद्दल वर्णन करीत बसूं नये, तर मुलांना प्रश्न विचारून त्या वस्तूचें वर्णन त्यांच्याकडूनच करून घ्यावें. एकाद्या वस्तूचें, प्राण्याचें, एकाद्या प्रसंगाचें, स्थलाचें, मनुष्य-स्वभावाचें शब्दचित्र शिक्षकाला अवश्य रेखाटतां आलें पाहिजे. मुलांच्या दृष्टीपुढें अदृश्य असलेल्या गोष्टी शब्दचित्रानें त्यांच्या दृष्टीपुढें हुबेहूब आणून उभ्या करणें, हें काम फार कठीण आहे. पण ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. तेव्हां ती साध्य करण्याचा प्रत्येक शिक्षकानें प्रयत्न करावा.

शिक्षणाचें तिसरें साधन व्याख्यान हें होय. व्याख्यान हें साधन प्रौढ विद्यार्थ्यांना उपयोगी आहे. लहान मुलांच्या शिक्षकाला तें अगदीं निरुपयोगी आहे. प्राथमिक शाळांतून व्याख्यानाचा उपयोग करणाऱ्या शिक्षकाला शिक्षणशास्त्राचे मुख्य नियमच माहीत नाहींत असें म्हटलें पाहिजे.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग २१ वा.

## पाठ.

पुष्कळ लोकांची अशी समजूत असते कीं, प्राथमिक शाळेंतील शिक्षकांना जे धडे द्यावयाचे असतात, त्यांची त्यांना घरीं तयारी करण्याची बिलकूल आवश्यकता नसते. या लोकांना वाटतें कीं, शाळेंत शिकविण्याचे इतिहास, भूगोल, भाषा वगैरे विषय शिक्षकाला चांगले माहीत असल्यावर त्यांतील धडे त्याला सहजच देतां येतील. मग 'महत्तम साधारण भाजक,' 'निर्मळची जत्रा' किंवा 'हिंदुस्तानांतील नद्या' वगैरे धडे देण्यास तयारी ती काय करावयाची आहे ! परंतु खरा शिक्षक अशी भ्रांतिमूलक समजूत आपल्या मनांत कधींही बाळगणार नाहीं. आपण विद्यार्थ्यांना जो धडा शिकविणार आहों, तो त्यांना चांगल्या रीतीनें समजावा व तो शिकविण्याचे सर्व उद्देश सिद्धीस जावे, असें जर शिक्षकाला वाटत असेल, तर त्यानें आपणाला द्यावयाच्या पाठांत त्या विषयाचा किती भाग द्यावयाचा, त्या धड्यांत मुख्य मुद्दे कोणते घ्यावयाचे, धड्यांतील महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या आहेत व त्या मुलांच्या मनावर कोणत्या रीतीनें बिंबवावयाच्या, मुलांची पूर्व तयारी कोठपर्यंत आहे, त्यांच्या जुन्या ज्ञानाची व या नवीन ज्ञानाची सांगड कशी घालतां येईल, आपल्या धड्यांत आपणाला कोणत्या साहित्याची जरूर लागेल, आपणास कोणते प्रयोग करावे लागतील वगैरे अनेक गोष्टींचा अगोदर विचार केला पाहिजे. नाहीं तर त्याला आपला धडा समाधानकारक रीतीनें शिकवितां येणार नाहीं. 'शिकवावयाचा विषय माहीत असला म्हणजे त्याचे धडे देण्यास पूर्व तयारीची कांहीं जरूर नाहीं' असें विधान, ज्याला शिक्षणशास्त्राची थोडी तरी माहिती आहे, तो कधीं करणार नाहीं.

शाळेंतील शिक्षणक्रमाचे विषय ठरवितांना, कोणते उद्देश दृष्टीसमोर ठेविलेले असतात याचें विवेचन मागें केलेंच आहे. मुलांच्या निर-

निराळ्या मानसिक शक्तींना व्यवसाय मिळून त्यांचा विकास व्हावा, मुलांचें ज्ञान वाढावें, त्यांना आपले हात, डोळे वगैरे इंद्रियांचा चांगला उपयोग करितां यावा, त्यांना उत्तम संवयी लागाव्या, त्यांची शरीर-प्रकृति सुधारावी, याच हेतूंनीं अभ्यासक्रमांतील निरनिराळ्या विषयांची योजना केलेली असते. एवढ्याकरितां शिक्षकानें आपला धडा शिकवितेवेळीं, या धड्याच्या योगानें आपणास कोणते उद्देश साधावयाचे आहेत, हें चांगलें लक्षांत ठेविलें पाहिजे. उदाहरणार्थ, शिक्षक शुद्धलेखनाचा धडा घेत आहे, अशी आपण कल्पना करूं. मुलांना शुद्ध लिहिण्यास शिकवावें हा या धड्याचा एक उद्देश आहे, ही गोष्ट खरी आहे. पण मुलांच्या आंगीं नीटनीटकेपणा यावा व त्यांना एकाग्रतेची संवय लागावी, हाही उद्देश हा धडा देतांना साधावयाचा असतो. शिक्षक शुद्धलेखन सांगत असतांना, मुलांना आपलें सर्व लक्ष त्याच्याकडे द्यावें लागतें, यामुळें साहजिकपणें मुलांना एकाग्रतेची संवय लागते. पण हा उद्देश साधण्याकरितां, मुलांना शुद्धलेखनास सांगत असलेल्या शब्दांचा, त्यानें फक्त एकदांच उच्चार केला पाहिजे. तेच तेच शब्द त्यानें जर दोन वेळां सांगितले, तर मुलें त्याजकडे विशेषसें लक्ष देणार नाहींत व मुलांना मन एकाग्र करण्याचा प्रसंगच या धड्यांत येणार नाहीं. मग सांगितलेल्या ओळी शुद्ध कशा लिहाव्या हें जरी मुलांना समजलें व त्यांनीं शुद्धलेखन जरी नीटनीटकें लिहिलें, तरी हा धडा देण्याचे सर्व उद्देश सिद्धीस गेले नाहींत. आपण दुसरें एक उदाहरण घेऊं. मराठी दुसऱ्या क्रमिक पुस्तकांतील ‘ सृष्टीचे चमत्कार ’ ही कविता शिक्षक शिकवीत आहे असें आपण समजूं. मलांना या कवितेचा अर्थ कळावा व त्यांचें भाषाज्ञान वाढावें, हा उद्देश ही कविता शिकविण्याचा आहे ही गोष्ट खरी आहे. तथापि त्याजबरोबरच त्यांना सृष्टिसौन्दर्याची गोडी लागावी व सृष्टिकर्त्या परमेश्वराच्या चातुर्याचें कौतुक वाटून त्याचेबद्दल त्यांचे मनांत प्रेम व पूज्यभाव जागृत व्हावा, हाही उद्देश ही कविता शिकविण्याचा आहे. तेव्हां मुलांनीं या कवितेंतील श्लोकांचा अर्थ जरी चांगला सांगितला, पण जर ही सर्व कविता शिकत असतांना सृष्टिसौंदर्याची किंवा सृष्टिकर्त्या परमेश्वराच्या चातुर्याची व दयाळूपणाची कल्पना त्यांच्या मनाला शिवलीच नाहीं, तर ही कविता शिकविण्याचे सर्व उद्देश साध्य झाले नाहींत व शिक्षकानें आपलें काम अपुरें केलें अस

होईल. साधारणपणें पाहिलें असतां प्रत्येक धड्यापासून शिक्षकाला तीन प्रकारचे उद्देश साधावयाचे असतात. मुलांला, त्या विषयाचें ज्ञान मिळावें, तो विषय शिकवीत असतांना मुलांच्या एक अगर जास्त बौद्धिक शक्तींना काम मिळून त्यांचा विकास व्हावा, त्याचप्रमाणें त्यांच्या एक अगर जास्त नैतिक शक्तींचीही तो धडा शिकवीत असतांना वाढ व्हावी, हे तीन उद्देश बहुतेक धड्यांत साधण्यास सांपडतात. कित्येक पाठांत यांपेक्षां एकादा उद्देश जास्त असतो, किंवा यांतील एकादा उद्देश साधावयास सांपडत नाहीं. एकदोन उदाहरणें घेतल्यानें ही गोष्ट जास्त स्पष्ट होईल. हस्तव्यवसाय हा विषय शिकवितांना चित्रें काढणें, मातीचीं चित्रें करणें वगैरे धड्यांपासून मुलांना त्या विषयांचें चांगलें ज्ञान मिळतें, त्यांच्या हातांस चपलता येते, त्यांची निरीक्षणशक्ति वाढते, कल्पना व विचार या शक्तींस काम मिळतें व सौंदर्याची गोडी त्यांचे मनांत उत्पन्न होते. हस्तव्यवसायाचा धडा जर चांगल्या रीतीनें शिकविला, तर यांतील सर्व उद्देश साध्य होतील दुसरें उदाहरण आपण खेळाच्या पाठाचें घेऊं. या योगानें मुलांची शरीर-संपत्ति वाढावी, त्यांना आज्ञाधारकतेची संवय लागावी, आपल्या स्नेही मंडळींत मिळून मिसळून काम करण्याची त्यांना गोडी लागावी, स्वार्थ विसरून सर्वांनीं मिळून एकादी गोष्ट केली असतां, सर्वांनाच तिजपासून आनंद उपभोगितां येतो, ही कल्पना मुलांचे दृष्टीपुढें आणावी इत्यादि उद्देश या धड्यापासून साधतां येतात. पण यांत या विषयाच्या ज्ञानाचा किंवा दुसऱ्या उपयुक्त ज्ञानाचा लाभ व्हावा, हा उद्देश विशेष महत्त्वाचा नाहीं. बौद्धिक आणि नैतिक शिक्षणासंबंधानें लिहितांना, शाळेंतील विषयांपैकीं प्रत्येक विषय शिकविण्याचे साधारण उद्देश कोणते आहेत, याबद्दलचें विवेचन केलेंच आहे. शिक्षकानें आपला धडा शिकवितांना, या धड्यापासून कोणते उद्देश साधावयाचे आहेत हें प्रथम लक्षांत घेतलें म्हणजे, त्या बेतानें त्याला तो धडा घेतां येतो.

धडा सुरू होण्याचे पूर्वी, आपल्या धड्याला सोईस्कर होईल अशी वर्गाची व्यवस्था शिक्षकानें करून घेतली पाहिजे. नाहींतर पुढें घोटाळा होऊन धडा जितका चांगला वठावा तितका चांगला वठणार नाहीं. वाचन, कविता, गणित, भूगोल, हस्तव्यवसाय, मोडीलेखन, शुद्धलेखन, शिवणकाम, ड्रिल इत्यादि सर्व विषयांना एकाच रीतीनें मुलें बसवून अगर उभीं करून

चालणार नाहीं. तेव्हां हा प्रत्येक विषय शिकवितेवेळीं मुलें कोणत्या रीतीनें बसलीं किंवा उभीं राहिलीं म्हणजे, त्यांना आपलें काम चांगल्या रीतीनें करितां येईल व आपणालाही त्यांना चांगल्या रीतीनें शिकवितां येईल, हें शिक्षकानें ठरविलें पाहिजे. लहान मुलांच्या वर्गांत वाचन किंवा कविता घ्यावयाचे वेळीं मुलें जर शिक्षकाच्या भोंवतीं अर्धवर्तुळाकार उभीं राहिलीं, तर त्यांना एकमेकांचा आवाज सहज ऐकूं येतो. शिक्षकालाही सर्व मुलांचें वाचन किंवा कविता स्पष्ट ऐकूं येते. मुलांच्या एकामागें एक अशा ओळी बसलेल्या असल्यास किंवा त्यांच्या दोन सरळ ओळी लांबवर पसरल्या असल्यास, एकमेकांचा आवाज त्यांना स्पष्ट ऐकूं येत नाहीं व शिक्षकालाही त्यांचे शब्द ऐकूं येत नाहींत. यामुळें सर्व घोटाळा होतो व धडा चांगला चालत नाहीं. मोडीलेखनाच्या वेळीं किंवा मातीचें काम करण्याच्या वेळीं, मुलांच्या मध्यें बरेंच अंतर सोडावें लागतें. नाहींतर मुलांना आपलें काम चांगलें करितां येत नाहीं. जवळ जवळ बसल्यानें, मुलांच्या आंगाला माती किंवा शाई लागण्याचा संभव असतो व त्यांना हात लांब करण्यास पंचाईत पडते. तोंडच्या हिशेबाच्या वेळीं मुलांना झट्कन उभें राहावें लागतें, तोंड फिरवावें लागतें व उत्तर मांडावें लागतें. तेव्हां या सर्व गोष्टी मुलांना सहज करितां येतील अशीच वर्गाची व्यवस्था केली पाहिजे. ड्रिलचे कांहीं प्रकार वर्गांत जागचे जागींच करून घेतां येतात; परंतु बाकीचे प्रकारांकरितां मुलांना बाहेर नेऊन, त्यांना व्यवस्थित रीतीनें ओळींत उभें करणें इष्ट असतें. सारांश, आपल्या विषयाला अनुरूप अशी वर्गाची व्यवस्था केल्याशिवाय कोणत्याही शिक्षकाला आपला धडा समाधानकारक रीतीनें घेतां येणार नाहीं.

मुलांची पूर्व तयारी कोठपर्यंत झाली आहे, हें पाहिल्याशिवाय नवीन धडा चांगल्या रीतीनें देतां येत नाहीं, हें आपण मागें पाहिलेंच आहे. नवीन धड्यांत ज्या कल्पना येणार, त्यांची जुन्या धड्यांतील कल्पनांशीं सांगड घालून दिल्याशिवाय, नवीन व जुन्या ज्ञानाचा मिलाफ पूर्णपणें होत नाहीं व नवीन धडा मुलांना चांगला कळत नाहीं. म्हणून बहुतेक धड्यांना उपोद्घाताची जरूर असते. धड्याच्या उपोद्घातांत शिक्षक मागील पाठांत झालेल्या विषयांची उजळणी करून मग आपल्या नवीन पाठाला सुरुवात करितो. जसें, लघुतम साधारण भाज्याचा धडा शिकवायाचा असेल,

तर अवयव म्हणजे काय, भाजक म्हणजे काय, महत्तम साधारण भाजक कशाला ह्मणतात, हें मुलांना कळल्याशिवाय पुढील धडा चांगला होणार नाहीं. संभाजीच्या कारकीर्दीचा इतिहास शिकवावयाचा असल्यास, शिवाजीनें केलेली कामगिरी, मोंगलांचा व त्याचा संबंध, त्याचे मुत्सद्दी व सरदार, या सर्वांची माहिती असल्याशिवाय पुढील धड्याची यथार्थ कल्पना मुलांना येणें शक्य नाहीं. तेव्हां या सर्व गोष्टी उपोद्घातांत घ्याव्या लागतात. कित्येक वेळां असें होतें कीं, नवीन धड्याचा मागल्या धड्याशीं कांहीं संबंध नसतो. त्यांतील कल्पना मुलांना कळण्यास कांहीं थोड्या माहितीची जरूर असते किंवा पाठाचा ओघ कोणत्या दिशेकडे आहे, हें थोडेंसें मुलांना कळलें, ह्मणजे मुलें त्या दृष्टीनें धड्याचा विचार करूं लागतात व मुलांनीं आपल्याच बुद्धीनें शक्य तितका धडा समजून घेण्याचा प्रयत्न करावा हा जो आपला हेतु असतो, तो तडीस जाण्याला धड्याच्या प्रारंभीं दिलेल्या या थोड्या माहितीचा किंवा धड्याची दिशा दाखविण्याकरितां विचारलेल्या प्रश्नांचा उपयोग होतो. तेव्हां ही प्रथम दिलेली माहिती किंवा हे विचारलेले प्रश्न उपोद्घातांत घ्यावे लागतात. उदाहरणार्थ, कन्यावाचनपाठमालेंतील 'शंकराचार्य' हा धडा शिकवावयाचा असल्यास, शंकराचार्यांपूर्वी हिंदुधर्माची काय स्थिति होती, त्याची अवनति कशी झाली, या गोष्टींचें चांगलें ज्ञान विद्यार्थ्यांना असल्याशिवाय, शंकराचार्यांच्या कामगिरीची खरी कल्पना त्यांना होणें शक्य नाहीं. तेव्हां ही माहिती उपोद्घातांत आली पाहिजे. दुसरें उदाहरण आपण क्रमिक दुसऱ्या पुस्तकांतील 'सृष्टीचे चमत्कार' या कवितेचें घेऊं. शिक्षकानें कांहीं प्रश्न विचारून पुढें येणाऱ्या कवितेचें थोडेंसें दिग्दर्शन केलें म्हणजे, मुलांना कवितेंत येणाऱ्या कल्पना लवकर व सहज समजूं लागतात. तेव्हां दिग्दर्शन करणारे हे थोडे प्रश्न उपोद्घातांत आले पाहिजेत. उपोद्घात हा नेहमीं धड्याच्या मानानें पाहिजे, म्हणजे त्यांत फार वेळ जातां कामा नये. नाहीं तर धड्याचा सर्व वेळ उपोद्घातच खाऊन जातो व मग 'चिमुटभर कथा व कंठाळभर नमन' अशी पाठाची स्थिति होते. कित्येक धड्यांना उपोद्घाताची बिलकूल जरूर नसते. अशा धड्याचे वेळीं मागील खेपेस तुमचा अमुक एक धडा झाला, आतां आज त्याच्या पुढचा धडा घेऊं, एवढाच उपोद्घात पुरा होतो.

एका वेळेला आपणाला आपल्या विषयाचा किती भाग शिकवावयाचा हें शिक्षकानें आधीं ठरविलें पाहिजे. अगदीं थोडाच भाग घेतला, तर वेळेच्या मानानें धडा अगदीं लहान होतो व तो केव्हांच संपून जातो. मग शिक्षकाला पुनः त्याच त्या गोष्टींचें चर्वितचर्वण करावें लागतें; यामुळें मुलांचा वेळ फुकट जातो व त्यांना धड्याचा कंटाळा येतो. बरें एका पाठांतच जास्त भाग घेतला, तर शिक्षकाला आपलें काम भराभर करावें लागतें; यामुळें धांदल उडून मुलांचे लक्षांत तो पाठ पूर्णपणें येत नाहीं. तेव्हां शिक्षकानें हे दोन्हीही दोष आपल्या हातून घडूं नयेत म्हणून खबरदारी घेतली पाहिजे. शिक्षकानें आपल्या पाठाचे भाग व्यवस्थित रीतीनें केले पाहिजेत. भागांची रचना अशी असावी कीं, एक भाग संपला कीं, दुसरा भाग स्वाभाविकपणेंच त्याचथापुढें आला पाहिजे. म्हणजे पहिला भाग समजलेला असला कीं, लगेंच दुसरा सहज समजतो. अशाच रीतीनें दुसऱ्याचे मागें तिसरा, तिसऱ्याचे मागें चौथा, अशी साहाजिक व्यवस्था असली पाहिजे. अशी व्यवस्था नसेल, तर कोणता तरी भाग कोठें तरी येतो व त्याचा परस्पर संबंध न कळल्यामुळें मुलांना धडाही विशेषसा समजत नाहीं. धड्यांतील भागांचा अनुक्रम बरोबर न घेतल्यामुळें धड्याचा कसा घोटाळा होतो, ही गोष्ट स्पष्ट होण्याकरितां आपण दोन उदाहरणें घेऊं. शिक्षक संभाजीच्या कारकीर्दीवर पाठ देत आहे अशी आपण कल्पना करूं. आतां या पाठांत प्रथम शिक्षकानें संभाजीच्या स्वभावाचें सुंदरसें शब्दचित्र काढलें पाहिजे. म्हणजे त्यानें केलेल्या व त्याच्या कारकीर्दींत झालेल्या अनेक गोष्टींचा कार्यकारणसंबंध साहजिकपणें मुलांच्या लक्षांत येईल. संभाजीला गादीवर न बसवितां राजारामाला गादीवर बसविण्याचा मुत्सद्दी मंडळीनें केलेला खटाटोप, हा भाग साहजिकपणेंच पहिल्या भागानंतर येईल. या मुत्सद्दी लोकांच्या वर्तनामुळें संभाजी कसा रागावला व त्याला जुन्या मुत्सद्दीमंडळीचा अविश्वास कसा वाटूं लागला, त्यानें त्यांपैकीं कांहीं जणांस निर्दयपणें कसें मारिलें, या गोष्टी तिसऱ्या भागांत येतील. अशा स्थितींत कलुशासारख्या धूर्त व स्वार्थसाधु मनुष्यानें संभाजीसारख्या मनुष्यावर आपलें वजन बसवावें हें उघडच होतें. तेव्हां कलुशा ब्राह्मण प्रधान झाला हा चौथा भाग होईल. राजा व प्रधान यांची ही अशी जोडी जमल्यावर प्रजाजनांला किती सुख लाधलें व राज्य-

व्यवस्था कशी चालत होती हा पांचवा भाग होईल. मोंगलांनीं ही संधि पाहून केलेली स्वारी व तिचा परिणाम हा सहावा भाग होईल. संभाजी कैदेंत सांपडल्यावर त्याचें वर्तन हा शेवटचा भाग होईल. अशा रीतीनें धड्याच्या भागांचा अनुक्रम ठेविला, तर मुलांना हा धडा साहजिकपणेंच चांगला कळेल. संभाजीच्या स्वभावाचें वर्णन केल्याशिवाय जर शिवाजीच्या मरणानंतर त्याच्या मुत्सद्यांनीं संभाजीला कैदेंत ठेवून राजारामास गादीवर बसविण्याचा जो बेत केला तो सांगितला, तर मुलांना मुत्सद्यांच्या या कृतीचा कार्यकारणसंबंध कळणार नाहीं व संभाजीनें पुढें त्यांच्याशीं जें अत्यंत निर्दयपणाचें व अमानुषतेचें वर्तन केलें त्याचेंही कारण नीटसें त्यांच्या लक्षांत येणार नाहीं. आपण दुसरें एक उदाहरण घेऊं. शिक्षक त्रैराशिकाचा धडा मुलांना शिकवीत आहे असें समजूं. या पाठांतील मुद्द्यांचा साहजिक अनुक्रम म्हटला म्हणजे, प्रथम शिक्षकानें गुणोत्तर म्हणजे काय हें मुलांना समजावून सांगावें. नंतर दोन गुणोत्तरें बरोबर असलीं म्हणजे त्याला प्रमाण म्हणतात, ही गोष्ट मुलांना स्पष्ट करून सांगावी. नंतर प्रमाणांत दिलेल्या राशींपैकीं कोणत्याही तीन राशी दिल्या, तर चौथी कशी काढतां येते हें समजावून दिलें पाहिजे. मग उदाहरणें व हिशेब प्रमाणांत कसे असतात हें बरींचशीं उदाहरणें घेऊन मुलांच्या लक्षांत आणून दिलें पाहिजे. मग शेवटचा भाग त्रैराशिक म्हणजे काय हें सांगून तें कसें मांडावयाचें व उत्तर कसें काढावयाचें हा शिकविला पाहिजे. असें न करितां एकदम त्रैराशिक कसें मांडावयाचें हें सांगितलें व नंतर गुणोत्तर व प्रमाण म्हणजे काय हें सांगण्याचा प्रयत्न केला, तर मुलांना सर्व धड्याची संगतवार स्पष्ट कल्पना येणार नाहीं.

कित्येक शिक्षकांना धड्यांतील महत्त्वाचा मुद्दा सोडून भलतीकडेच वाहवत जाण्याची संवय असते. याचा परिणाम असा होतो कीं, धडा एकीकडेसच राहातो व सगळा वेळ आगंतुक गोष्टींतच निघून जातो. तेव्हां अशा रीतीनें धडा सोडून, ज्यांचा धड्याशीं विशेषसा संबंध नाहीं अशा गोष्टी सांगण्यांत वेळ न घालविण्याची सावधगिरी ठेवावी. ‘ नाना फडणविसांचा या गांवीं जन्म झाला, ’ असें वाक्य आल्याबरोबर नानांच्या एकंदर चरित्राची हकीकत सांगत बसणें व त्यांच्या दंतकथा मुलांना सांगणें हा दोष होय. धड्यांतील मुद्दे ज्या मानानें कमी किंवा जास्त महत्त्वाचे असतील त्याच मानानें त्यांना वेळ दिला पाहिजे. नाहीं तर एकाच क्षुल्लक

मुद्द्याला बराचसा वेळ खर्च करावा व महत्त्वाचे मुद्दे कसे तरी भरकटून टाकावे असें होतें. नाहीं तर कधीं कधीं भलत्याच मुद्द्यांत सगळा वेळ निघून जातो व धडा पुराच होत नाहीं. प्रत्येक धड्याचे प्रारंभीं शिक्षकानें आपण आज या धड्याचे योगानें कोणतें नवीन ज्ञान देणार आहों याचा विचार केला पाहिजे. कित्येक पाठ दिसावयाला मोठे भपकेदार असतात. त्यांत उपकरणांची, प्रयोगांची व इतर गोष्टींची अगदीं गर्दी असते, पण शेंवटीं मुलांना या धड्यापासून काय नवीन ज्ञान मिळालें आहे याचा विचार केल्यास अगदीं निराश व्हावें लागतें. ज्या धड्यांत मुलांना कोणतेंही नवीन ज्ञान मिळत नाहीं, तो धडा अगदीं निरर्थक झाला यांत शंका नाहीं.

प्रश्नांचा उपयोग धड्यांत कसा करावा, प्रश्न कसे विचारावे, त्यांची वाटणी कशी करावी वगैरे गोष्टींचें मागील भागांत विवेचन केलेंच आहे. तेव्हां प्रश्नांसंबंधानें विशेष कांहीं एथें सांगण्याची आवश्यकता नाहीं. कित्येक शिक्षकांना आपणच सर्व कांहीं मुलांना सांगण्यांत मौज वाटते. मुलांना प्रश्न विचारून त्यांच्याकडून कांहीं गोष्टी काढून घेण्याचा या शिक्षकांना कंटाळा येतो. शिक्षकानें स्वतः नेहमीं वक्त्याचें काम करून मुलांना श्रोते बनाविणें हा शिक्षकाचा मोठाच दोष आहे हें मागें सांगितलेंच आहे. साहित्याचा उपयोग करण्याचा शिक्षकानें केव्हांही आळस करूं नये. वस्तु आधीं व तिचें वर्णन मागून हा नियम नेहमीं लक्षांत ठेविला पाहिजे.

फळ्याचा योग्य तो उपयोग न करणें, हा देखील शिक्षकाचा एक दोषच होईल. जी गोष्ट मुलांना येत नाहीं, ती त्यांचे मनावर बिंबविण्यास फळ्यावर ती गोष्ट लिहिणें हें फार आवश्यक असतें. कानांनीं ती गोष्ट ऐकिली व पुन्हा डोळ्यांनीं ती पाहिली कीं, ती सहसा विसरत नाहीं. कठीण शब्दांचें स्पष्टीकरण, इतिहासाच्या, भूगोलाच्या किंवा सृष्टि-निरीक्षणाच्या धड्याच्या शेवटीं त्यांतील मुख्य मुद्द्यांचें संक्षिप्त रीतीनें दिलेलें टांचण, तात्पुरता काढलेला नकाशा, व्याख्या, नियम, गणितांतील उदाहरणांचें स्पष्टीकरण वगैरे अनेक गोष्टींत शिक्षकाला फळ्याचा उपयोग होतो. मुलांनीं जी गोष्ट उतरून घ्यावी असें शिक्षकाला वाटत असेल, ती त्यानें तोंडीं सांगण्यापेक्षां जर फळ्यावर मुलांना लिहून दिली, तर तीं मुलें शुद्ध रीतीनें,

शब्द न गाळतां आपल्या वह्यांत उतरून घेतात. तेंच जर त्यांना शिक्षकानें नुसतें तोंडानें सांगितलें व मुलांनीं तें उतरून घेतलें, तर त्यांत किती तरी चुका होण्याचा संभव असतो. फळा शिक्षकाचा अत्यंत उपयोगी असा मित्र आहे. त्याचा उपयोग करण्यास शिक्षकानें कधींही मागें घेऊं नये. फळ्यावर लिहितांना शिक्षकानें नीटनेटकें लिहावें. त्यानें जर निष्काळजी-पणानें कसें तरी भरकटून काढलें, तर मुलें देखील निष्काळजीपणांत त्याचें अनुकरण करतील.

कित्येक शिक्षक धडा शिकवितांना, इतके कांहीं तन्मय होऊन जातात कीं, वर्गांत मुलें कशीं बसलीं आहेत, त्यांनीं पुस्तकें कशीं धरलीं आहेत, लिहितांना तीं फार वांकतात कीं काय, उभीं राहातांना तीं कशीं उभीं राहातात, त्यांचें लक्ष धड्याकडे आहे किंवा नाहीं, आपण सांगितल्याप्रमाणें तीं वाचीत किंवा लिहीत किंवा दुसरी एकादी कृति करीत आहेत किंवा नाहींत, आपल्या प्रश्नांना पुढल्या बाकावरचींच कांहीं मुलें उत्तर देत आहेत किंवा सर्व मुलें देत आहेत, वगैरे सर्व गोष्टींचें त्यांना विस्मरण पडतें. लहान मुलांच्या शिक्षकाला आपल्या पाठाबरोबर मुलांकडे देखील पूर्ण लक्ष दिलें पाहिजे. नाहीं तर वर्गांतील सर्व शिस्त बिघडून जाते आणि शिस्त बिघडल्यावर मुलांचा अभ्यास काय होणार व त्यांना वळण तें काय लागणार ? शिवाय मुलांच्या या बसण्याउठण्याच्या पद्धतीवर त्यांची शरीरप्रकृति ही अवलंबून असते, हें मागें शारीरिक शिक्षणाचे वेळीं सांगितलेंच आहे.

शिक्षकाची भाषा साधी, शुद्ध व मुलांना समजेल अशी असावी. ती पोरकटही नसावी किंवा तिच्यांत मोठमोठ्या संस्कृत शब्दांचा भर-णाही नसावा. भाषा हें शिक्षकाचे विचार मुलांना कळण्याचें साधन आहे आणि हें साधन जर चांगलें नसेल, तर मुलांना शिक्षकाचे विचार स्पष्टपणें कळणार तरी कसे ?

धड्यांत शिक्षकाचे हातून कोणकोणते दोष होण्याचा संभव असतो, त्याची यादी इंग्लिश ग्रंथकार मि. ल्यांडन यांनीं दिलेली आहे. ती पुढें दिली आहे.

१. धड्याची व्यवस्थित रचना नसणें, २ धडा वेळेच्या मानानें फार लांबलचक असणें व मग तो संपविण्याकरितां धांदल करणें, अथवा तो

फार लहान असणें, ३ लांबलचक व धड्याशीं ज्याचा कांहीं संबंध नाहीं असा अपुरा उपोद्घात करणें, ४ एका भागाचा दुसऱ्या भागाशीं संबंध नाहीं असा विस्कळित धडा देणें, ५ विषयाची माहिती बरोबर नसल्यामुळें चुकीची अगर अपूर्ण माहिती देणें, ६ महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या हें जाणून त्यांच्यावर विशेष जोर देऊन मुलांचें लक्ष त्यांजकडे वेधून न घेणें, ७ मुलांच्या मानसिक शक्तींना धड्यांत व्यवसाय मुळींच न मिळणें, ८ शिक्षकाची भाषा स्पष्ट नसल्यामुळें मुलांना ती न कळणें, ९ धड्यांत ज्या गोष्टी मुलांनीं सांगितल्या पाहिजेत व केल्या पाहिजेत त्या शिक्षकानें स्वतांच करणें, १० भलताच मुद्दा निघून शिकविण्याचा धडा एकीकडेसच राहाणें, ११ मुलांच्या पुढें एकदम भाराभर कल्पना मांडणें, १२ स्वतांच्या पाठाची बरोबर माहिती नसल्यामुळें उगीच प्रश्न विचारण्यांत काळ घालविणें व विचारलेल्या प्रश्नांचीं योग्य उत्तरें देतां न येणें, १३ ज्यांत शुष्क पाल्हाळाच्या पलीकडे कांहींही नाहीं असें व्याख्यान झोडणें, १४ साहित्याचा उपयोग न करणें व जे प्रयोग मुलांच्या समोर करावयास पाहिजेत ते न करणें, १५ पाठाच्या शेवटीं महत्त्वाच्या गोष्टी मुलांच्या मनांत बिंबविण्याकरितां त्यांची उजळणी न घेणें व फळ्यावर धड्याचा गोषवारा न लिहिणें, १६ धडा चालत असतांना वर्गाची शिस्त बरोबर नसणें व १७ मुलांची पूर्व तयारी काय आहे याचा विचार न करितां धडा देणें.

आतां सरतेशेवटीं शिक्षणशास्त्राचे जे मुख्य निमय शिक्षकानें शिकवितांना आपल्या डोळ्यासमोर ठेविले पाहिजेत ते देऊन, हा लांबलेला भाग पुरा करूं.

१. शिक्षण इंद्रियद्वारां द्यावें.

२. प्रथम अवलोकन, नंतर विचार, नंतर स्मरण हा शिक्षणाचा क्रम असावा.

३. शिक्षकानें स्वतः थोडें सांगावें. शक्य तितकें मुलांकडूनच त्यांना मदत करून काढून घ्यावें.

४. मुलांना जी गोष्ट शिकवावयाची, ती त्यांना हातानें करूनच शिकूं द्यावी.

५. मुलांना माहीत असलेल्या गोष्टींपासून सुरुवात करून त्या गोष्टींच्या मदतीनें त्यांना माहीत नसलेल्या गोष्टी शिकवाव्या.

६. विशिष्ट गोष्टी पुढें मांडून त्यांत असणारा सामान्य नियम काढून घ्यावा.

७. उद्गामी अनुमान पद्धतीनें शिकवावें.

८. मुलांना कोणतीही गोष्ट स्वतःच समजून घेण्यास उत्तेजन द्यावें.

९. धडा शक्य तितका मनोरंजक करावा.

१० सृष्टिनियमांना अनुसरून मुलांच्या प्रत्येक ईश्वरदत्त शक्तीचा विकास करावा.

# शिक्षक आणि शिक्षण.

## भाग २२ वा.

## उपसंहार.

मनुष्य जेव्हां आपल्या धंद्यालां अवश्य लागणारें ज्ञान संपादन करितो व त्या ज्ञानाचा उपयोग कसा करावा, याचें शिक्षण तज्ज्ञ व अनुभविक मनुष्यांचे हाताखालीं काम करून मिळवितो, तेव्हांच त्याला आपला धंदा चांगल्या रीतीनें करितां येतो व त्यांत त्याला यशही मिळतें, या नियमाची सत्यता वैद्य, वकील, एंजिनियर वगैरे लोकांच्या व्यवसायांत नेहमीं दिसून येते. ज्या मनुष्याला उत्तम वैद्य होण्याची इच्छा असते, तो आपल्या धंद्याला अवश्य लागणारें, वनस्पति, शारीर, रसायन वगैरे शास्त्रांचें ज्ञान मिळविण्याकरितां वैद्यक शिकविणाऱ्या पाठशाळेंत जातो; तेथें तें ज्ञान मिळवितो व तेथील अनुभविक व विद्वान वैद्यांचे देखरेखीखालीं औषधें देण्याचें व शस्त्रक्रियेचें काम कांहीं काळ तो करितो व नंतर आपल्या धंद्यास प्रारंभ करितो. एवढे परिश्रम न करितां 'त्या मनुष्यानें जर पाचपंचवीस रोगांवरचीं औषधें पाठ केलीं व आपल्या धंद्याला सुरुवात केली, तर त्याला आपला धंदा चांगल्या रीतीनें चालवितां येणार नाहीं. निरनिराळ्या रोगांचें निदान न कळल्यामुळें, शरिराच्या रचनेची बिलकूल माहिती नसल्यामुळें, तो नेहमीं घोटाळ्यांत पडेल व रोगी बरे करण्याचें काम त्याचे हातून होणार नाहीं. शिकलेला वैद्य रोगाची परीक्षा करून औषधें ठरवितो व दररोजच्या रोग्याच्या स्थितीप्रमा तीं पालटतो. यामुळें अशा वैद्याच्या औषधांनीं रोगी बरे होण्याची पुष्कळ खातरी असते. आपल्या धंद्याला अवश्य लागणारें ज्ञान व अनुभव मिळविल्याशिवाय, धंद्याला सुरुवात करणाऱ्या मनुष्याला आपला धंदा नीट रीतीनें कधींही करितां येत नाहीं हें उघड आहे.

शिक्षकाचा धंदा वकील, वैद्य, एंजिनियर, चित्रकार वगैरे लोकांच्या धंद्यापेक्षां कोणत्याही रीतीनें कमी महत्त्वाचा, कमी योग्यतेचा किंवा कमी

बुद्धीचा नाहीं. तेव्हां वैद्य, वकील वगैरे लोकांना, ज्याप्रमाणें आपल्या धंद्याचें ज्ञान संपादन करावें लागतें व शिक्षण मिळवावें लागतें, त्याचप्रमाणें शिक्षकालाही आपल्या धंद्याचें ज्ञान व शिक्षण मिळविणें अवश्य आहे. असें असतांनाही पुष्कळ लोकांचा व कित्येक शिक्षकांचाही असा समज असतो कीं, शिक्षकाचा धंदा करणाऱ्या माणसाला त्याच्या धंद्याला आवश्यक असें ज्ञान संपादन करण्याची जरूर नाहीं. एवढेंच नव्हे तर या धंद्याला जरूर लागणारें असें कांहीं ज्ञान आहे,हीच कल्पना कित्येकांच्या लक्षांत येत नाहीं. या लोकांना वाटतें कीं, जो विषय मुलांना शिकवावयाचा तो शिक्षकाला चांगला येत असला म्हणजे झालें. मग त्याला सहजच उत्तम रीतीनें तो विषय आपल्या मुलांना शिकवितां येईल. लिहिणें, वाचणें, उजळणी, गणित, तोंडचे हिशेब शिकविणें, एवढेंच काय तें शिक्षकाचें कर्तव्य आहे असें ज्या लोकांना वाटतें, त्यांची वर सांगितल्याप्रमाणें शिक्षकाचे धंद्याविषयीं समजूत व्हावी यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण कांहीं विषय शिकवावयाचे एवढेंच कांहीं शिक्षकाचें कर्तव्य नव्हे. मुलांच्या शारीरिक व मानासिक शक्तींचा विकास करणें, त्यांना व्यवहारांत लागणारें ज्ञान मिळवून देणें, त्यांचें शील बनविणें व अशा रीतीनें आपल्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या पुढील आयुष्यांतील कर्तव्यें करण्यास समर्थ बनविणें इत्यादि गोष्टी शिक्षकाच्या कर्तव्यांत येतात. हें महत्त्वाचें कर्तव्य बजावण्यास शिक्षकानें शिक्षणशास्त्राचें ज्ञान संपादन केलें पाहिजे व अनुभविक शिक्षकांचे देखरेखीखालीं कांहीं दिवस काम केलें पाहिजे. असें जर त्यानें केलें, तरच त्याला आपलें काम चांगल्या रीतीनें करितां येईल. शिक्षकाला आपल्या धंद्याला अवश्य लागणारें ज्ञान व अनुभव मिळवून द्यावा, याच हेतूनें सरकारनें ट्रेनिंग कॉलेजें स्थापन केलीं आहेत.

एकाद्या विषयाचें किंवा कलेचें, व्यवस्थित रीतीनें एके ठिकाणीं संग्रहित केलेलें जें ज्ञान, त्यालाच त्या विषयाचें किंवा कलेचें शास्त्र असें म्हणतात. वैद्यक विषयाचें व्यवस्थित रीतीनें एकत्र केलेलें जें ज्ञान तें वैद्यक शास्त्र होय. वैद्य लोक आपल्या धंद्याचें ज्ञान मिळविण्यास वैद्यक शास्त्राचा अभ्यास करितात व ज्योतिषी ज्योतिःशास्त्राचा अभ्यास करितात; त्याचप्रमाणें निरनिराळे व्यवसाय करणारे लोक आपआपल्या धंद्याच्या शास्त्राचा अभ्यास करितात. शिक्षणाच्या व्यवसायासंबंधाचें व्यवस्थित रीतीनें एकत्र

केलेलें जें ज्ञान तें शिक्षणशास्त्र होय. तेव्हां या शिक्षणशास्त्राचा थोडा तरी अभ्यास प्रत्येक शिक्षकानें केला पाहिजे हें उघड आहे.

शिक्षणशास्त्राचा उदय होऊन शंभरापेक्षां जास्त वर्षें झालीं नाहींत, परंतु एवढ्या काळांत या शास्त्राची फार झपाट्यानें प्रगति झाली आहे. या शास्त्रांत अद्यापिही नवीन महत्त्वाच्या ज्ञानाची भर पडत आहे व पुढेंही पडेल. कारण इतर शास्त्रांप्रमाणें हें शास्त्र अद्यापि पूर्णदशेस आलें नाहीं. युरोप व अमेरिकाखंडांतील अनेक शिक्षणशास्त्रज्ञांनीं फार परिश्रम करून या शास्त्राची वाढ केली आहे व करीत आहेत. आपल्याकडे या शास्त्राचा अभ्यास करण्यास नुकतीच कोठें सुरुवात झाली आहे व प्रत्येक शिक्षकाला या शास्त्राचीं मूलतत्त्वें तरी माहीत पाहिजेत, ही कल्पना आतां दृढ होत चालली आहे. इतर शास्त्रांप्रमाणें शिक्षणशास्त्रही फार व्यापक आहे. त्याचा पूर्ण अभ्यास करण्यास चांगली बुद्धि पाहिजे व दीर्घ काळही पाहिजे. तथापि प्रत्येक शिक्षकानें शक्य तितकें या शास्त्राचें ज्ञान मिळविलें पाहिजे व त्या शास्त्राचे मुख्य नियम समजावून घेतले पाहिजेत. अशा रीतीनें शिक्षकाला आपल्या पूर्वीं होऊन गेलेल्या विद्वानांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा मिळेल. कारण शास्त्रांत पूर्वींच्या व सध्यांच्या विद्वानांचा व तज्ज्ञ माणसांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा संग्रह केलेला असतो. शिक्षणशास्त्राचें अध्ययन केल्यानें तज्ज्ञ व विद्वान् लोकांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा शिक्षकाला साहजिकपणेंच मिळतो. यामुळें अज्ञानानें आपल्या धंद्यांत, ज्या कांहीं चुका त्यानें केल्या असत्या, त्या त्याचे हातून होत नाहींत व त्यामुळें मुलांचें हित होतें. शिक्षकाचे हातून ज्या ज्या चुका होतात त्यांचा अपायकारक परिणाम मुलांना सोसावा लागतो. मुलांचे कल्याणार्थ शिक्षकानें शिक्षणशास्त्राचें अध्ययन करणें फार जरूर आहे. मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी जितकी शिक्षकावर असते तितकीच किंबहुना तिजहूनही अधिक जबाबदारी त्यांचे आईबापांवर असते; म्हणून आईबापांना देखील या शास्त्राची थोडीबहुत माहिती असणें अवश्य आहे.

इंग्लिश, फ्रेंच वगैरे भाषांत शिक्षणविषयक शेंकडों ग्रंथ आहेत. त्यांपैकीं कांहीं ग्रंथ बहुजनसमाजाला कळण्याकरितां अगदीं सोप्या भाषेंत लिहिलेले

आहेत. आपल्या मराठी भाषेंत या विषयावर लिहिलेलीं पुस्तकें बोटावर मोजण्याइतकीं आहेत. ह्यांपैकीं एक दोन तर, प्रति खपून गेल्यामुळें मिळे नाशीं झालीं आहेत. शिक्षणविषयाचें महत्त्व लक्षांत घेतलें असतां, या विषयावर आपल्या भाषेंत जितकीं जास्त पुस्तकें लिहिलीं जातील तितकीं पाहिजेच आहेत हें उघड आहे. ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिकणारे विद्यार्थी व निवळ मराठी भाषा जाणणारे पालक, यांना उपयोग व्हावा या हेतूनें प्रस्तुत लेखकानें '**शिक्षक आणि शिक्षण**' हें पुस्तक '**कन्याशिक्षकांत**' लिहिण्यास सन १९१५ च्या एप्रिल महिन्यांत सुरुवात केली.

शिक्षणाचें ध्येय कोणतें असावें हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे, म्हणूनच या प्रश्नाचा विचार पहिल्याच भागांत केला आहे. मुलांच्या ईश्वरदत्त सर्व शक्तींचा विकास करून मुलांना सुशिक्षित बनविणें व त्यांना आपल्या आयुष्यांतील कर्तव्यें बजावण्यास समर्थ करणें हें शिक्षणाचें ध्येय असलें पाहिजे. केवळ अमुक एक परीक्षा मुलगा पास झाला पाहिजे, हें ध्येय दृष्टीपुढें ठेवून मुलांना शिक्षण दिलें असतां, शिक्षणाचा खरा हेतु तडीस जात नाहीं व तें शिक्षण अपूर्ण व अपायकारक होतें, हें पहिल्या भागांत दाखविलें आहे. मनाचे ज्ञान, भावना व प्रवृत्ति असे तीन व्यापार असतात. त्यांपैकीं पहिला व्यापार ज्ञान हा कसा होतो व तो उत्तम रीतीनें होण्याकरितां इंद्रियशिक्षणाची कशी आवश्यकता असते व इंद्रियशिक्षण मुलांना कसें देतां येईल, हें दुसऱ्या भागांत सांगितलें आहे. मनुष्याला उत्तम विचार करितां यावा हीच गोष्ट बौद्धिक शिक्षणानें साधावयाची असते. या कार्याला अवश्य लागणाऱ्या स्मरण, कल्पना, सामान्य बोध, निर्णय व अनुमान, या शक्तींचा विकास कसा करितां येईल हें २ ते ६ या भागांत दाखविलें आहे. पुढें ७ व्या, ८ व्या ९ व्या व १० व्या भागांत भावना म्हणजे काय हें सांगून त्यांचे तीन प्रकार दाखविले आहेत व स्वार्थी भावना ताब्यांत ठेवण्यास मुलांना कसें शिकवावें व मुलांच्या सामाजिक व उच्च भावनांचा परिपाष कसा करावा हेंही सांगितलें आहे. मनाचा तिसरा व्यापार जो प्रवृत्ति त्याचा ११ व्या भागांत विचार केला आहे व बाराव्या भागांत प्रवर्तकशक्तीला शिक्षण कसें द्यावें हें सांगितलें आहे. नीतिशिक्षण व शारीरिक शिक्षण यांचा विचार १३ व्यां व १४ व्या भागांत केला आहे.

आपल्या धंद्यांत यश येण्यास शिक्षकाला अवश्य लागणारे गुण १५ व्या भागांत सांगितले आहेत. १६ व्या भागांत वर्गाची जागा कशी असावी, वर्गांत कोणतें सामान अवश्य असावें व तें व्यवस्थित कसें ठेवावें, याचें थोडक्यांत विवेचन केलें आहे. शाळेंत शिस्तीची किती आवश्यकता आहे, तिच्या योगानें मुलांना चांगल्या संवयी कशा लागतात व शिस्त राखण्यास कोणत्या साधनांचा उपयोग करावा, याचा विचार पुढील तीन भागांत केला आहे. विसाव्या भागांत शिक्षणाचीं तीन साधनें, प्रश्न, साहित्य व व्याख्यान यांचा थोडक्यांत विचार केला आहे. प्रश्न करतांना शिक्षकानें कोणत्या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे व त्यांचा उपयोग कोणत्या वेळीं करावा, हेंही याच भागांत सांगितलें आहे. शेवटच्या म्हणजे एकविसाव्या भागांत शिक्षकानें आपल्या पाठांची रचना कशी करावी, पाठांत सामान्यतः कोणते दोष दिसून येतात व ते कसे टाळावे याचें विवेचन केलें आहे.

ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिकणारे विद्यार्थी व निवळ मराठी जाणणारे वाचक, यांना या पुस्तकाचा थोडा जरी उपयोग झाला, तरी प्रस्तुत लेख. कास आपले श्रम सफल झाले असें वाटेल. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे.

**क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते।**

समाप्त.

# सूचि.


विषय — पृष्ठ.

## अ

**अभ्यासक्रमांतील विषय.**
अभ्यासक्रमांतील निरनिराळे विषय, त्यांची आवश्यकता व उपयोग. ... ... ७
नीतिशिक्षण देण्याचें साधन ८६

**अनुमानः—**
स्वरूप ... ... ... ३८
उद्गामी ... ... ... ३९
अवगामी ... ... ३९
सादृश्य... ... ... ४०
मुलांचीं अनुमानें कां चुकतात ४०-४१
अनुमानशक्तीचा विकास करणारे विषय ... ... ४१

**अवधानः—**
प्रवृत्तीचा गुण ... ... १३
दोन प्रकार, ऐच्छिक व अनैच्छिक १३
कसें लावून घ्यावें ... १४

## आ

**आईः—**
मुलांचा पहिला शिक्षक ५
तिनें दिलेल्या शिक्षणाचें महत्त्व ५

**आत्मसंयमनः—**
शिक्षकाचे आंगीं असण्याची आवश्यकता ... ९९,१००
मुलांना कसें शिकवावें...७७,७८

**आसक्तिः—**
शिक्षकाची कामावरील ... १००

विषय — पृष्ठ.

## इ

**इतिहासः—**
शिकण्यापासून मानसिक शक्तीवर परिणाम ३१-४१-८६

## उ

**उत्तरें मुलांचीं:—**
उत्तरांची भाषा... .... १४४
विचार न करितां दिलेलीं उत्तरें ... ... ... १४४
सर्व वर्गानें एकदम दिलेलें उत्तर ... ... ... १४५

**उपोद्घातः—**
उपयोग... ... ... १५१

## क

**कल्पनाशक्तिः—**
स्वरूप ... ... ... २७
बुद्धीच्या विकासाला तिची आवश्यकता ... .... २६
दोन प्रकार १ बौद्धिक २ भावनोत्पादक ... २७,२८
उच्छृंखल होण्याची भीति २९
लहान मुलांच्या खेळांत दिसून येते. ... ... २९
लहानपणीं जोरांत असते. २९
बुद्धीच्या विकासाबरोबर कमी होते ... ... २९
भीति उत्पन्न करिते ... ३०

विषय पृष्ठ.

शाळेंतील कोणत्या विषयांनीं तिचा विकास होतो. ३१

**कसरत** (पाहा ड्रिल):–
नीतिशिक्षणाचें साधन... ८५

**कान** (पाहा श्रवणेंद्रिय):–१६,१८

**कुटुंब**:– ही नीतिशिक्षणाची शाळा आहे. ८१

**कुतूहल** :
ज्ञानार्जनाचें साधन ... ५२
बाळपणीं उदय होतो ... ५३
शाळेंतील अभ्यासक्रमानें दबण्याची भीति ... ५३
जिज्ञासेशिवाय कुतूहल व्यर्थ आहे. ... ... ... ५४
विकास कसा करावा ... ५५

**कृतिप्रेम**:–
(भावना) ... ... ४६

**क्रिया**:–
सहेतुक व अहेतुक... ६२-६३

१ आपोआप होणाऱ्या ६३
२ प्रतिक्षिप्त ... ... ६३
३ प्रकृतिसिद्ध ... ... ६३

**खेळ**:–
नीतिशिक्षणाचें साधन ... ८५
मानसिक व शारीरिक शिक्षणाचें साधन... १४-१५
**खेळांचे दोन प्रकार**:
१ व्यायामाकरितां व नैतिक शिक्षणाकरितां खेळावयाचे २ मनोरंजनाकरितां व विश्रांति मिळण्याकरितां खेळावयाचे ... ... १६

विषय पृष्ठ.

**ग**

**गणित**:—
मानसिक विकासाचें साधन ४१

**गायन**:– १८,५६

**गृहशिक्षण**: ... ... ६,८१

**गोष्टी**:– ... ... २९,३०

**ग्रहण**:– ... ... ... २०

**घ**

**घ्राणेंद्रिय**:– १६,१७

**घोकंपट्टी**:– ... ... ७-९

**च**

**चपलता (मुलांची)**:–
शिक्षणाचे कामीं तिचा उपयोग ९५

**चरित्रें (थोर माणसांचीं)**:–
नीतिशिक्षणाचें साधन... ८६,८७

**चित्रकला** १७,३१,५१

**ज**

**जिज्ञासा**:–
ज्ञानप्राप्तीचें साधन ... ५२
बाळपणीं या भावनेचा उदय ५३
शाळेंतील अभ्यासक्रमानें दबण्याची भीति ... ५३
विकास कसा करावा. ५५

**जिव्हा (पाहा रसना)**:–१६,१७

**ड**

**डेस्क**:– ... ... ... १०८

**डोळे (पाहा नेत्रेंद्रिय)** १६,१८

**ड्रिल**:–
शिकविण्याची आवश्यकता १६
शिकविण्याचा उद्देश ... १७
शिकविण्यापासून फायदे १७
कसें शिकवावें ... ... १८

| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| **ध** | |
| **धारणाः**–... ... | २०-२१ |
| **धार्मिक शिक्षण**... ... | ८६ |
| **ध्येयः**– | |
| मुलांपुढें ठेवण्याची आवश्यकता | ७९ |
| **ना** | |
| **नाकः**–( पाहा घ्राणेंद्रिय ) | १६,१७ |
| **नियमः**– | |
| शाळेंतील कसे ठरवावे | ११६ |
| त्यांजबद्दल कोणती काळजी घ्यावी ... ... | ११६-११७ |
| **निर्णयः**– | |
| विचाराची एक पायरी ... | ३७ |
| स्वरूप ... ... ... | ३७ |
| विकास कसा करावा ... | ३८ |
| **नीतिशिक्षणः**– | |
| स्वरूप ... ... ... | ८० |
| साधनें ... ... | ८३-८६ |
| नीतिशिक्षण आणि शाळा | ८४ |
| नीतिशिक्षण आणि कुटुंब | ८१ |
| नीतिशिक्षण आणि गृहशिक्षण | ८१ |
| **नेत्रेंद्रियांचें शिक्षण** | १६,१८ |
| **नैतिक उच्च भावनाः**– | |
| स्वरूप ... ... ... | ५७ |
| विचारशक्तीचे विकासावर अवलंबून असतात ... | ५७ |
| त्यांजवर सहवासाचा परिणाम | ५८ |
| विकास कसा करावा | ५९-६० |
| **प** | |
| **पदार्थसंग्रहालय** ( मुलांचें ) | ११० |
| **परीक्षाः**– | |
| पास होणें हें शिक्षणाचें ध्येय नव्हे ... ... ... | ८ |
| परीक्षेकरितां चाललेल्या धडपडीचा परिणाम ... | ८-९ |
| **पाठः**– | |
| पाठाची तयारी... ... | १४७ |
| पाठाचे उद्देश ... ... | १४८ |
| मुद्द्यांचा अनुक्रम ... | १५२ |
| पाठांतील दोष ... | १५७,१५८ |
| **पाठ करावयाच्या गोष्टी** | २३ |
| **पाठ काय व कसें करावें** | २३ |
| **प्रवृत्ति** ... ... | १५,६० |
| **प्रवर्तकशक्ति** | |
| व्याख्या ... ... | ६१ |
| शिक्षण ... ... | ७७,७८ |
| मुलांच्या प्रवर्तक शक्तीला वडील माणसांची मदत... | ७७ |
| **प्रश्नः**– | |
| शिकविण्याचें साधन ... | १३६ |
| पांच उपयोग ... | १३६,१३८ |
| प्रश्नांची भाषा ... ... | १३९ |
| प्रश्न कसे असावे | १३९,१४१ |
| प्रश्न कसे विचारावे ... | १४१ |
| **प्रसंगावधान** ( शिक्षकाचें ) ... ... | १०२ |
| **फ** | |
| **फळाः**– ... ... ... | १०८ |
| फळ्याचा उपयोग ...... | १५५ |
| **ब** | |
| **बक्षिसें**:– | |
| लहान मुलांना बक्षिसें देण्याची आवश्यकता ... ... | १३१ |
| **बक्षिसांचे प्रकार** | |
| बक्षिसें देण्यासंबंधानें लक्षांत ठेवावयाच्या गोष्टी ... | १३५ |

| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| **बोध:–** | |
| मनाचा व्यापार... ... | १६ |
| **बौद्धिक शिक्षणाचें महत्त्व** | ३-४ |
| **म** | |
| **भावना:–** | |
| भावनांचें स्वरूप ... | ४२ |
| शरीर आणि मन यांच्यावर भावनांचा परिणाम ... | ४३ |
| भावनांचे ३ प्रकार ... | ४४ |
| अहंपर भावना ... ... | ४४ |
| सामाजिक भावना ... | ४८ |
| उच्च भावना ... | ५२,५३ |
| **भीति ( भावना )** | ४४,४५ |
| **भूगोल:–** | |
| शिकविण्याचा हेतु ... | ७ |
| मानसिकशक्ति वाढविण्याचें साधन | २५,२६,३१,३५,८६ |
| **म** | |
| **मन:–** | |
| स्वरूप ... ... ... | ११ |
| व्यापार ... ... ... | ११ |
| मनाचा विकास व त्याचा काळ ... ... | १४;१५ |
| **मानाची जागा** ... ... | **१३४** |
| **मार्क** ... ... | १३३,१३४ |
| **मुलांची आवड(शिक्षकास)** | १०१ |
| **मुलांची पूर्वतयारी** | १५०,१५१ |
| **मुलींच्या शारीरिक शिक्षणाच्या बाबतींत अनास्था व अडचणी** ... | ९२ |
| **र** | |
| **रसना:–** ( पाहा जिव्हा ) | |
| **राग** (भावना)... ... | ४६ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| **ल** | |
| **लेखन:–** | १८ |
| **लोकापवादाची भीति** ... | ८५; |
| **व** | |
| **वर्ग:–** | |
| वर्गाची जागा कशी असावी | ९१ |
| ,, ,, सुशोभित कशी करावी | १०६ |
| वर्गातील हवा... ... | १०६ |
| वर्गातील उजेड... ... | १०७ |
| वर्गाच्या भिंतींचे रंग ... | १०८ |
| वर्गाची पाठाला अनुरूप रचना ... ... | १४९,१५० |
| **वाढ** ... ... ... | २ |
| **विकास** ... ... | २ |
| **वेळापत्रक** ... ... | १०९ |
| **व्याख्या कशी** शिकवावी | ३४ |
| **व्याख्यान** (शिकविण्याचें साधन ) ... ... | १४६ |
| **वाङ्मय:–**( आवड ) | ५६ |
| **श** | |
| **शरीर व मन यांचा परस्पर संबंध** | १२,१३ |
| **शरीरसंपत्तीचें महत्त्व** | २ |
| **शाबासकी** ( प्रशंसा ) | १३२ |
| **शारीरिक शिक्षण** | |
| आवश्यकता ... | ९०,९१ |
| शिक्षकानें करण्याच्या गोष्टी | ९१ |
| **शास्त्र:–** | **१५८** |
| **शाळा** | |
| शाळेंतील नैतिक शिक्षण | ८२ |
| शाळेंतील शिस्त ... | ८३ |
| शाळेंतील शिस्तीमुळें आंगीं येणारे गुण ... ... | ८२ |

विषय पृष्ठ.

**शिकविण्याचीं साधनें** १३६

**शिक्षकः—**

- शिक्षकाचें ध्येय ... ९
- माळ्याशीं साम्य ... ९
- अंगचे गुण ... ९९-१०३
- वाचनाचा व्यासंग ... १०३
- पोषाक ... ... ... १०३
- आवाज ... ... १०३
- गोष्टी सांगण्याचें चातुर्य १०४
- समाजांत मिसळण्याची आवड ... ... ... १०४

**शिक्षणः—**

- स्वरूप ... ... ... १
- हेतु ... ... ... ५

**शिक्षणशास्त्र व शिक्षणाची कला** त्यांच्या अभ्यासाची आवश्यकता १५९

**शिक्षाः—**

- शिस्तीचें गौण साधन ... १२०
- शिक्षा देण्याचे दोन उद्देश १२१
- योग्य वेळीं न दिल्यास होणारा दुष्परिणाम १२२
- मुख्य दोन प्रकार १२२
- शिक्षेसंबंधानें ध्यानांत ठेवण्याच्या गोष्टी १२३,१२४,१३०
- निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षा व त्यांचे गुणावगुण ... १२४-१२८
- शारीरिक शिक्षा ... १२९

**शिस्त**

- आवश्यकता ... ... ११५
- फायदे ... ११३,११४
- नसल्याने होणारे तोटे ... ११३

विषय पृष्ठ.

**शील.**

- महत्त्व ... ... ... ७
- शील व संवयी ... ... ८३
- शील कसें बनवावें ... ८३

**शुद्धलेखनाच्या पाठाचे हेतु** १४८

**श्रवणेंद्रियाचें शिक्षण** १६,१७

## स

**सदसद्विचारबुद्धिः—**

- उदय ... ... ... ७३
- सदसद्विचारबुद्धीचें समाधान हेंच खरें बक्षीस हें मुलांना शिकविणें १३५

**संवय.**

- स्वरूप ... ... ... ७८
- फायदे ... ... ६५,६७,६८
- महत्त्व ... ... ६८,७०
- जडण्याचा काल ... ७०
- कशी लावावी ... ... ७१
- कशी मोडावी ... ... ७१

**संवेदन** ... ... ... **१६**

**सहानुभूतिः—**

- सर्व सद्गुणांचा पाया ... ४९
- विकास कसा करावा ५०,५१

**सामान्यबोधशक्तिः—**

- स्वरूप ... ... ... ३३
- विकास कसा करावा ... ३५
- सामान्य बोध मुलांना बरोबर कां होत नाहीं ... ... ३४
- सामान्य ज्ञान व विशेष ज्ञान ३३
- सामान्य नामाचें कार्य ... ३४

**साहचर्य व त्याचे दोन प्रकार** ... ... **२१,२२**

**साहित्य** ... ... ... **१४६**

विषय पृष्ठ.

सृष्टिनिरीक्षणः— ३१-३५

सृष्टिसौंदर्याची आवड ५५-५६

सौंदर्यविषयक भावना

होणारा आनंद ५६

या बुद्धीच्या विकासावर

अवलंबून असतात ... ५५

विकास कसा करावा ... ५६

स्तुतिप्रियता ( भावना ) ४७

स्पर्धा ( भावना ) ... ४७

स्पर्शेंद्रियाचें शिक्षण १७-१८

विषय पृष्ठ.

ह

हस्तव्यवसायः— १७,१८,९१,९५

हेतु ... ६२,६४

ज्ञ

ज्ञानः—

मनाचा व्यापार... ... ११

ज्ञानाचे भागः—

( संवेदन, बोध, स्मरण,

कल्पना, विचार ) ११

ज्ञानेंद्रियाचें शिक्षणः— १६-१८

ज्ञान ( चांगल्या वाइटाचें मुलें

कसें मिळवितात.) ७२-७३


REFBK-0001630

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

१६३०

दा. क्रं.